# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१४/ २०१८** **दिनांक १३.१२.२०१८**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दि.१३.१२.२०१८ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये सकाळी १०.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/४४१३/२०१८, दि.०५.१२.२०१८ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव सदरहु सभा गुरुवार दि.१३.१२.२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता ऐवजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आलेली असल्याचे जा.नं.एसएसएस/वशी-०४/२७२५/२०१८, दि.१०.१२.२०१८ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार गुरुवार दि.१३.१२.२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य ०४. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह, सदस्य
०५. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.ॲड मोहन मोतीराम जयकर तसेच मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

मा.डॉ.मनिषा कायंदे, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.१३.१२.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस मी हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व पर्यावरण मंत्री मा.श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व माननीय मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत अजून कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा मला खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच मा.श्री.अमोल कीर्तीकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.१३.१२.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव मा.श्री.अनिल देसाई व पर्यावरण मंत्री मा.श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे, खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०१.०० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक २०.११.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७२८** **दिनांक २०.११.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१) निर्णय क्र.६९८- यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि. नाशिक यांनी परिक्षण अहवालात नमुद केलेली आकृतीबंध बदलाची शिफारस व त्याबाबत दिलेले विश्लेषण हे संबधीत विभागामध्ये जाऊन प्रत्यक्ष पाहणी करुन तेथील प्रथम दर्शनी परिस्थीतीचा अंदाज घेऊन ढोबळ मानाने दिल्याचे दिसून येते. संबधीत संस्थेस निर्देश देवुनही परिक्षण अहवालात नमुद केलेल्या विविध मुद्दयांच्या तपशिलासह, पुराव्यासह व कारणासह विस्तृत स्वरुपात माहिती दिलेली नाही. सबब, मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि. नाशिक

यांनी सादर केलेल्या परिक्षण अहवालानुसार संस्थान कर्मचारी विषयक धोरणामध्ये बदल करणे संस्थानचे हितावह ठरणार नसून तो स्विकारणेत येवू नये, असे ठरले.

संस्थानमधील मनुष्यबळाचे व्यवस्थापनाबाबत परिक्षण करण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून संस्थेची नेमणूक करण्यात यावी व त्यांचेमार्फत संस्थानमधील मनुष्यबळाचे परिक्षण करण्यात यावे, असे ठरले.

तसेच मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.), लि.नाशिक यांना जी रक्कम रु.७,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये सात लाख) अगाऊ आदा करणेत आलेली आहे, ती रक्कम त्यांनी आजपावेतो केलेल्या कामकाजाचा मोबदला म्हणून सदर कामापोटी अंतिम करुन जमा नावे करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे-

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि. नाशिक यांनी परिक्षण अहवालात नमुद केलेली आकृतीबंध बदलाची शिफारस व त्याबाबत दिलेले विश्लेषण हे संबधीत विभागामध्ये जाऊन प्रत्यक्ष पाहणी करुन तेथील प्रथम दर्शनी परिस्थीतीचा अंदाज घेऊन ढोबळ मानाने दिल्याचे दिसून येते. संबधीत संस्थेस निर्देश देवुनही परिक्षण अहवालात नमुद केलेल्या विविध मुद्दयांच्या तपशिलासह, पुराव्यासह व कारणासह विस्तृत स्वरुपात माहिती दिलेली नाही. सबब, मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि. नाशिक यांनी सादर केलेल्या परिक्षण अहवालानुसार संस्थान कर्मचारी विषयक धोरणामध्ये बदल करणे संस्थानचे हितावह ठरणार नसून तो स्विकारणेत येवू नये, असे ठरले.**

**संस्थानमधील मनुष्यबळाचे व्यवस्थापनाबाबत परिक्षण करण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून संस्थेची नेमणूक करण्यात यावी व त्यांचेमार्फत संस्थानमधील मनुष्यबळाचे परिक्षण करण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.), लि.नाशिक यांना जी रक्कम रु.७,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये सात लाख) अगाऊ आदा करणेत आलेली आहे, ती रक्कम त्यांनी आजपावेतो केलेल्या कामकाजाचा मोबदला म्हणून विषयाकींत कामाची अंतिम करुन जमा नावे करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

२) निर्णय क्र.७१६- यावर सविस्तर च र्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे-

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर शाळांना शासनाकडून अनुदान मिळते काय, सदर शाळांकडून विद्यार्थ्यांना किती फी आकारली जाते. मागणी केलेले अनुदान हे Hardware घेण्यासाठी आहे किंवा Software साठी, भविष्यात Software अद्ययावत करण्यासाठी वेळोवेळी येणाऱ्या खर्चाची तरतुद काय आहे, बसविले जाणारे सीसीटीव्ही कॅमेरे चोरीस जाऊ नये यासाठी काय उपाय योजना आहेत, याबाबत संबधितांकडून सविस्तर माहिती मागवून सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा.**

**(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

३) निर्णय क्र.७२०- यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉ. महेंद्र विलास तांबे व डॉ.गोविंद श्रीपतराव कलाटे या दोघांनी दि.०२/१०/२०१८ रोजीचे अर्जान्वये जुलै-२०१८ पासून नव्याने सुरु झालेला २०० टक्के प्रोत्साहन भत्ता न देता पुर्वीप्रमाणे मिडीयम ऑपरेशनसाठी रक्कम रु. ६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रक्कम रु. १,२००/- (प्रति ऑपरेशनसाठी ) अतिरिक्त दर कायम ठेवणेबाबत केलेली विनंती मान्य करण्यात आली.

श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांना माहे जुलै-२०१८ पासून नव्याने सुरु झालेला २०० टक्के प्रोत्साहन भत्ता न देता पुर्वीप्रमाणेच सायंकाळी ०६.०० ते १०.०० या वेळेत होणारे सर्व ऑपरेशन तसेच आवश्यक असलेले मिडीयम ऑपरेशनसाठी रक्कम रु.६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रक्कम रु.१२००/- या प्रमाणे प्रत्येक ऑपरेशनसाठी दर देण्यात यावे. तसेच डॉ.राम नाईक यांच्या सायंकाळी ०६ नंतर होणाऱ्या केसेस करणेसाठी पुर्ण वेळ भुलतज्ञ डॉक्टरांना प्राधान्य देण्यात यावे. जर पुर्ण वेळ भुलतज्ञ डॉक्टर रजेवर असतील तर पॅनलवरील व्हिजीटींग भुलतज्ञ डॉक्टरांना बोलविण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही - वैद्यकीय संचालक)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉ. महेंद्र विलास तांबे व डॉ.गोविंद श्रीपतराव कलाटे या दोघांनी दि.०२/१०/२०१८ रोजीचे अर्जान्वये जुलै-२०१८ पासून नव्याने सुरु झालेला २०० टक्के प्रोत्साहन भत्ता न देता पुर्वीप्रमाणे मिडीयम ऑपरेशनसाठी रक्कम रु. ६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रक्कम रु. १,२००/- (प्रति ऑपरेशनसाठी ) अतिरिक्त दर कायम ठेवणेबाबत केलेली विनंती मान्य करण्यात आली.

श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांना माहे जुलै-२०१८ पासून नव्याने सुरु झालेला २०० टक्के प्रोत्साहन भत्ता माहे नोव्हेंबर-२०१८ अखेर पावेतो देण्यात यावा. तसेच दि.१ डिसेंबर,२०१८ पासून २०० टक्के प्रोत्साहन भत्ता न देता पुर्वी प्रमाणेच सायंकाळी ०६.०० ते १०.०० या वेळेत होणारे सर्व ऑपरेशन तसेच आवश्यक असलेले मिडीयम ऑपरेशनसाठी रक्कम रु.६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रक्कम रु.१२००/- या प्रमाणे प्रत्येक ऑपरेशनसाठी दर देण्यात यावे. तसेच डॉ.राम नाईक यांच्या सायंकाळी ०६ नंतर होणाऱ्या केसेस करणेसाठी पुर्ण वेळ भुलतज्ञ डॉक्टरांना प्राधान्य देण्यात यावे. जर पुर्ण वेळ भुलतज्ञ डॉक्टर रजेवर असतील तर पॅनलवरील व्हिजीटींग भुलतज्ञ डॉक्टरांना बोलविण्यात यावे, सदरची कार्यवाही दि.०१.१२.२०१८ पासून लागू करावी, असे ठरले. (कार्यवाही – श्री साईबाबा रुग्णालय)

---

४) निर्णय क्र.७२१- महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना दि.०१.१२.२०१८ पासून भरपगारी साप्ताहिक सुट्टी (Paid Weekly Off ) देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- कामगार विभाग/ सामान्य प्रशासन विभाग)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे-

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.५९४ नुसार महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना द्यावयाच्या सोयी सवलतीबाबत समिती सदस्य मा.अडॅ.मोहन जयकर यांनी अभ्यास करुन त्याबाबत शिफारस करावी, असे ठरले होते.

सदर विषयावर कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात आली. कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) अनुज्ञेय असल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि.१.१२.२०१८ पासून भरपगारी साप्ताहीक सुट्टी (Paid Weekly Off) देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- कामगार विभाग/ सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.०२** **शासन निर्णय व परिपत्रके अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजा संबंधीत शासन निर्णय, परिपत्रके व इतर पत्र प्राप्त होतात. सदर पत्रांची एकत्रित रित्या मागासवर्ग कक्षाकडे नोंद घेऊन सदर पत्रावर उचित कार्यवाहीसाठी संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येते. सदर शासन पत्रावर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्यास वरिष्ठांकडे सादर करण्यात येतो.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ चे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१७, निर्णय क्र.३४६ "संस्थानचे कामकाजासंबंधी शासनाचे निर्णय,परिपत्रके वेळोवेळी समितीचे बैठकीत सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत देण्यात यावी व सदर शासन निर्णय, परिपत्रके यांचे वाचन असा विषय अजेंडयामध्ये समाविष्ट करण्यात यावा."असा झालेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.०१/११/२०१८ ते दि.०५/१२/२०१८ अखेर या कालावधीत महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात खालीलप्रमाणे प्राप्त झालेली पत्रे सोबत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | शासन पत्र क्र. व दिनांक | प्राप्त दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ०१ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/ १७९/ प्र.क्र.२०/ का.१६ विधी व न्याय विभाग दि.०७/०४/२०१८ | १६/०४/२०१८ | शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छताविषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस अर्थसहाय्य करणेबाबत |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | शासन शुध्दीपत्रक क्र.सासंवि-१०१८/ १७९/प्र.क्र.२०/का.१६ विधी व न्याय विभाग दि.२२/११/२०१८ | २२/११/२०१८ | शिर्डी शहराच्या साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून शिर्डी नगरपंचायतीस अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत |
| ०३ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१६/ प्र.क्र.१४५/का.१६ / विधी व न्याय विभाग दि.२०/११/२०१८ | २३/११/२०१८ | मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दि.२९/११/२०१८ रोजीच्या आदेशाची (श्री साईबाबा देवस्थान व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या पात्रतेचे पुनः परिक्षण आणि पुर्नविचार करणे) अंमलबजावणी करण्यासाठी दिलेल्या आदेशानुसार त्रयस्थ समिती गठीत करणेबाबत. |
| ०४ | क्र.सासंवि-१०१७/ १९६८/ प्र.क्र. २२७/का.१६ विधी व न्याय विभाग दि.२२/११/२०१८ | २८/११/२०१८ | प्रसार भारती ब्रॉडकास्टींग ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्टयाने देणेत आलेल्या जागेस मुदतवाढीबाबत |
| ०५ | शासन निर्णय क्र.सासंवि-२०१४/६११/ प्र.क्र.८८/का. १६ विधी व न्याय विभाग दि.३०/११/२०१८ | ०१/१२/२०१८ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडून निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याच्या विकासासाठी रु.५०० कोटी इतका निधी उसनवार तत्वावर (बिनव्याजी परत करण्याच्या बोलीवर) जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना देण्यासाठी एक विशेष बाब म्हणून देण्यास मान्यता देण्याबाबत. |
| ०६ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१६१९/ प्र.क्र.१८५/का. १६ विधी व न्याय विभाग दि.३०/११/२०१८ | ०१/१२/२०१८ | मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील जाणारा रस्ता व गट नं.१९५ येथे हेलिपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडून करुन घेण्यास व निधी त्यांचेकडे वर्ग करण्यास मंजूरी देणेबाबत. |
| ०७ | क्र.सासंवि-१०१७/१२९४/प्र.क्र.१३४/का. १६ विधी व न्याय विभाग दि.२२/११/१८ | ०१/१२/२०१८ | संस्थानचे सन २०१६-१७ या अर्थिक वर्षाचे विशेष अंतर्गत लेखापरिक्षण करण्यासाठी मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असोसिएटस्, सी.ए. पुणे या संस्थेने पूर्ण केल्याने त्यांना सन २०१६-१७ या अर्थिक वर्षाच्या विशेष अंतर्गत लेखापरिक्षणाचे बिल रु.६,००,०००/- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ०८ | शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१८ /प्र.क्र.४५/कार्या-०६ सामान्य प्रशासन विभाग दि.२६/११/२०१८ | ०३/१२/२०१८ | माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करुन देणेबाबत. |
| ०९ | महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, उर्ध्व प्रवरा धरण विभाग, (घुलेवाडी) संगमनेर, दि.०१/१२/२०१८ | ०४/१२/२०१८ | बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्ताव – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, शिर्डी नगरपंचायत व कोपरगांव शहर संयुक्त पाणीपुरवठा योजना, ता.राहाता व कोपरगांव, जिल्हा.अहमदनगर निळवंडेधरणातून पाणी आरक्षण प्रस्तावाबाबत |

सदर पत्रे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत वाचन करणेकामी द्यावयाची असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

निर्णय क्र.७२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त शासन निर्णय व परिपत्रक यांचे वाचन करुन त्यांची नोंद घेण्यात आली.

तसेच शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१८ /प्र.क्र.४५/कार्या-०६ सामान्य प्रशासन विभाग दि.२६/११/२०१८- माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करुन देणेबाबतच्या शासन परिपत्रकानुसार प्रत्येक सोमवारी दुपारी ३ ते ५ या काळात नागरिकांना मागणीनुसार अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्याचे निर्देश आहेत.

तथापी संस्थानचे सर्व विभागातील कामकाज हे भाविकांशी संबधीत असून भाविकांना सेवा पुरविणेबाबत आहे. त्यामुळे सदर परिपत्रकाची अंमलबजावणी करतांना एखादया विभागात नागरिकांची गर्दी होऊन परिपत्रकातील नमुद वेळेमध्ये त्या विभागाचे कामकाज बंद पडून भाविकांना पुरवावयाच्या सेवांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. व त्यामुळे भाविकांचा रोष ओढावण्याची शक्यता आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता संस्थानचे बाबतीत परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही प्रत्येक सोमवारी न करता प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी करणे उचित राहील असे समिती सदस्यांचे मत झाले.व त्याप्रमाणे मान्यतेसाठी प्रस्ताव शासनास सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/मागासवर्ग कक्ष)

---

**विषय नं.०३ पंडीत दिनदयाल उपाध्यक्ष शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय, सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रक्कम रु.२,२६,००,०००/- आर्थिक सहाय्य देणेचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** पंडीत दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांनी इमारत बांधकाम रु. १.२३ कोटी व शालेय साहित्य घेण्यासाठी रु. ४८.००लक्ष असे एकूण रक्कम रु १.७१ कोटीची मागणी त्यांचे पत्र जा.क्रं. पं.दी.ऊ.शि.सं/२०१७-२०१८/११ दिनांक १९.०४.२०१७ नुसार केली होती त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे

अ. इमारत बांधकाम खर्च :-

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | इमारत बांधकाम खर्च | रु. २,२२,००,०००/- |
| २ | इमारत बांधकाम निधीतून केलेला खर्च | रु. ९९,००,०००/- |
| ३ | उर्वरीत बांधकामसाठी लागणारी एकूण रक्कम | रु. १,२३,००,०००/- |

ब. शालेय साहित्य खरेदीसाठी लागणारा खर्च

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांसाठी नवीन ६०० बाके | रु. १५,००,०००/- |
| २ | क्रिडा साहित्य | रु. १०,००,०००/- |
| ३ | ग्रंथालय | रु. ३,००,०००/- |
| ४ | सुसज्ज प्रयोगशाळा | रु. ५,००,०००/- |
| ५ | संगणक, लॅब व फर्निचर | रु. १५,००,०००/- |
| ६ | एकूण | ४८,००,०००/- |
| एकूण | **अ+ब रु. १,२३,००,०००+४८,००,०००/-** | **१,७१,००,०००/-** |

अशी एकूण रक्कम रु.१.७१कोटी मात्र मिळणेबाबत विनंती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना केली होती. त्यावर मा. व्यवस्थापन समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय :- दि.०८.९.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७५३ अन्वये चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ आक्टोंबर पासून प्रारंभ होत आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि. ३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु. ३०२३ कोटी मात्रच्या कृती आराखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे व साईभक्तांना पायाभुत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणात खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभुमीवर पंडीत दिनदयाल उपाध्याय यांचे शिक्षण संस्थेस इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रु. १.७१

कोटी मात्र आर्थिक सहाय्य करणे उचित होणार नाही. सबब समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा.असा निर्णय झालेला आहे.

संस्थेने सादर केलेला नविन प्रस्ताव:- आता पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद यांनी दि.०५.०६.२०१८ रोजी रक्कम रु.२.२६ कोटी मात्र अनुदानासाठी फेर प्रस्ताव सादर केला असून, मा.श्री चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेच्या रामचंद्र नाईक विद्यालय, स्पंदन नगर सिडको एन–४ (दक्षिण) औरंगाबाद येथील शाळेच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी व शालेय साहित्य खरेदी करून शाळा सर्व सुविधायुक्त करण्यासाठी निधीची मागणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी यांचेकडे केलेली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

अ. इमारत बांधकाम खर्च :-

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | इमारत बांधकाम खर्च शासन मंजूरीनुसार | रु. २,५५,००,०००/- |
| २ | इमारत बांधकाम निधीतून केलेला खर्च | रु. ९९,००,०००/- |
| ३ | उर्वरीत बांधकामसाठी लागणारी एकूण रक्कम | **रु. १,५६,००,०००/-** |
| | | |

ब. शालेय साहित्य खरेदीसाठी लागणारा खर्च :-

| **अ.न.** | **विवरण** | रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांसाठी नवीन ६०० बाके | रु. १८,००,०००/- |
| २ | क्रिडा साहित्य | रु. १२,००,०००/- |
| ३ | ग्रंथालय सर्व साहित्यासह | रु. ७,००,०००/- |
| ४ | सुसज्ज प्रयोगशाळा साहित्यासह | रु. ८,००,०००/- |
| ५ | संगणक, लॅब व फर्निचर | रु. २५,००,०००/- |
| ६ | एकूण | **७०,००,०००/-** |

क. मागणी :-

| | | |
|---|---|---|
| एकूण | अ + ब रु. १,५६,००,०००+७०,००,०००/- | २,२६,००,०००/- |

| | |
|---|---|
| एकूण प्रकल्प खर्च अ + ब | रु.२,५५,००,०००+७०,००,००० = ३,२५,००,०००/- |

अशी मागणी केली आहे.

विभागाचा अभिप्राय :-

१) मा. व्यवस्थापन समितीने ज्या कारणास्तव दि. ०८.०९.२०१७ च्या सभेतील निर्णय क्रं. ७५३ नुसार प्रस्ताव अमान्य केलेला आहे, त्या बाबींची उद्दीष्ठ पुर्ती अद्याप झालेली नाही. अशातच या संस्थेला मदत केल्यास ही बाब संयुक्तीक होणार नाही असे वाटते.

२) संस्थेने यापूर्वी दिनांक १९.०४.२०१७ च्या प्रस्तावानुसार रु. १.७१ कोटीची मागणी केली होती आता मात्र सुधारीत मागणी रु. २.२६ कोटी केलेली आहे.

३) संस्थचे एक महाविद्यालय, सहा कनिष्ठ महाविद्यालय, नऊ माध्यमिक विद्यालय, चार प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, चार पुर्व प्राथमिक विद्यालय, दोन आश्रम शाळा, दोन वस्तीगृह आहेत. संस्थेच्या अनेक शाखा आहेत. प्रस्तावात नमूद माहितीनुसार सदरची शिक्षणसंस्था मोठी व सक्षम दिसते.

४) अनुदान मागणी ज्या विद्यालयाच्या इमारतीसाठी केली आहे ती शाळा औरंगाबाद शहरात आहे. एकंदरीत शहरात शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणा-या अनेक अनुदानित व विना अनुदानित शैक्षणीक संस्था कार्यरत आहेत.

५) अशाप्रकारे शैक्षणीक क्षेत्रात काम करणा-या अनेक शिक्षण संस्था कार्यरत असून त्याही अशाच प्रकारची मागणी करतील.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:- उपरोक्त नव्याने प्राप्त झालेला प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०.०६.२०१८ रोजीचे सभेत सादर केला असता, त्यावर निर्णय क्रं. ४१८ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, पंडीत दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकामासाठी रु. १.५६ कोटी व शालेय साहित्यासाठी रक्कम रु. ७० लक्ष अशी एकूण रु. २.२६ कोटी आर्थिक सहाय्य देणेबाबतचा प्रस्ताव मान्य केल्यास इतरही खाजगी संस्था अशाप्रकारे आर्थिक सहाय्य मिळणेबाबत मागणी करतील. यास्तव सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला.

मात्र छाननी समितीचे दि. ०६.१०.२०१८ रोजी यावर आयत्या वेळी चर्चा करण्यात येऊन निर्णय क्रं. ४६ अन्वये चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

मा. छाननी समितीचा निर्णय :- पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय, सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रक्कम रु.२,२६,००,०००/- आर्थिक सहाय्य मागणीचा नव्याने प्राप्त प्रस्ताव चर्चेला घेण्यात आला. व्यवस्थापन समितीच्या दि.३०.०६.२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४१८ याचेही अवलोकन करण्यात आले.

छाननी समिती सभासदांचे एकमताने असे मत झाले की, संबधीत शिक्षण संस्थान निरपेक्षपणे शैक्षणिक वातावरणात योग्य वाढ व्हावी व राष्ट्रीय विचारसरणीचा प्रसार विद्यार्थ्यामध्ये प्रतिबिंबीत व्हावा या दिशेने कार्य करीत आहे.

दि.०५.०६.२०१८ रोजी संस्थेने शाळेच्या इमारत बांधकाम व साहित्यासाठी म्हणून रकमेची मागणी केली आहे. सर्वांसाठी गुणात्मक शिक्षण हा संकल्प संस्थेचा दिसत असुन समाजातील सामान्य घटकांसाठी दर्जेदार शिक्षणव्यवस्था निर्माण करण्यासाठी संस्था प्रयत्न करीत आहे. संस्थेला दि.२६.०३.२०१५ औरंगाबाद महानगर पालीका यांनी शाळेकरीता बांधकाम परवानगी दिली आहे.

वरील संस्थेच्या नोंदणी पुस्तकाचे विवरण पाहता संस्थेचे उद्देश व व्यवस्थापन यांची सांगड संस्थेच्या ताळेबंदात दिसुन येते. म्हणून छाननी समितीने एकमताने वरील संस्थेस मागणीप्रमाणे रक्कम रु.२.२६ कोटी रक्कम देण्याचे प्रस्तावास सहमती दर्शविली आहे. सदरील प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेत ठेवण्यात यावा व शासनाकडे पाठविणेत यावा. संस्थेचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर संबधीत संस्थेला साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवथा, शिर्डी यांचेमार्फत आर्थिक मदत झालेबाबतचा इमारतीच्या एका बाजुस श्री साईबाबा संस्थान यांचेमार्फत आर्थिक सहाय्य असा उल्लेख करावा लागेल. संस्थेच्या प्रवेशव्दार/दर्शनीभागावर साईबाबांचे ३x४ फुट आकाराचे फोटो लावणे क्रमप्राप्त होईल. असे ठरले.

प्रस्ताव:- पंडीत दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्या साठी रक्कम रु.२,२६,००,०००/- आर्थिक सहाय्य देणेचे प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७३० **यावर सविस्तर चर्चा होऊन, पंडीत दिनदयाल उपाध्यक्ष शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद या संस्थेची व ते चालवित असलेल्या शाळेची सविस्तर माहिती घ्यावी, सदर संस्था देणगी घेते का? विद्यार्थ्यांकडून किती फी घेतली जाते, या संस्थेमार्फत कोणकोणते सामाजिक उपक्रम राबविले जातात, लाभार्थी कोणत्या आर्थिक स्तरातील आहेत, याबाबत सविस्तर माहिती घेऊन फेरप्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेमोर सादर करावा, असे ठरले.** **(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

विषय नं.०४ **संस्थानमधील कायम कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या ग्रॅच्युईटी रक्कम कमाल मर्यादा रु.१० लक्ष वरुन २० लक्ष करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानमधील कायम कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास, राजीनामा दिल्यास, किंवा तो कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापुर्वीच अकस्मात मयत झाल्यास त्या कर्मचा-याला त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंतची उपदानाची रक्कम The Payment of Gratuity Act, 1972 च्या कायद्यानुसार देण्यात येते. सध्या उपदानाच्या रक्कमेची मर्यादा रु.१० लाख मात्र इतकी आहे.

एखाद्या कर्मचा-याचे, सेवानिवृत्त होण्यापुर्वीच अकस्मात निधन झाल्यास, त्या कर्मचा-याला त्याच्या सेवानिवृत्तीपर्यंतची ग्रॅच्युईटीची रक्कम मिळावी व त्याच्या वारसांना मदत व्हावी, या हेतूने मा.व्यवस्थापन मंडळ समितीचे सभेतील दि.२२-२३/०९/२००१ रोजी झालेल्या निर्णय क्रमांक ४१८ अन्वये संस्थानच्या कायम

कर्मचा-यांसाठी एल.आय.सी.ग्रुप ग्रॅच्युईटी योजना लागु करण्यात आलेली आहे. त्यानुसार एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांचेकडे क्लेम दाखल करुन रक्कम प्राप्त झाल्यानंतर संबंधीत कर्मचा-यांस आदा करण्यात येते.

सदर योजनेअंतर्गत कर्मचा-याला त्याचे शेवटचे वेतन व एकुण सेवा कालावधी विचारात घेऊन ग्रॅच्युईटीची देय रक्कम आदा केली जाते. सध्या The Payment of Gratuity Act, 1972 या कायद्यानुसार उपदान रक्कमेची मर्यादा १०,००,०००/- इतकी आहे. तथापि, The Payment of Gratuity Act, 1972 मध्ये भारत सरकारने खालीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे.

Ministry of Law & Justice (Legislative Dept.) नवी दिल्ली दि.२९ मार्च, २०१८ चे राजपत्र व श्रम आणि रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील दि.२९ मार्च, २०१८ च्या अधिसुचनेनुसार The Payment of Gratuity (Amendment) Act 2018 (No.12 of 2018) अंमलात आणलेला असुन, त्या अन्वये दि. २९ मार्च, २०१८ पासून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यास देय होणा-या ग्रॅच्युईटी रक्कमेची कमाल मर्यादा रु.१० लाखावरुन रु.२० लाखापर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थानमधील कायम कर्मचा-यांना त्यांचे सेवानिवृत्तीनंतर त्यांची सेवा व शेवटचे मुळ वेतन + महागाई भत्ता या आधारे रु.१०.०० लक्ष पर्यंत उपदान उपदान अदा करण्यात येते. आता हि मर्यादा २९, मार्च २०१८ पासुन रु.२०.०० लक्ष अशी झाली आहे. उपदान परिगणना करण्याची कार्यपध्दती The Payment of Gratuity Act, 1972 या कायद्यानुसार खालीलप्रमाणे आहे.

$$\text{उपदानाची रक्कम} = \frac{\text{मुळ वेतन + महागाई भत्ता}}{२६} \times १५ \times \text{पुर्ण सेवेचा कालावधी}$$

हि रक्कम रु.२०.०० लाखापेक्षा जास्त झाल्यास रु.२०.०० लाखाचे मर्यादेत उपदान अदा करण्यात येते.

तरी, उपरोक्तप्रमाणे The Payment of Gratuity Act 1972 मध्ये झालेल्या सुधारणेप्रमाणे कर्मचा-यांना द्यावी लागणारी उपदानाच्या देय रक्कमेची कमाल मर्यादा रु.२०.०० लक्ष पर्यंत वाढविण्यात आल्यामुळे, दि.२९ मार्च, २०१८ नंतर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना या कायद्यानुसार ग्रॅच्युईटी रक्कम आदा करणेकामी मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.७३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, The Payment of Gratuity Act 1972 मध्ये झालेल्या सुधारणेप्रमाणे कर्मचा-यांना द्यावी लागणारी उपदानाच्या (ग्रॅच्युईटी) देय रक्कमेची कमाल मर्यादा रक्कम रु.२०.०० लक्ष पावेतो वाढविण्यात आलेली असल्याने, दि.२९ मार्च,२०१८ नंतर संस्थान सेवेतून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना या कायद्यानुसार ग्रॅच्युईटी रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली. व त्याप्रमाणे शासनास कळविण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.०५** **शिर्डी विमानतळावर आंतरराष्ट्रीय विमान वाहतुक सुरु करण्याचे दृष्टीने नविन टर्मिनल इमारतीचे बांधकाम, विमान पार्किंग व इतर अनुषंगीक कामासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादीत, मुंबई यांचे रक्कम रु.१०० कोटी अनुदान मागणीचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी विमानतळावर आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक सुरु करण्याचे दृष्टीने नविन टर्मिनल इमारतीचे बांधकाम, विमान पार्किंग व इतर अनुषंगीक कामांसाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी रु.१०० कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत दि.२३/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. त्यांचे पत्राचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

“शिर्डी विमानतळावर यशस्वी हवाई वाहतुकीचा वर्षपुर्ती कार्यक्रम महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी दि.०१/१०/२०१८ रोजी प्रवाशांना साई स्कार्फ देवून साजरा केला. याप्रसंगी स्पाईसजेटने त्यांचे बोईंग ७३७ विमानाचे दिल्ली ते शिर्डी व परत असे पहिले उड्डाण केले. सदरहू स्पाईसजेटचे विमानाने आलेल्या प्रवास्यांचे शिर्डी विमानतळावर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मार्फत स्वागत करण्यात आले. विमानतळासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दिलेल्या रु.५० कोटी अनुदाना बद्दल आम्ही संस्थानचे अभारी आहोत. सदर विमानतळावरील वाढती हवाई वाहतूक विचारात घेता सध्याच्या सुविधा विशेषतः टर्मिनल बिल्डींग व पार्किंग स्टॅण्ड्स् यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांनी आवश्यक सुविधांबाबत कार्ययोजना तयार केली आहे. त्यानुसार सध्याचे इमारतीजवळ १२५०० चौरस मिटर इमारत व ॲप्रॉन बांधणे प्रस्तावित केले आहे. त्यासाठी सल्लागार नेमणूक करणेत येत असून, त्यासाठी रु.५० कोटी रकमेची तरतुद केली आहे. तथापी, सदरहू प्रकल्पावरील खर्च रु.१०० कोटीचे वर

जाण्याची शक्यता आहे. याबाबत प्रधान सचिव यांनी विमानतळाचे वाढीव सुविधांसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे निधी मागणी करणेस सहमती दिली आहे. सदरचे टर्मिनल बिल्डींग व पार्किंग स्टॅण्डस् यामध्ये वाढ करणेकामासाठी अंदाजे रु.१५० कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी संस्थानने सदर कामासाठी रु.१०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी विनंती केली आहे तसेच याबाबत निर्णय झाल्यावर संस्थानला प्रकल्पाची सविस्तर माहिती देण्यात येईल."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:- अधिनिमय कलम २१ च्या पोट-कलम (१क) अन्वये, भक्तांच्या सोयीसाठी बस, वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

विभागाचा अभिप्राय :-

१. संस्थानमार्फत यापूर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्र.सासंवि-२०११/(प्र.क्र.४४)/का. १६ दि. २४ जून २०११ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार शिर्डी विमानतळासाठी रु.५० कोटी निधी यापूर्वी देण्यात आलेला आहे.

२. सदर विमानतळाचा उपयोग केवळ साईभक्तांसाठी होत असून त्याचा विकास झाल्यास जगभरातील भाविकांना श्री साईबाबांचे दर्शनाचा लाभ घेता येईल.

३. मा. व्यवस्थापन समितीचे सदर प्रस्तावास मान्यात दिल्यास शासनाचे मान्यतेन अनुदान विमानतळ प्राधिकरणाकडे वर्ग करता येईल.

प्रस्ताव:- शिर्डी विमानतळावर आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक सुरु करण्याचे दृष्टीने नविन टर्मिनल इमारतीचे बांधकाम, विमान पार्किंग व इतर अनुषंगीक कामांसाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी मागणी केलेले रु. १०० कोटी अनुदान उपलब्ध करुन देणेचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७३२ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.०६ केंद्र सरकारच्या सुवर्ण धनीकरण (Gold Monetization Scheme) योजनेअंतर्गत संस्थानचे सोने ठेव स्वरुपात ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** आपल्या देशामध्ये मोठया प्रमाणात सोन्याचा साठा असूनही देशामध्ये सोन्याची आयात मोठया प्रमाणात होत आहे. यावर उपाय म्हणून देशात शिल्लक असलेला सोन्याचा साठा वापरात आणून सोन्याची गुंतवणूक करुन त्यावर आकर्षक असे व्याज देऊन आपल्या देशाचा व गुंतवणुकदारांचा विकास होण्याचा उदात्त दृष्टीकोन समोर ठेवून भारत सरकारने सुवर्ण धनीकरण योजना सुरु केली आहे.

सुवर्ण धनीकरण योजनेचा तपशीलः- ही योजना रिझर्व बॅंकेच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीयकृत बॅंकांच्या ठरावीक शाखामध्येच सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेमध्ये फक्त शुध्द सोने (९९५ शुध्दतेचे सोने) स्वीकारले जाते. सोन्याचे दागिने, अलंकार व वस्तू दिल्यास प्रथम त्या बॅंकेमार्फत वितळून घेऊन, त्याचे शुध्द सोने करुन घेतले जाईल. यासाठी सरकारने देशामध्ये विविध राज्यांत एकूण ३५० संस्थांना शुध्दता तपासण्यासाठी अधिकृत नेमलेले आहे. शुध्दता तपासल्यानंतर ग्राहकाला त्यातील घट तूट वजा जाता शुध्द सोने किती आहे हे सांगितले जाईल. त्याच्या मान्यतेनंतरच त्यातील हिरे, मौल्यवान खडे बाजुला काढले जातील व ते त्याला त्वरीत दिले जातील. नेहमीप्रमाणे अग्निपरीक्षा चाचणीद्वारे दागिण्यातील धूळ, डाग वेगळे करुन सोने वितळविण्यासाठी दिले जाईल. फक्त शुध्द सोने बॅंक घेऊन ते सुवर्ण धनिकरण योजनेच्या (Gold Monetization Scheme) बचत खात्यात जमा करण्यात येईल. सोने शुध्द करण्यासाठी येणारा खर्च, वाहतुक खर्च व विमा खर्च हा संबंधीत सोनेधारक संस्थेस करावा लागेल. सोने शुध्द करण्याची प्रक्रिया सुरु असतांना सोनेधारकांचा प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी कमीत कमी ३० ग्रॅम सोने आवश्यक असून, जास्तीत जास्त किती असावे, यास मर्यादा नाही.

सुवर्ण धनीकरण योजनेतील व्याज दरः- सदर योजना रिझर्व बॅंकेच्या मार्गदर्शनाखाली पोष्ट ऑफीस, राष्ट्रीयीकृत बॅंका तसेच खाजगी बॅंकेमार्फत राबविली जाणार आहे. स्टेट बॅंकेच्या मुंबई येथील बुलीयन शाखेमध्ये सुवर्ण ठेव योजना सुरु आहे. या योजनेत अल्प, मध्यम व दिर्घ अशा तीन मुदतीच्या सुविधा उपलब्ध आहेत, आणि त्यावर तीन वेगवेगळया प्रकारचे व्याजदर मिळणार आहे त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.नं | मुदत | कालावधी | वार्षिक व्याजदर |
|---|---|---|---|
| १ | अल्प मुदत | १ ते ३ वर्ष | ०.५० % ते ०.५५ % |
| २ | मध्यम मुदत | ५ ते ७ वर्ष | २.२५ % |
| ३ | दिर्घ मुदत | १२ ते १५ वर्ष | २.५० % |

सदर योजनेमध्ये सहभागी झाल्यानंतर गुंतवणुकीच्या वेळेस असलेला सोन्याचा सर्वसाधारण दर गृहित धरुन त्याचे सर्टीफिकेट दिले जाईल. व गुंतवणूकीची मुदत संपल्यानंतर गुंतवणुकदारास त्याचे ९९५ शुध्दतेचे सोने अथवा त्यास हवे असल्यास सोन्याची किंमत आदा केली जाईल. त्यासाठीचा पर्याय गुंतवणुकीचेवेळीच द्यावा लागेल. सदर योजनेअंतर्गत मिळणारे व्याज करपात्र तसेच धातू स्वरूपात विकल्यास भांडवली नफा गृहित धरुन कर आकारणी लागू राहिल.

विभागाचा अभिप्रायः- संस्थानकडे दि.३१ मार्च २०१८ अखेर ४१६ किलो सोने वस्तू स्वरुपात उपलब्ध आहे. त्यापैकी साधारणतः १९६ किलो सोने श्रींना दैनंदिन वापरासाठी व गाभा-यात आहेत. तसेच मौल्यवान हिरे असलेले दागिने १८ किलो असे एकुण २१४ किलो वजा जाता साधारणत: २०० किलो सोने उपरोक्त योजनेमध्ये गुंतवणूकीसाठी उपलब्ध होईल. मा.विधी व न्याय विभाग, शासन निर्णय सासंवि-२००५/४०७/(६४)-का.सोळा.दि.३१/०५/२००७ अन्वये सोने वितळविण्याची कार्यपध्दती व त्यासाठी तयार केलेली समिती इ.बाबींची अंमलबजावणी त्यानुसार करुन तसेच त्यामध्ये सुवर्ण धनीकरण योजनेनुसार बँकेचा एक प्रतिनिधी घेऊन सोने वितळविण्याचे कार्यपध्दती अवलंबून संस्थानकडे असलेल्या वस्तू, दागदागिने स्वरूपातील साधारणतः१८ते२४ कॅरेटचे सोने वितळविता येईल.

सदर शुध्द सोने या योजनेअंतर्गत वितळवून मध्यम मुदतीसाठी ठेवल्यास संस्थानला या ठेवीवर साधारणपणे वार्षिक २.२५% इतक्या दराने व्याज मिळेल. सध्याचा साधारणतः रु.३१ लाख प्रति किलो दर गृहित धरल्यास रु.६२ कोटी रक्कमेच्या सोन्यावर साधारणतः वार्षिक रु.१.२५ कोटी व्याज मिळेल, सुरक्षिततेची जोखिम कमी होईल, नव्याने प्राप्त होणा-या सोन्याच्या वस्तू ठेवणेस स्ट्रॅांगरुममध्ये जागा उपलब्ध होईल तसेच देशाच्या विकास कार्यात सहभागी होण्याचे उदिष्ट साध्य होईल.

सुवर्ण धनिकरण योजनेअंतर्गत सहभागी होणेबाबत आर्थिक कार्य विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान यांना F.No.20/6/2015-FT, Dt.12/11/2018 अन्वये पत्र प्राप्त झाले आहे.

प्रस्तावः- दि.३१ मार्च २०१८ अखेर संस्थानकडे श्रींचे दागदागिने, वस्तू स्वरूपात देणगीद्वारे प्राप्त झालेल्या सोन्याच्या वस्तू "सुवर्ण धनिकरण" योजनेअंतर्गत वितळविण्याकरीता साधारणतः २०० किलोचे दागदागिने, वस्तू उपलब्ध होतील. शासन निर्णयाप्रमाणे मोजमापे घेऊन वितळविण्यास प्राप्त होईल. वितळविल्यानंतर त्यामध्ये काही प्रमाणात घट होऊन प्राप्त होणारे शुध्द सोने सुवर्ण धनिकरण योजनेत गुंतवणूक करता येईल. त्यामुळे संस्थानला साधारणतः रु.१.२५ कोटी वार्षिक व्याज मिळेल. तरी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडे दि.३१.०३.२०१८ अखेर उपलब्ध असलेले वितळविण्या योग्य सोने शासन निर्णय दि.३१/०५/२००७ मधील कार्यपध्दतीनुसार वितळवून त्याचे शुध्द सोन्यामध्ये रुपांतर करण्यासाठी प्रथम शासनाची मान्यता घ्यावी. उपलब्ध सोने वितळून प्राप्त होणाऱ्या शुध्द सोन्यापैकी १०० किलो सोने केन्द्र सरकारच्या सुवर्ण धनिकरण योजणेत ठेव स्वरुपात गुंतविणेस मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे मान्यतेसाठी प्रस्ताव शासनास सादर करावा, असे ठरले.**

**प्राप्त होणाऱ्या शुध्द सोन्यापैकी उर्वरीत शुध्द सोन्यातून भाविकांना विक्रीसाठी 'श्रीं' ची प्रतिमा असलेले २.५ ग्रॅम,५ ग्रॅम, व १० ग्रॅम वजनाची नाणी भारत सरकारच्या टांकसाळीतून वेळोवेळी आवश्यकतेप्रमाणे तयार करुन घेण्यास व ती नाणी संस्थानच्या कापडकोटी विभागामार्फत साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. सदर नाणी तयार करण्यासाठी येणाऱ्या आवश्यक खर्चास मान्यता घेण्यासाठी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.०७** **शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येण्याऱ्या परिसरातील दैनंदीन स्वच्छताविषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस रक्कम रु.४२,५१,५९९/- प्रमाणे प्रतिमहा अर्थसहाय्य मंजुरीचे शासन निर्णयाचे अवलोकन होणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.०६.०२.२०१७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून, सदर पत्रामध्ये त्यांनी श्री साईबाबा संस्थानने शिर्डी शहरातील विविध देवदेवतांची मंदीरे ताब्यात घेण्याच्या बदल्यात संपूर्ण शिर्डी शहराच्या स्वच्छतेसाठी रु. २५ लाख मात्र प्रति महिना शिर्डी नगरपालिकेला कायमस्वरुपी द्यावेत. शिर्डी शहराचे जसे नागरीकरण वाढेल तशी या पैशात संस्थानने वाढ करावी, अशी मागणी, सौ. योगिता अभय शेळके पाटील, अध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः- दि. २५.०२.२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. १५७ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरामध्ये श्रीं चे दर्शनासाठी देश विदेशातून साईभक्त येत असतात.यामुळे शिर्डी शहर स्वच्छ असायला हवे. परंतु शिर्डी नगरपंचायतीकडे निधीची कमतरता असल्यामुळे ते संस्थानच्या मदतीशिवाय काम करू शकत नाही. याकरिता उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली.

परंतु शिर्डी शहराचे स्वच्छतेकरिता त्यांनी केलेल्या खर्चाची रक्कम खुपच जास्त आहे. याकरिता संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व इतर अधिकारी यांची मिळून समिती गठीत करण्यात यावी. या समितीने शिर्डी शहराचे स्वच्छतेसाठी प्रत्यक्ष येणारा खर्च निश्चीत करावा व त्याबाबतचा परिपूर्ण अभ्यास करून फेरप्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

उपरोक्त ठरावाचे अनुषंगाने, दि. ०५.०५.२०१७ रोजी मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे कक्षात बैठक झाली. त्या बैठकीस संस्थानचे मुख्यकार्यकारी अधिकारी,श्रीमती रुबल अग्रवाल, डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी, श्री बाबासाहेब घोरपडे, मुख्यलेखाधिकारी, श्री दिलीप उगले, प्रशासकीय अधिकारी, श्री आर बी आहेर, उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, श्री अशोक वाळूंज, प्र. कामगार व विधी अधिकारी, श्री संजय गायकवाड प्र. अधिक्षक, आरोग्य विभाग,श्री सुधाकर कुलकर्णी, लिपीक आरोग्य विभाग तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मा.सौ. योगिता शेळके, नगराध्यक्षा, श्री अभय शेळके, श्री देसले श्री भागवत शेज्वळ बैठकीस हजर होते. सदर बैठकीमध्ये शिर्डी शहर स्वच्छतेसाठी नगरपंचायतीने मागणी केलेल्या रु. २५ लाख मात्रच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षातील संयुक्त बैठकीतील निर्णयः- शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत शहरातील कचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे, स्वच्छता करणे इ. साठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर निविदा उघडल्यानंतर येणारे दर स्विकारून, निविदाधारकाला कार्यारंभ आदेश देणेबाबत नगरपंचायतीचा ठराव नगरपंचायतीने संस्थानला द्यावा. सदर निविदा प्रक्रियेनुसार येणारे दर किंवा नगरपंचायतीने मागणी केलेली रक्कम रु. २५/- लाख मात्र यापैकी जी रक्कम कमी असेल ती प्रतिमाह अनुदान म्हणून देणेबाबत व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेबाबत निर्णय झाला तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी संस्थानकडून स्वच्छतेसाठी देण्यात आलेल्या अनुदानाचा विनीयोग त्याच कामासाठी करण्यात आलेबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संस्थानला प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला द्यावे, असे ठरले.

शिर्डी नगरपंचायतीने नव्याने सादर केलेला प्रस्तावः- शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचा दि.०३.११.२०१७ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला असून, त्यात नगरपंचायतीने शिर्डी नगरपंचयात ही 'क' वर्ग नगरपंचायत असून शहराची लोकसंख्या अंदाजे ४५००० इतकी आहे. श्री साईबाबांच्या दर्शनाकरिता दररोज येणा-या साईभक्तांची संख्या ५० ते ७५ हजार तर उत्सवकाळात साईभक्तांची संख्या २ ते ३ लाख होते. त्यामुळे शहरात वर्षभर येणा-या साईभक्तांकडून तसेच शहरातील नागरिकांकडून देखील मोठया प्रमाणावर कचरा होत असतो.

इतर नगरपरिषदांच्या तुलनेत शिर्डी शहरात स्वच्छतेबाबत विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. व त्यासाठी विशेष यंत्रणा लावणे देखील गरजेचे आहे. यापूर्वी शिर्डी नगरपंचयातीद्वारे तसे प्रयत्न करण्यात आलेले नव्हते. साईभक्तांना व शहरातील नागरीकांना येथे होणा-या अस्वच्छतेचा त्रास होऊ नये, यासाठी, शिर्डी नगरपंचायतीद्वारे स्वच्छताविषयक कामाची व्याप्ती मोठया प्रमाणावर वाढवून व यासाठी मनुष्यबळ व आवश्यक यंत्रणा बंधनकारक करून, शिर्डी शहर स्वच्छतेबाबत शिर्डी नगरपंचातीने हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छताविषयक साफसफाईची सर्व कामे ठोक पद्धतीने करणेसाठी दैनीक लोकमत या वर्तमानपत्रात दि. २६.०९.२०१७ रोजी, तसेच फेर ई – निविदा प्रसिद्ध करण्यात होती.

त्यानुसार शिर्डी नगरपंचायतीकडे एकूण तीन ई- निविदा धारकाच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | संतगाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, गुलाबनगर, दापोडी, पुणे | मे. गुरूजी इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. मिरा भाईंदर, जि. ठाणे | मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. बी.व्ही. जी. हाऊस, प्रिमीयर प्लाझा, जुना मुंबई-पुणे रोड, चिंचवड, पुणे |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीनविषयक साफसफाईची सर्व कामे प्रती महा ठोक पद्धतीने करणे | रु. ६०,७५,७५१/- प्रतिमहा | रु. ६५,६५,६६५/- प्रतिमहा | रु. ४२,५१,५९९/- प्रतिमहा |

उपरोक्त तक्त्यांचे अवलोकन केले असता मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. बी.व्ही. जी. हाऊस, प्रिमीयर प्लाझा, जुना मुंबई-पुणे रोड, चिंचवड, पुणे यांचे दर न्युनतम आलेले आहेत. असे त्यांचे प्रस्तावात नमूद केले आहे.

मागणी:- तरी शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफसफाईची सर्व कामे ठोक पद्धतीने करणेसाठी न्युनतम दराची निवीदातील रकमेप्रमाणे रक्कम रु.४२,५१,५९९/- प्रतिमहा पुढील ५ वर्षाकरिता संस्थानकडून नगरपंचायतीस मिळावी. अशी विनंती शिर्डी नगरपंचायतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १४.११.२०१७ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर केला असता निर्णय क्र. ९५२ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

उपरोक्त विषयावर चर्चा करण्यासाठी आजचे सभेसमोर शिर्डी नगरपंचायतीचे नगरसेवक, अधिकारी व बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे या कंपनीचे प्रतिनिधींना बोलविण्यात आले होते. सभेने शिर्डी नगरपंचायतीने राबविलेली ई- निवीदा प्रक्रिया व टेंडर डॉक्युमेंटचे अवलोकन केले. त्यामध्ये घंटागाडी व कर्मचा-यांची संख्या जास्त आढळून आली. परंतु सुपर्ण शिर्डी शहर स्वच्छतेच्या दृष्ट्रीने त्याची आवश्यकता असलेबाबत नगरसेवक व बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे या कंपनीचे प्रतिनिधींनी सभेस कळविले. यावर यापुर्वीच्या ठरावानुसार शिर्डी नगरपंचायतीस शिर्डी शहर स्वच्छतेसाठी प्रतिमहा रु. २५ लाख मात्र अनुदान देण्याचे ठरलेले आहे, परंतु ई-निवीदा प्रक्रियेमध्ये रु. ४२,५१,५९९/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, याकरिता शिर्डी नगरपंचायतीचे नगरसेवक, अधिकारी व बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे या कंपनीचे प्रतिनिधींनी एकत्रित चर्चा करून यामधील काही बाबी कमी करून, दर कमी करणेचा प्रयत्न करावा, अशा सूचना अध्यक्ष महोदय यांनी दिल्या. परंतु त्यांचे चर्चेअंती दर कमी होऊ शकले नाही. काही बाबी कमी केल्यास स्वच्छतेच्या कामावर त्याचा परिणाम होईल,अशी विनंती नगरसेवकांनी केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफसफाईचे कामे करणेसाठी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना प्रति महा रु.३५,००,०००/-मात्र अनुदान देण्यात यावे व ही रक्कम प्रत्येक महिन्यास त्यांना आदा करणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच उर्वरीत रक्कम शिर्डी नगरपंचायतीने ठेकेदारास आदा करावी. तसेच याबाबत करावयाच्या करारनाम्यातील अटि/शर्ती निश्चित करणेत याव्यात व सदर प्रस्तावास छाननी समितीच्या पुर्व परावनगीने महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात येऊन, त्यानंतर सदर रक्कम दरमहा अदा करणेस सुरवात करावी असे ठरले.

मा. छाननी समितीचा निर्णय:- सदरचा प्रस्ताव दि. २८.१२.२०१७ रोजीच्या मा. छाननी समिती समोर सादर केला असता निर्णय क्र.१९ अन्वये सविस्तर चर्चा करणेत आली. मा.उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्रमांक १०२/ २०१६ व इतर याचिका यांमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २९.११.२०१७ रोजीच्या निकालाच्या अनुषंगाने चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचा कार्यकाळ विचारात घेऊन, संबंधीत ठेकेदार मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचे बरोबरच्या करार दिनांक ०१.१२.२०१७ पासुन ११ महिन्यांसाठी नगरपंचायतीने करावा, असे नगरपंचायतीस कळविणेत यावे. व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे दरमहा रु.३५ लाख मात्र अनुदान नगरपंचायतीस देणेचे मान्य करणेत आले. संबंधीत ठेकेदार यांना सदर टेंडरची सर्व माहिती घेऊन, छाननी समितीच्या पुढील बैठकीत नगरपंचायतीमार्फत बोलविणेत यावे. पुढील बैठकीत ठेकेदार यांचेबरोबर स्वच्छतेच्या ठेक्याबाबत चर्चेअंती होणाऱ्या निर्णयानुसार प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.

शिर्डी नगरपंचायत यांचे पत्र:- शिर्डी नगरपंचायतीचे जा. क्रं. नप/ टे-८/७२/२०१८ दि. ०८.०१.२०१८ अन्वये शिर्डी नगरपंचयातीने जुने मक्तेदार कामाचा तपशील व मासिक खर्च व बी.व्ही.जी. यांचे कामाचा तौलनीक तक्ता सादर केला होता.

शिर्डी नगरपंचायतीने सादर केलेल्या तौलनीक तक्त्याचे अवलोकन होऊन, प्रस्ताव मा. छाननी समितीचे निर्णयार्थ फेरसादर केला असता मा. छाननी समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा. छाननी समितीचा निर्णय:- सदरचा प्रस्ताव दि. १९.०१.२०१८ रोजीच्या मा. छाननी समिती समोर फेर सादर केला असता निर्णय क्र. २४ अन्वये सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, व्यवस्थापन समितीने दिनांक २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १५७ अन्वये रु. २५ लक्ष व दिनांक १४.११.२०१७ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार रु. ३५ लक्ष तत्वतः मंजूर केलेले आहेत. नगरपंचायतीच्या दि. ०८.०१.२०१८ रोजीचे पत्राद्वारे आलेले विवरण पाहता, त्यामध्ये बरीच तफावत दिसून आली. याबाबत बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री गायकवाड यांनी दरातील वाढीव फरक कमी करण्यास असमर्थता दर्शवली. त्यांचे असे म्हणणे पडले की, त्यांच्या कंपनीतर्फे देण्यात आलेल्या शर्ती व अटी नगरपंचायतीने मान्य केलेल्या आहेत व त्यात संस्थानचा कोठेही उल्लेख नाही. त्यामुळे निविदा रक्कम कमी करणे अशक्य आहे. छाननी समितीमध्ये सविस्तर चर्चा होऊन, वाढीव कामाचा तपशील व त्यातील त्रुटी यांचे अवलोकन केल्यानंतर शिर्डी संस्थानतर्फे या कार्यासाठी दरमहा रु. ३० लक्ष मात्र रक्कम ५ वर्षासाठी देण्यात यावी. या ठरावास शासनाची मान्यता घेण्यात यावी. असा निर्णय झाला आहे.

तरी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १४.११.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९५२ अन्वये शिर्डी शहर स्वच्छतेसाठी रु.३५ लक्ष प्रतिमहा देणेबाबत संमती दिलेली आहे. मात्र दि. १९.०१.२०१८ रोजीच्या छाननी समितीचे सभेतील निर्णय क्र.२४ अन्वये रक्कम रु.३० लक्ष प्रतिमहा याप्रमाणे ५ वर्षासाठी देणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार शिर्डी शहर स्वच्छतेसाठी उपरोक्तप्रमाणे निधी मंजुरीच्या प्रस्तावास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे कामी जा. न. एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/५७०६/२०१८ दि. २५ जानेवारी २०१८ रोजी प्रस्ताव सादर केला होता.

शासन निर्णय:- दि.२५ जानेवारी २०१८ च्या शासनास पाठविलेल्या प्रस्तावास अनुसरून खालीलप्रमाणे शासन निर्णय क्र. सासवि.-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि. ०७ एप्रिल २०१८ पारीत झालेला आहे.

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१ (२) (दोन) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था येथील छाननी समितीने मान्यता दिलेप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छताविषयक साफ सफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दरमहा रु. ३० लक्ष इतका निधी पुढील ५ वर्षासाठी अनुदान स्वरुपात उपलब्ध करून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर निधीचा विनीयोग हा केवळ शिर्डी शहराच्या दैनंदिन स्वच्छताविषयक कामकाजासाठी करणे बंधनकारक असून याबाबत शिर्डी नगरपंचायतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांना त्रैमासिक उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त अटिंचे अधिन राहून, दि.१४.११.२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत यांचेशी अटि/शर्ती नुसार करारनामा करणेत आला आहे. तसेच शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छताविषयक साफसफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून अर्थसहाय्य देणेबाबतचा शासन निर्णय पारित झालेला असल्याने, शिर्डी नगरपंचायत यांना प्रतिमहा रक्कम रु. ३० लाख मात्र निधी ५ वर्षासाठी देणेबाबत कार्यवाही चालू करण्यात आलेली आहे. त्यानुसार शिर्डी नगरपंचायतीस माहे एप्रिल पासून रु. ३०.०० लक्ष प्रतिमहिना प्रमाणे अनुदान देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली.

पुनःप्रस्ताव:-शिर्डी नगरपंचायतीचा दि. २८.०४.२०१८ ला प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यात शिर्डी नगरपंचायतीने प्रति महिना ४२.५१ लक्ष रुपये निधी नव्याने प्रस्ताव सादर केला आहे. तसेच मा.सौ. योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या तथा नगराध्यक्षा,शिर्डी नगरपंचायत यांनी मा.अध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दि.०२.०५.२०१८ रोजी दिलेल्या पत्रान्वये शिर्डी नगरपंचायतीच्या विविध विकास कामांचे

प्रस्तावापैकी शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या दैनंदिन स्वच्छताविषय साफ सफाईची कामा संदर्भात घनकचरा व्यवस्थापनबाबत पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| अ.न. | तपशील | प्रस्तावाचे स्वरूप |
|---|---|---|
| ४ | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीस प्रती महिना ४२.५१ लक्ष संपर्ण रक्कम १ डिसेंबर २०१७ पासून मंजूर करणेबाबत | घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीने प्रतिमहीना ४२.५१ लक्ष रुपये निधी मिळविण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. तथापि श्री साईबाबा संस्थान यांनी प्रति महिना ३०.०० इतका निधी मंजूर केला आहे. तथापि प्रती महिना ४२.५१ लक्ष रक्कम १ डिसेंबर २०१७ पासून पुढील ५ वर्षासाठी मंजूर होणेसाठी शिर्डी नगरपंचायतीने नव्याने प्रस्ताव सादर केला आहे. त्यास व्यवस्थापन समिती व छाननी समितीची मान्यता मिळावी. |

व्यवस्थापन समिती व छाननी समितीचे शिफारशीसह शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस विनंती केली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२.०५.२०१८ रोजीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र.३३९ अन्वये शिर्डी नगरपंचायतीच्या मागणीवर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीस प्रती महिना रक्कम रु.३५ लक्ष निधी दि. १ डिसेंबर, २०१७ पासून देण्यात यावा, असे ठरले त्यास छाननी समितीची मान्यता घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. तथापि नगरपंचायतीची मागणी ४२.५१ लक्ष प्रति महिना याचीही माहिती शासनाकडे पाठवावी असा निर्णय झालेला आहे.

मा. छाननी समितीचा निर्णय:- दि. २२.०५.२०१८ रोजीचे मा. छाननी समितीचे निर्णय क्रं. ३४ अन्वये वरील विषयावर सखोल चर्चा झाली, शिर्डी नगरपंचायतीचे दि. ०६.०२.२०१७ चे पत्र, व्यवस्थापन समितीचे दि. २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १५७, शिर्डी नगरपंचायतीचा दि. ०३. ११.२०१७ रोजीचा प्रस्ताव व विभागाचा अभिप्राय, व्यवस्थापन समितीचा अगोदरचा निर्णय, छाननी समितीचे दि. १९.०१.२०१८ रोजीचे बैठकीतील निर्णय व शासन निर्णय दि. ०७.०४.२०१८ या बाबींवर विचार होऊन, पुढील प्रमाणे मत मांडण्यात आले.

छाननी समिती सदस्य श्री सुरेश हावरे व श्री चंद्रशेखर कदम यांनी असे सुचविले की, दि.२८.०४.२०१८ रोजीचा शिर्डी नगरपंचायत यांचा सुधारीत प्रस्ताव व मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३३९ अन्वये विशेष म्हणजे शिर्डी संस्थानचे व नगरपंचायतीचे हद्दीत येणारे भाविक व शासनाचे स्वच्छतेबाबतचे निकष व धोरण लक्षात घेता शिर्डी नगरपंचायतीस स्वच्छतेपोटी प्रती महिना रक्कम रु. ३५ लक्ष निधी दि. ०१.१२.२०१७ पासून देण्यात यावा.

छाननी समितीचे अध्यक्ष न्या. चांदीवाल यांनी असे सुचविले की, स्वच्छता करण्या-या ठेकेदार कंपनीने खर्चाचा, कर्मचा-यांचा, मशिनरी, औषध फवारणी इत्यादी चा व्यापक विचार करता शिर्डी नगरपंचायतीस अनुदान म्हणून देण्यात येणारी दरमहा ३० लक्ष रक्कम योग्य आहे. व या रकमेव्यतिरिक्त जास्तीचा खर्च अपेक्षीत नाही. याबाबी शासनाच्याही निदर्शनास आल्या असून त्यानुसार शासनाने दि. ०७.०४.२०१८ रोजी छाननी समितीने ३५ लक्ष ऐवजी ३० लक्ष दरमहा देण्याचा जो निर्णय घेतला आहे. तो मंजूर केला आहे. अशा परिस्थितीत पुन्हा कोणतेही सबळ कारण नसतांना दरमहा ३० लक्ष ऐवजी ३५ लक्ष करणे अयोग्य आहे. परंतु रु. ३० लक्ष दि.०१.१२.२०१७ पासून देण्यास सहमत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता निर्णय क्रं. ३४ शासनाचे निर्णयासाठी व मान्यतेसाठी पाठविणेत यावा.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३३९ अन्वये व मा. छाननी समिती दि.२२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३४ अन्वये जा. न. एसएसएसटी/वशी/लेखा-अनदुान/९५६/२०१८ दि. २५ मे. २०१८ अन्वये फेरप्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर फेरप्रस्तावाच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्रं. सासवि.-१०१८/१७९/ प्र.क्र.२०/का.१६ दि. ०७ एप्रिल २०१८ मध्ये शासन शुध्दीपत्रक क्रं. सासंवि-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि.२२.११.२०१८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

शासन शुध्दीपत्रक:-" श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१(२) (दोन) मधील तरतुदीनुसार शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफ सफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दि.०१.१२.२०१८ पासून दरमहा रु. ४२,५१,५९९/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात उपलब्ध करून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे."

प्रस्ताव :-

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.३३९ अन्वये शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफ सफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी प्रतिमहा रक्कम रु.३५ लक्ष निधी दि. १ डिसेंबर, २०१७ पासून देणेबाबत निर्णय झालेला आहे.

२) छाननी समितीचे दि. २२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३४ अन्वये रक्कम रु. ३०.०० लक्ष दि. ०१.१२.२०१७ पासून देण्यास मंजूरी दिलेली आहे.

३) विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्र. सासवि.-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि. ०७ एप्रिल २०१८ व शासन शुध्दीपत्रक क्रं. सासंवि-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि. २२.११.२०१८ नुसार शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफ सफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस दि. ०१.१२.२०१७ पासून पुढील ०५ वर्षासाठी अनुदान स्वरुपात उपलब्ध करून देण्यास मान्यता दिलेली आहे.

४) शिर्डी नगरपंचायतीस दि.०१.१२.२०१७ पासून रु.३०.०० लक्ष प्रतिमहा याप्रमाणे माहे. ३०.१०.२०१८ पर्यंत रु. ३,३०,००,०००/- वितरीत करण्यात आलेले आहे. आता दि. २२.११.२०१८ च्या शासन शुद्धीपत्रकानुसार रु. ४२,५१,५९९/- अदा करण्यास मान्यता मिळाल्याने रु. ४२,५१,५९९/- (-) ३०,००,०००/- प्रमाणे रु. रु. १२,५१,५९९/- प्रतिमहा याप्रमाणे दि. ३०.१०.२०१८ पर्यंत फरकाची रक्कम रु. १,३७,६७,५८९/- (अक्षरी रुपये एक कोटी, सदतीस लाख सदुसष्ट हजार, पाचशे एकोनव्वद मात्र) अदा करावी लागणार आहे.

तसेच यापुढे रु. ४२,५१,५९९/- प्रतिमहा याप्रमाणे अनुदान वितरीत करावे लागेल.

उपरोक्त अ. न. १, २, ३ व ४ मध्ये नमूद मा. व्यवस्थापन समिती, छाननी समितीचा निर्णय व विधी व न्याय विभागाचे शासननिर्णय व शासन शुद्धीपत्रक अवलोकनार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.७३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्रं. सासवि.-१०१८/१७९/ प्र.क्र.२०/का.१६ दि. ०७ एप्रिल २०१८ मध्ये शासन शुध्दीपत्रक क्रं. सासंवि-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि.२२.११.२०१८ अन्वये शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफ सफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दि.०१.१२.२०१७ पासून दरमहा रु. ४२,५१,५९९/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात देण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच शिर्डी नगरपंचायतीस दि.०१.१२.२०१७ ते दि. ३०.१०.२०१८ या ११ महिने कालावधीत रक्कम रु.३०.०० लक्ष प्रतिमहा याप्रमाणे रक्कम रु.३,३०,००,०००/- वितरीत करण्यात आलेले आहे. शासनाचे दि.२२.११.२०१८ च्या शुद्धीपत्रकानुसार दि.०१.१२.२०१७ ते दि. ३०.१०.२०१८ या ११ महिने कालावधीतील फरकाची रक्कम रु.१,३७,६७,५८९/- मात्र शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना आदा करणेत मान्यता देण्यात आली. सदरची कार्यवाही दि.०१.०१.२०१९ नंतर करावी.**

**तथापी सदर अनुदानाचा विनियोग योग्य पध्दतीने होत आहे किंवा नाही, नगरपंचायतीने काढलेल्या निविदेतील अटी शर्तीप्रमाणे व कामाच्या व्याप्तीप्रमाणे (Scope Of Work) कार्यवाही ठेकेदाराकडून केली जाते किंवा नाही, तसेच शहरात होणाऱ्या स्वच्छतेबाबत नागरिकांचे अभिप्राय घेणेसाठी संस्थानच्या प्रशासकिय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आवश्यक कर्मचाऱ्यांसह एक समिती स्थापन करण्यात यावी. या समितीने सदर कामाचे दरमहा परिक्षण करावे व त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रत्येक तिमाहीस व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग/सर्व प्रशासकिय अधिकारी)**

---

**विषय नं.०८** **श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धुळे यांना (3Tesla) एमआरआय मशिन व विथ टर्न की बेसीकसाठी रक्कम रु.१४ कोटी मात्र अनुदान देणेचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.ना. श्री गिरीष महाजन, मंत्री वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास महाराष्ट्र शासन यांनी श्रीमती रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पत्र पाठवून खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी मार्फत अनेक समाजपयोगी कामांकरिता मोठयाप्रमाणात देणगी स्वरुपात सहाय्य करण्यात येत आहे. ही बाब नक्कीच अभिनंदनीय आहे. श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे अंतर्गत गोरगरीब रुग्णांच्या तपासणी करणेकरिता एम. आर. आय. स्कॅन हे यंत्र श्री साईबाबा संस्थानकडून मिळणेकरिता प्रस्ताव अधिष्ठाता श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांनी सादर केला आहे.

सदर प्रस्तावात अधिष्ठाता श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे ५४५ खाटा असून या ठिकाणी धुळे नंदुरबार, जळगांव मालेगांव या जिल्हयातील रुग्ण हे विविध उपचारासाठी येत असतात. ही संस्था सन १९८९ पासून सुरू झाल्यापासून येथील विद्यार्थी प्रवेशक्षमता ही १०० असून काही विभागात सीपीएस कोर्सेस, मॉर्डर्न फॉर्मोकोलॉजी कोर्सेस व फेलोशिप कोर्सेस या ठिकाणी सुरू आहे.

या संस्थेत पदव्युत्तर पदवी (पी. जी.) कोर्सेस सुरु होणे नितांत आवश्यक असून या संस्थेकडून चिकीत्सालयीन एकूण ७ विषयात पी. जी. कोर्सेस सुरू करण्यासाठी एमसीआय, नवी दिल्ली यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला असून नजीकच्या कालावधीत केंव्हाही या ठिकाणी पी. जी. करिता निरीक्षण प्रक्रिया सुरू होणार आहे. यामध्य प्रामुख्याने चिकीत्सालयीन विषय स्त्रिरोग प्रसुती विभाग, शल्यचिकित्साशास्त्र, औषधवैद्यकशास्त्र, कान नाक घसा, अस्थिव्यंगोपचार, बालरोगशास्त्र, नेत्रशल्यचिकित्सा, यामध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

या संस्थेत सद्यस्थितीत एम. आर. आय. हे यंत्र उपलब्ध नसल्यामुळे याठिकाणी उपचारासाठी येणा-या गोरगरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात एम. आर. आय. ची चाचणी करण्याकरिता पाठविण्यात येत असते. त्यामुळे नाहक आर्थिक भुर्दंड हा बसत असतो. त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांच्या तसेच लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांची सातत्याने एमआरआय यंत्र उपलब्ध करण्याची मागणी आहे. यामुळे मेंदुच्या व मज्जासंस्थेच्या बारीक आजाराचे निदान करणेसाठी उपयोग होणार आहे.

तसेच धुळे शहर हे दोन राष्ट्रीय महामार्गावर वसलेले असल्यामुळे येथे मोठया प्रमाणात अपघात होत असतात. अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी व निदान होण्यासाठी एमआरआय हे यंत्र अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तसेच रुग्णालयाच्या लेखाशिर्षा क्रं. ५२ यंत्र व साधनसामुग्री अंतर्गत अनुदान उपलब्ध नसल्यामुळे आर्थिक अनुदान उपलब्ध करून देणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच त्यांनी एमआरआय मशीनचे Specification व रु. १४,००,००,०००/-किंमतीचे माहितीपत्रक सादर केले आहे. अर्थ साहाय्य साठी अधिनियमातील तरतुद:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

विभागाचा अभिप्राय :-

अ) राज्यातील जिल्हा रुग्णालयांना सिटी स्कॅन व एक्स रे मशीन खरेदी करणेकामी गत मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४.०६.२०१५ चे सभेत निर्णय क्र. १७९ अन्वये आरोग्य विभागाच्या शासकीय / निमशासकीय रुग्णालयांना रु. ४३.६४ कोटी निधी देणेबाबत निर्णय झालेला आहे, त्याबाबत सिव्हील ॲप्लीकेशन नं. ९६२२/२०१६ दाखल झालेले आहे. सदरचा शासन निर्णय रद्द होणेबाबत विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांना विनंती करण्यात आलेली आहे. मात्र याबाबत अद्यापपावेतो कार्यवाही झालेली नाही.

आ) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साई समाधी शताब्दी सोहळा साजरा करण्यात आला आहे. सदर समाधी शताब्दी सोहळा कालावधीत संस्थानने भक्तांच्या सुविधेसाठी विविध पायाभुत प्रकल्पांचे भुमिपूजन केलेले आहे. तसेच भविष्यातही प्रकल्पासाठी मोठया प्रमाणावर खर्च अपेक्षित आहे.

इ) शासकीय रुग्णालयांना शासनाचे अर्थ संकल्पातून तरतूद उपलब्ध होऊ शकते.

ई) प्राध्यापक व विभाग प्रमुख, क्ष- किरण विभाग श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांनी दि. २०.०७.२०१८ रोजी अधिष्ठाता, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांना लिहीलेल्या पत्रात तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे.

ऊ) शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व हॉस्पीटल एकाच प्रकारच्या मशीनसाठी वेगवेगळया रकमेची मागणी करत असल्याचे दिसून येते.

प्रस्ताव- श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धुळे यांना (3 Tesla) एमआरआय मशीन व विथ टर्न की बेसीकसाठी रक्कम रु. १४ कोटी मात्र अनुदान देणेचे प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.७३५ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.०९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफिसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ देणे व करारनामा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) प्रमाणे विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता,राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,असे नमूद आहे.

प्रस्तावना– मा.अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.४/३ मधील साईउद्यान इमारतीतील १५९९.४१ चौ.फूट जागा शिर्डी पोस्ट ऑफीसकरीता यापूर्वी खालील तक्त्यात नमूद केलेल्या कालावधीसाठी वापरास देणेत आलेली आहे.

| अ.नं. | मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेचा दिनांक व ठराव | करारनामा केलेचा कालावधी |
|---|---|---|
| १ | दि.१३/१२/२००३ निर्णय क्रं.५९० | दि.१८/१२/२००३ ते दि.१७/११/२००४ |
| २ | दि.२७/१२/२००४ निर्णय क्रं.१६६ | दि.१८/११/२००४ ते दि.१७/१०/२००५ |
| ३ | दि.१४/१२/२००५ निर्णय क्रं.७७० | दि.१८/१०/२००५ ते दि.१७/१०/२०१० |
| ४ | दि.२६/०३/२०११ निर्णय क्रं.२३९ | दि.१८/१०/२०१० ते दि.१६/१०/२०११ |
| ५ | दि.२४/०९/२०११ निर्णय क्रं.७३४ | दि.१७/१०/२०११ ते दि.१६/१०/२०१२ |
| ६ | दि.२६/०२/२०१३ निर्णय क्रं.१७९,मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लिकेशन नं.९४२२/०१३ मधील दि.१३/०८/२०१३ रोजीचा आदेश | दि.१७/१०/२०१२ ते दि.१६/१०/२०१३ |
| ७ | दि.०५/०६/२०१४ निर्णय क्रं.४३२,मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लिकेशन नं.१०४२९/२०१४ मधील दि.२२/१२/२०१४ रोजीचा आदेश | दि.१७/१०/२०१३ ते दि.१६/१०/२०१४ |
| ८ | दि.३०/११/२०१६ निर्णय क्रं.७६५ | दि.१७/१०/२०१४ ते दि.१६/१०/२०१५<br>दि.१७/१०/२०१५ ते दि.१६/१०/२०१६<br>दि.१७/१०/२०१६ ते दि.१६/१०/२०१७ |
| ९ | दि.०८/१२/२०१७ निर्णय क्रं.१०४४ | दि.१७/१०/२०१७ ते दि.१६/१०/२०१८ |

पोस्ट ऑफीसच्या वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत दि.१६/१०/२०१८ रोजी संपल्याने मा.अधिक्षक,डाकघर,श्रीरामपूर यांनी दि.०२/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दि.१७/१०/२०१८ ते दि.१६/१०/२०१९ या एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेकामी व लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करणेकामी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- पोस्ट ऑफीस यांना मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीची स.नं.३/४ मधील नगरपंचायत मिळकत नं.५०४ पैकी साईउद्यान इमारतीमध्ये दोन हॉल (१५९९.४१ चौ.फूट) इतकी जागा

दि.१७/१०/२०१८ ते दि.१६/१०/२०१९ या एक वर्षे कालावधीसाठी FRAC प्रमाणे दरमहा रक्कम रु.१२,३८५/- इतके भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरणेस मुदतवाढ देता येईल.

प्रस्ताव– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेस दि.१७/१०/२०१८ ते दि.१६/१०/२०१९ या एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणे व करारनामा करणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७३६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील स.नं.३/४ मधील नगरपंचायत मिळकत नं.५०४ पैकी साईउद्यान इमारतीमध्ये दोन हॉल (१५९९.४१ चौ.फूट) इतकी जागा पोस्ट ऑफिस यांना दि.१७/१०/२०१८ ते दि.१६/१०/२०१९ या एक वर्षे कालावधीसाठी FRAC प्रमाणे दरमहा रक्कम रु.१२,३८५/- इतके भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देण्यास व त्यांचे बरोबर करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.१० **संस्थान मालकीचे शिर्डी येथील स.नं.२ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.१ लगत साईभक्तांचे सोयीसाठी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि. शिर्डी यांना वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत वाढवून देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– संस्थान मालकीचे शिर्डी येथील स.नं.२ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.१ लगत साईभक्तांचे सोयीसाठी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी ११x८ फूट (८८ चौ.फूट) इतकी जागा मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१२१ अन्वये दि.०१/०१/२०१८ ते दि.३०/११/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कम रु.९५७/- आकारुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन वापरास देण्यात आलेली आहे.

सदर जागा वापराची मुदत दि.३०/११/२०१८ रोजी संपुष्टात येत असलेने पुढील ११ महिन्यांसाठीची मुदत वाढवून मिळणेकामी मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.श्रीसासंएक्रेसो/ ८३/२०१८ दि.०५/०७/२०१८ अन्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त विनंतीचे अनुषंगाने उक्त संस्थेस संस्थान मालकीचे शिर्डी येथील स.नं.२ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.१ लगत साईभक्तांचे सोयीसाठी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम साठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यापूर्वी निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कम रु.९५७/- या रकमेत १०% वाढ करुन म्हणजेच रु.९५७/- +१०% रु.९६/-अशीएकूण रक्कम रु.१,०५३/- इतके मासिक भाडे आकारुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१०/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी जागा वापराची मुदत वाढवून देता येईल व त्याप्रमाणे भाडे करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव– संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.२ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.१ लगत साईभक्तांचे सोयीसाठी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या ११x८ फूट (८८ चौ.फूट) या जागेचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यापूर्वी निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कम रु.९५७/- या रकमेत १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.९५७/-+ १०% रु.९६/- अशी एकूण रक्कम रु.१,०५३/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१०/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी भाडेकराराने मुदतवाढ देणेकामी व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.२ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.१ लगत साईभक्तांचे सोयीसाठी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास दिलेल्या ११x८ फूट (८८ चौ.फूट) या जागेचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यापूर्वी निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कम रु.९५७/- या रकमेत १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.९५७/-+ रु.९६/- (१०%) अशी एकूण रक्कम रु.१,०५३/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१०/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी भाडेकराराने मुदतवाढ देण्यास व त्यांचेबरोबर करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.११** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि. शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या संस्थानचे स्वागतकक्ष येथील क्लोकरुम या व्यवसायास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अथवा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५४१अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि. शिर्डी यांना स्वागतकक्ष येथील क्लोकरुम दि.२२/०१/२०१७ ते दि.२१/१२/२०१७ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन रु.१,०३७/-+१०% रु.१०४/- = रु.=१,१४१/- व दि.२२/१२/२०१७ ते दि.२१/११/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन रु.१,१४१/-+१०% रु.११४/- = रु.=१,२५५/- इतकी व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे करारनामा करण्यात आलेला आहे.

यापूर्वी संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील स.नं.१४८ मधील ११४.३२ चौ.मी बांधीव तसेच २६६.२८ चौमी. मोकळी जागा प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना दि.२१/०७/२०१७ ते दि.२०/०६/२०१८ या ११ महिने कालावधीसाठी भाडेपट्टयाने मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत इकडील पत्र जा.क्रं.एसएसएसटी/ मालमत्ता/४३४५/२०१७ दि.२०/११/२०१७ अन्वये शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-२०१७/१९६८/प्र.क्र.२२७/का.१६ दि.०१/०१/२०१८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी संस्थानची मालमत्ता भाडेतत्वावर देणेचे अधिकार समितीस असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी शासनाचे मान्यतेची आवश्यकता नाही असेबाबत इकडेस कळविले आहे.

सबब श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना भाडेकरारावर द्यावयाची संस्थान मालकीची स्वागतकक्ष येथील जागा वापरास मुदतवाढ द्यावयाचा कालावधी हा ११ महिन्यांचा म्हणजेच १ वर्षापेक्षा कमी असल्याने सदर प्रकरणी उक्त शासनाचे पत्रानुसार शासनाच्या परवानगीची आवश्यकता नाही.

सदरची जागा वापराची मुदत दि.२१/११/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील ११ महिने मुदतवाढ मिळणेकामी चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१६/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय - श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थानचे स्वागतकक्ष येथील जागा क्लोकरुमसाठी दि.२२/११/२०१८ ते दि.२१/१०/२०१९ या ११ महिने कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन (रु.१,२५५/-+१०% रु.१२६/- = रु.=१,३८१/- (अक्षरी रु.एक हजार तीनशे एक्यांऐंशी मात्र) इतकी आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन आणि क्लोकरुमची सुविधा साईभक्तांना विनामुल्य देता येईल व पूर्वीप्रमाणेच करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव– श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या स्वागतकक्ष येथील क्लोकरुम या व्यवसायास मुदतवाढ देणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थानचे स्वागतकक्ष येथील जागा क्लोकरुमसाठी दि.२२/११/२०१८ ते दि.२१/१०/२०१९ या ११ महिने कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन रु.१,२५५/-+ रु.१२६/-(१०%) एकुण रक्कम रु.१,३८१/- मात्र इतकी आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन तसेच क्लोकरुमची सुविधा साईभक्तांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास व त्यांचे बरोबर करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

विषय नं.१२ संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील स.नं. १ पै. मधील गेट नं. ४ लगतचे जागेत साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को- ऑप. सोसायटी लि. शिर्डी यांना वापरास दिलेल्या जागा वापराची मुदत वाढवून देणेबाबत.

प्रस्ताव- अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील स.नं.१ पै.मधील गेट नं.४ लगतची जागा साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या सुविधा पुरविणेकामी पादत्राणेगृहासाठी ६x३४ फूट (२०४ चौ.फूट) व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमसाठी १०x१० फूट (१०० चौ.फूट) इतकी जागा मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१७४ अन्वये दि.१३/०१/२०१८ ते दि.१२/१२/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांनी निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कम रु.१,०८७/- आकारुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन वापरास देण्यात आलेली आहे.

यापूर्वी संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील स.नं.१४८ मधील ११४.३२ चौ.मी बांधीव तसेच २६६.२८ चौमी. मोकळी जागा प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना दि.२१/०७/२०१७ ते दि.२०/०६/२०१८ या ११ महिने कालावधीसाठी भाडेपट्टयाने मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत इकडील पत्र जा.क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/४३४५/२०१७ दि.२०/११/२०१७ अन्वये शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-२०१७/१९६८/प्र.क्र.२२७/का.१६ दि.०१/०१/२०१८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी संस्थानची मालमत्ता भाडेतत्वावर देणेचे अधिकार समितीस असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी शासनाचे मान्यतेची आवश्यकता नाही असेबाबत इकडेस कळविले आहे.

सबब श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना भाडेकरारावर द्यावयाची संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील स.नं.१ पै.गेट नं.४ लगतची जागा वापरास मुदतवाढ द्यावयाचा कालावधी हा ११ महिन्यांचा म्हणजेच १ वर्षापेक्षा कमी असल्याने सदर प्रकरणी उक्त शासनाचे पत्रानुसार शासनाच्या परवानगीची आवश्यकता नाही.

सदर जागा वापराची मुदत दि.१२/१२/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील ११ महिन्यांसाठीची मुदत वाढवून मिळणेकामी मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.श्रीसासंएक्रेसो/ १२७/२०१८ दि.२१/०८/२०१८ अन्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय– मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांचे उपरोक्त विनंतीचे अनुषंगाने उक्त संस्थेस संस्थान मालकीचे शिर्डी येथील स.नं.१ पै. चे क्षेत्रातील गेट नं.४ लगत साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणेगृहासाठी६x३४ फूट (२०४ चौ.फूट) ही सुविधा मोफत व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमसाठी १०x१० फूट (१०० चौ.फूट) इतकीवापरास दिलेल्या जागेस सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यापूर्वी निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कम रु.१,०८७/- या रकमेत १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१,०८७/-+१०%रु.१०९/- अशी एकूण रक्कम रु.१,१९६/- इतके मासिक भाडे आकारुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन दि.१३/१२/२०१८ ते दि.१२/११/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी जागा वापराची मुदत वाढवून देता येईल व त्याप्रमाणे भाडे करारानामा करुन घेता येईल.

प्रस्ताव– संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील स.नं.१ पै.चे क्षेत्रातील गेट नं.४ लगत साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांना वापरास दिलेल्या पादत्राणेगृहासाठी ६x३४ फूट (२०४ चौ.फूट) ही सुविधा मोफत पुरविणेसाठी व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमसाठी १०x१० फूट (१०० चौ.फूट) या जागेचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यापूर्वी निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कम रु.१,०८७/- या रकमेत १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१,०८७/-+१०% रु.१०९/- अशी एकूण रक्कम रु.१,१९६/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन दि.१३/१२/२०१८ ते दि.१२/११/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी भाडेकराराने मुदतवाढ देणेकामी व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील स.नं.१ पै.चे क्षेत्रातील गेट नं.४ लगत असलेली ६x३४ फूट (२०४ चौ.फूट) ही जागा साईभक्तांचे सोयीसाठी पादत्राणेगृह सुविधा मोफत पुरविणेकामी तसेच मोबाईल कॅमेरा क्लोकरुमसाठी १०x१० फूट (१०० चौ.फूट) या जागेचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यापूर्वी निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कम रु.१,०८७/- या रकमेत १०% वाढ करुन ( रक्कम रु.१,०८७/- +१०% रु.१०९/-) रक्कम रु.१,१९६/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन दि.१३/१२/२०१८ ते दि.१२/११/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी भाडेकराराने मुदतवाढ देण्यास व त्यांचे बरोबर करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१३** **स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीमधील तळमजल्यावरील ९ चौ.मी. ए.टी.एम.साठी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अथवा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी. इतकी ए.टी.एम.साठी वापरास दिलेल्या जागेची वापराची मुदत दि.२७/०६/२०१८ रोजी संपुष्टात आलेली असलेने मा.शाखाधिकारी,स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१७/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उक्त जागा वापराची मुदत पुढील कालावधीसाठी वाढवून मिळणेकामी इकडेस विनंती केलेली आहे.

यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८२० अन्वये स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.चे वापरासाठी साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील दिलेल्या ९ चौमी जागेस दि.२८/०७/२०१७ ते दि.२७/०६/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.६,०००/- + रु.६००/-(१०%) =एकूण रु.६,६००/- मात्र भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देणेस व त्यांचेबरोबर कायदेशीर करारनामा करुन घेणेकामी मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/ मालमत्ता/४३८८/२०१७ दि.२२/११/२०१७ अन्वये मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेत आलेला होता.

त्यास अनुसरुन त्यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१७/१९६२/प्र.क्र.२२८/का.१६ दि.१/१/२०१८ अन्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये संस्थानची कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही,किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थानच्या मालकीची सदर जागा ११ महीन्यांसाठी लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर स्टेट बॅंक ऑफ इंडीया यांना ए.टी.एम.साठी देण्याकरीता शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. प्रस्तुत प्रकरणी व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने आपणास उचित व आवश्यक कार्यवाही करता येईल," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.साठी भाडेपट्टयाने देण्यात आलेली जागा सन २०१४ चे पूर्वीपासून एक-एक वर्षाच्या मुदतीने लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरास दिलेली आहे. सदर वापरास दिलेली जागा जरी ११-११ महीन्याच्या कराराने वापरास दिली तरी त्याचा वापराचा कालावधी हा सलग एक वर्षापेक्षा जास्त होत असल्याची इकडील धारणा असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) च्या तरतुदीनुसार प्रस्तुतचे प्रकरण शासनाचे विधी व न्याय विभागाकडे स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.साठी संस्थान मालकीची शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील ९ चौमी.जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.२८/०७/२०१७ ते दि.२७/०६/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी मासिक परवाना फी रु.६,६००/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन वापरास देणेकामी मान्यता मिळणेसाठी मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५८४०/२०१८ दि.३१/०१/२०१८ अन्वये सादर करण्यात आलेले होते.

त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१७/१९६२/प्र.क्र.२२८/का.१६ दि.१६/०७/२०१८ अन्वये " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) नुसार श्री साईबाबा संस्थानच्या मालकीची सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील ९ चौमी.जागा (एक गाळा) स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डीच्या ए.टी.एम.साठी दि.२८/०७/२०१७ ते दि.२७/०६/२०१८ या ११ महिन्यांच्याकालावधीसाठी रु.६,६००/- मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देण्यास व त्याबाबतचा कायदेशीर करारनामा करण्यास मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे उक्त कालावधीचा लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात आलेला आहे.

विभागाचा अभिप्राय- स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१७/११/२०१८ रोजीच्या उक्त जागा वापराचे मुदतवाढीचे पत्राचे अनुषंगाने त्यांना ए.टी.एम.चे वापरासाठी साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील दिलेल्या ९ चौमी.जागेस पुढील दि.२८/०६/२०१८ ते दि.२७/०५/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.६,६००/-+१०% रु.६६०/- = एकूण रु.७,२६०/- इतके मासिक भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने जागा वापराची मुदत वाढवून देता येईल व यापूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव– स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी स.नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी.इतकी ए.टी.एम.चे वापरासाठी दिलेल्या जागेच्या वापराची पुढील मुदत दि.२८/०६/२०१८ ते दि.२७/०५/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.६,६००/-+१०% रु.६६०/-अशीएकूण रक्कम रु.७,२६०/- इतके मासिक भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने जागा वापराची मुदत वाढवून देणेच्या व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी स.नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ चौमी.इतकी ए.टी.एम.चे वापरासाठी दि.२८/०६/२०१८ ते दि.२७/०५/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.६,६००/-+ रु.६६०/- (१०%) रक्कम रु.७,२६०/- इतके मासिक भाडे आकारण्यात येवून व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देण्यास व त्यांचे बरोबर करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१४** **सन २०१९-२० करीता मोतीचूर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी बनविणेकामी उक्त्या मजुरीची ई-निविदा काढणे व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१.५० कोटीचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - सन २००४ चा महाराष्ट अधिनियम क्रमांक १४(भाग-४) मध्येमहाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१(१घ)नूसार श्री साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. - नविन प्रस्ताव

प्रस्ताविक- उपरोक्तप्रमाणे अधिनियमास अनुसरुन लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाची दि.०३/०१/२०१४ रोजीपासून श्री साई प्रसादालय विभागापासुन वेगळा करुन स्वतंत्र स्थापना करणेत आलेली आहे.

"श्रीं"चे दर्शन घेतल्यानंतर दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना साईबाबांचा प्रसाद घरी घेऊन जाता यावा या सात्वीक उद्देशाने व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय व अधिनियम व आयएसओ चे नियमावलीस अधिन राहुन अनुसरुन संस्थानचे लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत लाडु व बुंदी प्रसाद तयार करुन त्याचे लाडू प्रसाद वितरण काऊंटर्सवर मोतीचूर लाडू पाकीटांची विक्री केली जाते, तसेच मंदिर दर्शनरांगेत भक्तांना मोफत बुंदी पाकीटे वाटप करण्यासाठी सुटी बुंदी प्रसाद तयार करुन त्याचे ५० ग्रॅम वजनाचे पाकीटे पॅकींग करुन मोफत वाटप करण्यात येतात. त्याचप्रमाणे प्रसादालयामध्ये भक्तांना भोजनात मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी बर्फी प्रसादालयाचे मागणीनुसार तयार करुन देण्यात येत आहे. सदरचे मोतीचूर लाडू,सुटी बुंदी तसेच बर्फी तयार करण्याचे काम लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत करण्यात येत आहे.प्रसादाची निर्मितीसाठी लागणारे कच्चे मटेरियल (हरबरा दाळ,शुध्द तुप, साखर, काजू पाकळी, खिसमिस, हिरवी विलायची, जिलेबी रंग इ.) संस्थानचे मध्यवर्ती भांडार/खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येते. खरेदी विभागानें खरेदी केलेले रॉ मटेरियल हे मध्यवर्ती भांडारकडून दैनंदिन गरजेनुसार मागणी करुन लाडू व बुंदी निर्मितीचे काम करण्या-या ठेकेदाराचे ताब्यात देण्यात येते. सध्या श्री साई केटरर्स, श्रीरामपुर या लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत मोतीचूर बुंदी लाडू व सुट्टी बुंदी तयार करुन घेण्यात येत असुन, दि यशोधरा महिला सह. औद्योगिक संस्था, नाशिक या ठेकेदाराकडुन बर्फी प्रसाद तयार करुन घेणेत येत आहे.

दि.०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७६ (०२) नुसार सन २०१८-१९ (दि.०१ मार्च२०१८ ते दि.२८ फेब्रुवारी २०१९ अखेर) या कालावधीसाठी जा.क्र.एसएसएस/वशी-लाडु प्रसाद/६२४३/२०१८, दि.२०/०२/२०१८ अन्वये, श्री साई केटरर्स, श्रीरामपुर यांना मोतीचुर लाडु, बुंदी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देण्याचे व जा.क्र.एसएसएस/वशी-लाडु प्रसाद/६२४४/२०१८, दि.२०/०२/२०१८ अन्वये, दि यशोधरा महिला सह.औद्यो. उत्पादक संस्था, नाशिक यांना व बर्फी प्रसाद तयार करुन देण्याचे उक्त्या मजुरीचे कार्यकंत्राट देण्यात आले असुन, त्यांचे कार्यकंत्राटांचा कालावधी दि.२८ फेब्रुवारी २०१९ रोजी संपत आहे.

सन २०१९-२० (दि.०१ मार्च २०१९ ते दि.२९ फेब्रुवारी २०२०) या कालावधीसाठी नव्याने मोतीचूर बुंदी लाडू,मोफत वाटपासाठी सुटी बुंदी प्रसाद व भोजनात मिष्ठान्न म्हणुन द्यावयाची बर्फी प्रसाद निर्मितीचे उक्त्या मजूरीची ई - निविदा विविध वृत्तपत्रात जाहिरात देऊन व www.mahatenders.org.in संकेतस्थळावर प्रसिध्द करुन पुढील कालावधीसाठी प्रसाद तयार करुन देणेकामी नव्याने ठेकेदारांची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

मोतीचुर लाडू, बुंदी व बर्फी निर्मिती प्रक्रीयेसाठी ठेकेदारांस मागील ०५ वर्षात खालीलप्रमाणे रक्कम उक्त्या स्वरुपात मजुरी अदा करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | तपशिल | मजुरी रक्कम |
|---|---|---|
| १ | सन २०१३-२०१४ | १,३२,९९,६२०/- |
| २ | सन २०१४-२०१५ | १,४१,२९,२३४/- |
| ३ | सन २०१५-२०१६ | १,३५,८८,९१७/- |
| ४ | सन २०१६-२०१७ | १,१०,४१,०९२/- |
| ५ | सन २०१७ -२०१८ | १,०७,०४,३८३/- |

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- सन २०१८-१९ (दि ०१ मार्च २०१८ पासुन ते दि.२८ फेब्रुवारी २०१९ अखेर) या कालावधीसाठी श्री साई केटरर्स, श्रीरामपुर व दि यशोधरा महिला सह.औद्यो. उत्पादक संस्था, नाशिक यांचे मोतीचुर लाडु प्रसाद, सुटी बुंदी प्रसाद व बर्फी प्रसाद तयार करुन देण्याचे उक्त्या मजुरीचे कार्यकंत्राटांचा कालावधी दि.२८ फेब्रुवारी २०१९ रोजी संपत आहे,त्यामुळे पुढील ०१ वर्ष कालावधीकरीता प्रसाद तयार करुन देणेकामी नव्याने ठेकेदारांची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

त्यास अनुसरुन

१) सन २०१९-२०२०(दि.०१ मार्च २०१९ ते दि.२९ फेब्रुवारी २०२०) करीता मोतीचुर लाडु, बुंदी प्रसाद व बफी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणेकामी आदा करणेत येणा-या उक्ती मजुरीची अंदाजे रक्कम रु. १,५०,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पन्नास लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळण्यास,

२) सदरचे लाडु, बुंदी व बर्फी प्रसादाची निविदा उक्त्या मजुरीने पध्दतीने ठेकेदाची नेमणुक करणेसाठी विविध शहरातील वृत्तपत्रात जाहीरात देण्यास,

तसेच शासनाचे www.mahatenders.org.inया अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७४१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० करीता मोतीचूर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी उक्त्या मजुरीने बनविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१.५० कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

विषय नं.१५ **समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी दर्शनीय भागात जानेवारी-२०१९ ते डिसेंबर-२०१९ या कालावधीत येणाऱ्या उत्सवानिमित्त फुलसजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद - २१ (१) ख मधील रुढीनुसार व प्रथेनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पुजा - अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे.

प्रास्ताविक- संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान, या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते, सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी स्वरुपात सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

जानेवारी-२०१९ ते डिसेंबर-२०१९ या (०१ वर्ष) कालावधीत येणा-या सण व उत्सवानिमित्ताने (महाशिवरात्री, गुढीपाडवा, रामनवमी, दसरा, गुरुपौर्णिमा , दत्तजयंती, श्री कृष्ण जन्माष्टमी, दिपावली, नववर्ष तसेच आषाढी एकादशी) श्री साईबाबा समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी दर्शनीय भागात दरवर्षीप्रमाणे फुलांची सजावट करावयाची आहे.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान -

मागणी- जानेवारी २०१९ ते डिसेंबर - २०१९ या (०१वर्ष) कालावधीत येणा-या महाशिवरात्री, गुढीपाडवा, रामनवमी, दसरा, गुरुपौर्णिमा , दत्तजयंती, श्री कृष्ण जन्माष्टमी, दिपावली, नववर्ष तसेच आषाढी एकादशी या महत्त्वाच्या सण व उत्सवानिमित्ताने समाधी मंदीर , द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी दर्शनीय भागात खालीलप्रमाणे फुलसजावट करता येईल.

| अ.नं. | | ठिकाण | अंतर | करावयाची सजावट |
|---|---|---|---|---|
| A | | **मंदीर** | | |
| | १. | मेन दरवाजा | ६ फुट | तोरण (३ ते ४ पदरीचे तोरण) |
| | २. | नंदी गेट | २२ फुट | विविध फुलांचा पटटा |
| | ३. | फोटो फ्रेमजवळ | ३२X२०X३० फुट | १६ बुके + ३ तोरण |
| | ४. | देणगीपेटीजवळ | २७X२७फुट | ८ बुके , फुलांच्या माळा सोडणे ४ फुटापर्यंत |
| | ५. | फोटो फ्रेमजवळील दगडी कमान | | कटफ्लॉवरन सुशोभित करणे |
| | ६. | समाधी मंदीर उत्तर बाजु | | माळा सोडणे |
| | ७. | समाधीजवळ | | फुलांचे स्टॅण्ड |
| B | | **द्वारकामाई** | | |
| | १. | दगडी फोटो | | फुलांचा पटटा लावणे. |
| | २. | बाहेरील बाजु | ६ फुट | फुलांचे तोरण |
| | ३. | आतील मेनगेट | १९ फुट | फुलांचे तोरण |
| | ४. | आतील फोटो | | फुलांच्या माळा सोडणे व कळसाजवळ फुलांचा पटटा |
| C | | **चावडी** | | |
| | १. | समोरील बाजु | १९ फुट | फुलांचे तोरण |
| | २. | दोन फोटो | | फुलांचा पटटा तसेच कडेने फुलांच्या माळा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३. | समोरील खांब | ५ नग | बुके लावणे |
| D | | **गुरुस्थान** | | |
| | १. | गुरुस्थान मंदीर | | फुलांच्या माळा सोडणे |
| | २. | समोरील बाजु | ३ फुट | फुलांचा पटटा |
| E | | **ग्रामदैवत मंदीर** | | |
| | १. | मारुती मंदीर | २३ फुट | समोरील बाजुचे तोरण |
| | २. | गणेश मंदीर | ६ फुट | फुलांचे तोरण |
| | ३. | शनी मंदीर | ६ फुट | फुलांचे तोरण |
| | ४. | महादेव मंदीर | ६ फुट | फुलांचे तोरण |
| | ५. | नंदादीप | ३ फुट | फुलांचे तोरण |
| F | | **दत्त मंदीर** | ६ फुट | फुलांचे तोरण व माळा सोडणे |
| G | | **मेन गेट** | २६ फुट | समोरील बाजुस फुलांचे तोरण |

उपरोक्तप्रमाणे सण व उत्सवानिमित्त फुलसजावट करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात देऊन तसेच जनसंपर्क विभागामार्फत मंदीर परिसरात फलक लावून देणगीस्वरुपात फुलसजावट करुन देणेकामी साईभक्तांना संस्थानचे खात्यात रक्कम जमा करणेकामी आवाहन करता येईल.

जानेवारी-२०१९ ते डिसेंबर - २०१९ मधील उत्सवांची नावे व प्रत्येकी अंदाजे खर्च पुढील प्रमाणे

| अ.न. | दिनांक | वार | उत्सवाचे नाव | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | ०४-०३-२०१९ | सोमवार | महाशिवरात्री | २,५०,००० |
| २ | ०६-०४-२०१९ | शनिवार | गुढीपाडवा | २,५०,००० |
| ३ | १४-०४-२०१९ | रविवार | रामनवमी | २,५०,००० |
| ४ | १२-०७-२०१९ | शुक्रवार | आषाढी एकादशी | २,५०,००० |
| ५ | १६-०७-२०१९ | गुरुवार | गुरूपौर्णिमा | २,५०,००० |
| ६ | २४-०८-२०१९ | शनिवार | श्री कृष्ण जन्माष्टमी | २,५०,००० |
| ७ | ८-१०-२०१९ | गुरूवार | दसरा(पुण्यतिथी उत्सव) | २,५०,००० |
| ८ | २७-१०-२०१९ | रविवार | दिवाळी | २,५०,००० |
| ९ | ११-१२-२०१९ | बुधवार | श्री दत्त जयंती | २,५०,००० |
| १० | ३१-१२-२०१९ | मंगळवार | नववर्ष-२०२० | २,५०,००० |
| | | | **एकुण** | **२५,००,०००** |

सदर प्रत्येक सण व उत्सवानिमित्ताने रु. २,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार) मात्र या प्रमाणे जानेवारी-२०१९ ते डिसेंबर-२०१९ या (०१वर्ष) कालावधीतील सण व उत्सवानिमित्ताने उपरोक्तप्रमाणे करणेत येणा-या फुलसजावटीसाठी एकुण रु. २५,००,०००/- (पंचवीस लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय- जानेवारी-२०१९ ते डिसेंबर-२०१९ या १ वर्षाच्या कालावधीत येणा-या प्रत्येक उत्सवासाठी समाधी मंदीर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलसजावट करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिदध करुन मंदीर परिसरात फलक लावणेस त्यानुसार साईभक्तांकडून फुलसजावटीकामी येणारी रक्कम संस्थानच्या खात्यात वर्ग करुन, पावती देऊन त्यांची आरती, दर्शन व राहण्याची व्यवस्था मोफत करणेस तसेच सदरची फुलसजावट करणेकामी साईभक्तांकडून प्रतिसाद न मिळालेस सदर फुलसजावट संस्थानमार्फत करणेस व सदरची फुलसजावट करणेकामी ई–निवीदा प्रक्रीया राबविणेस व याकामी येणा-या रु.२५,००,०००/- (पंचवीस लाख) मात्र खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.७४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जानेवारी-२०१९ ते डिसेंबर-२०१९ या १ वर्षाच्या कालावधीत येणा-या प्रत्येक उत्सवासाठी समाधी मंदीर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलसजावट करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात देऊन तसेच मंदीर परिसरात फलक लावून देणगी स्वरुपात फुलसजावट करुन देणेसाठी साईभक्तांना संस्थानचे खात्यात रक्कम जमा करणेकामी आवाहन करण्यात यावे, देणगीदार साईभक्तांना देणगी पावती देऊन त्यांची आरती, दर्शन व राहण्याची व्यवस्था मोफत करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच साईभक्तांकडून प्रतिसाद न मिळाल्यास सदर फुलसजावट संस्थानमार्फत करणेकामी विहीत पध्दतीने ई–निवीदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बगीचा विभाग)**

---

**विषय नं.१६** **शिर्डी शहरात गोशाळा सुरु करणेकामी शासनास पाठविलेल्या प्रस्तावासंदर्भात वेतन व भत्ते यावरील खर्चा संबधीचा तपशिल शासनास सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- २१ (१) (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोई व सुविधा पुरविणे.

प्रास्ताविक- उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, शिर्डी शहरात गोशाळा सुरु करणेकामी निमगाव को-हाळे शिवारात गट नं. १९५ मधील हेलीपॅडशेजारील ००.५६ आर क्षेत्र निश्चित करणेत आलेले असुन बगीचा,बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा इ. विभागासंबंधी होणा-या अंदाजे रु. ३,११,९७,५५६/- (तीन कोटी अकरा लाख सत्त्यान्नव हजार पाचशे छप्पन) मात्र खर्चास मान्यता घेणेत आलेली असून दि. ०४/०४/२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. १६१ नुसार सदर प्रस्ताव मंजुरीसाठी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडे पाठविणेत यावा असे ठरले. त्यानुसार शिर्डी शहरात गोशाळा सुरु करणेकामी अपेक्षित खर्चास तसेच आवश्यक कर्मचारी वर्गास मंजुरी मिळणेबाबत जा.नं.एसएसएसटी/वशी-बगीचा/४८९/२०१८ दि. २७/०४/२०१८ अन्वये महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागास पत्र पाठविणेत आलेले असुन क्र.सासंवि - १०१८/८९२/प्र.क्र.८७/का.१६ दि. १३/०६/२०१८ अन्वये त्यांनी शिर्डी येथे गोशाळा सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचा-यांची वेतनश्रेणी , त्यांच्यावर अपेक्षित असणारा वार्षिक खर्च तसेच मागील ३ वर्षात देवस्थानाच्या उत्पन्नाच्या एकुण किती टक्के खर्च व्यवस्थापन निधीवर करण्यात आला याबाबतचा तपशिल सादर करणेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग तसेच लेखाशाखा विभागास जा.नं.एसएसएसटी/वशी-बगीचा/२७/२०१८ दि. १८/०७/२०१८ अन्वये पत्र पाठवुन उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार माहीती मागविणेत आलेली होती.

शासनाचे पत्र - संदर्भाधीन दि. २७/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये शिर्डी येथे गोशाळा सुरु करण्यासाठी तसेच त्यासाठी येणारा खर्च व कर्मचारी वर्ग यासाठी शासनाची मान्यता देण्याची विनंती केलेली आहे.

शिर्डी येथे गोशाळा सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचा-यांची वेतनश्रेणी त्यांच्यावर अपेक्षित असणारा वार्षिक खर्च तसेच मागील ३ वर्षात देवस्थानाच्या उत्पन्नाच्या एकूण किती टक्के खर्च व्यवस्थापन निधीवर करणेत आला त्याचा तपशिल सादर करण्यात यावा.

मागणी- शिर्डी शहरात गोशाळा सुरु करणेकामी अपेक्षित खर्चास तसेच आवश्यक कर्मचारी वर्गास मंजुरी मिळणेकामी सामान्य प्रशासन शाखा (आस्थापना) विभागामार्फत कर्मचारी वेतनश्रेणी तसेच त्यांच्यावर होणारा अपेक्षित खर्च तसेच लेखाशाखा विभागामार्फत मागील ३ वर्षात देवस्थानाच्या उत्पन्नाच्या एकुण किती टक्के खर्च व्यवस्थापन निधीवर करण्यात आला याबाबत प्राप्त झालेली माहीती खालीलप्रमाणे.

| अ. क्रं | पदनाम | वेतन श्रेणी | देय्य प्रारंभिक मासिक एकूण वेतन (प्रारंभिकमुळवेतन+ग्रेडवेतन+महा.भत्ता) (महा.भत्ता दर १३९ % नुसार) | अंदाजे एकूण वार्षिक वेतन खर्च(१२महिने) |
|---|---|---|---|---|
| ०१ | सहायक पशुधन विकास अधिकारी(Assistant Live - stock development officer) महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ पान ४८ अ.क्र.२९ नुसार | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २८०० | मुळ वेतन +ग्रेड पे+महा.भत्ता =एकूण ८५६०+२८००+१५७९० =२७१५०/- | ३,२५,८००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | लिपीक टंकलेखक | ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन १९०० | मुळ वेतन +ग्रेड पे+महा.भत्ता = एकूण<br>५८३०+१९००+१०७४५ = १८४७५/- | २,२१,७००/- |
| ०३ | सुपरवायझर (मुकादम) | ४४४०-७४४०<br>ग्रेड वेतन १६०० | मुळ वेतन +ग्रेड पे+महा.भत्ता = एकूण<br>४८४०+१६००+८९५२ = १५३९२/- | १,८४,७०४/- |
| ०४ | अकुशल कंत्राटी कर्मचारी | ४३३.१८प्रती दिन | ११२६२.६८/- | १,३५,१५२.१६/- |

अ) मागील ३ वर्षात व्यवस्थापन निधीवर करणेत आलेला खर्च

| अ.क्रं | उत्पन्नाचे आर्थिक वर्ष | एकूण उत्पन्न | खर्च झालेले आर्थिक वर्ष | व्यवस्थापन निधीवरील खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१३ - १४ | ५४१,४३,००,०००/- | २०१४-१५ | ३७,७६,९६,६६०/- | ६.८४ % |
| २ | २०१४ - १५ | ४५६,६०,००,०००/- | २०१५-१६ | ४०,४८,६७,१४७/- | ८.८७% |
| ३ | २०१५ - १६ | ४५८,७०,००,०००/- | २०१६-१७ | ४३,२४,५२,२५६/- | ९.४३% |

ब) उपक्रमाचे नाव व त्यावरील खर्च -

| खर्चाचे आर्थिक वर्ष | कर्मचा-यांवरील खर्च ( साईबाबा व साईनाथ रुग्णालये) | शैक्षणिक संकुल | एकुण |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | ४०,९७,३१,२२३/- | ६,५१,८३,७४३/- | ४७,४९,१४,९६६/- |
| २०१५ -१६ | ४४,३७,५६,८९६/- | ६,९५,०२,६९६/- | ५१,३२,५९,५९२/- |
| २०१६-१७ | ४५,१४,७६,६९७/- | ७,५३,४५,७३०/- | ५२,६८,२२,४२७/- |

क) कर्मचारी वेतन व भत्ता (अ व ब)

| अ.नं. | वर्ष | एकुण उत्पन्न | व्यवस्थापन निधी शैक्षणिक संकुल व रुग्णालय खर्च | एकुण उत्पन्नाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २०१३ - १४ | ५५१,४३,००,०००/- | ८५,२६,११,६२६/- | १५.४६% |
| २ | २०१४ - १५ | ४५६,६०,००,०००/- | ९१,८१,२६,७३९/- | २०.११% |
| ३ | २०१५ - १६ | ४५८,७०,००,०००/- | ९५,९२,७४,६८३/- | २०.९१ % |

शिर्डी शहरात गोशाळा सुरु करणेकामी अपेक्षित खर्चास तसेच आवश्यक कर्मचारी वर्गास मंजुरी मिळणेकामी महाराष्ट्र शासन क्र.सासंवि-१०१८/८९२/प्र.क्र.८७/का.१६ दि. १३/०६/२०१८ रोजीचे विधी व न्याय विभाग यांनी सदर पत्राद्वारे मागविलेल्या माहितीबाबत चर्चा होणे अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय- शिर्डी शहरात गोशाळा सुरु करणेकामी अपेक्षित खर्चास तसेच आवश्यक कर्मचारी वर्गास मंजुरी मिळणेकामी महाराष्ट्र शासनाचे क्रं.सासंवि - १०१८/८९२/प्र.क्र.८७/ का.१६ दि.१३/०६/२०१८ रोजीचे विधी व न्याय विभाग यांचे पत्रानुसार गोशाळा सुरु करणेकामी आवश्यक कर्मचा-यांची वेतनश्रेणी व त्यांच्यावर अपेक्षित असणारा खर्च तसेच मागील ३ वर्षातील व्यवस्थापन निधीवर व संस्थानच्या शैक्षणिक संकूल व रुग्णालये या उपक्रमातील अधिकारी कर्मचारी यांचे वेतनावर झालेल्या खर्चासंबंधी तपशिल सादर केलेला आहे. सदर तपशिल शासनास गोशाळा सुरु करणेचे प्रस्तावासंबंधी पुर्ततेकरिता आवश्यक आहे. सदर वेतन व भत्ते संबंधी तसेच निर्माण करावयाची पदे व त्यावरील अपेक्षित खर्च यासंबंधीचा तपशिल शासनास सादर करणेस मान्यतेस्तव तथा अवलोकनार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.७४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा प्रस्ताव रद्द करुन त्याऐवजी फक्त वृध्द,भाकड व आजारी गायींसाठी गोशाळा सुरु करण्यात यावी, यासाठीचा सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- बगीचा विभाग)**

---

**विषय नं.१७** **श्रींचे समकालीन साईभक्त रावबहादुर हरी विनायक साठे यांचा फोटो व साठेवाडा फलक लावणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबांचे हयातीमध्ये अनेक साईभक्तांनी श्रींची नि:सीम सेवा केली आहे. याबाबतचे पुरावे संस्थान प्रकाशीत श्रीसाईसच्चरित या ग्रंथामध्ये अढळुन येतात. श्रींचे समकालीन त्यांची सेवा केलेल्या एकूण ५३ भक्तांचे फोटो फार पुर्वीपासुन समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये लावण्यात आलेले आहेत.

प्रस्ताव:- अर्जदार श्री दुर्गाप्रसाद अशोक साठे यांचे दि.१७.०८.२०१८ रोजीचे अर्जान्वये श्रींचे समकालीन भक्त रावबहादूर हरी विनायक साठे यांचा फोटो श्रींचे समाधी मंदिराचे सभामंडपात लावणे आणि श्रीगुरुस्थान इथे साठेवाडा नाम व माहिती फलक लावण्यात यावा अशी विनंती केली आहे.

ठराव:-

१) यापुर्वी साठे साठ्ये कुलपुरस्कृत न्यासचे कार्यवाह, श्री सुरेश द.साठे यांनी दि.११.०७.२००६, दि.१०.०६.२००७ व दि.२३.११.२००९रोजीचे पत्रान्वये १)लिंबाचे झाडाजवळ फलक लावून त्यावर कै.हरि विनायक साठे यांची थोडक्यात माहिती व त्यांनी बाबांना देणगी रुपाने दिलेल्या वाड्याची नोंद करावी.२)मंदिर परिसरातील एखाद्या वास्तूस अथवा संपुर्ण प्रशासकीय इमारतीस कै.हरि विनायक साठे यांचे नांव द्यावे कारण ते उपजिल्हाधिकारी होते व आयुष्यभर त्यांनी प्रशासकीय कामातच लक्ष दिले होते.३)दिक्षीत वाड्यात ठेवलेल्या प्रदर्शन दालनात कै.रावबहादुर साठे यांचे छायाचित्र व वर्णनाप्रमाणे एखादे रेखाचित्र लावावे.असे विनंतीचे पत्र दिले होते त्यावर दि.१८.०४.२०१० चे सभेतनिर्णय क्र.४३३ नुसार उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला. त्यानुसार श्री.सुरेश द. साठे, रा. पुणे यांना जा.क्र.एसएसएस/मंदिर/ ७६३०/२०१०, दि.०५.०६.२०१० चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

२) त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८चे सभेमधील विषय नं.०२नुसार श्रींचे समकालीन साईभक्त/ संत यांचे फोटो लावणेबाबत नियमावली निश्चित होणेबाबत विषय ठेवला असतात्यावर निर्णय क्र.२२५(२४) नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समकालीन साईभक्त/ संत यांचे फोटो लावणेची नियमावली निश्चित करणे ही बाब धोरणात्मक असून, त्यावर व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत यावा,अशी या उपसमितीची शिफारस होती. मात्र श्रींच्या समकालीन सर्व भक्तांचे फोटो मंदिरात व मंदिर परिसरामध्ये लावण्यात आले आहेत. त्यामुळे आता पुन्हा त्याबाबत विचार करण्याची आवश्यकता नाही. यास्तव सदर विषय आता बंद करावा, असे ठरले.

विभागाचा अभिप्राय:-

१) श्री साईबाबांच्या हयातीत त्यांची सेवा केलेले व त्यांना अर्पण केलेल्या वास्तू १)बुटी वाडा (समाधी मंदिर), २)दिक्षीत वाडा-म्युझियम हॉल, ३)नवलकर वाडा(सध्या अस्तित्वात नाही), ४) साठे वाडा (सध्या अस्तित्वात नाही)या पैकी अ.नं.३ व ४ या वास्तू आज रोजी अस्तित्वात नाहीत मात्र त्याचा नामोल्लेख श्रीसाईसच्चरित ग्रंथामध्ये अढळुन येतो. अर्जदार यांनी नमूद केलेली वास्तू "साठे वाडा" आजमितीस अस्तीत्वात नसल्याने त्याठिकाणी बोर्ड लावणे उचित वाटत नाही. तसेच श्रीगुरुस्थान मंदिर येथील निंबाच्या झाडाचा व कै.रावबहादु हरि विनायक साठे यांचा संबंध नाही. श्री दुर्गाप्रसाद साठे यांचे मागणीप्रमाणे स्मृती फलक लावल्यास सध्या अस्तित्वात नसलेल्या नवलकर वाडा यांचे वंशज अथवा इतर व्यक्ती स्मृतीफलक लावणेबाबतची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही.सध्याचे स्थीतीत असलेल्या सर्व इमारती व भक्तांच्या निवासस्थानासाठी बांधलेल्या इमारतीस किंवा इतर वास्तूस फक्त श्रीसाईबाबांचे नांव देण्यात आलेले आहे. त्याठिकाणी साईभक्तांची नांवे देणे उचित वाटत नाही. यापुर्वीही संस्थान परिसरात असलेले चार महाद्वारांना कै.बायजाबाई कोते प्रवेशद्वार, कै.तात्या पा. कोते प्रवेशद्वार, कै.म्हाळसापती प्रवेशद्वार, कै.माधवराव देशपांडे महाद्वार, कै.रामचंद्र दादा पा. कोते प्रवेशद्वार अशी श्रींचे समकालीन साईभक्तांची नांवे द्यावीत अशा प्रकारची मागणी शिर्डी ग्रामस्थ यांनी केली.परंतु,संस्थानने तसे केलेले नाही.

२) अर्जदार श्री.दुर्गाप्रसाद साठे यांनी विनंती केल्याप्रमाणे समाधी मंदिर सभामंडपामध्ये फोटो लावणेबाबत असे की, सध्या समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये एकूण ५३ फोटो लावण्यात आलेले आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करणेत आलेली नाही. याबाबत एकूण १९ अर्ज मंदिर विभागाकडे प्राप्त झाले असून, त्यातील काही भक्तांचाच उल्लेख श्रीसाईसच्चरितामध्ये नाममात्र व काहींचा संक्षिप्त असा अढळुन येतो. तसेच काहींचा उल्लेख इतर प्रकाशनामध्ये अढळुन येतो. या सर्वांनी समाधी मंदिर सभामंडपामध्ये श्रींचे समकालीन साईभक्तांचे फोटो लावणेबाबत विनंती केली असून याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे बांधकाम विभागामार्फत श्रीसाईसच्चरितामध्ये उल्लेखीत सर्व

समकालीन भक्तांचे फोटो व प्रसंगचित्रासह सविस्तर माहिती नवीन व स्वतंत्र आर्ट गॅलेरी तयार करुन लावणेबाबत कार्यवाही चालू आहे. त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८चे सभेतील निर्णय क्र.२२५(२४) नुसार श्रींच्या समकालीन सर्व भक्तांचे फोटो मंदिरात व मंदिर परिसरामध्ये लावण्यात आले आहेत. त्यामुळे आता पुन्हा त्याबाबत विचार करण्याची आवश्यकता नाही. यास्तव सदर विषय आता बंद करावा, असे ठरले. त्यामुळे कै.रावबहादुर साठे यांचा फोटो समाधी मंदिर सभामंडपामध्ये लावल्यास इतर भक्त नाराज होण्याची शक्यता आहे, त्याचप्रमाणे वाद निर्माण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

तरी अर्जदार श्री दुर्गाप्रसाद अशोक साठे श्रींचे समकालीन भक्त रावबहादूर हरी विनायक साठे यांचा श्रींचे समाधी मंदिराचे सभामंडपात फोटो लावणे आणि श्रीगुरुस्थान इथे साठेवाडा नाम व माहिती फलक लावण्यात यावा याबाबत उपरोक्त गोष्टींचा विचार व्हावा. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समकालीन त्यांची सेवा केलेल्या भक्तांचे फोटो समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये लावणेबाबत संस्थान प्रशासनाकडे १९ अर्ज प्राप्त झालेले आहेत. या सर्व श्रींचे समकालीन साईभक्तांचा 'श्री साई सच्चरित' मध्ये उल्लेख आहे काय, याबाबत पडताळणी करुन फेरप्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.१८ साईभक्तांना वाटण्यात येणा-या उदी पॅकेट पॅकींगकरीता प्लॅस्टीक रोल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.२१(१) ग मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे. भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावना:- श्रींचे द्वारकामाईतील पवित्र धुनीमधुन प्राप्त होणा-या उदीचा सर्व साईभक्तांना लाभ मिळावा याकरीता संस्थानमार्फत उदीचे पॅकेट तयार करुन सर्व साईभक्तांचे दर्शन झालेनंतर दर्शनरांगेतुन बाहेर येणा-या साईभक्तांना बुंदी वाटपाचे ठिकाणी उदी पॅकेट वितरीत करण्यात येते. श्रींचे उदी पॅकेट पॅकींग करणेकामी मंदिर विभागाकडे ०५ नग उदी पॅकींग मशीन आहेत. या उदी पॅकींग मशीनने प्लॅस्टीक रोलच्या सहाय्याने सुट्टी उदी पॅकेटमध्ये पॅकींग केली जाते. याकामी आवश्यक असणारे प्लॅस्टीकचे रोल पुर्वीपासुन देणगीदार यांचेकडुन स्विकारण्यात येत होते.

प्रस्ताव:- पुर्वीपासुन श्रींचे उदी वाटणेकरिता प्लॅस्टीक रोल साईभक्त श्री.सुशील मंशारमणी, रा.इंदोर हे पुरवित आहेत. त्यांनीदि.०९/०९/२०१८ रोजीचे संदर्भीय पत्रान्वये खाजगी कारणास्तव यापुढे प्लॅस्टीक रोल पुरविणेकामी असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे प्लॅस्टीक रोलची खरेदी वार्षिक ई-टेंडरद्वारे करणे आवश्यक आहे. याबाबत खालील Specification नुसार उदी पॅकींगसाठी प्लॅस्टीक रोल खरेदी विभागामार्फत खरेदी करावे लागणार आहेत.

| Sr.No. | Material Description | Width | Structure | Approx. Requirement | Rate/Kg | Approx. Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Single Color Printed and Multilayered packaging material | 90 mm | 12 PET/ 25 LD | 4800 Kg | 250/- | 12,00,000/- |

विभागाचा अभिप्राय:- मंदिर विभागामार्फत दररोज सरासरी अंदाजे ५५,००० ते ६०,००० उदी पाकीटांचे साईभक्तांना वितरण करण्यात येते. गर्दीचे कालावधीत ७०,००० ते ७५,००० उदीचे पाकीटे वाटण्यात येतात. यासाठी महिन्यामध्ये अंदाजे ४०० किलो प्लॅस्टीक रोलचा वापर केला जातो.मंदिर विभागासाठी वार्षिक प्लॅस्टीक रोल विहित पध्दतीने /ई-टेंडरद्वारे /शासन नियमानुसार खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस याकामी अंदाजे एकूण रुपये १२,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये बारालाख) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.७४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना देण्यात येणारे उदीचे पाकीटांसाठी प्लॅस्टीक रोल खरेदी विभागामार्फत खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.१९** **देणगीदार साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, हैदराबाद यांचे सोन्यामध्ये "श्रध्दा-सबुरी" नावे देणगीदाखल स्विकारणे व श्री व्दारकामाई येथे बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबांचे समाधी मंदिर गाभा-यातील भिंतीवर श्रींचे मूर्तीचे दोन्ही बाजूंनी दगडी खांब आहेत. याठिकाणी साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, रा.हैद्राबाद यांनी त्यांचे दि.०४/०८/२०१८ रोजीचे पत्रानुसार श्रींचे समाधी मंदिरातील श्रींचे मूर्तीचे मागील दोन्ही बाजुस असलेल्या खांबांना सोन्याचे "Shradda" and "Saburi" अशी दोन नांवे इंग्रजी भाषेमध्ये देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली होती. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२०१८ रोजीचे सभेमध्ये याबाबतची मान्यता घेणेकामी विषय नं.०९ नुसार, निर्णय क्र.५४४ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.ठाकूर गजेंद्र सिंग यांनी समाधी मंदिरामध्ये श्रींचे मूर्तीचे मागे असलेल्या भिंतीवरील खांबांवर सोन्यामध्ये "श्रद्धा व सबुरी" अशी दोन नांवे देणगीदाखल लावणेबाबतचा प्रस्ताव समिती सदस्य स्वत: लावणार असल्याने तूर्त स्थगीत ठेवावा. यावेळी समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे यांनी श्रींचे समाधी मंदिरातील श्रींचे मूर्तीचे मागील दोन्ही बाजूस असलेल्या खांबांना सोन्याचे "श्रद्धा" व "सबुरी" अशी दोन नांवे मराठी भाषेमध्ये स्वखर्चाने शताब्दीपुर्वी देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली, त्यास मान्यता देण्यात आली. असेठरले आहे. ठरावात नमूद केल्यानुसार मंदिर विभागाचे दि.२०.०९.२०१८चे मंजूर टिपणीनुसार १)जा.क्र.एसएसएस/ मंदिर/३१३९/२०१८, दि.२८.०९.२०१८ अन्वये श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, रा.हैद्राबाद यांना इतर देणगी वस्तू देणे बाबत व २)जा.क्र.एसएसएस/मंदिर/३१२६/२०१८, दि.२७.०९.२०१८ अन्वये मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडुन श्रद्धा-सबुरी अशी सोन्याची नांवे देणगी देणेबाबत कळविण्यात आले आहे. त्यावर मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य यांनी दे.पा.नं.SLV-18-156अन्वये चांदीचे पत्र्यावर व GLD-18-182 सोन्याचे श्रद्धा-सबुरी अशी दोन नांवे देणगीदाखल दिली असुनश्रींचे समाधी मंदिरात बसविण्यात आलेली आहेत.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२०, निर्णय क्र.६३२ नुसार देणगीदार साईभक्त श्री ठाकुर गजेंद्र सिंग, रा.हैद्राबाद यांनी सोन्यामध्ये देणगीदाखल दिलेली "श्रद्धा" आणि "सबुरी" अशी दोन नावे द्वारकामाई येथे लावणेत यावी, असे ठरले.

विभागाचा अभिप्राय:- श्रींचे द्वारकामाई येथे दिवसें-दिवस वाढती गर्दी व श्रीद्वारकामाईची जागा याचा विचार करता ही एक पुरातन वास्तू आहे. याचे संरक्षण व संवर्धन तसेच जपवणूक/ जतन होणे ही बाब महत्वाची आहे. त्याप्रमाणे याठिकाणी साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, रा.हैद्राबाद यांचेकडुन सोन्यामध्ये देणगीदाखल श्रद्धा व सबुरी अशी सोन्याचे नांवे बसविणेकामी खालील मुद्यांबाबत निर्णय होणेस विनंती.

**अ**) श्रींचे द्वारकामाई येथे देणगीदाखल प्राप्त होणारे श्रद्धा- सबुरी अशी दोन नांवे पवित्र निंबरचे दोन्ही बाजूने लावणे योग्य आहे. त्यामुळे सदरची नांवे बाहेरील साईभक्तांना दिसतील, असे नम्र मत आहे.

**ब**) त्याचप्रमाणे श्रींचे द्वारकामाईतील भिंतीस एरल्डाईटने चिटकवावे लागेल. एरल्डाईटने न चिटकल्यास भिंतीस खिळे-स्क्रु बसवुन फिट करावे लागेल. तरी बांधकाम विभागाचे मार्गदर्शनाने सदर श्रद्धा-सबुरी नांवे बसविणेकामी जागा निश्चित करणेस आदेश होणेस विनंती.

**क**) देणगीदार यांनी दिलेल्या सोन्याची देणगी पावती लेखाशाखेमार्फत करावी लागेल. त्याकरिता त्यांचेमार्फत देण्यात येणा-या सोन्याचे संस्थानमार्फत मुल्यमापन करणे गरजेचे आहे. त्याकरिता देणगीदार यांना सदर वस्तू इतर धातू-लाकडावर बसविणे असल्यास त्याचे वेगवेगळ्या वजनाप्रमाणे मुल्यमापन करावे लागेल. तरी सदर वस्तू शिर्डी येथे येऊन लेखाशाखेच्या कर्मचारी व संस्थान सोनार यांचे समक्ष वजन घेऊन त्यानंतर ते फिट करावे लागेल याबाबतची कल्पना देणगीदार यांना द्यावी लागेल. तसेच देणगीदार यांना सदर सोने वस्तू देणगी स्विकारणेकामी पत्राद्वारे कळविणेस मान्यता असावी.

तरी देणगीदार साईभक्त श्री.ठाकूर गजेंद्र सिंग, रा.हैद्राबाद यांचेकडुन "श्रद्धा-सबुरी" अशी दोन सोन्याची नांवे देणगी स्विकारणेपुर्वी **अ**, **ब** व **क** प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी, तसेच याबाबत देणगी स्विकारणेबाबत मान्यता असावी.

**निर्णय क्र.७४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगीदार साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, हैदराबाद यांचे सोन्यामध्ये "श्रध्दा-सबुरी" नावे देणगीदाखल स्विकारणेस व श्री व्दारकामाई येथे बसविणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच दिल्ली येथील साईभक्त श्री. जयंत यांनी समाधी मंदिरात 'श्रीं' चे मुर्तीवर लावणेकरीता सोन्याची छत्री देणगी स्वरुपात देण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. त्यानुसार सदर सोन्याची छत्री देणगी स्वरुपात घेण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.२०** **मे.चेरी ऑफसेट, सोलापुर यांचे पुस्तक छपाईची अनामत रक्कम जप्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील. "

प्रस्तावीत- प्रकाशने विभागामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे मान्यतेने श्री साईबाबा संस्थानकडील साठा संपुष्टात आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने छपाई करणेसाठी सन-२०१६-१७ या वर्षात संदर्भ क्र.१ नुसार मान्यता घेण्यात येवून त्याप्रमाणे ई-निविदा प्रक्रीया राबविणेत आलेली आहे. सदरील पुस्तक छपाई निविदा प्रक्रीयेत मे.चेरी ऑफसेट सोलापूर यांना एकूण २२ पुस्तके छपाईसाठी दर मंजूर झालेले होते. त्यानुसार त्यांना संदर्भीय २ प्रमाणे कार्यादेश पारीत करणेत आलेला होता. या कामी त्यांनी लेखा.पा.नं.६०७, दि.१९.१०.२०१६ नुसार सुरक्षा अनामत रक्कम रू.१,००,०००/- व लेखा.पा.नं.११८८९१८, दि.०७.०२.२०१७ नुसार ३,३८,३३२/- अशी एकूण रक्कम रू.४,३८,३३२/- (अक्षरी रू.चार लाख अडोतीस हजार तिनशे बत्तीस मात्र) संस्थानमध्ये जमा करणेत आलेली आहे. मे.चेरी ऑफसेट,सोलापूर यांनी मंजूर असलेल्या २२ पुस्तकांपैकी छपाई करून पुरवठा केलेल्या साहित्याचा तपशिल व त्याप्रमाणे संबंधितांना अदा करणेत आलेल्या बीलांचा तपशिल खालीलप्रमाणे-

**"अ"**

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | पुरवठा केलेल्या पुस्तकांचा तपशिल | बील क्रमांक/ दिनांक | नग | दर | अदा रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | खापर्डे डायरी-हिंदी | १४३/ ०४.०४.२०१७ | ९६० | १८.०० | १७,२८०/- |
| ०२ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | खापर्डे डायरी- तामिळ | १४४/०४.०४.२०१७ | १९६० | १६.६५ | ३२,६३४/- |
| ०३ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | श्री साईचे सत्यचरित्र-तेलगू | १४५/०४.०४.२०१७ | ३९६९ | ११३.२० | ४,४९,२९१/- |
| ०४ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | श्री साईचरित्र-तेलगू | १४६/०४.०४.२०१७ | ५८०८ | ४५.२५ | २,६२,८१२/- |
| ०५ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | खापर्डे डायरी-तामिळ | १४७/११.०४.२०१७ | २०६६ | १६.६५ | ३४,३९९/- |
| ०६ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | खापर्डे डायरी-तामिळ | १४८/११.०४.२०१७ | १९९८ | १८.०० | ३५,९६४/- |
| ०७ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | श्री साईचरित्र-तेलगू | १५१/११.०४.२०१७ | २०३२ | ४५.२५ | ९१,९४८/- |
| ०८ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | श्री साईचरित्र- तामिळ | १५२/११.०४.२०१७ | १००५७ | ५२.७५ | ५,३०,५०७/- |
| ०९ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | श्री साई सगुणोपासना-तामिळ | १५३/२७.०४.२०१७ | २००० | १०.८७ | २१,७४०/- |
| १० | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | दैनंदिन साईबोध - मराठी | १५४/२७.०४.२०१७ | ७१२८ | ६६.४० | ४,७३,२९९/- |
| ११ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | श्री साईचरित्र– तामिळ | १५५/२७.०४.२०१७ | ५४८२ | ५२.७५ | २,८९,१७५/- |
| १२ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | दैनंदिन साईबोध-मराठी | १५६/०८.०५.२०१७ | ९३६ | ६६.४० | ६२,१५०/- |
| १३ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | श्री साईचे सत्यचरित्र-तेलगू | १५७/०८.०५.२०१७ | ५००२ | ११३.२० | ५,६६,२२६/- |
| १४ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | श्री साईचरित्र- तेलगू | १५८/०८.०५.२०१७ | ४१६० | ४५.२५ | १,८८,२४०/- |
| १५ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | श्री साईचरित्र-तेलगू | १५९/१६.०५.२०१७ | १०४८० | ४५.२५ | ४,७४,२२०/- |
| १६ | मे.चेरी ऑफसेट,सोलापूर | मातृसाई-तेलगू | १६०/१६.०५.२०१७ | १७१२ | ३४.०० | ५८,२०८/- |
| | | | | | एकूण देय रक्कम रू. | **३५,८८,०९३/-** |

मे.चेरी ऑफसेट, सोलापूर यांनी सदरील कालावधीत संस्थानकडील पुस्तक व छपाई श्री साई दैनंदिनी-२०१७ व कॅलेंडर छपाईचे कामही घेतलेले होते. संदर्भीय २ चे आदेशाचे खंडण करून सदरील २२ पुस्तके छपाईचा पुरवठा आजपावेतो पूर्ण केलेला नाही. याबाबत प्रकाशने विभागाने वेळोवेळी दुरध्वनीवरून, मेलद्वारे, समक्ष कार्यालयात तसेच संदर्भ क्र.४,५,६ अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-प्रकाशने/४३८९/२०१६, दि.२२.११.२०१६, जा.नं.एसएसएस/वशी-प्रकाशने/५००१/१६, दि.२७.१२.२०१६, व जा.नं.एसएसएस/वशी-प्रकाशने/६१०४/१७, दि.०३.०३.२०१७ नुसार वेळोवेळी पत्रव्यवहार करून कळविणेत आलेले आहे. तरीही त्यांनी पत्रान्वये विनंती करून मुदत मागविणे, तसेच प्रत्यक्ष कार्यालयात समक्ष भेटून चुकीची माहीती देवून वेळ घालविला आहे. तसेच जो थोडाफार पुरवठा केलेला आहे. त्या पुस्तकाचे छपाईमध्ये बाईंडींग, पेस्टींग, प्रिंटींग, पॅकींग तसेच कागदाचा दर्जाही मागणीप्रमाणे दिलेला नाही. मे.चेरी ऑफसेट सोलापूर, यांचेकडून सदरील

कालावधीत पुस्तके पुरवठा न झालेने, संस्थानला भक्तांच्या रोषाला सामोरे जावे लागलेले आहे. श्री साईबाबा संस्थानमार्फत संस्थानमार्फत, श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार-प्रसार साईभक्तांपर्यंत व्हावा, या उद्देशाने अशा विविध भाषीक पुस्तकांची छपाई करून ना नफा ना तोटा या धर्तीवर माफक दरात साईभक्तांना पुरविली जातात. परंतू संबंधितांनी संस्थान कार्यादेशाप्रमाणे मंजूर

पुस्तकांचा पुरवठा न केल्याने शिल्लक पुरवठया इतक्या साईभक्तांना पुस्तक खरेदी न करता आल्याने त्यापासून वंचित रहावे लागलेले आहे, यामुळे बाबांचे माहीतीचा प्रचार-प्रसार होण्यास, तसेच मागणीप्रमाणे पुस्तक न मिळाल्याने भक्तांच्या भावना दुखावल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे संस्थान कार्यात बाधा आलेली आहे. संबंधितांनी संस्थान कार्यादेशातील अटी व शर्तीचा भंग केलेला आहे, यातून त्यांची असमर्थता दिसून येते.

मे.चेरी ऑफसेट, सोलापूर यांनी संस्थानला कार्यादेशाप्रमाणे मंजूर २२ पुस्तकांपैकी आजअखेर केलेला पुरवठा व शिल्लक पुस्तक छपाईचा तपशिल खालीलप्रमाणे –

**"ब"**

| अ.नं. | पुस्तक छपाईचा तपशिल | छपाई संख्या | आज अखेर पुरवठा संख्या | शिल्लक पुरवठा संख्या | मंजूर न्युनतम दर सर्व करांसह रू. पै. | शिल्लक पुरवठा येणे बाकी रक्कम रू. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| a | b | c | d | e | f | g |
| १ | श्री साईचरित्र-तेलगू | ४०,००० | २२४८० | १७५२० | ४५.२६ | ७९२९५५.२ |
| २ | श्री साईचरित्र-तामिळ | ४०,००० | १५५३९ | २४४६१ | ५२.७५ | १२९०३१७.७५ |
| ३ | श्री साईचे सत्यचरित्र –तेलगू | १०,००० | ८९७१ | १०२९ | ११३.२ | ११६४८२.८ |
| ४ | मातृसाई- तेलगू | ५००० | १७१२ | ३२८८ | ३४/- | १११७९२/- |
| ५ | दैनंदिनी साईबोध- मराठी | १५००० | ८०६४ | ६९३६ | ६६.४ | ४६०५५०.४ |
| ६ | खापर्डे डायरी-हिंदी | ५००० | २९५८ | २०४२ | १८/- | ३६७५६/- |
| ७ | खापर्डे डायरी- तामिळ | ५००० | ४०२६ | ९७४ | १६.६५ | १६२१७.१ |
| ८ | मुलांचे साईबाबा-मराठी | ७००० | ०० | ७००० | ५.५६ | ३८९२०/- |
| ९ | श्री साईलिलामृत- हिंदी | १५००० | ०० | १५००० | १६.३८ | २४५७००/- |
| १० | श्री साईलिलामृत-गुजराथी | १००० | ०० | १००० | १९.५६ | १९५६०/- |
| ११ | श्री साईनाथ सगुणोपासना- हिंदी आरती | ५०००० | ०० | ५०००० | ८.६४ | ४३२०००/- |
| १२ | श्री साईनाथ सगुणोपासना- इंग्रजी | १५००० | ०० | १५००० | १०.४२ | १५६३००/- |
| १३ | श्री साईनाथ सगुणोपासना- तामिळ | १५००० | २००० | १३००० | १०.८७ | १४१३१०/- |
| १४ | श्री साईनाथ सगुणोपासना- बंगाली | ३००० | ०० | ३००० | ६.९१ | २०७३०/- |
| १५ | श्री साईनाथ सगुणोपासना- उर्दू | १००० | ०० | १००० | ११.४८ | ११४८०/- |
| १६ | श्री साई सच्चरित पोथी- गुजराथी | १००० | ०० | १००० | १२७.५ | १२७५००/- |
| १७ | श्री साई सच्चरित पोथी- हिंदी | ५००० | ०० | ५००० | ९४.९५ | ४७४७५०/- |
| १८ | श्री साई सच्चरित पोथी- कन्नड | १००० | ०० | १००० | १२७.५ | १२७५०० |
| १९ | श्री साईबाबा चित्रावली- मराठी/ इंग्रजी | १०००० | ०० | १०००० | ६.०६ | ६०६०० |
| २० | श्री साईबाबा शिकवण व तत्वज्ञान | ७००० | ०० | ७००० | १३.५७ | ९४९९०/- |
| २१ | श्री साईनाथ सगुणोपासना- तेलगू | ४०००० | ०० | ४०००० | ६.३७ | २५४८००/- |
| २२ | श्री साईनाथ भजनमाला- हिंदी | ५००० | ०० | ५००० | २९.५ | १४७५००/- |
| | | | | | एकूण पुरवठा येणे बाकी रक्कम रू. | ५१,७८,७११.२५ |

मे.चेरी ऑफसेट, सोलापूर यांनी पुस्तकांचा पुरवठा वेळेत न केल्याने संबंधितांनी तक्ता **"अ"** मध्ये दर्शविलेप्रमाणे पुरवठा केलेल्या पुस्तकांचे बिलांतून एकूण देय रक्कम रू.३५,८८,०९३/- मधून १% प्रमाणे दंडात्मक रक्कम रू.३५,८८१/- लेखा. व्हाऊचर नं.२२००, दि.२१.०७.२०१७ प्रमाणे कपात करण्यात आलेली आहे. तरीही त्यांनी पुढे शिल्लक पुस्तक छपाई पुरवठा न करता आवक नं.६२५६, दि.२५.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये पुस्तक छपाई कामासाठी संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम रू. ४,३८,३३२/- परत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्यावर दि.२१.०९.२१८ चे मंजूर प्रस्तावान्वये संबंधितांना जा.नं.एसएसएस/वशी-प्रकाशने/३१०६/१८, दि.२७.०९.२०१८ चे पत्रान्वये आपण संस्थानकडील मंजूर

आदेशातील पुस्तकाचा पुरवठा पुर्ण न केलेने आपली अनामत रक्कम जप्त का करणेत येवू नये ? याबाबत लेखी खुलासा मागविणेत आलेला आहे.

याबाबत संबंधितांनी दि.१२.१०.२०१८ चे खुलासा पत्रामध्ये , माझेकडे सदरील कालावधीत डायरी व कॅलेंडर-२०१७ चे काम होते व तसेच पुस्तकाचे प्रुफ तपासणीचे काम चालू होते व ते दि.१५.१२.२०१६ रोजी मिळाले. त्यानंतर ६ महिन्यापर्यंत म्हणजे १५.०६.२०१७ पर्यंत पुरवठा करणे आवश्यक होते. परंतू त्यांनी आजपावेतो मंजूर २२ पुस्तकांचा पुरवठा पूर्ण न करता उलट-सुलट मेलद्वारे,पत्राद्वारे तसेच समक्ष माहीती दिलेली आहे.

मे.चेरी ऑफसेट,सोलापूर यांनी दि.०६.१०.२०१८ रोजी दिलेला खुलासा असमाधानकारक असल्याने संबंधितांचे कार्यादेशातील तसेच त्यांनी दिलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती क्र.७ नुसार त्यांची अनामत रक्कम रू.४,३८,३३२/- जप्त करून संस्थान खाती जमा करावी,असे स्पष्ट मत आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्रायः- उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे मे.चेरी ऑफसेट, सोलापूर यांचेकडून मंजूर पुस्तके छपाई पुरवठा पूर्ण न झालेने, सदरील कालावधीत संस्थानला भक्तांच्या रोषाला सामोरे जावे लागलेले आहे. संस्थान प्रकाशित पुस्तक छपाईमागे संस्थानचा मुळ उद्देश श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार-प्रसार साईभक्तांपर्यंत व्हावा, हा आहे. परंतू संबंधितांनी वेळेत पुस्तके छपाई केलेली नाही. त्यातून साईभक्तांच्या भावना दुखावल्या गेलेल्या आहेत. संबंधितांनी संस्थान पुस्तक छपाई कार्यादेशातील व त्यांनी दिलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती क्र.७ प्रमाणे भंग केलेला आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र.९ नुसार त्यांनी दि.१२.१०.२०१८ रोजी दिलेला लेखी खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांची पुस्तक छपाई कामासाठी संस्थान जमा असलेली अनामत रक्कम रू.४,३८,३३२/- (चार लाख अडोतीस हजार तिनशे बत्तीस मात्र) जप्त करून संस्थान खाती जमा करावी, व सदर प्रेसचा काळया यादीत समावेश करून ५ वर्षे संस्थान ई-निविदा प्रक्रीयेत भाग घेता येऊ नये, करिता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.७४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.चेरी ऑफसेट, सोलापूर यांची पुस्तक छपाई कामासाठी संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम रू.४,३८,३३२/- मात्र जप्त करून संस्थानखाती जमा करणेत यावी व त्यांचे नावाचा काळया यादीमध्ये समावेश करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री साई सच्चरित तसेच साईलीला या संस्थान प्रकाशीत व्दैमासिकावरील संदेशांबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान अधिनियमातील तरतूद- कलम नं.१७ (२) ठ अन्वये- "श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील "

प्रास्तविक- उपरोक्त विषयास अनुसरून शिर्डी ग्रामस्थांचे संदर्भांकित पत्राची छायाप्रत इकडील कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सदर पत्रात त्यांनी असें म्हटले आहे की-

"सन २००४ ते २०१६ पर्यंत तत्कालीन साईसंस्थानच्या विश्वस्तांनी व प्रशासकीय समितीने साईबाबांच्या विचाराला व संदेशाला तडा जाणार नाही याची काळजी घेतली.

मात्र २०१६ पासून राज्य सरकारने नियुक्त केलेल्या विश्वस्तांकडून राज्य सरकारने साईसंस्थानसाठी दिलेल्या नियमावलीचे सातत्याने उल्लंघन होत आहे. साईसंस्थान सर्व धर्माचे प्रतिक आहे. त्यामुळेच आज साईंच्या दर्शना साठी देश विदेशातील लाखो साईभक्त शिर्डीला येत आहेत."

सदर पत्रात संस्थानच्या प्रकाशने विभागामार्फत प्रकाशित होणा-या प्रकाशनांमार्फत पुढील प्रमाणे मजकूराचा समावेश आढळून येतो-

"साईसतचरित्र व साईलिला मानसिकता मुखपृष्ठावर सबका मलिक एक हा संदेश गायब झाला आहे. तेथे सबका मलिक एक ऐवजी ओम साईनाथायनम असा नवीन संदेश आला आहे. आमची व साईभक्तांची एव्हडीच इच्छा आहे की पुर्वीप्रमाने चाली रीता,रुढी परंपरा कायम ठेवून तातडीने प्रकाशनांवर सबका मलिक एक हा संदेश अधोरेखीत व्हावा"

विभागाचा अभिप्राय- संस्थान मार्फत प्रकाशित होणा-या प्रकाशनांबाबत सदर पत्रात घेतलेल्या आक्षेपासंदर्भात वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे-

१) सर्वच संस्थान प्रकाशनांवर 'सबका मालिक एक' किंवा 'ॐ श्री साईनाथाय *नमः'असा संदेश मुद्रित करण्यात आलेला नाही.*

२) *'सबका मालिक एक'* हे उद्गार श्रीसाईबाबांचे मुखातील असल्याबाबतचा उल्लेख संस्थान प्रकाशित आणि साईभक्त श्री. गो.र.-तथा-अण्णासाहेब दाभोळकर लिखित श्रीसाईसच्चरित या ग्रंथामध्ये कुठेही आल्याचे आढळून येत नाही. साईबाबा हे सर्वधर्मियांचे दैवत होते यावरून तो संदेश रूढ झालेला आहे, असें नम्र मत आहे.

३) भक्तांशी बोलताना साईबाबांच्या तोंडी *'अल्ला भला करेगा'* असें शब्द असत. स्वत कडें ते कधीही मोठेपणा घेत नसत. ते कधीही *'अनल हक्क'* म्हणजे *'मीच परमेश्वर'* असे म्हणत नसत पण त्यांचा उच्चार वारंवार *'यादे हक्क'* म्हणजे *'मी परमेश्वराची याद म्हणजे स्मरण करतो'* हा असें- या माहितीचा समावेश संस्थान प्रकाशित उपरोक्त क्र.१ मध्ये नमूद केलेल्या श्रीसाईसच्चरित या ग्रंथाच्या सुरूवातीला समाविष्ठ केलेल्या आणि साईबाबांचे निकटचे भक्त श्री. हरी सीताराम दीक्षित यांनी लिहिलेल्या उपोद्घातात आढळून येतो. श्री. दीक्षित, यांनी ही माहिती अगदी बारकाईने लिहिल्याचे दिसून येते. साईबाबांचे तोंडी- *सबका मालिक एक* असें शब्द असते तर त्याचा समावेश सदरच्या उपोद्घातात श्री. दीक्षित यांनी निश्चितपणे केला असता किंवा सच्चरितात असलेल्या एकूण ५३ अध्यायांपैकी एखाद्या अध्यायात तो आढळून आला असता.

४) संस्थान प्रकाशनांवरील म्हणजेच श्रीसाईसच्चरित आणि साईलीला या द्वैमासिकावरील *'सबका मालिक एक'* हा संदेष २०१६ नंतर गायब झाला आहे असे उपरोक्त अर्जदार यांनी म्हटले आहे याबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे-

अ) सन २०१० मध्ये श्रीसाईसच्चरित या ग्रंथाची मराठी भाषेतील २८ वी आवृत्ती प्रकाशित झालेली आहे. सदर आवृत्तीच्या मलपृष्ठावर-*ॐ श्री साईनाथाय नम:* असे मुद्रित करण्यात आलेले आहे. सदरची आवृत्ती ही सन २०१० मध्ये म्हणजेच अर्जदार म्हणतात त्याप्रमाणे २०१६ नंतरची नसून ती त्यापूर्वीची आहे.

ब) सन २००१ मध्ये प्रकाशित झालेल्या श्रीसाई दैनंदिनीच्या मलपृष्ठावरही 'ॐ श्री साईनाथाय नम:' असे मुद्रित करण्यात आल्याचे आढळून येते. सदर दैनंदिनीचे प्रकाशनही अर्जदार
यांच्या म्हणण्यानुसार ज्या सालानंतर प्रकाशनांच्या मुखपृष्ठावर बदल झालेला आहे त्या अगोदरचे आहे.

क) श्री साईलीला, सप्टेंबर-ऑक्टोबर सन २००० दसरा-दिवाळी विशेषांक मराठी व हिन्दी- इंग्रजी या अंकाच्या मुखपृष्ठावर *'सबका मालिक एक'* हा संदेश मुद्रित करण्यात आलेला आहे. तथापि, सदरचा संदेश एक सुविचार या अर्थाने किंबहूना त्या अंकाच्या मुखपृष्ठावर जे चित्र मुद्रित करण्यात आलेले आहे त्याच्याशी सुसंगत व त्यास अनुसरून आहे म्हणून छापण्यात आलेला आहे, असें नम्र मत आहे.

प्रस्ताव-तरी सदर पत्रात संस्थान प्रकाशनांवर मुद्रित करण्यात येणा-या संदेशांबाबत घेण्यात आलेल्या आक्षेपांबाबतची वस्तुस्थिती मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत अवलोकनार्थ सादर

**निर्णय क्र.७४८ संस्थान प्रकाशनांवर मुद्रीत करण्यात येणाऱ्या संदेशावर घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत प्रस्तावात नमुद वस्तुस्थितीचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२२ 'साई अर्पण सेवा' मराठी व्दैमासिकाचे प्रकाशन बंद करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत. कलम नं.१७ (२) 'ठ' मध्ये खालील प्रकारे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय-

१) मा. व्यवस्थापन समिती दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६२८.

जुने साईलिला व नवीन साई अर्पण सेवा द्वैमासिक सुरू करणेसाठी प्रस्तावातील परिशिष्ट ' ब ' मध्ये नमूद केलेल्या पदांना मंजूरी मिळणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली.

२) मा.व्यवस्थापन समिती दि.०८.१२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०२३.

साईलिला व साई अर्पण सेवा ही द्वैमासिके निर्धारीत वेळेत प्रसिध्द व्हावीत, याकरिता सदरहू द्वैमासिकांचे संपादकीय कामकाजासाठी स्वतंत्र दोन संपादकांची नेमणूक करणे आवश्यक आहे. परंतू संस्थानच्या

आकृतीबंधामध्ये कार्यकारी संपादकाचे एकच पद असल्यामुळे श्री साईलिला द्वैमासिकाचे कार्यकारी संपादकपदी श्री विद्याधर ताठे, पुणे यांची व साई अर्पण सेवा द्वैमासिकाकाचे कामकाजासाठी श्री भगवान दातार, पुणे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने प्रत्येकी प्रती माह एकत्रित रू.२५,०००/- मात्र मानधनावर दोन वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत यावी. तसेच सदरहू द्वैमासिक अंक निर्धारीत वेळेत प्रसिध्द झाला तरच त्या कालावधीचे मानधन अनुज्ञेय राहील.

३) मा.व्यवस्थापन समिती दि.०७/०३.२०१८ चे सभेतील निर्णय क.१८६.

सदरील प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे साई अर्पण सेवा द्वैमासिक छपाई करून साई भक्तांना उपलब्ध करून देणेकामी छपाईसाठी येणा-या अंदाजे रक्कम रू.१४,७३,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच साई अर्पण सेवा या द्वैमासिकाचा प्रथम तयार होणारा अंक, साईलिला मराठी द्वैमासिकाच्या एकूण ७,००० सभासदांना स्वागत मूल्य म्हणून मोफत वितरण करणेत यावा, व साई अर्पण द्वैमासिकासाठी सभासद होणा-या साईभक्तांना, सभासद झाल्यानंतरचा पहिला अंक मोफत वितरीत करणेत यावा.

४) मा.व्यवस्थापन समिती दि.३०/०६/२०१८ चे सभेतील निर्णय क्र.४६०.

साई अर्पण अंकासाठी सभासद न झाल्याने सध्या अंकाच्या २,००० प्रतींची छपाई करावी. सदरचे अंक श्री गुरूपौर्णिमा उत्सव-२०१८ चे उत्सवाची येणा-या मान्यवरांना, भक्तांना मोफत देणेत यावे. तसेच सदरची छपाई पहिल्या अंकाचे प्रिन्टर्स प्रिन्ट प्लस प्रा.लि.मुंबई हे पहिल्या अंकाचे छपाई दरात २,००० अंकाची छपाई करणेस तयार असल्यास प्रिन्टर्स प्रिन्ट प्लस प्रा.लि.मुंबई यांना छपाईचा कार्यादेश देण्यात यावा. तसेच छपाई करण्यास तयार नसल्यास तातडीने ई-मेलद्वारे दरपत्रके मागवून छपाई करून घेण्यात यावी. तसेच पुढील अंकही प्रत्येकी २,००० प्रती छापून भक्तांना मंदिरात मोफत वितरीत करण्यात यावे.

प्रस्ताविकः-

१) मा. व्यवस्थापन समिती दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६२८ नुसार श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे वतीने 'साई अर्पण सेवा'- मराठी या नुतन व्दैमासिक नियतकालिक निर्मितीकामी मान्यता मिळालेली आहे.

२) सदरील अंकाचे संपादकीय कामकाजासाठी श्री भगवान दातार, यांची विशेष कार्य अधिकारी संदर्भ क्र.२ चे मान्यतेने कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेत करण्यात येवून जा.नं.एसएसएस/वशी-साप्रशा-आस्थापना/५६४१/१८, दि.२२.०१.२०१८ नेमणूक कार्यादेश देण्यात आलेला आहे.

३) सदर अंकात संस्थान मार्फत राबविण्यात आलेल्या नवीन योजना, सुधारणा, संस्थानचे उत्सव आदी माहिती प्रकाशित करण्यात येते.

४) मा.व्यवस्थापन समिती दि.०७.०३.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८६ अन्वये साई अर्पण सेवा द्वैमासिक छपाईसाठी येणा-या अंदाजे रक्कम रू.१४,७३,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरील प्रथम अंक साईलिला मराठी द्वैमासिकाचे ७,००० सभासदांना स्वागतमूल्य म्हणून मोफत वितरीत करणेत यावा, असा निर्णय झालेला आहे. साई अर्पण सेवा माहे मे-जून-२०१८ प्रथम अंक छपाईसाठी दरपत्रके मागणी करून न्युनतम दरपत्रकधारक मे.प्रिन्ट प्लस प्रा.लि.मुंबई यांना ९,००० अंकासाठी प्रति अंक रू.१३.१० व वितरण पाकीटे-९,००० नगासाठी प्रति पाकीट रू.१.२३ याप्रमाणे एकूण रक्कम रू.१,२८,९७०/- चा जा.नं.एसएसएस/वशी-प्रकाशने/५९/१८, दि.०५.०४.२०१८ ने कार्यादेश देण्यात आलेला आहे. मा.अध्यक्ष महोदय व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत प्रथम अंकाचे प्रकाशन दि.०२.०५.२०१८ रोजी करणेत आलेले आहे. त्यानुसार सदरील अंक दि.२५.०५.२०१८ रोजी साईलिलाचे मराठी सभासदांना विनामूल्य मोफत वितरीत करणेत आलेला आहे.

५) मा.व्यवस्थापन समिती दि.३०/०६/२०१८ चे सभेतील निर्णय क्र.४६० अन्वये, साई अर्पण सेवा अंकासाठी सभासद नसलेने माहे जुलै-ऑगष्ट-१८ ( श्री गुरूपौर्णिमा उत्सव-२०१८) द्वितीय द्वैमासिक २,००० प्रतींची छपाई करून उत्सवाचे वेळी येणा-या

मान्यवरांना तसेच भक्तांना मंदिरात मोफत देणेस मान्यता तसेच पुढील ४ अंकासाठी प्रत्येकी २००० प्रती याप्रमाणे छपाई करून घेण्यासाठी दरपत्रके मागवून भक्तांना मंदिरात मोफत वितरीत करण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार मे.प्रिन्ट प्लस प्रा.लि.मुंबई यांना प्रथम अंकाचे दराने जा.नं.एसएसएस/वशी-प्रकाशने/१७९८/१८, दि.१३.०७.२०१८ ने कार्यादेश देण्यात येवून २००० अंक व वितरणकामी २००० पाकीटे छपाईकामी रक्कम रू.२८,६६०/- चा कार्यादेश देण्यात आलेला आहे. तसेच पुढील ०४ अंक (माहे-सप्टे-आक्टो-१८, नोव्हे-डिसें-१८, जाने-फेब्रु-१९ व मार्च-एप्रिल-२०१९) छपाई साठी दरपत्रके मागणी करून न्युनतम

दरधारकमे.प्रिन्ट प्लस प्रा.लि.मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी-प्रकाशने/२७०१/१८, दि.०५.०९.२०१८ ने एकूण छपाई रक्कम रू.१,८६,४००/- चा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सध्या साई अर्पण सेवा- मराठी द्वैमासिकावर होणारा खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे –

| | | 'अ' | | | 'ब' | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | छपाई तपशिल | द्वैमासिक छपाई नग/ संख्या | मंजूर दर | रक्कम रू. पै. | वितरणकामी पाकीटे नग / संख्या | मंजूर दर | रक्कम रू. पै. |
| १ | माहे मे-जून-२०१८ | ९,००० | १३.१० | १,१७,९००/- | ९,००० | १.२३ | ११,०७०/- |
| २ | माहे जुलै-ऑगष्ट-२०१८ | २,००० | १३.१० | २६,२००/- | २,००० | १.२३ | २,४६०/- |
| ३ | माहे सप्टेंबर-आक्टोबर-२०१८ | २,००० | २२.०० | ४४,०००/- | २,००० | १.३० | १०,४००/- |
| ४ | माहे नोव्हेंबर-डिसेंबर-२०१८ | २,००० | २२.०० | ४४,०००/- | २,००० | १.३० | |
| ५ | माहे जानेवारी-फेब्रुवारी-२०१९ | २,००० | २२.०० | ४४,०००/- | २,००० | १.३० | |
| ६ | माहे मार्च-एप्रिल-२०१९ | २,००० | २२.०० | ४४,०००/- | २,००० | १.३० | |
| | | एकूण खर्च रक्कम रू. | | **३,२०,१००/-** | | | **२३,९३०/-** |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे साई अर्पण सेवा द्वैमासिक अंक छपाईसाठी आतापर्यंत रू.(३,२०,१००.००) + (२३,९३०.००) = एकूण रक्कम **रू.३,४४,०३०/-** खर्च झालेला आहे.

उपरोक्त खर्चाशिवाय साई अर्पण सेवा मासिकासाठी नेमलेले श्री भगवान दातार, विशेष कार्य अधिकारी यांना प्रतिमाह रक्कम रू.२५,०००/- प्रमाणे अदा करावे लागतात. त्याच प्रमाणे त्यांना मानधनाव्यतिरिक्त प्रवास व निवास खर्चासाठी प्रतीमहा रू.१०,०००/- भत्ताही दयावा लागतो. तसेच श्रीमती गिता वेलिया,मुंबई यांना सदरील मासिकाच्या आर्टवर्कसाठी दर मासिकासाठी रू. १००१/- अदा करावे लागतात.

सदरील अंकासाठी रजिष्ट्रेशन मिळणेकामी विशेष कार्य अधिकारी व मुंबई कार्यालयामार्फत कार्यवाही चालू आहे. सबब त्याचे अदयाप रजिष्ट्रेशन झालेले नाही. छपाई करणेत आलेले अंक मंदीरात भेट देणा-या साईभक्तांना , संस्थानचे बुकस्टॉल वरील मराठी भाषिकांना तसेच संबंधित विभागांना वितरीत करणेत येतात. त्यामुळे कर्मचा-यांना दैनंदिन कामकाज पाहून एकात्मिक नोंद ठेवणे शक्य होत नाही.

विभागाचा अभिप्रायः -

याकामी खालील नमूद केलेल्या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे-

१) सदर साई अर्पण सेवा या द्वैमासिकाची नोंदणी प्रक्रीया व त्यासंबंधी कामकाज मुंबई कार्यालयामार्फत सुरू आहे.

२) सदर द्वैमासिकाची नोंदणी झालेली नाही.

३) सदर अंकासाठी एकही सभासद नसल्यामुळे सदर अंक संस्थानच्या बुकस्टॉलवर प्रकाशने खरेदी करावयास येणा-या मराठी भाषक साई भक्तांना मोफत वितरीत करण्यात येतो. तसेच अंक अधिकाधिक साई भक्तांपर्यंत पोहचू शकत नाही.

४) मोफत वितरीत केल्या जाणा-या अंकाची तपशिलवार नोंद ठेवणे शक्य होत नाही.

५) साई अर्पण सेवा या नियतकालिकाद्वारा संस्थानमार्फत साईभक्तांना दिल्या जाणा-या सेवा तसेच अन्य सेवा उपक्रमांची माहिती दिली जाते. सदरची माहीती संस्थानच्या साईलिला मराठी व श्री साईलिला हिंदी-इंग्रजी या सध्या सुरू असलेल्या नोंदणीकृत द्वैमासिकाच्या पृष्ठ संख्येत वाढ करून ( सध्याची नियमित अंकाची पृष्ठ संख्या ३२ +४ =३६ पाने व दसरा पुण्यतिथी उत्सव विशेषांकाची पृष्ठ संख्या ६४+४ = ६८ पाने) त्यामध्ये प्रकाशित करता येईल. जेणेकरून साईबाबांच्या लिला व शिकवण यासोबतच संस्थानमार्फत राबविले जाणारे सेवाप्रकल्प/उपक्रम याची माहीती साईभक्त वाचकांना एकाच वेळी मिळू शकेल.

साईलिलाचे सभासद हे महाराष्ट्रात तसेच महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यातही असल्याने व्यापक प्रमाणात ही माहीती वाचक भक्तांपर्यंत पोहचू शकेल. अंकात केलेल्या या अभिनव बदलामुळे साईलिलाच्या सभासद संख्येतही वाढ होऊन अंक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहचू शकेल.

उपरोक्त सर्व वस्तूस्थिती विचारात घेता साई अर्पण सेवा या द्वैमासिकाचे प्रकाशन बंद करणे इष्ट होईल, असे प्रशासनाचे मत आहे.

प्रस्ताव - तरी साई अर्पण सेवा या द्वैमासिकाचे प्रकाशन बंद करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, 'साई अर्पण सेवा' या मराठी व्दैमासिक अंकाचे रजिष्ट्रेशन अदयाप प्राप्त झालेले नसल्यामुळे तसेच पुरेशी सभासद नोंदणी झालेली नसल्याने मान्यवर व देणगीदार साईभक्तांना मोफत वाटण्यासाठी यापुर्वी कार्यवाही केल्याप्रमाणे २००० अंकाची छपाई करण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.२३** **संगणक दुरुस्ती देखभाल अंतर्गत आवश्यक संगणकीय व अनुशंगीक साहित्य खरेदी करणेसाठी वार्षिक दरकरार करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :-कलम १७(१)भक्तगणांना आवश्यक सोयी सुविधा देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- दि.०४.०४.२०१८, निर्णय क्र.२७५

प्रास्ताविक :- माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे विविध विभागांना मागणीप्रमाणे कार्यालयीन कामकाजासाठी संगणके व अनुषंगीक साहित्य विहीत पद्धतीने पुरविणेत येते. सदर संगणकीय व अनुषंगीक साहित्यांचे दुरूस्ती देखभालीचे कामकाजही माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत पाहिले जाते. तसेच मा.व्यवस्थापन समीतीचे निर्देशान्वये कार्यान्वीत करणेत आलेल्या साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत संगणके व संगणकीय साहित्य दुरूस्ती देखभालीचा मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कार्यकाल संपुष्टात आल्याने सदर संगणके व सगणकीय साहित्यांची देखभालही इकडील विभागामार्फत करणेत येते. कार्यान्वीत करणेत आलेले संगणके व संगणकीय साहित्य हे जुने झालेले असल्यामुळे अनेक वेळेस याबाबत संबंधीतांना अडचणी येतात. सदर अडचणींचे निरसण करणेकामी अनेकवेळेस स्पेअरपार्ट्स बदलणेची वेळ येते. सदरचे स्पेअरपार्ट्स उपलब्ध नसल्यास विहित पद्धतीने खरेदी करणेत येतात. सद्यस्थितीत अनेक स्पेअरपार्ट्सची आवश्यकता वारंवार लागते. सबब, सदरचे साहित्य वारंवार खरेदी करावे लागते. त्यामुळे सदरील कामामध्ये व्यत्यय येऊन विलंब होतो.सबब,सदरचे साहित्य आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणेकामी या क्षेत्रातील पुरवठाधारकांबरोबर वार्षिकदरकरार निश्चित केल्यास त्यांना पुरवठा आदेश देऊन उपलब्ध करता येईल.इकडील विभागामार्फत दुरूस्ती देखभाली कामी आवश्यक असलेले साहित्य व त्याचा मागील वर्षीचा वापर तसेच अंदाजीत खर्च (करविरहीत) पुढीलप्रमाणे आहे.

| Sr No | Description of Spare Part | 2018 Consumption | 2019 Required | Rate /Unit | Approx Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | HDD 500 GB SATA Seagate/Sony/Samsung | 3 | 5 | 1800 | 9000 |
| 02 | HDD 1TB SATA Seagate/Sony/Samsung | 5 | 5 | 2250 | 11250 |
| 03 | HDD 1 TB Portable USB Seagate/Sony/Samsung | 2 | 5 | 3500 | 17500 |
| 04 | HDD 2 TB Portable USB Seagate/Sony/Samsung | 0 | 5 | 4200 | 21000 |
| 05 | DVD drive USB External Portable | 0 | 2 | 3100 | 6200 |
| 06 | OTG cable (USB to OTG) | 0 | 4 | 200 | 800 |
| 07 | Web Camera Intel/Iball With atleast 1 meter Cable | 20 | 30 | 600 | 18000 |
| 08 | Antivirus Net Protector Total Security | 60 | 100 | 500 | 50000 |
| 09 | Antivirus Quick Heal Total Security | 2 | 5 | 900 | 4500 |
| 10 | Computer CMOS battery | 20 | 30 | 15 | 450 |
| 11 | VGA cable | 15 | 30 | 200 | 6000 |
| 12 | Power Cable ISI Standard | 25 | 25 | 100 | 2500 |
| 13 | SMPS for Lenovo Thinkcenter Desktop 14+2 Pin | 0 | 10 | 2000 | 20000 |
| 14 | SMPS for Dell Optiplex 380 | 0 | 5 | 2000 | 10000 |
| 15 | CPU Cooling FAN Lenovo Thinkcenter Desktop | 0 | 5 | 1200 | 6000 |
| 16 | CPU Cooling FAN Dell optiplex 380 | 0 | 5 | 1200 | 6000 |
| 17 | CPU Cooling Paste | 5 | 10 | 100 | 1000 |
| 18 | USB Mouse Logitech/iball | 25 | 50 | 200 | 10000 |
| 19 | RAM 2GB 1333 Mhz | 2 | 5 | 700 | 3500 |
| 20 | RAM 4GB 1600 Mhz | 2 | 5 | 1800 | 9000 |
| 21 | RAM 4GB 1666 Mhz | 5 | 5 | 2000 | 10000 |
| 22 | HDMI Cable 20 meters | 0 | 3 | 900 | 2700 |
| 23 | VGA Cable 20 Meters | 0 | 3 | 750 | 2250 |
| 24 | USB Keyboard Logitech/iball | 60 | 100 | 400 | 40000 |
| 25 | Head Carriage for LQ 310+ DMP | 5 | 15 | 700 | 10500 |
| 26 | Carriage Belt for LQ 310+ DMP | 0 | 30 | 100 | 3000 |
| 27 | EPSON LQ 310+ Dmp Printer Flat tern gear | 0 | 20 | 75 | 1500 |
| 28 | PF gear for LQ 310 DMP | 10 | 20 | 60 | 1200 |

| Sr No | Description of Spare Part | 2018 Consumption | 2019 Required | Rate /Unit | Approx Amount |
|---|---|---|---|---|---|
| 29 | Ribbon Mask for LQ 310 DMP | 5 | 20 | 100 | 2000 |
| 30 | Head Cable Pair for LQ 310+ DMP | 0 | 20 | 170 | 3400 |
| 31 | Head for LQ 310+ | 0 | 10 | 2000 | 20000 |
| 32 | LQ 310+ Belt drive Pully | 10 | 25 | 75 | 1875 |
| 33 | EPSON LQ 310+ Dmp Printer carriage Bush | 0 | 15 | 45 | 675 |
| 34 | Combination gear 13.6 for LQ310+ DMP | 0 | 15 | 200 | 3000 |
| 35 | Logic Board for LQ 310+ DMP | 0 | 7 | 2500 | 17500 |
| 36 | Main Board For LQ310+ DMP | 0 | 7 | 2500 | 17500 |
| 37 | Knob for LQ 310+ DMP | 10 | 25 | 150 | 3750 |
| 38 | RD assembly for LQ 310 DMP | 10 | 25 | 200 | 5000 |
| 39 | Tractor for LQ 310+ DMP | 0 | 10 | 750 | 7500 |
| 40 | EPSON LQ 310+ Dmp Printer Tractor Spocket | 0 | 10 | 225 | 2250 |
| 41 | Ribbon Cartidage for LQ 310+ DMP | 400 | 1000 | 150 | 150000 |
| 42 | Ribbon Cake for LQ 310+ DMP 13 meter | 300 | 500 | 30 | 15000 |
| 43 | USB Printer Cable 1.5 meter | 10 | 10 | 100 | 1000 |
| 44 | WD spray | 25 | 30 | 150 | 4500 |
| 45 | Q2612A tonner HP original | 0 | 150 | 3000 | 450000 |
| 46 | 88 A tonner HP original | 0 | 30 | 3000 | 90000 |
| 47 | 36 A tonner HP original | 0 | 30 | 3000 | 90000 |
| 48 | Q2612A tonner Compitable | 75 | 200 | 600 | 120000 |
| 49 | 88 A tonner Compitable | 30 | 30 | 600 | 18000 |
| 50 | 36 A tonner Compitable | 30 | 30 | 600 | 18000 |
| 51 | Brother Toner TN-2365 | 0 | 10 | 2900 | 29000 |
| 52 | Brother Toner TN-2365 Drum Unit | 0 | 10 | 1200 | 12000 |
| 53 | 925 A Toner HP original | 0 | 5 | 3100 | 15500 |
| 54 | 337 A Toner HP original | 0 | 5 | 3200 | 16000 |
| 55 | HP cp1025 CE-310A | 0 | 2 | 3500 | 7000 |
| 56 | HP cp1025 CE 311A | | 2 | 3500 | 7000 |
| 57 | HP cp1025 CE 312A | 0 | 2 | 3500 | 7000 |
| 58 | HP cp1025 CE 313A | 0 | 2 | 3500 | 7000 |
| 59 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 Magnet Rod | 5 | 20 | 180 | 3600 |
| 60 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 Magnet Bush | 5 | 20 | 75 | 1500 |
| 61 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 Teflon sleev | 20 | 20 | 150 | 3000 |
| 62 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 Teflon sleev cream | 2 | 10 | 100 | 1000 |
| 63 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Heater Assembly | 0 | 15 | 200 | 3000 |
| 64 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Pressure Roller | 2 | 15 | 180 | 2700 |
| 65 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Pick up Roller | 0 | 15 | 150 | 2250 |
| 66 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 relay | 0 | 15 | 100 | 1500 |
| 67 | Telfon for HP P1007 | 3 | 10 | 250 | 2500 |
| 68 | Presser Roller for HP P1007 | 0 | 5 | 200 | 1000 |
| 69 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A, 78A, 88A, 16A, 36A Toner Refilling And Reconditioning | 0 | 1200 | 100 | 120000 |
| 70 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner Drum | 100 | 500 | 100 | 50000 |
| 71 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner wifer Blade | 100 | 300 | 60 | 18000 |
| 72 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner PCR roller | 100 | 500 | 75 | 37500 |
| 73 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner Dr Blade | 80 | 300 | 75 | 22500 |
| 74 | 12 A Powder 140 Gram Pouch/Bottle | 400 | 600 | 100 | 60000 |
| 75 | 88A Powder 100 Gram Pouch/bottle | 300 | 500 | 100 | 50000 |
| 76 | 88A Drum | 40 | 200 | 75 | 15000 |
| 77 | 88 A wifer Blade | 40 | 200 | 75 | 15000 |
| 78 | 88 A PCR roller | 40 | 200 | 80 | 16000 |
| 79 | 88 A Dr Blade | 40 | 200 | 80 | 16000 |
| 80 | Toner Powder HP1025 Cyan Powder | 2 | 10 | 400 | 4000 |
| 81 | Toner Powder HP1025 Magenta Powder | 2 | 10 | 400 | 4000 |
| 82 | Toner Powder HP1025 Yellow Powder | 2 | 10 | 400 | 4000 |
| 83 | Toner Powder HP1025 Black Powder | 2 | 10 | 400 | 4000 |
| 84 | HP cp1025 Reset Chip (CMYK) | 5 | 10 | 200 | 2000 |
| 85 | Tonner Powder for Brother Laserjet printer | 5 | 20 | 150 | 3000 |
| 86 | Brother 2365 Reset Gear | 2 | 10 | 400 | 4000 |

| Sr No | Description of Spare Part | 2018 Consumption | 2019 Required | Rate /Unit | Approx Amount |
|---|---|---|---|---|---|
| 87 | Refilling Cartidge of LQ310 with Cake | 0 | 1000 | 100 | 100000 |
| 88 | Refilling Brother Toner TN-2365 with Powder | 4 | 25 | 150 | 3750 |
| 89 | Cat 6 Cable Box 305 meter Dlink Original | 5 | 8 | 6000 | 48000 |
| 90 | Switches 5 Port Dlink | 4 | 10 | 500 | 5000 |
| 91 | Switches 8 Port Dlink | 0 | 10 | 800 | 8000 |
| 92 | OFC Joint encloser 4 holes | 5 | 10 | 1200 | 12000 |
| 93 | Rack 6U fully loaded | 2 | 5 | 2000 | 10000 |
| 94 | Rack 9U fully loaded | 1 | 5 | 4500 | 22500 |
| 95 | Rack 12U fully loaded | 0 | 5 | 7000 | 35000 |
| 96 | RJ 45 Dlink Original 1 box = 100 Units | 1 | 2 | 1000 | 2000 |
| 97 | LIU 16 Port Fully Loaded | | 2 | 15000 | 30000 |
| 98 | LIU 24 Port Fully Loaded | 1 | 2 | 20000 | 40000 |
| 99 | Usb LAN card iball/Baton/ | 2 | 10 | 450 | 4500 |
| 100 | D-link Original/i-ball (Hydraulic) Crimping tool for RJ45 and RJ11 | 1 | 2 | 900 | 1800 |
| 101 | D-link or i-ball Baton LAN tester | 1 | 2 | 900 | 1800 |
| 102 | Laprite 58 in 1 Aluminum Alloy Precision Magnetic Toolkit With 30 bits electronics repair Toolkit | 0 | 2 | 1000 | 2000 |
| 103 | Optic Fiber Cable Armour 10mm to 12mm thickness 6 Core | 1000 | 5000 | 15 | 75000 |
| 104 | Optic Fiber Cable Armour 12mm to 15mm thickness 12 Core | 0 | 5000 | 25 | 125000 |
| 105 | ISO propyl Alcohol (200ml) | 0 | 2 | 100 | 200 |
| 106 | Three hole Fiber Optic Stripper with 6” Handle (Make D-link/Baton/Jonard) | 0 | 1 | 4000 | 4000 |
| 107 | Optic Fiber protective Sleeve for Splicing 70 mm | 0 | 500 | 3 | 1500 |
| 108 | Media converter for fast Ethernet over single mode with SC connector (Dual fiber, Gb Speed, Support up to 20 km range) With 1 year warranty Make Dlink/Digisol | 1 | 6 | 4500 | 27000 |
| 109 | Media Converter with SFP Slot Gigabit Ethernet 1x 10/100/1000Base-T RJ45 to 1x 1000Base-X With 1 year warranty Make Dlink/Digisol | 0 | 1 | 7000 | 7000 |
| 110 | Media converter for single mode with SC connector (Single fiber core, Gb Speed, Support up to 20 km range) With 1 year warranty Make Dlink/Digisol | 4 | 6 | 4500 | 27000 |
| 111 | Display Port(M) to HD Mi (F) Convertor with Audio (1080P) Make : Amazon Basis Warranty 1 year | 0 | 3 | 1000 | 3000 |
| 112 | DisplayPort(M) to VGA(F) Convertor Make:- Amazon Basis With 1 year warranty | 0 | 3 | 1000 | 3000 |
| 113 | VGA(M) to HDMI (F) with Sound Convertor and audio cable Make : Oxyura, Amazon Basis With 1 year warranty | 0 | 3 | 1000 | 3000 |
| 114 | HDMI(M) to VGA(F) with audio Convertor and cable Make: F Cables Kart, Storite, Amazon basis, with 1 year warranty | 0 | 3 | 1000 | 3000 |
| | | | | **Approx Amount** | **2497400** |

संगणक दुरुस्ती-देखभालीचे कामकाजाकरिता उपरोक्त नमुद साहित्य आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणेकामी या क्षेत्रातील पुरवठाधारकांबरोबर वार्षिक दरकरार निश्चित करणेकामी संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून पात्र पुरवठाधारकाबरोबर दरकरार करता येईल,असे मत आहे

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे विविध विभागांना मागणीप्रमाणे कार्यालयीन कामकाजासाठी संगणके व अनुषंगीक साहित्य पुरविणेत येते. संगणके दुरूस्ती देखभालीअंतर्गत आवश्यक संगणकीय व अनुषंगीक साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये २४,९७,४००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी व सदरील साहित्याचा वार्षिक दरकरार निश्चित करणेकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ.

छाननी करुन अनुमान :- तांत्रीक/प्रशासकीय/आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे विविध विभागांना मागणीप्रमाणे कार्यालयीन कामकाजासाठी संगणके व अनुषंगीक साहित्य पुरविणेत येते. संगणके दुरूस्ती

देखभालीअंतर्गत आवश्यक संगणकीय व अनुषंगीक साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये २४,९७,४००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा व सदरील साहित्याचा वार्षिक दरकरार निश्चित करणेकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.७५० **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागातील संगणक दुरुस्ती देखभाल अंतर्गत आवश्यक संगणकीय व अनुशंगीक साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२४,९७,४००/-+कर मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

विषय नं.२४ **आयटी विभागातंर्गत दुरुस्ती देखभालीकामी तांत्रिक क्षमतेचे मनुष्यबळ ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने उपलब्ध करुन घेणेस व साईभक्तांचे तक्रारींचे निरसण करणेकामी आऊटसोर्स पध्दतीने हेल्पडेस्क सुविधा उपलब्ध करुन घेणेकामी या क्षेत्रातील कंपनीची नेमणुक करणेस व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :-१७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-

०१. दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५९

०२. दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४१ व २७५

प्रास्ताविक:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७.११.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९ अन्वये, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत “साईटेक प्रकल्प” उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली होती. साईटेक प्रकल्प कार्यान्वीत करणेकरीता करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा प्रकल्प देखभालीचा कालावधी माहे एप्रिल-२०१७ मध्ये संपुष्टात आलेला आहे.

साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभालीसाठी नविन कंपीनीची नेमणुक होईपर्यंत मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत सदरची कार्यवाही सुरु ठेवणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१८ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार, दि.०१.०५.२०१७ ते दि.३०.०४.२०१८ या कालावधीसाठी साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभाल सुरु ठेवणेकामी मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/१४१५/२०१७, दि.१६.०६.२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५५९ अन्वये, मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी प्रकल्प देखभालीचे कामकाज थांबविल्यास, सदरहु कार्यप्रणाली सुरळीत सुरु रहाव्यात याकरीता “साईटेंक प्रकल्प दुरुस्ती देखभाल” करीता नविन कंपनीची नेमणुक करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेत यावी, असेही निर्देश देणेत आलेले होते. सदर निर्देशानुसार इकडील विभागाचे दि. २३.०१.२०१८ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये याकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. परंतु, ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत दोनच निविदाधारक तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्याने, सदरहू निविदा प्रक्रिया मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २४१ अन्वये, रद्द करणेत आलेली आहे. तसेच सदर निर्णयान्वये, याकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत प्रकल्प देखभालीचे कामकाज मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी., पुणे यांचेमार्फत दिनांक ०१.०५.२०१८ पासून त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील अटी शर्ती प्रमाणे प्रती माह रक्कम रुपये १४,४४,०००/- + कर याप्रमाणे चालू ठेवणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार, मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/४६८/२०१८, दि.२५.०४.२०१८ अन्वये, कार्यादेश देण्यात आलेला होता.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२७५ अन्वये, M/s Tata Sons Ltd., यांनी तयारी दर्शविलेप्रमाणे प्रकल्पाबाबतची कार्यवाही त्यांचेमार्फत विनामुल्य स्वरुपात करुन घेणेस मान्यता देणेत आली. त्यानुसार M/s Tata Consultancy Services यांनी दि.०१ सप्टेबर,२०१८ पासून “साईटेक प्रकल्प ०२” अंतर्गत कार्यप्रणाली बाबतची कार्यवाही सुरु केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेमध्ये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये “साईटेक प्रकल्प-२” प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या पुढील बाबी नमुद करणेत आलेल्या आहेत.

1. IT Infrastructure (Hardware & Network)
   a. Procurement
   b. Installation

c. CMC and necessary licenses for 5 years
d. Support for 5 years.
2. Application (Revamp, Development & Support)
a. Enhancement in present applications
b. Implementation of new functionalities as per requirement.
c. Integration of various applications (Online portal, mobile app etc.) as per requirement.
d. Implementation of Oracle ERP (Procurement, Inventory & Finance).
e. Bug fixes.
f. Support for 5 years.
3. Cloud enabled Database Services
a. Design, configuration, installation and setup of Cloud site.
b. Maintenance & support of implemented Cloud site.
4. Data Centre
a. On premise Data Centre for critical applications.
5. Helpdesk
a. For Sai Devotees
b. For internal users

तसेच प्रस्तावामध्ये "M/s Tata Sons Ltd यांचेबरोबर झालेल्या चर्चेनुसार "साईटेक प्रकल्प-२" प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या उपरोक्त बाबींपैकी Sr.No. 2 बाबतची पुर्ण कार्यवाही विनामुल्य स्वरुपात करणेची त्यांनी तयारी दर्शविलेली आहे. तसेच उर्वरीत Sr.No. 1,3,4,5ते संस्थानला मार्गदर्शन व सदरबाबी कार्यान्वीत झालेनंतर व्यवस्थापनाबाबतची कार्यवाही विनामुल्य करणेची त्यांनी तयारी दर्शविलेली आहे. Sr.No. 1,3,4,5 अंतर्गत खरेदीसाठी येणारा खर्च संस्थानला करावा लागणार आहे."तसेच M/s Tata Sons Ltd यांनी यावेळी सादर केलेल्या सादरीकरणातही हि बाब नमुद केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चेअंती मे. टाटा सन्स यांनी तयारी दर्शविलेप्रमाणे प्रकल्पाअंतर्गत त्यांचेमार्फत Application बाबतची सर्व कार्यवाही तसेच Data Centre, Cloud Based Services, Hardware & Network बाबत सल्ला व व्यवस्थापनबाबतची कार्यवाही विनामुल्य स्वरुपात करुन घेणेस मान्यता देणेत आली. तसेच याकामी सादरीकरणात त्यांनी मागणी केलेप्रमाणे संस्थानमार्फत त्यांना पुढीलप्रमाणे सुविधा त्याखाली नमुद केलेप्रमाणे मोफत स्वरुपात पुरविणेचे मान्य करणेत आले.

उपरोक्तप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेल्या प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे प्रकल्पाअंतर्गत हार्डवेअर, नेटवर्क दुरूस्ती देखभाल, साईभक्त व कार्यप्रणाली वापरणारे संस्थानचे कर्मचारी यांचेसाठी हेल्पडेस्क इ. कार्यवाही संस्थानला करावी लागणार आहे.

मे. टाटा सन्स यांचेमार्फत M/s Tata Consultancy Services यांनी दि.०१ सप्टेबर,२०१८ पासून "साईटेक प्रकल्प ०२" अंतर्गत कार्यप्रणाली बाबतची कार्यवाही सुरु केलेली आहे. तसेच मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कळविलेप्रमाणे प्रकल्पांतर्गत दुरुस्ती देखभालीचे कामकाज त्यांनी दि.०१ सप्टेबर, २०१८ पासून थांबविलेले आहे. सदरचे कामकाज पाहणेकरीता मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत एकूण १४ तांत्रिक कर्मचा-यांची शिर्डी येथे माहीती तंत्रज्ञान विभागात नेमणूक करण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार सादर करणेत आलेल्या इकडील विभागाचे दि.०१.०८.२०१८ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये, हेल्पडेस्क, हार्डवेअर व नेटवर्क दुरूस्ती देखभालीचे कामकाज पाहणेसाठी संगणक क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता (MCS/MCA/BCS/Diploma in Computer Engg./Tech./Electronics Engineering (MS BTE Recognized) प्राप्त ११ कर्मचारी उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानचे नियमीत कंत्राटदाराला कळविणेकामी कामगार विभागास आदेश होणेस, मान्यता घेणेत आलेली होती. त्यानुसार कामगार विभागाने कंत्राटी कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे. बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांना माहीती तंत्रज्ञान विभागाच्या मागणीप्रमाणे, उपलब्ध असणा-या कंत्राटी कर्मचा-यांमधून ११ कंत्राटी कर्मचारी माहीती तंत्रज्ञान विभागास पुरविणेबाबत कळविणेत आलेले होते. तथापी, मे. बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांनी त्यांचेकडे संस्थानचे इतर विभागात अतिरीक्त कंत्राटी कर्मचारी उपलब्ध नसल्याने माहीती तंत्रज्ञान विभागास कंत्राटी कर्मचारी पुरविणे शक्य नसल्याचे कामगार विभागास कळविलेले आहे. त्यानुसार कामगार विभागाने जा. क्रं. एसएसएसटी/वशी-७ए/१९७९/२०१८ दि.०५.१०.२०१८ अन्वये, "सध्या उपलब्ध असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांमध्ये सदर शैक्षणिक पात्रतेचे कंत्राटी कर्मचारी उपलब्ध नाही. तसेच कंत्राटदारास नवीन भरती करता येत नाही. तरी आपणास

आवश्यक असलेले शैक्षणिक पात्रतेचे कंत्राटी कर्मचारी भरतीबाबत आपण आपले विभागामार्फत प्रस्ताव सादर करुन मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन कार्यवाही करण्यात यावी." असे इकडील विभागास कळविले आहे.

अ) सद्यस्थितीत माहीती तंत्रज्ञान विभागात उपलब्ध असलेल्या तांत्रिक मनुष्यबळाकडुन साईटेक प्रकल्प तसेच प्रकल्पाव्यतिरीक्त कार्यान्वीत संगणके व संगणकीय प्रणालींचे दुरुस्ती देखभालींचे कामकाज पाहणे जिकरीचे होत असल्याने, कंत्राटी कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे. बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचेमार्फत संगणक क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता (MCS/MCA/BCS/Diploma in Computer Engg./Tech./ Electronics Engineering (MS BTE Recognized) प्राप्त ११ कर्मचारी आऊटसोअर्स पध्दतीने नेमता येतील, असे नम्र मत आहे.

आ) साईभक्तांना शिर्डी येथे श्रींचे दर्शनास येणे अगोदर दर्शन/आरती पास व रुम आरक्षित करता यावी. याकरीता साईटेक प्रकल्पांतर्गत online.sai.org.in ही वेबसाईट विकसीत करुन, कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर वेबसाईटव्दारे आरती/दर्शन पास व रुम बुकींग बरोबरच देणगी, संस्थान प्रकाशने, भक्त मंडळ सभासद व साईलीला मासीक सभासद इ. सुविधा साईभक्तांना उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत. सदर वेबसाईट बाबत देश विदेशातील साईभक्तांना येणा-या अडचणींबाबत प्राप्त होणारे फोन-कॉल व ई-मेल यांना उत्तर देणेसाठी माहीती तंत्रज्ञान विभागांतर्गत हेल्पडेस्क कार्यान्वीत करणेत आलेले आहे. सदरचे हेल्पडेस्क २४ तास ७ ही दिवस कार्यान्वीत असते.

सदर हेल्पडेस्कवर कंत्राटी कर्मचा-यांची नेमणूक करणेत आलेली आहे. अनेक वेळेस सदरचे ठिकाणी फोन करणारे साईभक्त हिंदी, इंग्रजीतथा प्रादेशिक भाषेतून संभाषण करतात. या ठिकाणी नेमण्यात आलेल्या कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता व भाषा कौशल्य यास येत असलेल्या मर्यादेमुळे अनेक वेळेस साईभक्तांच्या शंकाचे निरसण होणेस अडचण निर्माण होते. सबब, साईभक्त नाराज होऊन, याबाबत संस्थानचे वरिष्ठ अधिका-यांशी संपर्क करतात. वेबसाईटला साईभक्तांकडून मिळणा-या लक्षणिय प्रतिसादामुळे साईभक्तांकडून प्राप्त होणा-या फोन-कॉल व ई-मेलच्या संख्येतही लक्षणिय वाढ झालेली आहे. अनेकवेळेस साईभक्त वेबसाईट व्यतीरीक्तही संस्थानचे बाबत इतर माहीतीसाठी सदर ठिकाणी फोन करतात अथवा ई-मेल पाठवितात.

नमुद केलेप्रमाणे हेल्पडेस्क येथे नेमण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता व भाषा कौशल्य यामुळे साईभक्तांच्या तक्रारींचे निरसण करणेकामी येत असलेल्या अडचणींचा विचार करता, सदरचे हेल्पडेस्क आऊटसोअर्स पध्दतीने चालविणेकामी या क्षेत्रातील अनुभवी कंपनीची नेमणूक केल्यास साईभक्तांशी विविध भाषांमध्ये कुशलतेने संपर्क होऊन, त्यांचे अडचणींचे निरसण व त्यांना हवी असलेली माहीती वेळेत प्राप्त होणेस मदत होईल. परिणामी साईभक्तांचे समाधान होईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, माहीती तंत्रज्ञान विभागातंर्गत संगणक दुरुस्ती देखभालकामी कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदार मे. बी.व्ही.जी इंडिया लि., पुणे यांचेमार्फत संगणक क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता (MCS/MCA/BCS/Diploma in Computer Engg./Tech./Electronics Engineering (MS BTE Recognized) प्राप्त ११ कर्मचारी आऊटसोअर्स पध्दतीने नेमणेकामी व साईभक्तांच्या तक्रारींचे निवारण तसेच त्यांना आवश्यक माहीती फोन-कॉल व ई-मेलद्वारे देणेकामी आऊटसोअर्स पध्दतीने हेल्पडेस्क (मदतकेंद्र) चालविणेसाठी या क्षेत्रातील कंपनीची नेमणूक प्रचलित पध्दतीने करणेकामी मान्यता मिळणेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे "साईटेक प्रकल्प टप्पा-२" अंतर्गत हार्डवेअर, नेटवर्क दुरूस्ती देखभालीचे कामकाज पाहणेसाठी संगणक क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता (MCS/MCA/BCS/Diploma in Computer Engg./Tech./Electronics Engineering (MS BTE Recognized) प्राप्त ११ कर्मचारी संस्थान ठेकेदार यांचेमार्फत आऊटसोअर्स पध्दतीने नेमणेसाठी मान्यता मिळणेकामी तसेच साईभक्तांचे संस्थानचे ऑनलाईन वेबसाईट संदर्भातील शंका/तक्रारींचे निरसण करणे व त्यांना संस्थान विषयक आवश्यक माहीती फोन-कॉल व ई-मेलद्वारे देणेकामीआऊटसोअर्स पध्दतीने हेल्पडेस्क सुविधा उपलब्ध करुन घेणेसाठी या क्षेत्रातील अनुभवी कंपनीची नेमणुक प्रचलित पध्दतीने करणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

प्रस्ताव- "साईटेक प्रकल्प टप्पा-२" अंतर्गत हार्डवेअर, नेटवर्क दुरूस्ती देखभालीचे कामकाज पाहणेसाठी संगणक क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता (MCS/MCA/BCS/Diploma in Computer Engg./ Tech./Electronics Engineering (MS BTE Recognized) प्राप्त ११ कर्मचारी संस्थान ठेकेदार यांचेमार्फत आऊटसोअर्स पध्दतीने नेमणेसाठी मान्यता मिळणेकामीचा तसेच साईभक्तांचे संस्थानचे ऑनलाईन वेबसाईट संदर्भातील शंका/तक्रारींचे निरसण करणे व त्यांना संस्थान विषयक आवश्यक माहिती फोन-कॉल व ई-मेलद्वारे देणेकामीआऊटसोअर्स पध्दतीने हेल्पडेस्क सुविधा उपलब्ध करुन घेणेसाठी या क्षेत्रातील अनुभवी कंपनीची नेमणुक प्रचलित पध्दतीने करणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.७५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, "साईटेक प्रकल्प टप्पा-२" अंतर्गत हार्डवेअर, नेटवर्क दुरूस्ती देखभालीचे कामकाज पाहणेसाठी संगणक क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता (MCS/MCA/BCS/Diploma in Computer Engg./ Tech./Electronics Engineering (MS BTE Recognized) प्राप्त ११ कर्मचारी संस्थान ठेकेदार यांचेमार्फत आऊटसोअर्स पध्दतीने नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. तसेच साईभक्तांना संस्थानचे ऑनलाईन वेबसाईट संदर्भातील असलेल्या शंका/तक्रारींचे निरसण करणे व त्यांना संस्थान विषयक आवश्यक माहिती फोन-कॉल व ई-मेलद्वारे देणेकामी आऊटसोअर्स पध्दतीने हेल्पडेस्क सुविधा उपलब्ध करुन घेणेसाठी या क्षेत्रातील अनुभवी कंपनीची नेमणुक करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२५** **संस्थान कर्मचारी निवासस्थान परिसरातील साईनगर, समर्पण, साईध्यान नं.०१ व ०२ या इमारतीचे अंतर्गत व बाहेरील रंगकाम करणे कामाचे ठेकेदार सौरव डेकोरेटर्स, पुणे यांचे २ रे व अंतिम देयक रक्कम रु.३५,७१,०३२/- मात्र मंजूर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.४,९९,२५९/- मात्र आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान कर्मचारी निवासस्थान परीसरातील साईनगर, समर्पण, साईध्यान नं.०१ व ०२ या इमारतींचे अंतर्गत व बाहेरील रंगकाम करणे कामाचे ठेकेदार सौरव डेकोरेटर्स, पुणे यांनी पूर्ण केले असून, ठेकेदार यांनी सादर केलेले २ रे व अंतीम बीलाची सविस्तर तपासणी करणेत आलेली आहे. ठेकेदार यांचे अंतीम बीलास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

कामाचे नाव - संस्थान कर्मचारी निवासस्थान परीसरातील साईनगर, समर्पण, साईध्यान नं.०१ व ०२ या इमारतींचे अंतर्गत व बाहेरील रंगकाम करणे.

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नाव | सौरव डेकोरेटर्स, पुणे. |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/११९७/२०१८,दि.०८/०६/२०१८. |
| मंजूर निविदा रक्कम | रु.३५,०२,९६६/-. |
| मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय व दिनांक | निर्णय क्र.२२८ (०७) , दि.०२/०५/२०१८. |
| २ रे व अंतीम बिलानुसार झालेल्या कामाची किंमत | रु.३५,७१,०३२/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.३०,७१,७७३/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.६८,०६६/- अधिक (१.९४ % जास्त). |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०४ महिने. (दि.२२/०६/२०१८ ते दि.२१/१०/२०१८). |
| मुदतवाढ दिनांक | - |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याची दिनांक | दि.१५/१०/२०१८. |

ठेकेदार सौरव डेकोरेटर्स, पुणे यांनी दि.२७/१०/२०१८ रोजी उपरोक्त कामाचे एकूण रु.३५,९७,०७२/- मात्र इतक्या रकमेचे दुसरे व अंतीम बील सादर केले होते. ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार अंतीम बिलापोटी एकूण रु.३५,७१,०३२/- मात्र इतकी रक्कम देय होत असून त्यामधून मागील बीलाची रक्कम रु.३०,७१,७७३/- वजा करुन निव्वळ रक्कम रु.४,९९,२५९/- देय होत आहे.

ठेकेदार यांनी पी.एफ.संबंधीची पूर्तता केलेली आहे. सदरहू कागदपत्रे सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१० अ यांचेकडे तपासणीसाठी सादर करणेत येत आहे.

ठेकेदार यांनी दि.२७/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये GST भरणा केलेबाबत GSTR-1 च्या प्रती संस्थानकडे सादर केलेल्या आहेत.

सदरकामी वापरणेत आलेले रंग मटेरीयलची तपासणी VJTI, Mumbai येथे करण्यात आलेली असून ते विहीत मानकांनूसार योग्य आहेत.

ठेकेदार यांनी सादर केलेल्या अंतीम बीलाची सविस्तर तपासणी ठेकेदार यांचेसमवेत करण्यात आली असून प्रत्यक्ष कामाचे मोजमापानुसार त्यांना एकूण रक्कम रु.३५,७१,०३२/- देय होत आहे.

तरी ठेकेदार सौरव डेकोरेटर्स, पुणे यांना संस्थान कर्मचारी निवासस्थान परीसरातील साईनगर, समर्पण, साईध्यान नं.०१ व ०२ या इमारतींचे अंतर्गत व बाहेरील रंगकाम करणे कामाचे सादर केलेले २ रे व अंतीम देयक एकूण रक्कम रु.३५,७१,०३२/- मात्र मंजूर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रु.४,९९,२५९/- मात्र अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी निवासस्थान परिसरातील साईनगर, समर्पण, साईध्यान नं.०१ व ०२ या इमारतीचे अंतर्गत व बाहेरील रंगकाम करणे कामाचे ठेकेदार सौरव डेकोरेटर्स, पुणे यांचे अंतिम देयक रक्कम रु.३५,७१,०३२/- मात्र मंजूर करुन उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.४,९९,२५९/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.२६** **संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०१९ मधील तीनही उत्सवांच्या निमत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

संस्थान व्यवस्थापनाने तयार केलेले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) भक्त मंडळ विनियम सन २०१३ मध्ये शासनाने मान्य केलेले आहेत. या विनियमातील कलम (४) भक्त मंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार या मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

१) भक्त मंडळांच्या सभासदांना संस्थानच्या तीन उत्सवाचे, म्हणजे रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवांचे निमंत्रण पाठविण्यात येईल. असे निमंत्रण डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने, फॅक्स, ई-मेल व्दारा किंवा इलेक्ट्रॉनीक संपर्काच्या इतर पध्दतीने पाठविण्यात येईल.

२) वर उल्लेख केलेल्या तिन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने ‘उदी प्रसाद’ प्राप्त होण्यास पात्र असेल.

प्रस्तावना- संस्थानमार्फत साज-या होणा-या वर्षभरातील तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका संस्थानचे भक्तमंडळाच्या सभासदांना पाठविणेकामी खालील दोन भागात कार्यवाही केली जाते.

अ) १. मंदिराकडून उत्सवाची माहिती मागविणे.

२. ई-निविदा मागविणेकामी मसुदा तयार करणे.

३. सदरचा मसुदा वरिष्ठांकडुन तपासुन मान्य करुन घेणे.

४. वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करणे.

५. ई निविदा भरणेकामी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देणे.

६. ई-निविदेचा कालावधी संपल्यानंतर मा. खरेदी समितीचे सभेपुढे तांत्रिक बिड (Technical Bid)

उघडणे.

७. तांत्रिक बिड उघडल्यानंतर पात्र छपाईधारकांचे दरपत्रक (Commercial Bid) मा. स्थानिक उपसमिती सभेपुढे उघडुनतुलनात्मक तक्ता तयार करुन सादर करणे.

८. निम्नतम दर असलेल्या छपाई धारकास दराबद्दल चर्चा / वाटाघाटीसाठी प्रत्यक्ष मा. स्थानिक उपसमितीच्या सभेत उपस्थित राहणेबाबत कळविणे.

९. वाटाघाटी / चर्चेअंती निम्नतम दर निश्चित करणे.

**ब)** १. छपाई धारकास छपाई कामाचा कार्यादेश देणे.

२. तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई कामी निम्नतम छपाई धारकाकडुन छपाई कामाचा करारनामा तयार करुन घेणे.

३. प्रत्येक उत्सवाच्या निमंत्रण पत्रिकेचा मसुदा व रंगसंगती वरिष्ठांकडुन मान्य करुन घेणे.

४. रंगसंगती निश्चित झाल्यानंतर छपाई कामास सुरवात करणेबाबत कळविणे .

५. पाकीटे व पत्ते चिटकविणे, फ्रॅंकिंग करणे.

६. पत्रिकांची राज्याच्या नावानुसार विभागणी करुन पोष्टात टाकणे.

भक्त मंडळ विनियम सन २०१३ मधील कलम (४) नुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत साज-या करण्यात येणा-या श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी (विजयादशमी) उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद भक्तमंडळ सभासदांना पोष्टाव्दारे पाठविणेत येतो. तसेच व्यवस्थापनामार्फत देणगीदार भक्त, मा. मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मान्यवर अधिकारी व शिर्डी ग्रामस्थ यांना निमंत्रण पाठविण्यात येतात. सध्या १,८०,००० इतके संस्थान भक्तमंडळाचे सभासद असून, सभासद संख्येत वाढ किंवा घट होऊ शकते.

सन २०१६ मध्ये साजरा करण्यात आलेल्या तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई कामी रु. ९,१८,०००/- इतका खर्च आलेला होता.

यापुर्वी उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका खाली दिलेल्या तपशीलाप्रमाणे छपाई करुन घेण्यात आल्या होत्या.

**निमंत्रण पत्रिका**

| निमंत्रण पत्रिका छपाई तपशिल | प्रती उत्सव छपाई संख्या १,८०,००० प्रमाणे तीनही उत्सवांची छपाई संख्या |
|---|---|
| अ) निमंत्रण पत्रिका- फोर कलर छपाई<br>आकार-९.५" x९.५"<br>कागदाचा प्रकार १३० GSM आर्ट पेपर<br>ब) पाकीटे (फोर कलर) आकार -५" x १०"<br>९० GSM आर्ट पेपर<br>क) पत्रिका घडी करुन पाकीटात भरणे पाकीटांसाठी गेमटेप वापरणे. | ५,४०,००० |

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त तपशीलाप्रमाणे निमंत्रण पत्रिका छपाई करुन घेता येतील व त्याकामी अंदाजे रक्कम रु. १४,००,०००/- (अक्षरी- रुपये चौदा लाख ) मात्र खर्च अपेक्षित आहे.

प्रस्ताव:- तरी सन-२०१९ मधील संस्थानमार्फत साज-या करण्यात येणा-या उत्सवासाठी उपरोक्त प्रमाणे नमुद केलेल्या निमंत्रण पत्रिका छापून घेणेस, पत्रिका व पाकीटे छपाई करणेसाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस, जाहिरातीनुसार आलेल्या ई-निविदेबाबत कार्यवाही करणेसाठी, व निमंत्रण पत्रिका छपाई कामासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु. १४,००,०००/- (अक्षरी- रुपये चौदा लाख ) मात्रचे खर्चास मंजुरी मिळणेस निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७५३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०१९ मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

विषय नं.२७ **शिर्डी महोत्सवासाठी (३१ डिसेंबर २०१८) कलाकार व त्यांचे मानधन निश्चीत करणेबाबत.**

प्रस्ताव- प्रस्तावना – मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७/११/२००४ चे सभेतील निर्णय क्र. १२० ला अनुसरुन सन २००४ पासून इंग्रजी नववर्षाचे अगोदर २ ते ३ दिवस शिर्डी महोत्सव सुरु करण्यास मान्यता मिळालेली आहे.

पुर्वी शिर्डी महोत्सव २ ते ३ दिवस साजरा केला जात होता, मात्र सध्या दि. ३१ डिसेंबर या दिवशी साजरा केला जात आहे. गेल्या अनेक वर्षापासून नववर्षाचे पुर्वसंधेला व नववर्षाचे पहिल्या दिवशी शिर्डीमध्ये श्रींचे दर्शनासाठी मोठया प्रमाणात गर्दी होते. यावेळी श्रींचे दर्शनाकरीता आलेल्या साईभक्तांसाठी सरत्या वर्षाचा शेवट व नववर्षाचा प्रारंभ साईनामाच्या गजरात व्हावा, या हेतूने साईभजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

साईभजन संध्या कार्यक्रमासाठी संस्थानकडे बरेचशे कलाकार अर्ज करत असतात. मागील वर्षी दि.३१ डिसेंबर २०१७ रोजी खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | गायन प्रकार | कलाकार संख्या | वेळ | सर्व करांसह मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | विजय साखरकर,मुंबई | साई-स्वर गीत संध्या | ३० | सायं. ७.०० ते ९.३० | ३५,०००/- |
| ०२ | श्री निरज शर्मा , दिल्ली | साईभजन संध्या | १० | रात्रों ९.३० ते १२.०० | ५१,०००/- |

विभागाचा अभिप्राय – नेहमीचे प्रथेप्रमाणे याहीवर्षी शिर्डी महोत्सव साजरा करावयाचा ठरल्यास, त्यातील साईभजन संध्या कार्यक्रम हे श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप या ठिकाणी आयोजित करता येतील.

शिर्डी महोत्सव २०१८ मध्ये दि. ३१ डिसेंबर २०१८ रोजी रात्री ७.०० ते ९.३० व ९.३० ते १२.०० या वेळेत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी खालील तक्त्यात नमुद कलाकारातून किंवा मा. व्यवस्थापन समिती ठरविल यातुन दोन कलाकारांची निवड करावयाची आहे.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | मोबाईल नंबर | गायन प्रकार | कलाकार संख्या | सर्व करांसह मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.मदन चौहान, रायपूर (छत्तीसगढ) | ९८२६६०८२७७ | हिंदी भजन संध्या | ७ | २,५०,०००/- | मा. श्री. बिपीनदादा कोल्हे सो. यांची शिफारस |
| ०२ | श्री.अंचल शर्मा, बिलासपूर | ९८२७१८०९५० | साई भजन संध्या | १२ | ३५,०००/- | ई-मेल |
| ०३ | साई सावली भजन मंडळ वडाळा, मुंबई | ८८९८९५६८३८ | साई भजन संध्या | १५ | ३०,०००/- | ई-मेल |
| ०४ | अवधेश चंदन भारद्वाज, लखनऊ उत्तर प्रदेश | ९४५१७६५२४४ | साई भजन संध्या | १० | निशुल्क | पत्र |
| ०५ | उज्जवल शर्मा, हरिद्वार | ७०४२७०५४०४ | साई भजन संध्या | १० | निशुल्क | पत्र |
| ०६ | जगदीश मारुती पाटील, वडवली, ठाणे | ८०९७२१८१११ | साई भजन संध्या | १२ | निशुल्क | ई-मेल |

प्रस्ताव– तरी दि.३१ डिसेंबर २०१८ रोजी सायंकाळी ७.०० ते ९.३० व रात्रौ ९.३० ते १२.०० या कालावधीत आयोजित करावयाच्या साईभजन संध्या कार्यक्रमासाठी दोन कलाकार व त्यांचे मानधन ठरविणे व सदरचे कार्यक्रम हे श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप याठिकाणी आयोजित करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी महोत्सवासाठी (३१ डिसेंबर २०१८) मोफत सेवा देणाऱ्या खालील तक्तामध्ये दर्शविल्याप्रमाणे कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | तारीख | कार्यक्रमाची वेळ | कलाकाराचे नांव | कलाकार संख्या | कार्यक्रमाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २२.१२.२०१८ (दत्तजयंती ) | ७.३० ते ९.०० | व्दारका मंडळी, बेंगलोर | १२ | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेज |
| ०२ | २३.१२.२०१८ | ७.०० ते ८.३० | मनिषा धिंग्रा, दिल्ली | १५ | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेज |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ८.३० ते ९.४५ | रमेश ओबेरॉय, मुंबई | २५ | |
| ०३ | २४.१२.२०१८ | ७.०० ते ९.४५ | सुबरत, ओडीसा | १५ | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेज |
| ०३ | २५.१२.२०१८ | ७.०० ते ९.४५ | विनया कुलकर्णी, नाशिक | १५ | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेज |
| ०४ | २६.१२.२०१८ | ७.०० ते ९.४५ | अनिलकुमार मिस्कीन, कर्नाटक | १६ | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेज |
| ०५ | २७.१२.२०१८ | ७.०० ते ९.४५ | सुधांशु लोकेगावकर, शिर्डी | | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेज |
| ०६ | २८.१२.२०१८ | ७.०० ते ९.४५ | उज्वल शर्मा, हरिव्दार | १५ | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेज |
| ०७ | २९.१२.२०१८ | ७.०० ते ९.४५ | रविंद पिंगळे, शिर्डी | १० | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडम स्टेज |
| ०८ | ३०.१२.२०१८ | ७.०० ते ९.४५ | नारायण मुंदडा, व सार्थक (आप्पा) गायकवाड मुंबई | २७ | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप स्टेज |
| ०९ | ३१.१२.२०१८ | ७.०० ते ९.३० | जगदीश मारुती पाटील, मुंबई | १२ | साईआश्रम नं.१ समाधी शताब्दी मंडप |
| | | ९.३०ते १२.०० | साई स्वरांजली संगीत संच, नागपूर | ०७ | साईआश्रम नं.१ आश्रम शताब्दी मंडप |

**तसेच उपरोक्त कलाकारांपैकी गैरहजर असणाऱ्या कलाकारांचे जागी दुसऱ्या मोफत सेवा देणाऱ्या कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष/ध्वनिक्षेपन विभाग)**

---

**विषय नं.२८** **वाहन विभागाकडील १३५ वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

१) कलम १७ (१) मध्ये, "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेची मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगंणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील ," असे नमुद केलेले आहे.

२) कलम १७ (२) (झ) मध्ये, "सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद केलेले आहे.

प्रस्ताविक:- संस्थानचे ११० वाहनांचा दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ या कालावधीतील विमा नुतनीकरण करणे करीता राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडुन दरपत्रके मागवून निम्नतम दर देणारे युनाइटेड इंडिया इश्युरेन्स कं. लि., नाशिक रोड यांचेकडून संस्थान वाहनाचे वाहन विमा उतरविण्यात आलेला असुन या कामी एकुण रक्कम रु.१७,६७,६२८/- (अक्षरी रक्कम रु.सतरा लाख सदुसष्ट हजार सहाशे अठ्ठावीस मात्र ) खर्च आलेला आहे. तसेच २०१७-१८ मध्ये दि.२१/०३/२०१९ अखेर ऑड कालावधीचा ०६ वाहनांचा विमा उतरविण्यात आला असुन त्याकामी रक्कम रू. १,३३,८६६/- इतका खर्च झालेला आहे.

उपरोक्त ११६ वाहनापैकी सन २०१८ मध्ये दि. २१/०५/२०१८ रोजी ०८ वाहनांचा लिलाव झालेला आहे.

तसेच उर्वरीत १०८ वाहनांचा व नविन १ टेलरचा तसेच १ दुचाकी वाहनाचा अशा एकुण ११० वाहनांचा दि.०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० या पुर्ण वर्षाच्या कालावधीचा विमा नुतनीकरन करने आवश्यक आहे.तसेच सन२०१८-१९ मध्ये एकुण २५ वाहने नवीन आलेली असल्याने त्यांची सध्याची विमा मुदत संपल्यानंतर दि.३१/०३/२०२० पर्यत विमा करने करीता ऑड कालावधीचा विमा करावा लागेल.

सध्या संस्थानकडे असलेली वाहने व त्यांचा करावयाचा विमा याबाबतची तपशीलवार माहीती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र. १ पुर्ण वर्षाचा विमा करणे (Regular )**

| अ.न. | कालावधी | झिरो डेप विमा | फुल विमा | थर्ड पार्टी विमा | एकुण वाहने |
|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | |
| १. | कार्यालयीन वाहने | ०२ | १२ | ०० | १४ |
| २. | रुग्णवाहीका वाहने | ०३ | ०८ | ०३ | १४ |
| ३. | स्कुल बस वाहने | ०० | १३ | ०० | १३ |
| ४. | प्रवासी बस वाहने | ०१ | ०७ | ०४ | १२ |
| ५. | मालवाहतुक वाहने ( ट्रॅक्टर सह ) | ०१ | १८ | ०१ | २० |
| ६. | टॅकर / टेलर | ०० | ०८ | ०० | ०८ |
| ७. | दुचाकी वाहने | ०१ | ०३ | ०३ | ०७ |
| ८. | इतर( आपत्कालीन) | ०० | ०७ | ०१ | ०८ |
| ९. | बॅटरी कार वाहने | ०० | ०४ | ०० | ०४ |
| १०. | मोबाईल टॉयलेट | ०० | ०९ | ०१ | १० |
| | **एकुण वाहने** | ०८ | ८९ | १३ | ११० |

**तक्ता क्र २ अपुर्ण कालावधी (Odd Period Insurance)**

| अ.न. | कालावधी | झिरो डेप विमा | फुल विमा | थर्ड पार्टी विमा | एकुण वाहने |
|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | |
| १. | कार्यालयीन वाहने | ०४ | ०० | ०० | ०४ |
| २. | प्रवासी बस वाहने | १५ | ०० | ०० | १५ |
| ३. | मालवाहतुक वाहने | ०५ | ०० | ०० | ०५ |
| ४. | अग्निशामक चेसी | ०१ | ०० | ०० | ०१ |
| | एकुण वाहने | २५ | ०० | ०० | २५ |

विभागाचा स्पष्ट अभिप्रायः- दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२० अखेर एक वर्ष कालावधी करीता उपरोक्त प्रमाणे वाहन विभागाकडील १३५ वाहनांचा वाहन निहाय विमा उतरविण्याचा असलेने राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडूनच बंद लिफाप्यामध्ये निविदा मागविणे आवश्यक आहे. कारण ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास त्यास सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्या प्रतिसाद देत नसलेने संस्थानला विमा पॉलिसीचे स्पर्धात्मक दर प्राप्त होत नाही. तसेच विमा कंपन्याचे दरात स्पर्धा ही होत नाही. हा अनुभव संस्थानच्या वाहनांचा दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ या कालावधीतील विमा नुतनीकरण करतेवेळी आलेला आहे. संस्थान फक्त सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुनच दरपत्रक मागवित असलेने ई-निविदेची आवश्यकता नाही.

उपरोक्त प्रमाणे संस्थानकडे असलेल्या सध्याचे १३५ वाहनांचे विमा नुतनीकरण करणे कामी (जी.एस.टी.सह) अंदाजे रक्कम रु.३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तिस लाख ) मात्र खर्च अपेक्षीत आहे. वाहन विभागाचे सन-२०१९-२०२० या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्राकामध्ये विमा खर्चाकरीता रक्कम रु.३१,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.एकतिस लाख ) मात्र खर्चाची तरतुद प्रस्तावीत असुन सदरचा खर्च मोटारकार विमा खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

उपरोक्त तक्ता क्र.१ मधील नमुद केलेल्या ११० वाहनांचा विमा नुतनीकरन करण्याचा दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२० कालावधी वार्षीक आहे. यातील 'अ' रकान्यात नमुद केलेल्या ८ वाहनांचा झीरो डेप प्रकारचा तर 'ब' रकान्यात नमुद केलेल्या ८९ वाहनांचा पुर्ण विमा (पॅकेज पॉलीसी) तसेच 'क' रकान्यात नमुद केलेल्या १३ वाहनांचा थर्ड पार्टी विमा करणे आवश्यक आहे.

तसेच तक्ता क्र. २ मधील २५ वाहने नविन असलेने त्यांचा सध्याचा विमा कालावधी संपलेनंतर दि.३१/०३/२०२० अखेर विमानुतनीकरन ऑड कालावधी करीता करणे आवश्यक आहे. त्यांचा देखील झीरो डेप विमा करावा लागेल.

वरील प्रमाणे तक्ता क्र.१ मधील ११० व तक्ता क्र.२ मधील २५ अशा एकुण १३५ वाहनांचे विमा नुतनीकरणाकरीता दरपत्रके मागवीता येतील. निम्नतर दर देणा-या विमा कंपनीस वार्षीक कालावधीचे ११०

वाहनांच्या विम्याची रक्कम एकाचवेळी देता येईल. मात्र उर्वरीत २५ वाहनांचे विमा हप्त्याचे दर मान्य करून संबधीत वाहनांचे विमा मुदत संपण्यापुर्वी स्वतंत्रपणे रक्कम अदा करून विमा नुतनीकरण करून घेण्यात येईल.

मागणी:- तरी उपरोक्त प्रस्तावात नमुद केले प्रमाणे संस्थानचे एकुण १३५ वाहनांचा विमानुतनीकरण करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तिस लाख मात्र ) पर्यतचे खर्चास मान्यता मिळणेस तसेच याकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे १३५ वाहनांचा विमानुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३०,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वाहन विभाग)**

---

**विषय नं.२९** **श्री.साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक (वर्ग-४ कर्मचारी) यांचेवर शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या गुन्हयाबाबत.**

**प्रस्ताव-** विषयाची पूर्वपीठीका -

०१. श्री.साईदास निवृत्ती शिंदे, वर्ग-४ कर्मचारी हे संरक्षण विभागात कायम सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांची डयुटी दि.३०/१०/२०१८ रोजी सकाळी ०६ ते ०२ व दि.३१/१०/२०१८ रोजी दुपारी ०२ ते १० अशी गेट नंबर ५ येथे नेमलेली होती. सदरचे कालावधीत श्री.शिंदे हे विनापरवानगी रजा अर्जाशिवाय गैरहजर राहिले. त्यामुळे दैनंदिन कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊन साईभक्तांना सेवा पुरविणेस अडचण निर्माण झाली आहे. असे श्री.साईदास शिंदे यांचे विरुद्ध पोलीस उपअधिक्षक, श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे निवेदन आलेले आहे. श्री.शिंदे यांचे सदरचे कृत्य गैरशिस्त वर्तनात मोडते. उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.शिंदे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२३९५/२०१८, दि.०७/११/२०१८ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढण्यात आलेली होती.

०२. दरम्यान सहा. पोलिस निरीक्षक, शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी यांनी जा.क्र. ४३१८/२०१८, दि.०८ नोव्हेंबर, २०१८ अन्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे-

".. .. ..शिर्डी पोलीस स्टेशन गुन्हा रजी नंबर|229|2018 भा.द.वि.कलम ३०४(ब) प्रमाणे दि.२८/१०/२०१८ रोजी दाखल झाला असुन सदर गुन्हयातील मयत नामे वैशाली साईदास शिंदे वय ३३ रा.वेदभक्ती निवास गणेशवाडी, शिर्डी हीस तीचे सासरचे लोकांनी तीचे माहेरुन घराचे कर्ज भरण्यासाठी पैसे आनावे म्हणुन मानसिक व शारीरक त्रास दिल्याने सदर मयत हीने शिर्डी येथील तीचे राहते घराचे छतावरुन उडी मारुन आत्महत्या केले आहे. तीच्या आत्महतेस तीचे सासरचे लोकांनी प्रवृत केले म्हणुन मयत हीचे आईचे फिर्यादी वरुन गुन्हा राजी दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपी नामे साईदास निवृत्ती शिंदे हा श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथे सुरक्षा विभागात नोकरीस आहे तरी माहिती व पुढील कार्यवाही करीता सादर.''

शिर्डी पोलीस स्टेशनचे उपरोक्त पत्रास अनुसरुन जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२४११/२०१८, दि.१०/११/२०१८ अन्वये संरक्षण विभागासपत्र देऊन त्यांचे विभागाचे कर्मचारी श्री.साईदास शिंदे यांचे गैरवर्तनाबाबत सविस्तर माहितीसह अहवाल सादर करणेस कळविण्यात आलेले होते.

०३. श्री.साईदास निवृत्ती शिंदे, याचे गैरवर्तनाबाबत संरक्षण अधिकारी, संरक्षण विभाग यांनी जा.नं./८६४/२०१८, दि.१७/११/२०१८ रोजीचे अहवाल सादर केला असून त्यात त्यांनी खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे -

"....उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये श्री.साईदास निवृत्ती शिंदे, वर्ग-४ कर्मचारी यांचे गैरवर्तनबाबत सविस्तर माहितीसह अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.

त्यास अनुसरुन सादर की, श्री साईदास निवृत्ती शिंदे हे दि.२७/११/२०१८ रोजी डयुटीवर हजर होते. यानंतर त्यांनी दि.२८/११/२०१८ रोजी राहीलेली आठवडा सुटी व दि.२९/११/२०१८ रोजी सार्वजनिक सुटी घेतलेली होती. यानंतर श्री साईदास निवृत्ती शिंदे हे दि.३०/११/२०१८ पासुन ते आजपर्यंत विनापरवानगी गैरहजर आहेत.

वरील संदर्भिय पत्राचे अनुषंगाने इकडील दि.११/११/२०१८ चे पत्राने स.पो.नि.शिर्डी पो.स्टे.यांना श्री साईदास निवृत्ती शिंदे यांचे अटकेबाबत व पोलीस कस्टडीबाबत अहवाल मागविण्यात आला होता. त्यास अनुसरुन स.पो.नि.शिर्डी पो.नि.शिर्डी पो.स्टे. यांनी दि.१७/११/२०१८ चे पत्राने कळविले आहे की, साईदास

निवृत्ती शिंदे हा श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथे सुरक्षा विभागात नोकरीस आहे. त्यास दि.२८/१०/२०१८ रोजी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली असुन त्यास दि.२८/१०/२०१८ ते दि.३१/१०/२०१८ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रीमांड घेण्यात आलेली असुन व्दीतीय पोलीस कस्टडी दि.३१/१०/२०१८ ते दि.०२/११/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली असून दि.०२/११/२०१८ रोजी पासुन तो न्यायालयीन कोठीत आहे, असे कळविले आहे."

तसेच सदर पत्रासोबत स.पो.नि.शिर्डी पो.नि.शिर्डी पो.स्टे. यांचे दि.१७/११/२०१८रोजीच्या पत्राची प्रत जोडली असून त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे –

"....शिर्डी पोलीस स्टेशन गुन्हा रजी नंबर|229|2018 भा.द.वि.कलम ३०४(ब) प्रमाणे दि.२८/१०/२०१८ रोजी दाखल झाला असुन सदर गुन्हयातील मयत नामे वैशाली साईदास शिंदे वय ३३ रा.वेदभक्ती निवास गणेशवाडी, शिर्डी हीस तीचे सासरचे लोकांनी तीचे माहेरुन घराचे कर्ज भरण्यासाठी पैसे आनावे म्हणुन मानसिक व शाररीक त्रास दिल्याने सदर मयत हीने शिर्डी येथील तीचे राहते घराचे छतावरुन उडी मारुन आत्महत्या केले आहे. तीच्या आत्महतेस तीचे सासरचे लोकांनी प्रवृत केले म्हणुन मयत हीचे आईचे फिर्यादी वरुन गुन्हा राजी दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी नामे साईदास निवृत्ती शिंदे हा श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथे सुरक्षा विभागात नोकरीस आहे. यास दि.२८/१०/२०१८ रोजी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली असुन त्यास दि.२८/१०/२०१८ ते दि.३१/१०/२०१८ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रीमांड घेण्यात आलेली असुन व्दीतीय पोलीस कस्टडी दि.३१/१०/२०१८ ते दि.०२/११/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली असून दि.०२/११/२०१८ रोजी पासुन तो न्यायालयीन कोठीत आहे,करीता माहीती सादर''

थोडक्यात, परिच्छेद अ मधील अ.नं. ०१ ते ०३ मध्ये नमुद केलेल्या बाबींचा विचार करतां, श्री. साईदास निवृत्ती शिंदे यांचेकडून गैरवर्तन घडल्याचे सकृतदर्शनी दिसून येते आहे.

(ब-०१) संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कर्मचारी यांचेकडून गैरवर्तन / गैरवर्तणूक / शिस्तभंग घडल्यास त्याबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३–प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-याचे कर्तव्य या शीर्षाखाली उपकलम १ मध्ये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच - (i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल (ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल; आणि (iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही, असे नमूद करणेत आलेले आहे.

उपरोक्त परिच्छेद अ मधील अ.नं. ०१ ते ०३ मध्ये नमूद केलेल्या घटना विचारात घेतां, श्री. साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक(वर्ग-४ कर्मचारी) यांनी उपरोक्त सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ मधील कलम ३(१) चे उल्लंघन करुन, शिस्तभंग केलेला आहे.

(ब-०२) याव्यतिरिक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा ( शिस्त व अपील) विनियम, २०१३ चे प्रकरण २ - निलंबन या शीर्षाखालील कलम ०४ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे –

(१) समिती किंवा समितीने यासाठी शक्ती प्रदान केलेले कोणतेही प्रधिकारी सर्वसाधारण किंवा विशेष आदेश पारीत करुन संस्थानाच्या कर्मचा -याला निलंबीत ठेवु शकतात-

(अ) जेव्हा त्याच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई योजलेली असेल किंवा प्रलंबीत असेल, किंवा

(ब) जेव्हा वर उल्लेख केलेल्या प्राधिका-यांच्या मतानुसार तो संस्थानाच्या हितसंबंधांना बाधा आणणा-या कारवायात गुंतला असेल, किंवा

(क) जेव्हा त्याच्या विरुद्ध एखाद्या फौजदारी गुन्ह्याच्या प्रकरणाचा तपास, चौकशी किंवा, खटला चालु असेल: मात्र

जेव्हा निलंबन आदेश समिती व्यतिरिक्त इतर प्राधिका-यांनी पारीत केला असेल तर अशा प्राधिका-यानी

ताबडतोब ज्या परिस्थीतीत आदेश पारित करण्यात आला त्यासंबंधी समितीला कळविणे आवश्यक आहे.

(२) संस्थानाचा कर्मचारी समितीच्या आदेशाव्दारा पुढीलप्रमाणे निलंबीत ठेवला आहे असे मानले जाईल.

(अ) जर त्याला फौजदारी दोषारोपाबद्दल किंवा इतर कारणासाठी ४८ तासापेक्षा जास्त काळ पोलीस किंवा न्यायालयीन कोठडीत स्थानबद्ध केले असेल तर त्याच्या स्थानबद्धतेच्या तारखेपासुन;

(ब) जर त्याला ४८ तासापेक्षा जास्त काळ तुरुंगवासाची शिक्षा झाली असेल तर आणि त्याला अशा गुन्हा शाबीतीमुळे ताबडतोब कामावरुन बडतर्फ केले नसेल, किंवा कमी केले नसेल किंवा सक्तीने सेवानिवृत्त केले नसेल तर गुन्हा शबितीच्या तारखेपासुन.

(ब-०३) तसेच, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ यात आणखी सुधारणा करणेसाठी सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ (दिनांक १३ जुलै, २०१७) यामधील कलम ५ – सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम १४ ची सुधारणा या शीर्षाखाली मूळ अधिनियमातील कलम १४(२)(क) मधील तरतुदीमध्ये बदल करुन, कलम ५ (२) (क) (दोन) समितीच्या कोणत्याही अधिका-याविरुध्द किंवा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे; / (तीन) समितीच्या कोणत्याही अधिका-याचे किंवा कर्मचा-याचे त्या समितीकडे निलंबीत प्रस्तावित करण्याचे अधिकार प्रशासनास देणेत आलेले आहेत.

(क) प्रस्ताव- श्री.साईदास निवृत्ती शिंदे, याचं गैरवर्तनास अनुसरुन व त्याकामी त्यांचेविरुध्द दाखल करणेत आलेल्या वैयक्तिक गुन्हयाचे स्वरुप व व्याप्ती याचा पोलिस यंत्रणेमार्फत अद्याप तपास सुरु आहे.

उपरोक्त परिच्छेद अ, ब व क मध्ये नमुद केलेल्या बाबी व विवेचनास अनुसरुन, श्री. साईदास निवृत्ती शिंदे हे सध्या न्यायालयीन कोठडीत असल्यामुळे ते डयुटीवर गैरहजर आहेत, तसेच श्री. शिंदे यांनी संस्थानचे सेवा विनियमाचे उल्लंघन केलेले आहे. तरी त्यांचे शिस्तभंगाचे गांभिर्य विचारात घेता, श्री. साईदास निवृत्ती शिंदे यांना संस्थान सेवेतुन “सेवानिलंबीत” करुन त्यांची खातेनिहाय चौकशी सुरु करणेबाबत निर्णय होणेस होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.७५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा ( शिस्त व अपील) विनियम, २०१३ कलम ०४ (२) (अ) अन्वये श्री.साईदास निवृत्ती शिंदे, सुरक्षा रक्षक (वर्ग-४ कर्मचारी) यास सदर गुन्ह्यात अटक झाल्याच्या दि.२८/१०/२०१८ पासून पुर्वलक्षी प्रभावाने संस्थान सेवेतून निलंबीत करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३० श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या विभागाचे मुख्याध्यापक पदाबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) विषयाची पूर्वपिठीका- सध्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत,श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डीही संस्था विनाअनुदानित तत्वावर कार्यान्वीत आहे.

तथापि, सदर विभागाबाबत पूर्वपीठीका खालीलप्रमाणे -

१) संस्थानमार्फत सन १९९३ पासून श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ही मुलींची शाळा कार्यान्वीत आहे.

२) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनीजा.क्र. माध्य.३(१४)नमाशा/मान्यता/पुवी ९५/१४६६, दिनांक०५ फेब्रुवारी, १९९७ अन्वये, इ. ८वी ते इ. १० वी कायम विनाअनुदानित तत्वावर मराठी माध्यमातील कन्या शाळा माहे जून,१९९६ पासून सुरु करणेस मान्यता दिली.

३) दि.२६-२७/०२/२००० चे तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.९२ अन्वये, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या शाळेत शैक्षणिक वर्ष २०००-२००१ पासून कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेऊन,शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे यांनी कायम विनाअनुदानिततत्वावर त्यांचेकडीलपत्र क्र. जा.क्र. उमाशि-१/पुवि/नविनवर्ग मान्यता आदेश /२०००-०१, दिनांक०१ ऑक्टोबर,२००१ अन्वये इयत्ता ११ वीचे वर्ग सुरु करणेस मान्यता दिली.

४) शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी त्यांचेकडील जा.क्र. उमाशि-१पुवि/१/२००५-०६,दिनांक१९ जुलै,२००५ रोजीचेपत्रान्वये,श्री साईबाबा कन्या विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी या शाळेस संलग्नउच्च माध्यमिक वर्गात फक्त मुली ऐवजी मुला-मुलींना (सहशिक्षण) प्रवेश सन २००५-०६ पासून कायम विनाअनुदान तत्वावर देणेबाबत विहीत शर्तीच्या अधिन राहून मान्यता दिली.

५) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र. शिऊसं/पुवि/उमाशि-१/ना.ब./२०१६-१७/२४४९,दिनांक १० एप्रिल, २०१७ अन्वये,जुने नांव श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी चे ऐवजी नवीन नांव श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी असा बदल करणेत आले असलेबाबत कळविले.

६) श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका पदावरीलश्रीमती निता बबनराव चव्हाणके या संस्थानचे प्रचलित सेवानियमानुसार,दिनांक३१ डिसेंबर,२०१५ रोजी सेवानिवृत्त झालेनंतर, संस्थानचे कायदे सल्लागार ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर तसेच विभागीय शिक्षण

उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे दिनांक ०२ जुलै, २०१६ रोजीचे अभिप्रायानुसार जेष्ठतम शिक्षिका श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर, सहाय्यक शिक्षिका यांचेकडेस सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/३६९८/२०१५,दिनांक ३० डिसेंबर,२०१५अन्वये मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविणेत आला.

७) श्रीमती मिरजकर यांचे नेमणूकीपासून व त्याच्या कामकाजाबाबत झालेल्या तक्रारीस अनुसरुन खालील परिशिष्टात नमुद केलेप्रमाणे घटना घडलेल्या आहेत त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

| अ.नं. | संदर्भ व विभाग | पत्राचा दिनांक | तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | जा.क्र. एसएसएस/साप्रशा/ आस्था/ ३६९८/२०१५ | ३०/१२/२०१५ | श्रीमती जहॉआरा मिरजकर यांचेकडे मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला. |
| ०२ | मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं.१४ / निर्णय क्र.९१८ | २२/१२/२०१६ | यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर विभागाकडील सेवाजेष्ठता, गोपनिय अहवलाची प्रतवारी, ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा अभिप्राय या सर्व बाबींचे अवलोकन करुन महाराष्ट्र शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३(४) मधील तरतुदीनुसार तसेच शिक्षण संचालक, पुणे विभाग यांचेशी दूरध्वनीव्दारे केलेल्या चर्चेस अनुसरुन जेष्ठतम शिक्षिका श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्याता देण्यात आली. |
| ०३ | जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३६३२/२०१६ | ०७/०१/२०१७ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापिका पदावर एक वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांना पदोन्नतीने नेमणूक देण्यात आली. |
| ०४ | श्री वरघुडे गंगाधर विश्वनाथ, सहाय्यक शिक्षक, श्री साईबाबा कन्याविद्यामंदिर यांचा अर्ज. | ०६/०७/२०१७ | श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नेमणूक करतांना सेवाजेष्ठता डावलून कनिष्ठ शिक्षिकेला देण्यात आलेली नेमणूक रद्द करावी आणि माझ्यावर झालेला अन्याय दूर करुन माझी मुख्याध्यापक पदी नेमणूक करणेबाबत अर्ज केलेला होता तसेच शालेय न्यायधिकरण, पुणे विभाग- सोलापूर येथे पदोन्नोतीने मुख्याध्यापक पद मिळणेबाबत अपिल दाखल केलेले आहे. |
| ०५ | मा.व्यवस्थापन समिती सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र. १२ / निर्णय क्र २८२ | ०४/०४/२०१८ | यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचे दि. ३१ मार्च २०१८ रोजीचे अभिप्रायानुसार श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पदी केलेली नियुक्ती रद्द करून, शाळा संहितेमधील निकष, शैक्षणिक पात्रता व सेवाजेष्ठता या सर्व बाबींचा विचार करता श्री गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा. शिक्षक यांची श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. |
| ०६ | जा. क्र. एसएसएस/साप्रशा/आस्था/३२२/२०१८ आदेश | ०३/०५/२०१८ | श्री गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा. शिक्षक यांची श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. |
| ०७ | आयुक्त, शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र. आशिका/१७-१८/ शि.ह.मंच /आस्था क-१०६-प्राथ/२५६९ | १०/५/२०१८ | “.. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही संस्था सन १९९० पासून कन्या विद्या मंदिर ही मुलींची शाळा चालवित असल्याने आपण संदर्भांकित पत्रामध्ये नमुद केलेले आहे. याबाबत संबंधित शाळेत इयत्ता ५ वी ते १० वीच्या स्तरावर केवळ मूलींचीच पट असल्याचे School Report Card आपण सादर केलेले आहे.<br>अशा परिस्थितीत इयत्ता ५ वी ते १० वी शैक्षणिक सतर पूर्णतः मुलींसाठी असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच शाळेस जुलै २००५ मध्ये सन २००५-०६ पासून उच्च माध्यमिक स्तरावरील मुलां-मुलींसाठी इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वीचे वर्ग सुरु करण्यास सहशिक्षणाची अनुमती प्राप्त झाल्याचे आपण नमुद केलेले असल्याने, सदर इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वीची शाळा ही कन्या शाळा असल्यामुळे या शाळेतील मुख्याध्यापकाची अर्हता व नेमणूकीबाबत आपले लक्ष महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ च्या नियम क्रमांक ३(४) कडे वेधण्यात येत असून या नियमातील तरतुदीनुसार यशानियम कार्यवाही करण्यात यावी.” असे कळविले आहे. |
| ०८ | अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण- | १९/०६/२०१८ | “ प्रस्तुत प्रकरणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था संचलित श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर, शिर्डी जि. अहमदनगर या शाळेत सन २००१ पासून कनिष्ठ महाविद्यालय जोडण्यात आल्यानंतर सन-२००५ पासून सदर कनिष्ठ महाविद्यालयास सह- |

| | | | |
|---|---|---|---|
| | २०१८/(प्र.क्र.१४४)/टिएनटी-१. | | शिक्षणाची मान्यता देण्यात आलेली असल्याचे व आता सदर कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय येथील मुख्याध्यापक / प्राचार्य पदाचा प्रश्न आपल्या कार्यालयाच्या दि. ३१/०३/२०१८ च्या पत्रामुळे उपस्थित झालेला असल्याबाबत अर्जदार जहॉआरा मिरजदार यांनी उपरोक्त पत्रान्वये नमूद केले आहे.<br>याबाबत आपल्या निर्दशनास आणण्यात येते की, महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ नियम ३(४) च्या तरतूदी स्पष्ट आहेत. तसेच माध्यमिक शाळा संहितेनुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हे माध्यमिक शाळेला जोडलेल्या उच्च माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक असतात. प्रस्तूत प्रकरणी श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर ही मूळची मुलींची शाळा आहे. त्यामुळे सदर शाळेच्या मुख्याध्यापक पदासंदर्भात उक्त नियामावलीतील नियम ३(४) च्या तरतुदीनुसार सेवाजेष्ठ शिक्षिकेची संबंधित पुरुष शिक्षकांची जेष्ठता विचारात न घेता, मुख्याध्यापिका म्हणून नियुक्तीसंदर्भात कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे प्रस्तूत प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत संबंधित संस्थेस कळविण्यात यावे" असे नमुद केलेले आहे. |
| ०९ | शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. शिउसं/उमाशि-४०२/ मुख्याध्यापक/२०१८/६०९८. | ३०/०८/२०१८ | सदर पत्रान्वये "..उपरोक्त विषयाच्यात्यांच्या संदर्भिय पत्र क्र. ५ नुसार या कार्यालयाने मुलींच्या करिताचा चालविण्यात येत असलेल्या शाळेमध्ये माध्यमिक शाळा संहिता मधील नियम ६१.१(अ) मध्ये नमुद केलेल्या अटीनुसार सेवाजेष्ठ शिक्षिकेची नियुक्ती पुरुष शिक्षकांची सेवाजेष्ठता विचारात न घेता मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती केली जाईल त्याच प्रमाणे महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील कलम ३(४) मधील तरतुदीनुसार, मुर्लीच्या माध्यमिक शाळेतील नियुक्तीबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. व त्याप्रमाणे मुख्याध्यापक नियुक्ती करावी असे कळविण्यात आले होते.<br>आपल्याकडील दि.१८/०९/२०१७ च्या पत्रानुसार श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी ता. राहाता या शाळेस सन २००५-०६ पासून मुले व मुली सहशिक्षण प्रवेश देण्याबाबत मान्यता शासनाने दिली असल्याचे कळविल्यामुळे या कार्यालयतील संदर्भ पत्र क्र-८ नुसार मुख्याध्यापक पद सेवाजेष्ठतेने भरावे असे कळविण्यात आले होते. सदरचे पत्र या कार्यालयाचे पत्र दि.२१/०४/२०१८ च्या पत्रानुसार रद्द करण्यात आलेले होते.<br>मा. आयुक्त (शिक्षण) म.रा. पुणे यांचेकडील दिनांक १०/०५/२०१८ च्या पत्रानुसार आणि मा. अवर सचिव , शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक १९/०६/२०१८ या पत्रानुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ही मुलींची शाळा असल्यामुळे मुख्याध्यापक नियुक्ती संदर्भात महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र-३(४) तरतुदीनुसार सेवाजेष्ठ शिक्षिकेची संबधित पुरुष शिक्षकांची सेवाजेष्ठता विचारात न घेता मुख्याध्यापिका म्हणून नियुक्ती करणेबाबत कळविलेले आहे. तरी उपरोक्त संदर्भ क्र-१२ व १३ नुसार मुख्यापिका पदावर तात्काळ सेवाजेष्ठ महिला शिक्षिकेची नियुक्ती करावी. " असे नमुद केलेले आहे.तसेच संस्थानने वेळोवेळी त्यांना मार्गदर्शनपर दिलेले पत्र व त्यावर त्यांनी दिलेले संदर्भ व पत्र सोबत खालीलप्रमाणे –<br>०१. माध्यमिक शाळा संहिता १९६३<br>०२. महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१<br>०३. या कार्यालयाचे पत्र जा. क्र. उमाशि-१/पुवि/१/२००५-०६/१४१०५/०६ दि. १६/०७/२००५.<br>०४. संस्थान पत्र क्र. ३९७१/२०१६ दि.०२/११/२०१६<br>०५. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं /उमावि-२/पुवि/मुख्याध्यापक/ २०१६/२१२५३/दि.१७/११/२०१६.<br>०६. आपले पत्र जा.क्र.एसएसएस/साप्रशा-आस्था/३२१२/२०१७ दि.१८/०९/२०१७<br>०७. आपले पत्र जा.क्र. एसएसएस/साप्रशा-आस्था/६२५२/२०१७ दि.२१/०२/२०१८<br>०८. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/माध्य-४०२/२०१८/२३८०दि.३१/०३/२०१८<br>०९. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. उमावि२/पुवि/मुख्याध्यापक/२०१६/३०८०, दि.२१/०४/२०१८<br>१०. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये शाळेने भरलेला ऑनलाईन युडास (स्कुल रिपोर्ट कार्ड)<br>११. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिउसं/उमावि-४०२/पुवि/मुख्याध्यापक /२०१८ /३३०२ दि. ०७/०५/२०१८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १२. महाराष्ट्र शासन-शिक्षण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. आशिका/ १७-१८ /शि.ह.मंच/आस्था क-१०६-प्राथ/२५६९ दि.१०/५/२०१८ चे पत्र.<br>१३.जिल्हा परिषद, माध्यमिक शिक्षण विभाग, अहमदनगरयांचेकडील जा.क्र.शिअमा /मु.का. /उमाशि/८७/२०१८ दि.१८/०९/२०१८ |
| १० | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,अहमदनगरयांचेकडील पत्र क्र.शिअमा /मु.का. /उमाशि/८७/२०१८ | १८/०९/२०१८ | त्याबाबत या कार्यालयास शासनाने असे आदेशीत केले आहे की, महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नियम ३(४) च्या तरतुदी स्पष्ट आहेत. तसेच माध्यमिक शाळा संहितेनुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हे माध्यमिक शाळेला जोडलेल्या उच्च माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक पदासंदर्भात उक्त नियमावलीतील नियम ३(४) च्या तरतुदीनुसार सेवाजेष्ठ शिक्षिकेची संबंधित पुरुष शिक्षकांची जेष्ठता विचारात न घेता मुख्याध्यापिका म्हणून नियुक्तीसंदर्भात कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी आपल्याकडून तात्काळ कार्यवाही करुन इकडील कार्यालयास अवगत करावे." असे नमुद केले आहे. |

**(ब) सद्य:स्थिती -**

१) श्रीमती मिरजकर यांना जा.नं. एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/७७०/२०१८,दि. १४ जून,२०१८ अन्वये अभिकथन पत्र व जा.नं. एसएसएस/साप्रशा/ वशी-शिस्त/१२८३/२०१८,दि. ०२/०८/२०१८ अन्वये पुरवणी अभिकथन पत्र देण्यात आले असून त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या आरोपांची खातेचौकशी सुरु करणेत आलेली असून, याकामी खातेचौकशी अधिकारी म्हणून ॲड. बी.वाय. काळवाघे, कोपरगांव हे काम पहात आहेत. सदरहू खाते चौकशीचे कामकाज सध्या सुरु आहे.

२) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. १९ जुन २०१८ चे पत्रान्वये " महाराष्ट्रखाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ नियम ३(४) च्या तरतूदी स्पष्ट आहेत. तसेच माध्यमिक शाळा संहितेनुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हे माध्यमिक शाळेला जोडलेल्या उच्च माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक असतात. प्रस्तूत प्रकरणी श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर ही मूळची मुलींची शाळा आहे. त्यामुळे सदर शाळेच्या मुख्याध्यापक पदासंदर्भात उक्त नियामावलीतील नियम ३(४) च्या तरतुदीनुसार सेवाजेष्ठ शिक्षिकेची संबंधित पुरुष शिक्षकांची जेष्ठता विचारात न घेता, मुख्याध्यापिका म्हणून नियुक्तीसंदर्भात कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे प्रस्तूत प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत संबंधित संस्थेस कळविण्यात यावे " असे कळविले आहे.

३) शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी त्यांचेकडील दि. ३०/०७/२०१८ चे पत्रान्वये " आपल्याकडील दि.१८/०९/२०१७ च्या पत्रानुसार श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी ता. राहाता या शाळेस सन २००५-०६ पासून मुले व मुली सहशिक्षण प्रवेश देण्याबाबत मान्यता शासनाने दिली असल्याचे कळविल्यामुळे या कार्यालयतील संदर्भ पत्र क्र-८ नुसार मुख्याध्यापक पद सेवाजेष्ठतेने भरावे असे कळविण्यात आले होते. सदरचे पत्र या कार्यालयाचे पत्र दि.२१/०४/२०१८ च्या पत्रानुसार रद्द करण्यात आलेले होते.

मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दिनांक १०/०५/२०१८ च्या पत्रानुसार आणि मा.अवर सचिव , शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक १९/०६/२०१८ या पत्रानुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ही मुलींची शाळा असल्यामुळे मुख्याध्यापक नियुक्ती संदर्भात महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र-३(४) तरतुदीनुसार सेवाजेष्ठ शिक्षिकेची संबधित पुरुष शिक्षकांची सेवाजेष्ठता विचारात न घेता मुख्याध्यापिका म्हणून नियुक्ती करणेबाबत कळविलेले आहे. तरी उपरोक्त संदर्भ क्र-१२ व १३ नुसार मुख्यापिका पदावर तात्काळ सेवाजेष्ठ महिला शिक्षिकेची नियुक्ती करावी. " असे कळविले आहे.

४) जिल्हा परिषद, माध्यमिक शिक्षण विभाग, अहमदनगर यांनी त्यांचे दि. १८/०९/२०१८ रोजीचे पत्रान्वये " महाराष्ट्रखाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नियम ३(४) च्या तरतुदी स्पष्ट आहेत. तसेच माध्यमिक शाळा संहितेनुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हे माध्यमिक शाळेला जोडलेल्या उच्च माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक पदासंदर्भात उक्त नियमावलीतील नियम ३(४) च्या तरतुदीनुसार सेवाजेष्ठ शिक्षिकेची संबंधित पुरुष शिक्षकांची जेष्ठता विचारात न घेता मुख्याध्यापिका म्हणून नियुक्तीसंदर्भात कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी आपल्याकडून तात्काळ कार्यवाही करुन इकडील कार्यालयास अवगत करावे." असे कळविले आहे.

५) दरम्यानचे कालावधीत दि.०३/०५/२०१८ चे आदेशाने श्री. वरघुडे यांची श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय या विभागाचे मुख्याध्यापक या पदावर नियुक्ती करणेत आली असून, सध्या श्री. वरघुडे हे काम पहात आहेत.

(क) प्रस्ताव व विनंती - उपरोक्त मा. शासनाकडील, शिक्षण विभाग, पुणे यांचेकडील तसेच माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर (उपरोक्त तक्त्यातील अनुक्रमे अनुक्रमांक ०७, ०८, ०९ व १० नुसार) या विविध पत्रात नमुद केलेप्रमाणे,श्री साईबाबा कन्या विद्यामंदिरव कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी या विभागाचे मुख्याध्यापक या पदावर पुनश्चः सेवाजेष्ठ महिला शिक्षिकेची नेमणूक करणेत येऊन, त्याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत कळविणेत आलेले आहे.

तथापी, वर सद्यःस्थितीत अ.नं. ०१ मध्ये नमुद केलेप्रमाणे,श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर, सहाय्यक शिक्षिका यांचेविरुध्द आलेल्या विविध तक्रारीनुसार, त्यांची खाते चौकशी सुरु असून,सदरील खाते चौकशी पुर्ण होऊन अंतिम निष्कर्ष अहवाल/अंतिम निर्णय अहवाल येणे बाकी आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, सध्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी मध्ये कार्यरत असणा-या सेवा जेष्ठ सहाय्यक शिक्षिका श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची सेवा जेष्ठतेनुसार पुनश्चः श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय या विभागाच्या मुख्याध्यापिका या पदावर नेमणूक करणेत यावी किंवा कसे याबाबत यथोचित निर्णय होणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी मध्ये कार्यरत असणा-या सहाय्यक शिक्षिका श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांचे विरुध्द आलेल्या विविध तक्रारीनुसार त्यांची खाते चौकशी सुरु असल्याने त्यांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देणेबाबतचा विषय स्थगित ठेवण्यात यावा व तसे शासनास कळविण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३१** **माहे जून-२०१८ ते सप्टेंबर-२०१८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या मालाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०० अन्वये "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्या गावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स अॅण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी", असे ठरलेले आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे टिपणी वरील निर्देश नुसार संस्थानला प्राप्त होणा-या गावरान तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश झालेले आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे.

संदर्भीय निर्णयांनुसार, गावरान तुपाचे सध्याचे पुरवठादार हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा. लि., हरीद्वार, यांचेकडून प्राप्त होणा-या तूपाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह अश्वमेध इंजिनीअर्स अॅण्ड कन्सलटंटस नासिक (NABL Lab) व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा (शासकीय प्रयोगशाळा) यांचेकडून करणेत येत आहे, तसेच आवश्यकतेनुसार केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचेकडूनही तपासणी करणेत येत आहे. तसेच खाद्यतेलाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह शासकीय प्रयोगशाळेकडून करणेत येत आहे.

उपरोक्त निर्णयानुसार दि.०२.०६.२०१८ पर्यंतचे सर्व प्रयोगशाळा तपासणी अहवाल यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेले आहेत. आता संस्थानला दि.०३ जून २०१८ ते ३० सप्टेंबर २०१८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या गावरान तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेंमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल तपशिलवार परिशिष्ठासह यासोबत सादर केले आहेत.

**अ)** उपरोक्त तपासणी अहवालांमध्ये १) प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा, औरंगाबाद, (शासकीय प्रयोगशाळा) यांचे बॅच नं. ३३/ दि. ०९.०८.२०१८ चे तपासणी अहवालांमध्ये "The Above Submitted Sample's does not conform to the standards of Ghee as per Food Safety standards (Food Products & Food Additives) Regulations 2011." असा शेरा/ अभिप्राय नमुद आहे. तर २) जिल्हा

आरोग्य प्रयोगशाळा, नासिक, (शासकीय प्रयोगशाळा) यांचे बॅच नं. २५/ दि.२४.०६.२०१८, बॅच नं. २६/ दि.२६.०६.२०१८ व बॅच नं. ३५/ दि.२१.०८.२०१८ या तीन बॅचचे तपासणी अहवालामध्ये "The Above samples of Ghee do not conform to the standards of ghee as per F.S.& S. Act 2006. & there Regulations 2011." असा शेरा/ अभिप्राय नमुद आहे. तसेच 3) केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचे सोबतच्या तपासणी अहवालांमध्ये सूस्पष्ठ अभिप्राय नमुद नाही. तसेच त्यांनी बॅच नं. २३,२४,२५,२६,२८,२९ व ३० या बॅचची BRR तपासणी केलेली नाही. याबाबत त्यांना ई-मेल केला असता, त्यांनी BRR तपासणीचे मशिन बंद आहे, ते पुर्ववत सुरु झाल्यानंतर तपासणी अहवाल अद्ययावत करु असे दि.०४.०९.२०१८ रोजीचे ई-मेल द्वारे संस्थानला कळविलेले आहे.

ब) अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार बिगर कापूस उत्पादीत क्षेत्र (Areas, other than cotton track areas) साठी BRR हा ४० ते ४३ इतका तर कापूस उत्पादीत क्षेत्र (Cotton track areas) साठी तो ४१.५ ते ४५ इतका असणे आवश्यक असते. मात्र केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, बॅच नं.३४, दि.१२.०८.२०१८ चे तपासणी अहवालांमध्ये BRR ४३.१ असल्याचे निर्दशनास येत आहे. तथापि, गावरान तुपाचे सध्याचे पुरवठादार हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा. लि., हरीद्वार, हे उत्तराखंड राज्यातील उत्पादक आहेत. अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार उत्तराखंड हे कापूस उत्पादीत क्षेत्र (Cotton track areas) मध्ये येत नाही, त्यामुळे तेथील उत्पादीत गावरान तुपाचा BRR हा ४० ते ४३ या दरम्यान असणे गरजेचे आहे, मात्र त्यांचे तुपाचे BRR हा ४३.१ असल्याने तो अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे norms मध्ये बसत नाही.

क) उर्वरित सर्व प्रयोगशाळांचे तपासणी अहवालामध्ये उपरोक्त कालावधीतील सर्व बॅचचे गावरान तुप व खाद्यतेल अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार conform असल्याचे नमुद आहे. तसेच भांडार विभागातून उपरोक्त सर्व बॅचचे गावरान तुपाचा साठा विनातक्रार संपलेला आहे.

तरी उपरोक्त अ, ब व क प्रमाणे तपासणी अहवालाच्या झेरॉक्स प्रती (पा.नं. १ ते ४४) व दि.२७.११.२०१८ रोजीचे तपशिलवार परिशिष्ठ (पा.नं. १ ते ७) मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ/ निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जून-२०१८ ते सप्टेंबर-२०१८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या मालाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करण्यात आलेल्या तपासणी अहवालाचे अवलोकन करुन त्यांची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- भांडार विभाग)**

---

**विषय नं.३२** **डिसेंबर महिन्याकरीता पेपर कप खरेदी करणे व पुढील कालावधीसाठी पेपर कप वापराऐवजी उचित पर्याय निवडणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांनी दि.३०.११.२०१८ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

वरील संदर्भानुसार २,३६,००,०००/- दोन कोटी छत्तीस लाख मात्र पेपर कप पुरविणेकामी वार्षिक पुरवठा आदेश दिला होता. नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम भरून मी संस्थानला करारनामा करून दिलेला आहे.

सदर पुरवठा आदेशाप्रमाणे मी संस्थानला आज अखेर पर्यंत पेपर कप पुरविले आहेत. पेपर कपची निविदा भरतांनी प्रति नग ०.३१ पैसे दर दिले होते. या दरामध्ये मी ना नफा ना तोटा या तत्वावर श्री साईबाबांची सेवा घडावी या उद्देशाने दिले होते. तथापि महाराष्ट्र शासनाने संपुर्ण राज्यामध्ये प्लॅस्टिक् बंदी नेमकी त्याच दरम्यान लागू केल्यामुळे पेपर कप साठी लागणारे रॉ मटेरीयलची मागणी मोठया प्रमाणावर वाढली व त्याचा परिणाम सदर मटेरियलचे बाजारामध्ये मोठया प्रमाणात शॉर्टेज झाले. मागणी जास्त व पुरवठा कमी त्यामुळे सदर मटेरियलचे दर ही मोठया प्रमाणात वाढले. तरी सुध्दा मी रॉ मटेरीयल उपलब्ध करून पाच ते सहा महिने संस्थानला पेपर कप पुरवठा करण्याचा प्रयत्न केला. परंतु आता रॉ मटेरियलचे खरेदीचे दर व संस्थानकडून पेपर कपचा मिळणारा दर यामध्ये मोठया प्रमाणात तफावत निर्माण झाली आहे. त्यामुळे माझे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे.

वरीलप्रमाणे नमुद सत्य परिस्थिती विचारात घेता मी संस्थानला विनंती करू इच्छितो की, सदर पुरवठा आदेश दि.२२.०५.२०१८ रोजी जा.नं.एसएसएसटी/वशी-८८०/२०१८ रद्द करावा ही नम्र विनंती.

संस्थाननी याकामी ई-निविदा प्रक्रिया नव्याने करावी अशी माझी विनंती आहे. माझे वरील परिस्थितीचा सहानुभूतिपुर्वक विचार होऊन मला देय असलेली बीले व सुरक्षा अनामत रक्कम परत मिळावी ही नम्र विनंती.

सदर अर्जाबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. तथापि मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी यांनी पेपर कपचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेमुळे पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

संस्थानकडून साईभक्तांना कॅन्टीन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी पेपर कपचा वापर केला जात आहे. सदर पेपर कपला आतील बाजुने पॉली कोटींग असते. यामध्ये प्लॅस्टिकचा थर असतो म्हणून सदर पेपर कपचे नमुने मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळ, मुंबई यांचेकडे सदर पेपर कप वापराबाबतचे मार्गदर्शन मिळणेसाठी सादर केलेले आहे. तथापि त्यांचेकडून अदयाप मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

शासनाने दि.३०.०६.२०१८ रोजी अधिसूचना काढलेली आहे त्यामध्ये खालील बाबी प्रतिबंधीत केल्या आहेत.

१४. "मल्टीलेअर (बहूस्तरीय पॅकेजींग)" म्हणजे पॅकेजींग मटेरियल की ज्यामध्ये, कमीतकमी एक स्तर पलास्टीकचा असतो तसेच त्यामध्ये एक किंवा अधिक स्तर कागद/धातू/बोर्ड/अॅल्युमिनियम फॉईल लॅमिनेटेड स्वरूपात किंवा कोएक्स्टुडेड स्वरूपात असतो.

१५. "प्लास्टिकचा एक स्तर असलेला पुठ्ठा किंवा पेपर-अधोरित खोका" म्हणजे द्रव/ अन्न व पेय पदार्थ (उदा.दुग्धजन्य,रस इ.) सुरक्षित व आरोग्यदायी वापरासाठी वापरण्यात येणारा खोका की ज्यामध्ये पेपरबोर्ड हा प्राथमिक घटक असतो व एक किंवा जास्त स्तर प्लास्टिक, फॉईल इत्यादीचा असतो.

वरील तरतुदींचा विचार करता सध्या वापरात असलेले पेपर कपला आतील बाजुने एक प्लास्टिकचा थर असल्यामुळे नव्याने सदर पेपर कपची निविदा काढुन खरेदी करणे उचित होणार नाही. त्यासाठी पर्यायी चिनी मातीचे कप/ काचेचे ग्लास/ मातीचे बोळके वगैरे पर्याय आहेत. तथापि यामध्ये मातीचे बोळके एवढया मोठया प्रमाणावर उपलब्ध होतील की नाही याबाबत शंका आहे. तसेच वरील तरतुदीनुसार शासनाच्या अधिनियमाचे कक्षेत काही पेपर कप उपलब्ध असल्यास त्याचा विचार करता येईल. चिनी मातीचे १०० मिली कपची अंदाजे किंमत रू.१५/- प्रती नग तर ५० मिली कपची किंमत रू.१०/- प्रती नग तर काचेच १०० मिली ग्लासची किंमत रू.५/- प्रती नग आहे.

मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांनी ऑक्टोबर महिन्यात पुरेशा प्रमाणात पेपर कपचा पुरवठा केलेला नव्हता. त्यावेळी दरपत्रके मागवून ०.३६ पैसे प्रती नग दराने मे.पार्थ एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांचेकडून पेपर खरेदी केले होते व निविदा दरापेक्षा जादा आलेला खर्च मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांचे बीलातून वसुल केलेला होता. त्याप्रमाणेच डिसेंबर २०१८ महिन्यामध्ये आवश्यक असणारे पेपर कप खरेदी करून जादा येणारा खर्च मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांचेकडून वसुल करता येईल. साईभक्तांची डिसेंबर-२०१८ नाताळच्या सुट्टीमध्ये मध्ये मोठया प्रमाणावर गर्दी अपेक्षित असलेमुळे साईभक्तांना कॅन्टीन सेवा देणेसाठी साधारण ३०,००,००० पेपर कप लागतील. असे कॅन्टीन विभागाने दुरध्वनीवरून कळविले आहे.

मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी यांनी अचानक पेपर कपचा पुरवठा थांबविल्यामुळे व वरील अधिसुचनेतील तरतुदींचा विचार करता नवीन निविदा प्रक्रिया व दरपत्रके मागविणे उचित होणार नाही. त्यामुळे साईभक्तांना कॅन्टीन सेवा देण्यासाठी वरील खरेदी केलेले ०.३६ पैसे प्रती नग दरपत्रक दराने डिसेंबर-२०१८ करीता ३०,००,००० पेपर कप खरेदी करावेत असे मत आहे. याकामी रक्कम रू.१०,८०,०००/- मात्र खर्च येईल. थोडक्यात निविदा दराने ०.३१ पैसे प्रती नग प्रमाणे विचार केल्यास सदर पेपर कप खरेदीकामी रूपये १,५०,०००/- मात्र जादा खर्च येईल. ही जादा आलेली खर्चाची रक्कम मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांचे संस्थानकडून देय असणारी बीले रक्कम रू.१,२७,१००/- + सुरक्षा अनामत रक्कम रू.२,१९,४८०/- असे मिळून ३,४६,५८०/- मधून वसुल करता येईल. तरी,

अ- डिसेंबर महिन्याकरीता ३०,००,००० नग पेपर कप वरील दरपत्रकातील ०.३६ पैसे दराने मे.पार्थ एंटरप्रायजेस,औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रू.१०,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व जादा खर्चाची रक्कम वर नमूद केल्याप्रमाणे मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांचेकडून वसुल करण्यास,

ब- साईभक्तांना चहा, कॉफी व दुध उपलब्ध करून देणेसाठी चिनी मातीचे कप/ काचेचे ग्लास/ मातीचे बोळके अगर उचित पर्यायाबाबत निर्णय होणेस,

वरील "अ" व "ब" बाबत उचित निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी यांनी पेपर कपचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविल्यामुळे माहे डिसेंबर-२०१८ करीता ३०,००,००० नग पेपर कप ०.३६ पैसे दराने मे.पार्थ एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस, याकामी येणाऱ्या रक्कम रु.१०,८०,०००/-मात्रचे खर्चास व सदर पेपरकप**

**खरेदीकामी येणारा जादा खर्च रक्कम रु.१,५०,०००/-मात्र मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांचेकडून वसुल करण्यास मान्यता देण्यात आली.**

**सद्यस्थितीत शासनाचे दि.३०.०६.२०१८ रोजीच्या अधिसुचनेनुसार अनुज्ञेय/ वापरास परवानगी असलेले पेपरकप खरेदी करणेकामी तातडीने विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३३** **मे.स्मृती पॉडक्ट्स प्रा.लि.अंबाला यांनी संस्थानविरुध्द राहाता/कोपरगाव येथील मे.न्यायालयात दाखल केलेले दाव्याचे सद्यस्थिती व सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांनी संस्थानविरूध्द राहाता येथील न्यायालयात दाखल केलेला दावा मे.सिव्हील जज, वरीष्ठस्तर, कोपरगांव येथील न्यायालयात वर्ग झाला होता. सदर दावा मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांनी मागे घेतलेला आहे. याबाबतच्या सर्टीफाईड प्रती दि.१९.११.२०१८ रोजी प्राप्त झालेल्या आहेत.

सदर प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

सन २०१७-१८ चे शुध्द तूप खरेदी पुरवठादार मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि.,अंबाला यांनी पुरविलेल्या शुध्द तूपाचे लॅब रिपोर्ट्सबाबतचा प्रस्ताव संस्थानच्या भांडार विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.१०.२०१७ चे सभेत सादर केला होता, यामध्ये मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि.,अंबाला यांचेकडून तुप खरेदी थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१७ चे सभेत पुर्ववत पुरवठा आदेश मिळण्याची समक्ष विनंती केली होती. तथापि सभेने त्यांना पुरवठा आदेश देता येणार नाही, परंतु त्यांचा काळया यादीत समावेश करण्याची अट शिथील करून यापुढील गाईचे तूप खरेदीकामीच्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होणेस त्यांना मुभा देण्यात यावी असा निर्णय घेतला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे सदर निर्णयानुसार मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांना संस्थानकडून जा.क्रंएसएसएसटी/वशी-खरेदी/४२९८/२०१७ दि.१६/११/२०१७ नुसार त्यांचे पुरवठयाची मुदत संपलेबाबत व त्यांचा पुढील तूप पुरवठा थांबवायचा निर्णय घेतलेबाबत कळविणेत आले होते.

संस्थान व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ चे सभेतील निर्णयानुसार तूप खरेदीकामीचे नवीन ई-निविदा प्रक्रियेत मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना सहभाग घेण्याची संधीही देण्यात आली होती. परंतु तांत्रिक निविदेमध्ये आर्थिक बाबीबाबतची उचित कागदपत्रे ऑनलाईन सादर न केल्यामुळे ते अपात्र ठरले होते. त्यामुळे व मागील निविदेतील पुढील कालावधीसाठीचा पुरवठा आदेश त्यांना न मिळालेमुळे, या संस्थानविषयीच्या रागातूनच त्यांनी दिनांक २६.१२.२०१७ रोजी संस्थानविरुद्ध अंबाला (हरियाणा) न्यायालयात अनाधिकारे पुरवठा आदेश रद्द केला व संस्थानला तुप पुरवठा करणेचा त्यांचा आदेश कायम करणेबाबत व संस्थानच्या तुपाचे नवीन ई-निविदा खरेदी प्रक्रियेस स्थगिती मिळावी, याबाबत दावा क्र.३६२७/२०१७ दाखल केला होता. याबाबत संस्थाननेही वेळीच उचित कागदपत्रांसह मा.न्यायालयात म्हणणे सादर केलेमुळे, मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना मनाईहुकुम मिळालेला नव्हता. तसेच संस्थानने अंबाला येथील मे.कोर्टात म्हणणे सादर केलेनंतर मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांनी अंबाला कोर्टात दाखल केलेला दावा मागे घेऊन राहाता येथील मे.न्यायालयात याबाबत दावा दाखल केला आहे.

संस्थानने मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांनी पुरविलेले शुध्द तूप १६३९.६२ क्विंटल त्यांची क्विंटलची एकुण किमत रक्कम रु.६,४९,२८,९५२/- त्यांना आदा केलेली आहे.

मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांची सदर शुध्द तूप पुरवठयापोटी एकूण दिलेल्या पुरवठा आदेशाच्या ३ टक्के रक्कम रु.३३,२६,४००/- संस्थानकडे जमा आहे. त्यांनी सदर सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणेची संस्थानकडे लेखी मागणी केलेली नाही.

मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांनी मे.अंबाला येथील न्यायालयात संस्थानविरुध्द दावा दाखल केलेमुळे व ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यांची संस्थानकडे असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.३३,२६,४००/- परत करणेबाबत संस्थानचे विधी सल्लागार ॲड.श्री.नितीन भवर यांचे मार्गदर्शन/सल्ला घेण्याचे ठरले होते. त्यांनी सदर रक्कम परत करण्याऐवजी संस्थानकडे जमा राहू देणेबाबत सल्ला दिला होता.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.७/३/२०१८ चे सभेत मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांची संस्थानकढे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.३३,२६,४००/- परत करावी अगर कसे? याबाबत संस्थानचे

वकीलांनी दिलेले अभिप्रायासह प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्रं.१६३ अन्वये सदरहू बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांचे शुध्द तूप पुरवठयापोटी संस्थानकडे जमा असलेल्या सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला. असा निर्णय झाला होता.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२०१८ चे सभेत मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांनी संस्थानविरूध्द राहाता येथील मे.न्यायालयात दाखल केलेल्या सदयस्थितीबाबतचा प्रस्ताव अवलोकनार्थ व माहितीसाठी सादर केला होता त्यावर निर्णय क्रं.५६५ अन्वये सदरहू बाब न्यायप्रविष्ठ असल्यामुळे मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांचे शुध्द तूप पुरवठयापोटी संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत देऊ नये, असे ठरले मात्र दाव्याचा अंतिम निकालानंतर याबाबत निर्णय घेता येईल. असा निर्णय झाला होता.

मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांनी संसथानविरुध्द राहाता येथील मे.न्यायालयात दाखल केलेले दाव्यामध्ये संस्थान पॅनलवरील ॲडव्होकेट श्री.गोंदकर यांनी संस्थानची बाजू मांडलेली आहे. राहाता येथील मा.न्यायालयातही संस्थानचे वकीलांनी उचित न्यायालयीन पूर्तता केलेली आहे. त्यांना आवश्यक ती माहिती व कागदपत्रे पुरविण्यात आली होती. सदर दावा कोपरगांव येथील न्यायालयात वर्ग होईल अशी माहिती संस्थानचे वकीलांनी दिलेली होती. त्यानुसार सदर दावा मे.सिव्हील जज, वरीष्ठ स्तर,कोपरगांव यांचे न्यायालयात वर्ग झाला होता. त्यामध्ये दि.२६.१०.२०१८ रोजी मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांनी सदर दावा काढुन घेणेसाठी अर्ज दिला होता. यावर मे.कोर्टाने "In view of pursis exh-9 and say of Deft. Eh 12, suit is withdraw by Plaintiff vide exh.9, hence suit is disposed of CF be refunded as per rules." असे निर्देश दिलेले आहेत.

प्रस्ताव– वरील नमूद केल्याप्रमाणे संस्थानच्या विरूध्द दाखल केलेल्या कोर्ट केसमध्ये मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि अंबाला यांनी दावा मागे घेणेचा कोपरगांव येथील मे.न्यायालयात अंतिम निर्णय झालेला आहे. त्यास अनुसरून सदर बाब मा.व्यवस्थापन समितीचे सभेत माहितीसाठी सादर करणेस व मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रू.३३,२६,४००/- परत करावी अगर कसे? याबाबत निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या विरूध्द दाखल केलेल्या कोर्ट केसमध्ये मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि अंबाला यांनी दावा मागे घेणेचा कोपरगांव येथील मे.न्यायालयात अंतिम निर्णय झालेला असल्याने मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि.,अंबाला यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रू.३३,२६,४००/-मात्र मधुन सदर कोर्ट केसमध्ये संस्थानला आलेला खर्च वसुल करुन उर्वरीत रक्कम त्यांना परत करण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३४** **मे.वर्धमान सिरॅमिक यांनी पेपर कप पुरविणेस असमर्थता दर्शविलेमुळे सुरक्षा अनामत रकमेबाबत व त्यांचेवर करावयाचे कारवाईबाबत.**

**प्रस्ताव-** मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांनी दि.३०.११.२०१८ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

वरील संदर्भानुसार २,३६,००,०००/- दोन कोटी छत्तीस लाख पेपर कप पुरविणेकामी वार्षिक पुरवठा आदेश दिला होता. नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम भरून मी संस्थानला करारनामा करून दिलेला आहे.

सदर पुरवठा आदेशाप्रमाणे मी संस्थानला आज अखेर पर्यंत पेपर कप पुरविले आहेत. पेपर कपची निविदा भरतांनी प्रती नग ०.३१ पैसे दर दिले होते. हे दर मी ना नफा ना तोटा या तत्वावर श्री साईबाबांची सेवा घडावी या उद्देशाने दिले होते. तथापि महाराष्ट्र शासनाने संपुर्ण राज्यामध्ये प्लॅस्टिक् बंदी नेमकी त्याच दरम्यान लागू केल्यामुळे पेपर कपसाठी लागणारे रॉ मटेरीयलची मागणी मोठया प्रमाणावर वाढली व त्याचा परिणाम सदर मटेरियलचे बाजारामध्ये मोठया प्रमाणात शॉर्टेज झाले. मागणी जास्त व पुरवठा कमी त्यामुळे सदर मटेरियलचे दर ही मोठया प्रमाणात वाढले. तरी सुध्दा मी रॉ मटेरीयल उपलब्ध करून पाच ते सहा महिने संस्थानला पेपर कप पुरवठा करण्याचा प्रयत्न केला. परंतु आता रॉ मटेरियलचे खरेदीचे दर व संस्थानकडून पेपर कपचा मिळणारा दर यामध्ये मोठया प्रमाणात तफावत निर्माण झाली आहे. त्यामुळे माझे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. वरीलप्रमाणे नमुद सत्य परिस्थिती विचारात घेता मी संस्थानला विनंती करू इच्छितो की, सदर पुरवठा आदेश दि.२२.०५.२०१८ रोजी जा.नं.एसएसएसटी/वशी-८८०/२०१८ रद्द करावा ही नम्र विनंती.

संस्थाननी याकामी ई-निविदा प्रक्रिया नव्याने करावी अशी माझी विनंती आहे. माझे वरील परिस्थितीचा सहानुभूतिपुर्वक विचार होऊन मला देय असलेली बीले व सुरक्षा अनामत रक्कम परत मिळावी ही नम्र विनंती.

सदर प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

सन २०१८-१९ च्या किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्याच्या खरेदी निविदेस अनुसरून मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी यांना २,३६,००,००० पेपर कप ०.३१ पैसे प्रती नग दराने पुरविणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/८८०/२०१८ दि.२२.०५.२०१८ अन्वये वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आला आहे. तसेच त्यांनी दि.२९.०६.२०१८ रोजी त्यांनी संस्थानला करारनामाही करून दिलेला आहे व सदर पुरवठा करण्याची हमी म्हणून रक्कम रू.२,१९,४८०/- सुरक्षा अनामत संस्थानकडे रक्कम भरलेली आहे. दि.०४.०६.२०१८ पासून मे.वर्धमान सिरॅमिक यांनी पुरवठा सुरू केला होता. तेव्हापासून स्वतंत्र पेपर कपचा खालीलप्रमाणे पुरवठा केलेला आहे.

| महिना | पुरवठा चलन | पुरविलेले कप |
|---|---|---|
| जून | ४०,००,००० | १५,७३,१०० |
| जुलै | ४१,००,००० | १९,१४,००० |
| ऑगस्ट | २०,००,००० | १९,४१,००० |
| सप्टेंबर | - | १५,१५,००० |
| ऑक्टोबर | ४२,००,००० | १३,५५,००० |
| नोव्हेंबर | - | ४,१०,००० |
| | एकुण | ८७,०८,१०० |

वरील पुरवठा सुरू असताना कॅन्टीन विभागाने दि.१७.०९.२०१८ व दि.२८.०९.२०१८ चे पत्राने पुरेशा प्रमाणात पेपर कपचा पुरवठा होत नसल्याचे तसेच पेपर कप लिकेजचे प्रमाण खूप असल्याचे व लिकेज कप बदलून घेणेबाबत कळविले होते.

त्यास अनुसरून मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/३३४६/२०१८ दि.०९.१०.२०१८ नुसार संस्थानला पेपर कप पुरेसा प्रमाणात पुरवठा करणेकामी ते गंभीर दिसून येत नाही. तसेच मोठया प्रमाणावर लिकेज पेपर कपचा पुरवठा होत असल्याचे व लिकेज पेपर कप बदलून देणे वगैरे बाबींबाबत कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला होता. तसेच उचित पूर्तता न झाल्यास करारनाम्याप्रमाणे उचित कारवाई करणेबाबतही त्यांना कळविण्यात आले होते.

मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी यांनी लिकेज झालेले सर्व पेपर कप बदलून दिलेबाबत कॅन्टीन विभागाने दि.२२.१०.२०१८ चे पत्राने कळविले आहे.

मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांनी दि.२९.१०.२०१८ अखेर फक्त ६,६०,००० पेपर कपचा पुरवठा केलेला आहे. त्यांचेकडे पेपर कप शिल्लक नसलेमुळे भक्तांना सेवा देण्यात अडचण येऊ नये म्हणून राहाता व औरंगाबाद येथून संस्थानला तातडीने पेपर कप खरेदी करावे लागले आहेत. तसेच यापुर्वीही दोनदा स्थानिक दुकानदारांकडून पेपर कप खरेदी करावे लागले होते. त्यापैकी राहाता व औरंगाबाद येथील पुरवठाधारकांचे काही पेमेंट मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी यांनी केलेले नाही. ते संस्थानकडे पाठपुरावा करीत आहेत. ती रक्कमही संबंधितांना आदा करणेबाबत मे.वर्धमान सिरॅमिक यांना कळविता येईल.

संस्थानचे वरील नोटीसीस अनुसरून त्यांनी संस्थानला दिलेले दि.१६.११.२०१८ चे पत्रान्वये दिलेल्या खुलाशामध्ये "त्यांनी ना नफा ना तोटा या तत्वावर आम्ही साईच्या चरणी संस्थानला पुर्णपणे पुरवठा करणे बंधनकारक असल्याचे कळविले होते." तथापि दरम्यानच्या काळात त्यांनी लगेचच दि.३०.११.२०१८ चे पत्रानवये त्यांचा पेपर कपचा पुरवठा आदेश रद्द करण्याची व त्यांना देय असलेली बीले व सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणेची विनंती केली आहे.

मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी व संस्थान यांचेमध्ये दि.२९.०६.२०१८ रोजी झालेल्या करारनाम्यातील तरतुदीसंबंधीचा तपशिल खालीलप्रमाणे-

१- वरील तपशिलाप्रमाणे पुरवठा करणेसाठी पुरवठा कालावधी पुरवठा आदेशाच्या तारखेपासून ते ३१ मार्च २०१९ असा राहील. या कालावधीत पार्टी नं.१ यांचे मागणीनुसार माल पार्टी नं.२ यांनी नमुन्याबरहुकुम व मंजूर केलेल्या दराने पॅकिंग व फॉरवर्डींगसह स्वखर्चाने पार्टी नं.१ संस्थानचे शिर्डी येथील भांडारात पोहोच करावयोच आहेत. पेपर कप वर GST, जकात तसेच अनलोडींग, वाराईचा खर्च पार्टी नं.२ यांनी करावयाचा आहे.

५- दिलेल्या मुदतीत पार्टी नं.२ यांचेकडून पेपर कपचा पुरवठा न झाल्यास पार्टी नं.१ यांना बाजारातुन बाजारभावाने आवश्यक वाटेल तितके किंवा दिलेल्या आदेशाइतके पेपर कप खरेदी करता येतील. अशा खरेदीसाठी दयाव्या लागणा-या/लागलेल्या जादा रकमेची संपूर्ण भरपाई पार्टी नं.२ यांचे कोणत्याही बीलातून अथवा सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करणेत येईल. अनामत रकमेतून भरपाई करून घेतलेस पार्टी नं.२ यांना पुर्ववत कपात केलेल्या रकमेइतकी अनामत रक्कम पार्टी नं.१ संस्थानकडे भरावी लागेल.

१०- पार्टी नं.२ यांनी पेपर कपचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास पार्टी नं.१ यांना बाजारभावाने अथवा फेर निविदा प्रक्रिया करून पेपर कप खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पार्टी नं.२ यांचेकडून वसुल केली जाईल. तसेच पेपर कप पुरवठयासाठी पार्टी नं.२ यांना पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समाविष्ट केले जाईल.

२२- पार्टी नं.२ यांनी पुरवठा आदेशातील पेपर कप पुरवठा चलनाप्रमाणे मुदतीत पुरविले नाही तर पार्टी नं.१ हे खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करतील.

अ- पुरवठा न केलेल्या पेपर कपची किंमत रू.२ लाखापेक्षा कमी असल्यास- प्रती आठवठा ०.५ टक्के दराने जास्तीत जास्त १० टक्केपर्यंत.

ब- पुरवठा न केलेल्या पेपर कपची किंमत रू.२ लाखापेक्षा जास्त असल्यास- प्रती आठवडा ०.५० टक्के दराने जास्तीत जास्त ५ टक्क्यापर्यंत.

२३- उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी-शर्ती विहित करण्याचा अधिकार पार्टी नं.१ संस्थानचे व्यवस्थापनाने राखुन ठेवलेला आहे. पार्टी नं.२ निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

२४- सदर करारनाम्यातील सर्व शर्ती व अटी पार्टी नं.२ यांचेवर बंधनकारक राहतील मात्र कोणत्याही एका अटीचा भंग पार्टी नं.२ यांनी केल्यास सदरचा करार पार्टी नं.१ यांना कोणतीही लेखी सुचना न देता रद्द करण्याचा अधिकार राहिल व तशा परीस्थितीत पार्टी नं.२ यांचे काही नुकसान झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी पार्टी नं.१ यांनी पत्करलेली नाही.

मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांनी पेपर कप पुरवठयासाठी असमर्थता दर्शविल्यामुळे पेपर कपसाठी नविन ई-निविदा प्रक्रिया करण्याचे ठरले होते. तथापि महाराष्ट्र शासनाचे दि.३०.०६.२०१८ चे अधिसूचनेनुसार पेपर कपचे एक थरावरसुध्दा प्रतीबंध असल्यामुळे डिसेंबर महिन्यासाठी पेपर कप खरेदी करणे व पेपर कप ऐवजी उचित पर्याय निवडणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तथापि मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांनी पेपर कपचा पुरवठा न केल्यामुळे डिसेंबर-२०१८ करीता केलेल्या पेपर कप खरेदीसाठी संस्थानला येणारे जादा खर्चाची वसुली त्यांचे बीलातून करून घ्यावी लागेल असे मत आहे.

तरी वरील वस्तुस्थिती विचारात घेता मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांचे संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रू.२,१९,४८०/- जप्त करणे व त्यांचेवर उचित कारवाई करणेबाबत पुढील निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.वर्धमान सिरॅमिक, शिर्डी यांनी पेपरकपचा पुरवठा बंद केल्याने करारनाम्यातील अटी शर्तीनुसार त्यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रू.२,१९,४८०/- मात्र जप्त करुन त्यांच्या नावाचा पुढील तीन वर्षासाठी काळया यादीत समावेश करावा, असे ठरले. (कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३५** **श्री साई प्रसादालयास सन २०१९-२० या आर्थिक वर्षकरीता लागणारा भाजीपाला खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

प्रास्ताविक :- श्री साई प्रसादालयामध्ये सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत साईभक्तांना प्रसादभोजनाची सुविधा पुरविली जाते. तसेच दररोज सरासरी १०००० अन्नपाकीटे प्रसादालयामार्फत तयार करणेत येऊन साईभक्तांना अल्प दरामध्ये पुरविणेत येतात. दैनंदिन सरासरी ४० ते ४५ हजार साईभक्त प्रसाद-भोजनाचा लाभ घेतात. प्रसादभोजनामध्ये चपाती, पुरी, कडधान्य भाजी, पालेभाजी, दाळ- भात शिरा, बर्फी इ.पदार्थ दिले जातात.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७ निर्णय क्र.२० अन्वये माहे जुलै-२०१७ पासून प्रसादालयास लागणारा भाजीपाला ई-निविदा पध्दतीने खरेदी विभागामार्फत खरेदी करून प्रसादालयास पुरवठा

करणेत येतो. श्री साईबाबांच्या दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांच्या गर्दीवर प्रसाद- भोजन सेवा अवलंबून असल्यामुळे आवश्यकतेनुसार आठवड्यातून दोनदा (गुरुवार व रविवार) भाजीपाल्याची प्रसादालयामार्फत मागणी करण्यात येते व व्यापा-यांमार्फत भाजीपाला थेट प्रसादालयामध्ये पोहच करण्यात येतो.

यापुर्वी प्रसादालयास आर्थिक वर्षाकरीता लागणा-या भाजीपाला खर्चास प्रशासकीय मान्यता घेऊन सदर प्रस्ताव खरेदी विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत येत होता. परंतू जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/३२२३/२०१७ दि.१८/११/२०१७ अन्वये "भाजीपाला खरेदीची वार्षिक मागणी दरवर्षी प्रसादालय विभागाने ऑक्टोबर महिन्यामध्ये निश्चित करुन, त्याचा प्रस्ताव तयार करून अंदाजे Quantity व खर्चास प्रशासकीय तसेच मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता घ्यावी. मान्यतेनंतर परिपुर्ण प्रस्ताव दरवर्षी ३० नोव्हेंबरपर्यंत खरेदी विभागाकडे ई-निविदा प्रक्रियेसाठी पाठविण्याची पध्दत ठेवावी" असा खरेदी विभागाने कार्यालयीन आदेश पारित केलेला आहे.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता श्री साई प्रसादालयासाठी लागणा-या भाजीपाल्याचा अंदाजीत खर्चाचा तपशिल-

| अ. नं. | तपशिल | मागणी | सन १८-१९ चे सरासरी दर(क्विं.) | रक्कम | अ.नं. | तपशिल | मागणी | सन १८-१९ चे सरासरी दर(क्विं.) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्विंटल | रु. पै. | रु. पै. | | | क्विंटल | रु. पै. | रु. पै. |
| १ | बटाटा | ३००० | १४३३ | ४२९९००० | १४ | सिमला मिरची | ५०० | १९६२ | ९८१००० |
| २ | कांदा | २५०० | १४३२ | ३५८०००० | १५ | आद्रक | ५० | २६२५ | १३१२५० |
| ३ | लसूण | ३०० | ३३८४ | १०१५२०० | १६ | गाजर | १० | १८१८ | १८१८० |
| ४ | हिरवी मिरची | ४५० | ३१४३ | १४१४३५० | १७ | आळूपाने | २५ | ६७५० | १६८७५० |
| ५ | वांगी | १००० | १३७० | १३७०००० | १८ | शेवगा शेंगा | ५ | २४५० | १२२५० |
| ६ | टोमॅटो | ५२५ | १४६७ | ७७०१७५ | १९ | मेथी भाजी | ४ | १९५० | ७८०० |
| ७ | कोथंबिर | १०० | २८३७ | २८३७०० | २० | काकडी | १२ | १८०० | २१६०० |
| ८ | कोबी | १५०० | ९३२ | १३९८००० | २१ | भेंडी | ५ | २२२५ | ११११२५ |
| ९ | भोपळा | २००० | ११८७ | २३७४००० | २२ | रताळे | १ | २५०० | २५०० |
| १० | डांगर | १००० | १०८८ | १०८८००० | २३ | बीट | ०.५० | १५०० | ७५० |
| ११ | पालक | ३०० | १४२५ | ४२७५०० | २४ | फ्लावर | २०० | १४०० | २८०००० |
| १२ | कढीपत्ता | ५५ | २५०० | १३७५०० | २५ | तोंडले | १ | २०२५ | २०२५ |
| १३ | लिंबू | ५ | ३१७५ | १५८७५ | | -- | -- | -- | -- |
| | | | | | | | एकुण रक्कम रुपये- | | **१९८१०५३०** |
| अक्षरी रक्कम रुपये- एक कोटी अठ्ठयान्नव लाख दहा हजार पाचशे तीस मात्र. | | | | | | | | | |

सन २०१८-१९ प्रत्यक्ष व अपेक्षित खर्च तसेच सन २०१९-२० वार्षिक अंदाजे खर्च

| अ.न | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | सन २०१८ -२०१९ प्रत्यक्ष झालेला खर्च<br>एप्रिल २०१८ ते आक्टोबर २०१८ अखेर ) | ९०,३०,४०६/- |
| २ | नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९ करीता होणारा अपेक्षित खर्च | रू ६४,५०,२९०/- |
| | एकूण - (सन २०१८ – १९ खर्च ) | रू १,५४,८०,६९६/- |
| ३ | सन २०१९ -२०२० करीता होणारा अपेक्षित खर्च (२० टक्के वाढीसह ) | रू १,९८,१०,५३०/-<br>(पुर्णांकित रू २ कोटी |

मागणी:- श्री साई प्रसादालयामध्ये सन २०१९-२०२० करीता साईभक्तांना प्रसाद- भोजन सुविधा पुरविणेकामी लागणारा उपरोक्तप्रमाणे भाजीपाला खरेदी करणे आवश्यक आहे. उपरोक्त दर हे सरासरी असून त्यात चढ-उताराची शक्यता विचारात घेता प्रसादालयाकडील बजेटमध्ये रक्कम रु.२,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी मात्र) तरतूद करणेत आलेली आहे. मा.व्य.समितीची मान्यता मिळालेनंतर सदरील खरेदी ही खरेदी विभागामार्फत ई-निविदेव्दारे करणेत येईल.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:- आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साई प्रसादालयाकरीता सन २०१९-२० करीता आवश्यक असणारा उपरोक्त मागणीप्रमाणे भाजीपाला खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७६२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयास सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता लागणारा भाजीपाला खरेदी विभागामार्फत खरेदीकरणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १,९८,१०,५३०/-मात्र (पुर्णांकित रू २ कोटी) खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

विषय नं.३६ **रक्कम रु.६६,६५,२७०/- वसुल करणेसाठी मे.अपोलो हॉस्पिटल एन्टरप्राइजेस, चेन्नई यांचेवर विधी विभागामार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी संचलीत श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय येथील रुग्णांना वैद्यकीय सेवेबरोबरच औषधे पुरविण्याच्या हेतुने मा.व्यवस्थापन मंडळाने दोन्ही रुग्णालयात मे.अपोलो फार्मसीला औषध दुकान चालविणेस परवानगी दिलेली होती, त्या अनुशंगाने संस्थानने अपोलो फार्मसी सोबत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात औषध दुकान सुरु करणेबाबत दि. १८ मार्च, २०१० व दि. २१ जानेवारी, २०११ रोजी करारनामा करणेत आलेला होता. तथापी, अपोलो फार्मसीने करारनाम्यातील अटी व शर्ती क्र. १३ व १४ चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे.

मे. अपोलो फार्मसी यांचेमार्फत श्री साईबाबा संस्थानच्या दोन्ही रुग्णालयात चालवित असलेले दुकान क्र.०१ व ०२ मध्ये करारनाम्यात ठरल्याप्रमाणे वेळच्यावेळी रक्कम जमा न करणे, खर्च अवाजवी दाखवुन कमी रकमेचा भरणा करणे, वगैरे बाबी प्रशासनाच्या लक्षात आल्यानंतर दोन्ही औषध दुकानांचे लेखापरिक्षण करणेसाठी मे. शिंदे चव्हाण गांधी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौन्टंट, लातुर यांना विशेष लेखापरिक्षणासाठी नेमण्यात आले होते. त्यांनी अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस यांचे विशेष लेखापरिक्षण करुन त्याचा लेखापरिक्षण अहवाल दि. २६/०५/२०१६ रोजी संस्थानला सादर केला होता. या अहवालात खालीलप्रमाणे रक्कम संस्थानला कमी जमा केल्याचे त्यांनी नमुद केले आहे.

| अ. क्र. | तपशिल | विशेष लेखापरिक्षण अहवालाप्रमाणे कमी जमा झालेली रक्कम |
|---|---|---|
| १ | किरकोळ खर्च (औषध दुकानाशी संबंधीत नसलेला व करारनाम्यामध्ये प्रस्तुत नसलेला) | १,०९,३२५/- |
| २ | दुरुस्ती व देखभाल खर्च (कार्यालयीन देखभाल भांडवली स्वरुपाचा खर्च) | २,९६,५६०/- |
| ३ | उशिराने जमा केलेल्या रक्कमेवरील व्याज | १५,३५, ८२२/- |
| ४ | बॅंक चार्जेस (करारनाम्यात उल्लेख नसलेले) | ६१,२००/- |
| ५ | ढोबळ नफ्याच्या सरासरीप्रमाणे कमी जमा केलेली रक्कम | ८,०७,५२०/- |
| ६ | जादा दर्शविलेला मासिक कर्मचारी पगार खर्च | ५६,७५,६३० /- |
| ६ अ | जादा दर्शविलेला कर्मचारी पगार खर्च (मार्च २०१४) | ४,२५,०४६/- |
| ६ ब | जादा दर्शविलेला कर्मचारी पगार खर्च (श्री. संदीप ताठे) | ९,४१,०६१/- |
| | **एकुण: -** | **९८,५२,१६४/-** |
| | **अक्षरी रक्कम रु. अठ्ठयान्नव लाख बावन्न हजार एकशे चौसष्ठ मात्र** | |

उपरोक्त रक्कम संस्थानखाती जमा करणेसाठी वेळोवेळी पत्र देण्यात आलेले होते व संस्थानचे वकील श्री जे.के.गोंदकर यांचेमार्फत विधी विभागाना दि.०१.०२.२०१७ रोजी नोटीस पण दिले होते. तसेच ०१ एप्रिल २०१६ ते दि. ०५ जुन २०१७ अखेर मे. अपोलो फार्मसी यांचेमार्फत श्री साईबाबा संस्थानच्या दोन्ही रुग्णालयात

चालवित असलेले औषध दुकानाचे मे. शिंदे चव्हाण गांधी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौन्टंट, लातुर यांनी विशेष लेखापरिक्षण करुन अहवाल दि.१०.१०.२०१७ रोजी संस्थानला सादर केलेला आहे. या अहवालात खालीलप्रमाणे रक्कम संस्थानला कमी जमा केल्याचे त्यांनी नमुद केले आहे.

| अ. क्र. | तपशिल | विशेष लेखापरिक्षण अहवालाप्रमाणे कमी जमा झालेली रक्कम |
|---|---|---|
| १ | उशिराने जमा केलेल्या रक्कमेवरील व्याज | १,३८,४२३/- |
| २ | जादा दर्शविलेला मासिक कर्मचारी पगार खर्च | ५,००,०००/- |
| | **एकुण: -** | **६,३८,४२३/-** |

दि. ०१ एप्रिल २०१० ते ०५ जुन २०१७ अखेरचे विशेष लेखापरिक्षण अहवालात नमुद केलेप्रमाणे मे.अपोलो हॉस्पिटल इंटरप्रायजेस, चेन्नई यांनी करारनामा मधिल तरतूदींचा भंग करुन उपरोक्त रक्कम रु.९८,५२,१६४/- व रु. ६,३८,४२३/- इतकी रक्कम संस्थानला कमी भरल्याची लेखापरिक्षकांनी नमुद केले आहे.

तथापी, सदर रक्कम संस्थानखाती जमा करणेबाबत व लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांबाबत मे. अपोलो हॉस्पिटल एन्टरप्रायजेस, चेन्नई यांचे मागणीनुसार संस्थानचे अधिकारी व लेखापरिक्षक तसेच अपोलो हॉस्पिटल एन्टरप्रायजेस, चेन्नई यांचे अधिकारी व लेखापरिक्षक याचे समवेत दि.२४/११/२०१७ रोजी संस्थानचे परिसरामध्ये झालेल्या संयुक्त बैठकीत दि. ०१ एप्रिल २०१० ते दि. ३१ मार्च २०१६ अखेरच्या लेखापरीक्षणासाठी अपोलो हॉस्पिटल एन्टरप्रायजेस, चेन्नई यांनी सादर केलेल्या कागदपत्राचे पुनर्लेखापरिक्षण करणेबाबत ठरलेले होते. त्यानुसार दि.१५/०५/२०१८ रोजी मे. शिंदे चव्हाण गांधी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौन्टंट, लातुर यांनी पुनर्लेखापरिक्षण करुन अहवाल दि. १५/०५/२०१८ रोजी संस्थानला सादर केला आहे.

**दि. ०१ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०१६ पर्यत केलेल्या पुनर्लेखापरिक्षण अहवाल खालीलप्रमाणे,**

| अ. क्र. | तपशिल | विशेष लेखापरिक्षण अहवालाप्रमाणे कमी जमा झालेली रक्कम | पुनर्लेखापरिक्षण अहवालाप्रमाणे कमी जमा झालेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | किरकोळ खर्च (औषध दुकानाशी संबंधीत नसलेला व करारनाम्यामध्ये प्रस्तुत नसलेला) | १,०९,३२५/- | १,०९,३२५/- |
| २ | दुरुस्ती व देखभाल खर्च (कार्यालयीन देखभाल भांडवली स्वरुपाचा खर्च) | २,९६,५६०/- | - |
| ३ | उशिराने जमा केलेल्या रक्कमेवरील व्याज | १५,३५, ८२२/- | १४,४८,९४०/- |
| ४ | बॅंक चार्जेस (करारनाम्यात उल्लेख नसलेले) | ६१,२००/- | - |
| ५ | ढोबळ नफ्याच्या सरासरीप्रमाणे कमी जमा केलेली रक्कम | ८,०७,५२०/- | ८,०७,५२०/- |
| ६ | जादा दर्शविलेला मासिक कर्मचारी पगार खर्च | ५६,७५,६३० /- | २७,२०,०००/- |
| ६अ | जादा दर्शविलेला कर्मचारी पगार खर्च (मार्च २०१४) | ४,२५,०४६/- | - |
| ६ ब | जादा दर्शविलेला कर्मचारी पगार खर्च (श्री. संदीप ताठे) | ९,४१,०६१/- | ९,४१,०६१/- |
| | **एकुण: -** | **९८,५२,१६४/-** | **६०,२६,८४७/-** |
| | **अक्षरी रक्कम रु. साठ लाख सव्वीस हजार चारशे सत्तेचाळीस मात्र/-** | | |

मे. शिंदे चव्हाण गांधी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौन्टंट, लातुर यांनी दि. ०१ एप्रिल २०१० ते दि. ३१ मार्च २०१६ अखेरच्या पुनर्लेखापरिक्षण अहवालामध्ये रक्कम रु. ६०,२६,८४७/- तसेच, दि. ०१ एप्रिल २०१६ ते दि.०५ जुन २०१७ अखेरच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये रक्कम रु. ६,३८,४२३/- अशी एकुण रक्कम रु.६६,६५,२७०/- इतकी रक्कम मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांनी संस्थानला कमी जमा केल्याचे नमुद केलेले आहे.

उपरोक्त लेखापरीक्षण अहवालामध्ये नमुद केलेली एकुण रक्कम रु.६६,६५,२७०/- (अक्षरी रक्कम रु.सहासष्ठ लाख पासष्ठ हजार दोनशे सत्तर मात्र)संस्थानखाती जमा करणेबाबत मे.अपोलो हॉस्पिटल एन्टरप्रायजेस, चेन्नई यांनाजा.नं.एसएसएस/एसएसबीएच/९७७/२०१८, दि ११.०६.२०१८ रोजी पत्र व

पुनर्लेखापरीक्षण अहवालाची छायांकीत प्रत पाठविण्यास आलेली होती. परंतू मे.अपोलो हॉस्पिटल एन्टरप्रायजेस, चेन्नई यांनी सर्व रेकॉर्ड पुन्हा तपासणी करणेबाबत संस्थानला दि.२८.०६.२०१८ रोजी पत्र दिले आहे. सदरचे पत्र मे. शिंदे चव्हाण गांधी अ‍ॅन्ड कं. चार्टर्ड अकौंन्टंट, लातुर (लेखापरिक्षक) यांना पाठवुन सर्व रेकॉर्डची पुर्नतपासणी करणे आवश्यक आहे का याबाबत कळवुन अभिप्राय देणेबाबत विनंती करण्यात आली होती. याबाबत लेखापरिक्षकांनी कागदपत्रांची पुन्हा तपासणी/लेखापरिक्षण करण्याची आवश्यकता नसलेबाबत दुरध्वनी द्वारे कळविले आहे.

त्यानुसार जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/२६१६/२०१८, दि २७.०९.२०१८ चे पत्रा अन्वये मे. अपोलो हॉस्पिटल एन्टरप्रायजेस, चेन्नई यांना पत्र दिले होते कि "रक्कम रु.६६,६५,२७०/- संस्थान खाती जमा करावी अन्यथा आपलेवर संस्थान नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई केली जाईल" अशा आशयाचे अंतिम पत्र देणेस आलेले होते.

तथापि मे. अपोलो हॉस्पिटल एन्टरप्रायजेस, चेन्नई यांनी सर्व रेकॉर्ड पुन्हा तपासणी करणेबाबत संस्थानला परत दि.२३.१०.२०१८ रोजीपत्र दिले आहे.

तरी सदरचे प्रकरण संस्थानचे विधी विभागाकडे वर्ग करुन विधी विभागामार्फत मे.अपोलो हॉस्पिटल एन्टरप्राइजेस, चेन्नई यांचेकडुन रक्कम रु.६६,६५,२७०/- वसूल करणेसाठी योग्य ती कायदेशीर कारवाई करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.७६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.अपोलो हॉस्पिटल एन्टरप्राइजेस, चेन्नई यांचेकडुन रक्कम रु.६६,६५,२७०/-मात्र वसूल करणेसाठी कायदेशीर सल्ला घेऊन कारवाई करण्यात यावी व त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच मे.अपोलो हॉस्पिटल एन्टरप्राइजेस, चेन्नई यांचे नावाचा काळया यादीत समावेश करण्यात यावा, असे ठरले.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/ विधी विभाग)**

---

**विषय नं.३७** **श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय या रुग्णालयांच्या नावासमोर अथवा नावामध्ये, धर्मादाय अथवा चॅरिटेबल हा शब्द नमुद करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र. – नवीन प्रस्ताव.

प्रास्ताविक - मा.धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक क्र.५४६ दि.१९/०७/२०१८ प्रमाणे राज्यात साधारणत: ४३० धर्मादाय रुग्णालये असून या रुग्णालयांनी मा. उच्च न्यायालयाच्या योजनेप्रमाणे त्यांचेकडील वापरातील ऐकुण खाटांपैकी १० % खाटा या निर्धन रुग्णांकरीता व १० % खाटा या दुर्बल घटकांतील रुग्णांकरीता राखून ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार, राज्यात जवळपास ५,०००(अक्षरी पाच हजार) खाटा या निर्धन रुग्णांकरीता व ५,००० (अक्षरी पाच हजार) खाटा या दुर्बल घटकातील रुग्णांकरीता राखीव आहेत. असे असतानाही, अनेक धर्मादाय रुग्णालयांत सदर खाटा रिकाम्या राहत असल्याचे निदर्शनास येते. बहुतेक धर्मादाय रुग्णालयांच्या नावामध्ये ‘धर्मादाय’ अथवा ‘चॅरिटेबल’ हा शब्द नसल्यामुळे गरीब रुग्णांना ते रुग्णालय धर्मादाय आहे किंवा नाही याची माहीती होत नसावी. तसेच अनेक धर्मादाय रुग्णालयांच्या भव्य इमारतीकडे पाहून गरीब रुग्णांना ते धर्मादाय रुग्णालय ‘धर्मादाय’ आहे अथवा कसे याबाबत माहिती होत नसावी, त्यामुळे धर्मादाय रुग्णालयांच्या नावामध्ये अथवा नावासमोर ‘धर्मादाय’ अथवा ‘चॅरिटेबल’ हा शब्द नमूद केल्यास, गरीब रुग्णांना ते रुग्णालय धर्मादाय रुग्णालय आहे याची जाणीव होईल, त्यांच्या मनात कुठलाही संभ्रम राहणार नाही आणि त्या ठिकाणी जाऊन ते मोफत तसेच सवलतीच्या दराने उपचार घेऊ शकतील व त्यांना निश्चितच फायदा होईल असे सांगण्यात आले आहे.

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० च्या कलम ४१- अे अे च्या तरतुदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई, यांचे रिट याचिका क्र.३१३२/२००४ मधील दि. १७.८.२००६ चे आदेशाप्रमाणे अंमलात आणावयाची योजनेतील मुद्दा क्र.२, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमाचे कलम ४१ क क च्या तरतुदीन्वये कायदेशीर उत्तरदायित्व असे आहे की, त्यांनी कार्यान्वित असलेल्या खाटांच्या संख्येपैकी १० % खाटा निर्धन रुग्णांसाठी मोफत उपचाराकरीता आरक्षित ठेऊन सदर उद्देशांकरीताच राखून ठेवणे आणि एकूण कार्यान्वित असलेल्या खाटांच्या संख्येपैकी १० % खाटा दुर्बल घटकातील रुग्णांसाठी सवलतीच्या दराने उपचाराकरीता आरक्षित ठेवून सदर उद्देशांकरीताच राखून ठेवणे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी संचलित, श्री साईबाबा रुग्णालयामध्ये, उपरोक्त योजने प्रमाणे, २४४ ऐकुण रुग्ण खाटांच्या १० % खाटा प्रत्येकी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. राखीव ठेवण्यात आलेल्या खाटा पुर्णपणे, लाभार्थी उपचार्थ दाखल रुग्णांनी भरलेल्या असतात. सन २०१७ – २०१८ या आर्थिक वर्षात निर्धन घटकातील १६०५ लाभार्थी रुग्णांना व दुर्बल घटकातील २५१९ लाभार्थी रुग्णांना लाभ मिळाला आहे.

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी संचलित, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये एकुण ३०० खाटा असून सर्वच खाटा या पुर्ण क्षमतेने भरलेल्या असतात. तसेच मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.९४४ दि. २२/१२/२०१६ अन्वये श्री साईबाबांनी सुरु केलेले रुग्णसेवेचे कार्य पुढे सुरु ठेवुन, त्याची व्याप्ती वाढविणेसाठी दि.०१/०१/२०१७ पासुन रुग्णांकडून प्रवेशासाठी फक्त १० रुपये आकारले जातात व पुढील वैद्यकिय उपचार रुग्णानां पुर्णपणे मोफत देण्यात येत आहेत. या अनुशंगाने प्रत्येकी १० % खाटा किंबहुना त्यापेक्षा जास्त खाटा या निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी राखीव ठेवणेत आले आहेत.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान –

प्रस्ताव- मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक क्र.५४६ दि.१९/०७/२०१८, जा.क्र.४३३५/२०१८ दि.१९/०७/२०१८ नुसार धर्मादाय रुग्णालयांनी, रुग्णालयाच्या नावासमोर अथवा नावामध्ये धर्मादाय अथवा चॅरिटेबल शब्द नमुद करणे बंधनकारक आहे. या अनुशंगाने मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, यांनी दिनांक ०६/१०/२०१८ रोजी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर येथे, 'मासिक देखरेख समिती सभेचे' आयोजन करण्यात आले होते. सदर सभेस बोलतांना श्रीमती. एच.के.शेळके (मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त) यांनी उपस्थितांना संबोधित करतांना सांगितले की, धर्मादाय रुग्णालयांच्या नावामध्ये बदल करतांना कोणताही चेंज रिपोर्ट इकडील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाला देण्याची आवश्यकता नाही. तसेच धर्मादाय रुग्णालयांच्या इतर कोणत्याही कायदेशीर कागद पत्रांमध्ये (लेटरपॅड, रबरी स्टॅम्प, रुग्णालय रजि.नं. व इतर कायदेशीर कागदपत्र) रुग्णालयाचे नाव बदलण्याची आवश्यकता नाही. धर्मादाय रुग्णालयांनी फक्त आणि फक्त दर्शनी फलकावरील रुग्णालय नावामध्ये अथवा नावासमोर 'धर्मादाय' अथवा 'चॅरिटेबल' असे नमुद करावे त्यामुळे सदर रुग्णालय हे धर्मादाय अथवा चॅरिटेबल आहे, याची जाणीव सदर रुग्णालयात उपचारार्थ दाखल होणा-या निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना तसेच रुग्णनातेवाईकांना होईल.

मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रकाव्दारे निर्देशित केल्याप्रमाणे, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित 'श्री साईबाबा रुग्णालय', व 'श्री साईनाथ रुग्णालय' या रुग्णालयांच्या नावामध्ये अथवा नावासमोर 'धर्मादाय' अथवा 'चॅरिटेबल' हा शब्द नमुद करण्याची मान्यता द्यावी असे मत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक क्र.५४६ दि.१९/०७/२०१८, जा.क्र.४३३५/२०१८ दि.१९/०७/२०१८ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय या रुग्णालयांच्या नावाचे फलक व दैनंदिन व्यवहारात 'धर्मादाय' अथवा 'चॅरिटेबल' शब्द नमुद करणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३८** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑक्टोबर २०१८ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु. ८३,५५,७४५/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर

करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १४,८०८ व १,१०७ आयपीडी रुग्णांपैकी २,८८३ओपीडी व ५८३ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.७७,०८,८४५/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ४०१ रुग्णाना रक्कम **रु.६,४६,९००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ९८ | १७,३८,९९६/- | - | १७,३८,९९६/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १०९ | २२,५४,२९९/- | ९,३४,३५५/- | १३,१९,९४४/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०४ | ४,९७०/- | १,०००/- | ३,९७०/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ४८३ | ३३,३५,८४८/- | १७,६०,५०८/- | १५,७५,३४०/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २९४ | १,२५,०८,१६५/- | १,०६,७५,९३५/- | १८,३२,२३०/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,४७७ | १२,३८,३६५/- | - | १२,३८,३६५/- |
| | **एकुण** | **३,४६५** | **२,१०,८०,६४३/-** | **१,३३,७१,७९८/-** | **७७,०८,८४५/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४५ | ६२,८००/- | - | ६२,८००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ९ | २१,८००/- | - | २१,८००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ३६ | ४,८००/- | - | ४,८००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १३२ | ३,०७,५००/- | - | ३,०७,५००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | १३ | ३४,२००/- | - | ३४,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ५ | ९,४००/- | - | ९,४००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १६१ | २,०६,४००/- | - | २,०६,४००/- |
| | **एकुण** | ४०१ | ६,४६,९००/- | - | ६,४६,९००/- |
| | **एकुण अ+ब** | **३,८६६** | **२,१७,२७,५४३/-** | **१,३३,७१,७९८/-** | **८३,५५,७४५/-** |

**प्रस्ताव** - उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑक्टोबर २०१८ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८३,५५,७४५/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.७६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे ऑक्टोबर-२०१८ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८३,५५,७४५/- मात्रचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३९** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकी करणासह स्वच्छता कामाबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१४ नोव्हेंबर २०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत विषय नं.०२ व निर्णय क्र.९१५ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी मे.स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांचे वार्षिक रु.२,३२,९९,७०४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असा निर्णय झाला होता. सदर निर्णयानुसार मे.स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांना जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/पीआरओ/१७०४/२०१७,दि.३० नोव्हेंबर २०१७ रोजी श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामआऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामीदि.०१ जानेवारी २०१८ ते दि.३१ डिसेंबर २०१८ या १ वर्ष कालावधीचा कार्यादेश देण्यात आलेले होता. दि.३१डिसेंबर २०१८ रोजी सदर कामाची मुदत संपुष्टात येणारअसल्याने नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे. तथापी निविदा प्रक्रियाकामी तांत्रीक कारणाने विलंब होण्याची शक्यता असल्याने तो पर्यंत मे.स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांना मुदत वाढ देऊन कामकाज सुरू ठेवावे लागणार आहे.

सद्यस्थिती– मे.स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांना दोन्ही रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेकामी प्रतिदिन एकुण १५३ कर्मचारी, आवश्यक केमिकल्स व साहित्यासह / सामुग्रीसह प्रती महिना रक्कम रु.१९,४१,६४२/- (अक्षरी– एकोनावीस लाख एकेचाळीस हजार सहाशे बेचाळीस रुपये मात्र) प्रमाणे (वार्षिक रक्कम रु.२,३२,९९,७०४/- मात्र)कामाचादि.०१ जानेवारी २०१८ ते दि.३१ डिसेंबर २०१८ या १ वर्ष कालावधीचा ठेका देण्यात आलेला आहे. त्यानुसार सुरळीत कामकाज सुरू आहे.

विभागाचा अभिप्राय– मे.स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांना दोन्हीरुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेकामी प्रतिदिन एकुण १५३ कर्मचारी, आवश्यक केमिकल्स व साहित्यासह / सामुग्रीसह प्रती महिना रक्कम रु.१९,४१,६४२/- (अक्षरी– एकोनावीस लाख एकेचाळीस हजार सहाशे बेचाळीस रुपये मात्र) प्रमाणे वार्षिक रक्कम रु.२,३२,९९,७०४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन १ वर्ष कालावधीचा कार्यादेश देण्यात आलेला होता. मे.स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांची दि.३१ डिसेंबर २०१८ रोजी सदर कामाची मुदत संपुष्टात येणारअसल्याने नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे. सदर कामाकरीता नविन निविदा प्रक्रिया राबविताना किमान वेतन व केमीकल साहित्य / सामुग्रीसाठी होणारी अपेक्षीत वाढ ग्राह्य धरावी लागणार आहे. त्यानुसार १५% वाढ ग्राह्य धरल्यास दोन्हीरुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचेकामी प्रतिदिन एकुण १५३ कंत्राटी कर्मचारी, आवश्यककेमिकल्स व साहित्यासह / सामुग्रीसह एकवर्षासाठीचा ठेका दिल्यास प्रति महिना अंदाजे रक्कम रु.२२,३२,८८८/- पुर्णांकित २३,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. याप्रमाणे (वार्षीक रक्कम रु.२,७६,००,०००/-) अंदाजीत खर्च अपेक्षीतव ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामीचा विषय प्रशासकिय मान्यता मिळणेकामी सादर केला असता, वरिष्ठांनी ''साईआश्रम व व्दारावती भक्तीनिवासासाठी सध्या आऊटसोर्ससाठीची निविदा प्रक्रिया चालु आहे. त्यामध्ये आऊटसोर्सच्या निविदेमध्ये मोठया प्रमाणावर बदल प्रस्तावित आहेत. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचा विषय व ई निविदा तयार करावी'',असे नमुद केले आहे. त्यामुळे नविन निविदा प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता गृहीत धरुन सध्या काम करत असलेल्या ठेकेदारास निविदेतील अटी व शर्तीनुसार मंजुर दरात पुढील ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत मुदत वाढ द्यावी लागणार आहे, असे नम्र मत आहे.

मागणी– तरी श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या मे.स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचे कडून निविदेतील अटी व शर्तीनुसार मंजुर दरात काम करुन घेणेसाठी मुदत वाढ देणेकामीसदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत तथापी जास्तीत जास्त तीन महिने पावेतो सध्याकार्यरत असलेल्या मे.स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचे कडून निविदेतील अटी व शर्तीनुसार मंजुर दरात काम करुन घेणेसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**
**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.४० **श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत, बडतर्फ परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना मा. कामगार न्यायालय, अहमदनगर यांचे समोर दाखल केलेल्या रेफरन्स (आडीए) नं. ६१/२०१४ विरुध्द मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या रिट पिटीशन नं. ११४६३/२०१८ मध्ये झालेल्या आदेशानुसार संस्थान सेवेत सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेल्या शेवटचे वेतनावर पुर्ववत कामावर घेणेबाबत.**

प्रस्ताव- श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांचा संस्थान सेवेतील पूर्व इतिहास- श्रीमती पंडीत वेरोनिका काशिनाथ या दि.०२/०५/२००६ पासून परिचारीका या पदावर संस्थान सेवेत होत्या. त्या दि. ०६/०९/२०१० पासुन सतत, सलग, विनापरवानगी, मंजूर रजेशिवाय कामावरुन गैरहजर होत्या. त्यामुळे रुग्णालयातील दैनंदीन कामकाजात अडचणी आल्या. तसेच इतर स्टाफवर कामाचा अतिरिक्त बोजा पडला. याबद्दल दि. ०१/१०/२०१० रोजी रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून गैरहजेरीबाबत लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर होणेबाबत त्यांना सुचविले होते. कु. पंडीत यांनी दि. ०९/१०/२०१० रोजीचा लेखी खुलासा सादर करुन M. Sc नर्सिंग साठी पूणे येथे नर्सिंग कॉलेजला प्रवेश घेतलेला आहे. सदरच्या शिक्षणाचा कालावधी दोन वर्षाचा आहे. त्यांनी उच्च शिक्षणासाठी दोन वर्षाच्या कालावधीसाठी रजा मागणी केली होती.

परंतू कामाची व्यवस्था होत नसल्यामुळे व स्टाफची कमतरता असल्याने सहाय्यक अधिसेविका यांनी असा अभिप्राय दिला आहे की, सध्या परिचारीकेंची संख्या अपूरी आहे. यापूर्वी अध्ययन रजेवर असलेल्या परिचारीका कामावर हजर झालेनंतर नविन परिचारीकांस अध्ययन रजेसाठी सेवाजेष्ठते नुसार प्राधान्य देता येईल. त्यामुळे कु. पंडीत यांची दोन वर्षे प्रदीर्घ कालावधीची रजा मंजूर करता येत नाही. याबाबत इकडील जा. नं. एसएसएस/वशी-७बी/४२०३/२०१० दि. २२/१०/२०१० अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून कु. पंडीत यांना कळविले आले होते की, त्यांची रजा मंजूर करणे प्रशासनास शक्य होणार नाही. त्यांनी आठ दिवसात कामावर हजर व्हावे. सदरचे पत्र प्राप्त होवून देखील कु. पंडीत कामावर हजर झालेल्या नाहीत.

त्यानंतर इकडील जा. नं. एसएसएस/वशी-७बी/४८८१/२०१० दि. १५/११/२०१० अन्वये रजिस्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून कु. पंडीत यांना कळविण्यात आले आहे की, दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे. अन्यथा, तुम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून तुमचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. सदरचे पत्र कु. पंडीत यांना प्राप्त झाले आहे. परंतु त्या कामावर हजर झाल्या नाहीत. तसेच अशाप्रकारे कामावर हजर होणेस संधि देवूनही कु. पंडीत कामावर हजर झालेल्या नाहीत.

सबब, मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६/०३/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २५१ नुसार दि. ०९/०६/२०११ रोजीच्या आदेशान्वये कु. पंडीत यांचे नांव दि. १३/०६/२०११ पासून संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात आलेले आहे. सदर आदेशाविरुद्ध श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत, बडतर्फ परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विरुद्ध मा. कामगार न्यायालय अहमदनगर येथे रेफरन्स (आयडीए) नं. ६१/२०१४ दि. ०८/०४/२०१५ रोजी दाखल केलेली होती. त्यात दि. २६/०६/२०१८ रोजी खालीलप्रमाणे न्यायनिवाडा केला आहे.

A W A R D

1. Reference is answered partly in the affirmative.
2. It is hereby declared that the termination of the second party dated 13.06.2011 being illegal, improper is hereby quashed and set-aside.
3. The First Party is directed to reinstate the second party in service with continuity of services w.e.f.13.6.2011, but without back wages.
4. Four copies of this award be sent to Dy. Commissioner of Labour, Nashik Division, Nashik for publication.
5. Both parties to bear their own cost.

उपरोक्त रेफरन्स (आयडीए) नं. ६१/२०१४ मध्ये ॲड. अशोक पाटील, अ.नगर यांनी कामाकाज पाहिलेले आहे. दि. ०६/०८/२०१८ रोजी ॲड. अशोक पाटील यांनी खालीलप्रमाणे सल्ला दिलेला आहे. –

> I have gone through Judgement and Award passed by Hon'ble Labour Court in reference (I.D.A. No. 61/2014 between Executive Officer, Shri Saibaba Sansthan and Veronika Kashinath Pandit.
>
> I have gone through reasons given by Hon'ble Labour Court, Ahmednagar. It appears on record that Smt. Veronika Kashinath Pandit remained absent unauthorisedly for years together. It is important to see that she had admitted her gainful employment in her cross-examination and also holding Superior post that post held by her in our hospital. It is advisable to challenge the said Award in the Hon'ble High Court, Bench at Aurangabad.

ॲड. अशोक पाटील, अ.नगर यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार, मा. कामगार न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाड्याविरुद्ध मा. उच्च न्यायालयात खंडपीठ औरंगाबाद श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांचेविरुद्ध

रीट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दाखल करण्यात आली होती. त्यात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यानी दि. १६/१०/२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

7. In the above backdrop, the order of termination from service with allegations of misconduct of unauthorized absenteeism could not have been sustained. The Labour Court has rightly set aside the termination as the Management did not exercise its right to conduct an enquiry before the Labour Court, considering the law laid down by the Honourable Apex Court in the matter of Bharat Forge Company Ltd. V/s. A. B. Zodge, 1996 (73) FLR 1754 : AIR 1996 SC 1556, which have been considered by this Court in MSRTC, Beed V/s. Syed Saheblal Syed Nijam, 2014 (III) CLR 547 : 2014(4) Mh.L.J. ***687*** and Maharashtra State Cooperative Cotton Growers Marketing Federation Limited Vs. Vasant Ambadas Deshpande, 2014 (I) CLR 878 : 2014(3) Mh.L.J. 339 and in the matter of KSRTC Vs. Lakshmidevamma 2001(2) CLR 640.

8. I, therefore, do not find that the impugned order, to the extent of setting aside the order of the termination and granting reinstatement, could be faulted.

9. Insofar as the denial of backwages is concerned, the respondent employee has not preferred a Writ Petition as on date as no such petition has been circulated. The said issue, therefore, need not be dealt with in this petition.

10. The learned Advocate for the petitioner submits that the same respondent had preferred Writ Petition No. 6332/2018 before the learned Division Bench of this Court. Grievance was that her proposal for seeking approval to her appointment with the Seva Nursing College/respondent No.5 operated by the Sakhar Kamgar Hospital Trust/respondent No.6, was rejected by the Maharashtra University of Health Sciences/respondent No.2. It is then pointed out that the respondent is said to be working with the Seva Nursing School from 01/08/2007 as a tutor/clinical instructor.

11. I find that the learned Division Bench is yet to deal with the said certificate, inasmuch as, no such document was placed before the Labour Court. It requires no debate that the Labour Court would deal only with such oral and documentary evidence, which is placed before the Court.

12. When the Labour Court delivered the impugned judgment, the respondent was said to have undertaken fresh employment with another organization. No litigant is expected to starve during the period of unemployment. If an alternate employment is taken up, the law is settled that backwages
can be deprived. If the respondent does not desire to join duties pursuant to the judgment and award of the Labour Court, it would be a different situation which can be dealt with by the petitioner/Management on its own merits. Refusing continuity of service merely because a terminated employee undertakes an alternate employment for keeping his or her mind, body and soul together, would not disentitle her from continuity in service.

13. In view of the above, I do not find that the impugned judgment and award could be termed as being perverse or erroneous. This petition, being devoid of merit is, therefore, dismissed.

श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांनी दि. १५/०६/२०१८ रोजी १. आरोग्य शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २. एम.यु.एच.एस., नाशिक, ३. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई, ४. शिवा ट्रस्ट, औरंगाबाद, ५. सेवा नर्सिंग कॉलेज, श्रीरामपुर, ६. साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्ट, श्रीरामपुर यांचेविरुद्ध रीट पिटीशन क्र. ६३३२/२०१८ दाखल केली असुन रीट मेमोतील परिच्छेद क्र. ०९ मध्ये एका ठिकाणी Petitioner has completed her B.S.C. Nursing in the year 2007 and joined as a Tutor / Clinical Instructor from academic year 2007 with respondent No. 5. She was there till the year 2010 and thereafter petitioner joined the post Graduate course in the yar education year 2010 for M.S.C. Nursing. For ready reference hereto annexed and marked as ANNEXURE – B is the copy of experience certificate dated 30.07.2010 issued by respondent No. 5. असे नमुद केले आहे. श्रीमती पंडीत यांनी महाराष्ट्र शासनाविरुद्ध दाखल केलेल्या रीट पिटीशन मध्ये त्या सन २००७ पासुन सन २०१० पर्यंत ट्युटर / क्लिनीकल इंस्ट्रक्टर या पदावर सेवा नर्सिंग कॉलेज, श्रीरामपुर येथे कार्यरत होत्या, हे त्यांनी मान्य केलेले आहे. याचा अर्थ त्यांनी संस्थान रुग्णालयात नोकरीत असताना संस्थानची फसवणुक करुन दुस-या संस्थेत नोकरी केलेली आहे.

श्रीमती पंडीत यांना दि. १३/०६/२०११ रोजी वेतनबॅण्ड रु. ९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/-, ग्रेड पे रु. ४,२०० नुसार वेतन देण्यात येत होते. मा. कामगार न्यायालय अहमदनगर रेफरन्स (आयडीए) नं. ६१/२०१४ मधील दि. २६/०६/२०१८ रोजीचा न्यायनिवाडा व मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचा रीट पिटीशन क्र. ११४६३/२०१८ दि. १६/१०/२०१८ रोजीचे आदेशानुसार श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांना परिचारीका या पदावर दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. १३/०६/२०११ पासून पुढे संस्थान सेवेत

सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेल्या शेवटचे वेतनबॅण्ड रु.९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/- + ग्रेड वेतन रु. ४,२००/- नुसार होणा-या वेतनावर पूर्ववत कामावर हजर करुन घेणेबाबत तसेच सन २००७ ते सन २०१० या कालावधीत संस्थानमध्ये नोकरी करत असताना, दुस-या संस्थेत नोकरी केल्याबाबत विचारात घेऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७६७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचा रीट पिटीशन क्र.११४६३/२०१८ दि. १६/१०/२०१८ रोजीचे आदेशानुसार श्रीमती वेरोनिका काशिनाथ पंडीत यांना परिचारीका या पदावर दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. १३/०६/२०११ पासून पुढे संस्थान सेवेत सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेले शेवटचे वेतनबॅण्ड रु.९३००-३४८००, मुळ वेतन रु. ९,७१०/- + ग्रेड वेतन रु. ४,२००/- नुसार होणा-या वेतनावर पूर्ववत कामावर हजर करुन घेण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच श्रीमती पंडीत यांनी सन २००७ ते सन २०१० याकालावधीत संस्थानमध्ये नोकरी करत असतांना दुसऱ्या संस्थेत नोकरी केले बद्दल त्यांचेविरुध्द करावयाच्या कायदेशीर कारवाई बाबत संस्थानचे वकीलांचा सल्ला घेऊन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करावा. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४१ श्रीमती आशुमती संपत सदाफुले माजी परिचारीका (११ महिने नेमणूक) यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेल्या युएलपी क्र. ७८/२०१८ मधील अंतरीम आदेशाबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती आशुमती संपत सदाफुले, माजी परिचारीका (११ महिने कालावधीकरीता नेमणूकीवरील) यांची ११ महिने नेमणूक कालावधीसाठीची नेमणूक दि. १६/१२/२०१७ रोजी संपुष्टात आली. मा व्यवस्थापन समिती दि. ०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १०४९ नुसार, याकरीता व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री. प्रताप भोसले यांची समिती तयार करणेत आली. या समितीने प्रस्तावित परिचारक/परिचारीकांना मुदतवाढ देणे योग्य होईल का, याची शहानिशा करून त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

दि. ०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १०४९ नुसार, गठीत केलेल्या समितीकडून, व्यवस्थापन समितीसमोर सादर करावयाचा एकत्रित अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर झालेला नसल्याने प्रस्तावातील नमुद परिचारक/परिचारीकांना बाह्ययंत्रणेद्वारे घेऊन प्रतिमहा रू.१५,४००/- एकत्रित वेतन देणेबाबतचा प्रस्ताव दि.०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र १२८ नुसार, प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १३९ नुसार, मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १२८, यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

प्रस्तावित ११ परिचारक/परिचारीकांना सध्या रू.१५,४००/- मात्र प्रतिमहा एकत्रितवेतनावर बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देण्यात यावी. त्याचबरोबर सदरहू परिचारक/परिचारीका यांना पुर्वीप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेकामी शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती दि. ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र २२५ नुसार, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ११-११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या ११ परिचारक/ परिचारीका यांना दि.०२/०२/२०१८ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देणेबाबत ठरलेले आहे. परंतु आता, ज्या शासन निर्णयाचे अनुषंगाने निर्णय क्र १२८ घेण्यात आला, त्या शासन निर्णयास स्थगिती मिळालेली आहे. त्यामुळे सदरहू परिचारक/परिचारीका यांना पुर्वीप्रमाणेच ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

सदर निर्णयानुसार, कु आशुमती संपत सदाफुले यांना दि. ०१/०५/२०१८ रोजीचा नेमणूक आदेश देणेत आला होता. श्रीमती सदाफुले यांना दि. ०१/०५/२०१८ रोजीचा नेमणूक आदेश रजिस्टर ए.डी. द्वारे दि. १६/०५/२०१८ रोजी मिळालेला असुन पोहोच इकडील कार्यालयास प्राप्त झाली आहे.

सदाफुले यांचे नेमणूक आदेशामधील अटी-शर्ती १३ मध्ये, नेमणूक आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात करारमाना सादर करून कामावर हजर व्हावे, अन्यथा आपले नेमणूक आदेश रद्द समजणेत येतील असे नमुद आहे. सदाफुले ह्या त्यानंतर देखील १५ दिवसात हजर झालेल्या नाहीत.

श्रीमती सदाफुले यांचेबरोबर इतर १० परिचारक/परिचारीका यांनाही ११ महिने कालावधीकरीता नेमणुक आदेश देणेत आलेले असुन ते कामावर हजर झालेले आहेत. त्यांनी कामगार न्यायालय, अहमदनगर येथे संस्थानविरोधात कोर्ट केस दाखल केलेली आहे.

सदाफुले यांना त्यांचा नेमणूक आदेश दि. १६/०५/२०१८ रोजी मिळालेला असुनही तदनंतर त्या १५ दिवसाचे आत कामावर हजर न झाल्याने त्यांचा नेमणूक आदेश रद्द झालेला आहे, असे त्यांना दि. ०८/०९/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले असुन दि.०८/०८/२०१८ रोजीचा कामावर हजर करून घेणेबाबतचा अर्ज निकाली काढुन नस्तीबंद करणेत आला आहे.

तदनंतर श्रीमती सदाफुले यांनी औद्योगिक न्यायालय,अहमदनगर येथे संस्थान विरूध्द तक्रार (युएलपी) क्र. ७८/२०१८ ही कोर्ट केस दाखल केली आहे.

सदर कोर्ट केसमध्ये त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

मा.न्यायालयास तक्रारदारातर्फे नम्र प्रार्थना की,

अ) जाबदेणार यांनी तक्रारदाराबाबत तक्रारीत नमुद केलेल्या अनुचित कामगार प्रथांचा अवलंब केल्याचे जाहीर करुन त्या बेकायदेशीर, अयोग्य असुन त्या रद्द करण्याचे आदेश जाबदेणार यांना व्हावेत.

ब) तक्रारदारास समान कामास समान मोबदला तत्वाने प्रथम नेमणूकी पासुन दिलेले वेतनव देय वेतन व फायदे फरकासहीत अदा करण्याचे आदेश जाबदेणार यांना व्हावेत.

क) तक्रारदारास प्रथम नेमणुकीपासुन किंवा २४० दिवस सेवेपासुन किंवा योग्य त्या काळापासुन परिचारीका म्हणून कायम करुन सर्व फायदे फरकासहीत अदा करण्याचे आदेश जाबदेणार यांना व्हावेत.

ड) तक्रारदारास सध्याचे नेमणुक पत्र देताना मागण्यात आलेला करार हा बेकायदेशीर असल्याने जाहीर करावे.

इ) सोबतच्या अंतरीम आदेश अर्जातील बाबी कायम व्हाव्यात.

ई) इतर योग्य ते न्यायोचित आदेश तक्रारदराच्या बाजुने व्हावेत.

आवश्यकता वाटल्यास वरील मजकुरात भर घालण्याची दुरुस्ती करण्याची परवानगी तक्रारदारास असावी. तसेच त्यांनी अंतरीम आदेशास्तव अर्ज सादर केला असुन त्यात त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

अ) तक्रारीच्या सुनावणीच्या काळात जाब देणार यांनी दिलेला आदेश जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/६०/२०१८ दि.०१/०५/२०१८ प्रमाणे तक्रारदार हीची सेवा चालु ठेवण्याचा अंतरीम आदेश व्हावा. तसेच तक्रारीच्या सुनावणीच्या काळात तक्रारदार हीला सेवेतुन कमी न करण्याविषयक आदेश व सेवेत ठेवण्याचे आदेश जाब देणा-यांना व्हावेत.

ब) तक्रारदार हीला समान कामास समान मोबदला तत्वाने कायम परिचारिका प्रमाणे मुळ वेतन, ग्रेड पे आणि इतर वेतन देण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

क) इतर योग्य ते न्यायोचित आदेश तक्रारदाराच्या बाजुने व्हावेत.

यावर मा. औद्योगिक न्यायालय, अ.नगर यांनी दि. २४/०९/२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

Heard. Issue show cause notice returnable on 01/10/2018. Till then only the services of the complaints shall not be terminated except by following due process of law.

दि. २८/११/२०१८ रोजी मा. औद्योगिक न्यायालय, अ.नगर यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

ORDER BELOW EXH. U – 2 (Passed on 28-11-2018)

1) Perused the record and heard Mr. Sadaphule and Mr. Ashok Patil, the learned Advocates.

2) The complainant wants interim relief in terms of para 6 of the application pending decision in main complaint relating to items 5, 6, 9 & 10 of Sch-IV to the MRTU & PULP Act.

3) The complainant was appointed as Staff Nurse by the respondent vide order dated 17-8-2008. Appointment was for eleven months. Thereafter, such orders were issued from time to time till 17-12-2017 when the respondent stopped providing work. On 01-05-2018 the respondent issued an appointment letter to the complainant asking her to submit some agreement within 15 days regarding terms and conditions and join duties, failing which the appointment order would stand cancelled.

4) According to the complainant, she had worked for years but was treated as temporary. She ought to have been made permanent. Others have been made permanent as named in Annexure – A. the complainant got appointment letter on 30-5-2018. Thereafter she was sick. The complainant therefore, wrote a letter dated 8-8-2018 and submitted medical certificate. However, she was not allowed to join. The complainant wants a direction to the respondent to continue her service and to pay equal wages for equal work etc.

5) The respondent has opposed the application, denying all adverse allegations.

6) Mr. Sadaphule Advocate submitted that the complainant had worked for years. The appointment letter dated 1-5-2018 was actually received on 30-5-2018. The complainant was not well. Thereafter, she submitted a letter alongwith medical certificate and requested for providing work. According to the learned Counsel, there is discrimination also as others have been made permanent, some within one year.

7) Mr. Patil learned Advocate countered the submissions of Mr. Sadaphule, and submitted that the contractual appointments are made according to the rules and Staffing Patters. The Complainant was given appointment letter and sufficient time to join duties. She failed to accept the appointment and therefore, there is no unfair labour practice. Mr. Patil advocate opposed grant of any relief.

8) Prime facie, it appears that several similar employees have been made permanent. Similarly situated employees had been working since 2008 or so on periodical appointment letters. Some of them had approached Hon'ble High Court where the respondent allegedly assured to provide work and therefore, writ was withdrawn. It appears that the complainant was not on work after 17-2-2017. If similarly situated employees are indeed made permanent as claimed then item 5 may be attracted.

9) Prima facie, it appears that the complainant received the appointment letter and according to her, due to illness, she could not join duties. The respondent informed the complainant about cancellation of appointment letter on technical ground that she failed to join after submitting agreement or contract within 15 days.

10) The respondent does not appear to have considered the reasons for the complainant's inability to make compliance within 15 days. Prima facie, the respondent is required to consider the case of the complainant sympathetically. Having regard to the reasons stated by her and the fact that similarly situated employees are working even now, the respondent shall consider the case of the complainant for allowing her to join duties. This order shall take effect on and from 13-12-2018.

दि. २९/११/२०१८ रोजी आशुमती संपत सदाफुले यांनी मा न्यायालयाने दि. २८/११/२०१८ रोजी आदेश पारीत केला आहे व सदर अंतरीम आदेशाप्रमाणे अर्जदार हीला सेवेत घेणेत यावे व मा. न्यायालयाचे आदेशाची अंमलबजावणी व्हावी व अर्जदार हीला आपली सेवा करण्याची संधी द्यावी ही नम्र विनंती असा अर्ज दिला आहे.

तरी श्रीमती आशुमती सदाफुले यांचे दि. २९/११/२०१८ रोजीचे अर्जाबाबत व दि. २८/११/२०१८ रोजी मा. औद्योगिक न्यायालय, अ.नगर यांनी दिलेले आदेशाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती आशुमती सदाफुले यांना नियुक्ती देण्यात येऊ नये, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४२** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१,४८,८१३/- मात्र आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद –

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी – पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | चालु आर्थिक वर्षात यापुर्वी अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग- औ.प्र. सं.<br>हुददा – निर्देशक | स्वतः | HTN<br>रक्तदाब | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ८३६०.०० | ७७९८.०० | १२८२३२०० |
| २ | सुरवसे संतोष बब्रुवन<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुददा –भुलतज्ञ | स्वतः | HTN<br>रक्तदाब | डॉ.शिंदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५६९४.०० | ५६९४.०० | १७०३२.०० |
| ३ | दिपक सुर्यकांत लोखंडे<br>विभाग-लेखाशाखा<br>हुद्दा-लिपिक | आई | Diabetes & Blood Pressure<br>रक्तदाब,मधुमेह | डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | १४२६.०० | १०४६.०० | २००३५.०० |
| | | | | **अ - एकूण रक्कम-** | | **१५४८०.००** | **१४५३८.००** | |
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झाल्याने संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते.** | | | | | | | |
| ४ | चौधरी मंजुषा विजय<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा –लॅब टेक्निशियन | वडिलां | Ca<br>कर्करोग | डॉ.जाधवर | क्युरी मानवता कॅन्सर सेंटर | २५८१२.०० | २२००१.०० | ००.०० |
| ५ | योगेश त्रिंबक साळवी<br>विभाग-लेखाशाखा<br>हुद्दा-मदतनीस | स्वतः | Ca<br>कर्करोग | डॉ. किरण खांदे | क्युरी मानवता कॅन्सर सेंटर ,नासिक | १८०३१.०० | १७९२६.०० | २४८५३.०० |
| ६ | राजेंद्र दत्तात्रय जोर्वेकर<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा –औषधनिर्माता | मुला | हदयासंदर्भात Pulmonary Embolism | डॉ.शिंदे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ५६५०.०० | ५६५०.०० | ४९९३६.०० |
| ७ | झणकर वैशाली सदाशिव<br>विभाग- इंग्लिश मिडीयम स्कूल<br>हुद्दा - स.शिक्षिका | आई | Ca<br>कर्करोग | डॉ.पोरवाल | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २३२५०.०० | २३२५०.०० | ००.०० |
| ८ | सतिष जगन्नाथ आजबे<br>विभाग- सा.भ. निवास<br>हुद्दा- मदतनिस | स्वतः | CVA with NHI with aphasia हदयासंदर्भात | डॉ. कांदळकर | सहयाद्री हॉस्पिटल, नासिक | ५५२८६.०० | ३९२०६.०० | ००.०० |
| | | | | **ब - एकूण रक्कम-** | | **१२८०२९.००** | **१०८०३३.००** | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | चालु आर्थिक वर्षात यापुर्वी अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **क. संस्थान रुग्णालयात व संस्थान मान्य यादीत उपचार न घेतलेले रेफर न केलेले ,निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतलेले** | | | | | | | |
| ९ | डॉ.सचिन देविदास बागडे विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा –आर एम ओ | आई | Kidney Biopsy मुत्रपिंड तपासणी उपचार | डॉ.जाधवर | उत्कर्ष हॉस्पिटल, औरंगाबाद | ३२८०३.०० | २६२४२.०० | ००.०० |
| | | | | | **क - एकूण रक्कम-** | **३२८०३.००** | **२६२४२.००** | |
| | | | | | **अ+ब+क - एकूण रक्कम -** | **१७६३१२.००** | **१४८८१३.००** | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.१,४८,८१३/-इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत – नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहेत.

प्रस्ताव- उपरोक्त ०९कर्मचारी /कर्मचा-यांवरअवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु. १,४८,८१३/- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावातील ०९ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.१,४८,८१३/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत पॅनलवर असलेल्या V.R. Nagarkar Medical Foundation, Nashik बाबत व यांना संस्थान तर्फे देत असलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनिय २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:- दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

प्रास्तविक:- श्री साईबाबा संस्थानने,गरीब गरजु रुग्णांना रुग्ण उपचार घेत अलेल्या रुग्णालयाचे नावे वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी, मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०७/२०११, विषय नं.१४, निर्णय क्र.५८१. अन्वये, स्वतंत्र नियमावलीस मान्यता दिलेली आहे. नियमावलीतील अ.क्र. ३ अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटीच देण्यात येईल. अ.क्र.६औषधांच्या उपचाराच्या वाढत्या किंमती व खर्च लक्षात घेता अनुदान हे शस्त्क्रिया येणारे एकुण खर्चाच्या खर्चाचे १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम देण्यात येईल.सध्या पॅनलवरील ८२ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील आठ आजारांकरीता वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येते. त्यास संदर्भ क्र.२ अन्वये शासन मान्यता आहे.

संदर्भ क्र.३, हिरण्यगर्भ मॅनेजमेंट रिसोर्सेस नाशिक यांचे डॉ.श्री प्रदिप पाटील यांची श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय या दोन्ही रुग्णालयांचे मानवी साधन संपत्ती व्यवस्थापन सल्लामसलत करणेकामी नेमणुक करणेत आलेली आहे. डॉ.श्री प्रदिप पाटील हे वैद्यकीय आर्थिक अनुदान विभागात मानवी साधन संपत्ती व्यवस्थापन सल्लामसलत करणे कामी आले असता. डॉ. श्री प्रदिप पाटील यांनी वैद्यकीय आर्थिक अनुदान कशाप्रकारे दिले जाते याबाबत माहिती घेत असतांना. श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीतील पॅनलवरील रुग्णालयांची यादीचे अवलोकन केले असता. V.R.Nagarkar Medical Foundations, Nashik यांना तुम्ही वैद्यकीय आर्थिक अनुदान कसे देतात? श्री

साईबाबा संस्थानच्या नियमावली काय सांगते? सार्वजनिक न्यासाने चालविलेले रुग्णालय, V.R.Nagarkar Medical Foundations, Nashik हे सार्वजनिक धर्मदाय न्यास आहे, परंतु त्यांचे रुग्णालय कोणते? अशी विचारणा केली.

याबाबत त्यांना माहिती दिली की, या अगोदर श्री साईबाबा संस्थान मार्फत V.R.Nagarkar Medical Foundations चे Manavata Cancer Centre, Nashik या रुग्णालयातील रुग्णांस अनुदान दिले जात होते. परंतु त्यांनी दि.२३/१२/२०१५ रोजी, पत्र पाठवुन V.R.Nagarkar Medical Foundations, Nashik या नावाने कॅन्सर रुग्णांसाठी वैद्यकीय आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केलेली होती. त्यांनी पत्रात असे नमुद केलेले आहे की, संस्थानकडुन प्राप्त झालेली रक्कम Manavata Cancer Centre, Nashik या रुग्णालयातील रुग्णांना वापरलेली आहे. या अगोदर आम्ही Manavata Cancer Centre याचा भाग होतो. आता ते Manavata Cancer Centre Healthcare Global Enterprises Ltd. (HCG), यांचे बरोबर लिंक झालेले आहे. कारण त्यांचे उच्च दर्जाचे कॅन्सर वरील उपचार देण्याकरीता ते यांचे बरोबर लिंक झालेले आहे. त्यामुळे Manavata Cancer Centre, हे Curie Manavata Cancer Centre मध्ये रुपांतरीत झालेले असुन, ते एक प्रा.लिमिटेड रुग्णालय आहे.

पॅनलवरील रुग्णालयाचे नावात बदल करणेकामी तत्कालीन मा.का.अ.साहेब यांचे तोंडी निर्देशान्वये,दि.३०/१२/२०१५ रोजी प्रशासकीय मान्यतेसाठी टिपणी सादर केली असता, नावात बदल करणेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

V.R.Nagarkar Medical Foundations, Nashik यांचा धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयात नोंदणी क्रं.ई-१०६९ (नाशिक) दि.१४/०७/२००५ (वसंतराव रुद्राप्पा नगरकर मेडीकल फौडेंशन, नाशिक) आहे. संस्थान नियमावलीनुसार वैद्यकीय आर्थिक अनुदान हे सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेल्या रुग्णालयातील रुग्णास दिले जाते. V.R.Nagarkar Medical Foundations, Nashik हे सार्वजनिक धर्मदाय न्यास आहे, परंतु हे एक फौंऊडेशन आहे. रुग्णालय नाही.

प्रस्ताव- दि.३०/१२/२०१५ रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये, V.R.Nagarkar Medical Foundations, Nashik या नावाने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. परंतु श्री साईबाबा संस्थानच्या नियमावलीनुसार अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटीच देण्यात येते. V.R.Nagarkar Medical Foundations, Nashik हे सार्वजनिक धर्मदाय न्यास आहे, परंतु हे एक फौंऊडेशन आहे. रुग्णालय नाही.

श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत, पॅनलवर असलेल्या V.R.Nagarkar Medical Foundations, Nashik बाबत व यांना संस्थान तर्फे देत असलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेत, सविस्तर चर्चा होऊन, निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली नुसार वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येत असलेल्या रुग्णालयांच्या यादीमधुन V.R. Nagarkar Medical Foundation, Nashik यांचे नाव वगळण्यात येऊन त्यांचे नावे रुग्णांकरीता देण्यात येत असलेले वैद्यकीय आर्थिक अनुदान बंद करण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **शासन निर्णय व परिपत्रक वाचन.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थ, शिर्डी यांचे कामकाजा संबंधीत शासन निर्णय, परिपत्रके व इतर पत्र प्राप्त होतात. सदर पत्रांची एकत्रित रित्या मागासवर्ग कक्षाकडे नोंद घेऊन सदर पत्रावर उचित कार्यवाहीसाठी संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येते. सदर शासन पत्रावर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्यास वरिष्ठांकडे सादर करण्यात येतो.

मा. व्यावस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ चे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१७, निर्णय क्र.३४६ "संस्थानचे कामकाजासंबंधी शासनाचे निर्णय,परिपत्रके वेळोवेळी समितीचे बैठकीत सर्व समिती सदस्यांना

बैठकीच्या अजेंडयासोबत देण्यात यावी व सदर शासन निर्णय, परिपत्रके यांचे वाचन असा विषय अजेंडयामध्यें समाविष्ट करण्यात यावा."असा झालेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.११/१२/२०१८ ते दि.१३/१२/२०१८ अखेर या कालावधीत महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात खालीलप्रमाणे प्राप्त झालेली पत्रे सोबत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | शासन पत्र क्र. व दिनांक | प्राप्त दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ०१ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/९१२/ प्र.क्र.९८/का.१६ / विधी व न्याय विभाग दि.०७/१२/२०१८ | ११/१२/२०१८ | आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारातील महिलांच्या पुर्नवसनासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत देण्यात आलेल्या निधीच्या विनियोगास मुदतवाढ देणेबाबत. |
| ०२ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१७१०/ प्र.क्र. १९५/का.१६ विधी व न्याय विभाग दि.०६/१२/२०१८ | ११/१२/२०१८ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस रु. ५० कोटी इतके अर्थ सहाय्य देण्याबाबत |

**निर्णय क्र.७७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त शासन निर्णय व परिपत्रक यांचे वाचन करुन त्यांची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही- मागासवर्ग कक्ष)**

---

दि.१३.१२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय-

आयत्या वेळेचा
विषय नं.०२ **सन २०१९ वर्षा करीता गायीचे शुध्द तुप खरेदी करीता ऑनलाईन प्राप्त झालेल्या निविदांमधून पात्र ठरलेल्या निविदा धारकांच्या ऑनलाईन वाणिज्यीक निविदा उघडून न्युनतम दरधारकांशी दराबाबत चर्चा वाटाघाटी व Vendor Audit करणे आणि पुरवठा आदेश देणे.**

प्रस्ताव- सन २०१९ या वर्षासाठी गाईचे शुद्ध तुप खरेदीसाठी जानेवारी ते मार्च-२०१९, एप्रिल ते जुन-२०१९, जुलै ते सप्टेंबर-२०१९, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१९ अशा चार स्वतंत्र ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकामी अनुक्रमे २१,१६,१६ व १४ अशा ऑनलाईन निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदर निविदांची तांत्रिक छाननी खरेदी समितीच्या सभेत करण्यात आली. त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे-

**अ) जानेवारी ते मार्च-२०१९ या तिमाहीसाठी एकुण २१ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे–**

१. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपुर
२. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी
३. कर्नाल मिल्क फुडस् लिमिटेड, दिल्ली
४. कोल्हापुर जिल्हा दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर
५. प्रभात डेअरी लिमीटेड, रांजणखोल
६. प्रिमिअर ॲग्रो फुड.प्रा., बरेली
७. शिव इंडस्ट्रीज, गुगलीयाना
८. सुरत जिल्हा सह.दुध उत्पा.युनियन लि., सुरत
९. व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद
१०. गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., गणेशशेरी, फलटण
११. एस डि पी इंडस्ट्रीज प्रा.लि.,
१२. श्री वारणा सहकारी दुध उत्पा.संघ, वारणानगर
१३. श्री दत्त इंडिया प्रा.लि.,हमीदवाडा, कोल्हापुर
१४. गंगा डेअरी, अलीगड
१५. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा. संघ, सहजानंदनगर

१६. पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई
१७. ऊमिया मिल्क प्रॉडक्ट्स, अहमदाबाद
१८. स्मृती प्रॉडक्टस् प्रा.लि., सहा, अंबाला, हरियाणा
१९. मल्टी ग्लोब डेअरी प्रा.लि., नानहेरी, हरीयाणा
२०. मळगंगा मिल्क ॲण्ड ॲग्रो प्रॉ.प्रा.,लि., निघोज
२१. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव

वरील निविदांची ऑनलाईन छानणी केली असता सदर निविदाधारकांपैकी अनुक्रम नं. १ ते १४ या निविदाधारकांनी संस्थानचे मागणीप्रमाणे सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर केलेली आहेत त्यामुळे ते पात्र ठरले. अ.नं. १५ व १६ यांनी सादर केलेल्या FSSAI Certificate मध्ये तूप उत्पादन क्षमता २५ क्विंटल प्रती दिन पेक्षा कमी असल्यामुळे ते अपात्र ठरले आहेत. अ.नं.१७ यांनी FSSAI परवाना सादर न करता फक्त परवाना Renewal पावती सादर केलेली आहे. त्यामुळे ते अपात्र ठरले. तसेच अ.नं.१८ व १९ यांनी CA यांचे Production Capacity सर्टिफिकेट दिलेले आहे. CA ही Competent Authority नसल्यामुळे ते अपात्र ठरले. तर अ.नं.२० यांचे FSSAI परवान्याची मुदत संपलेली आहे त्यामुळे ते अपात्र ठरले आहे. अ.नं.२१ हे शुध्द तूपाचे उत्पादक नसून डिलर आहेत त्यामुळे त्यांचा विचार करता येणार नाही.

सदर नमूद कारणांमुळे अ.नं.१५ ते २१ निविदाधारक तांत्रिक दृष्टया अपात्र ठरले आहेत.

ब) एप्रिल ते जुन-२०१९ या तिमाहीसाठी एकुण १६ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे–

१. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपुर
२. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी
३. कर्नाल मिल्क फुडस् लिमिटेड, दिल्ली
४. कोल्हापुर जिल्हा दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर
५. प्रभात डेअरी लिमीटेड, रांजणखोल
६. प्रिमिअर ॲग्रो फुड.प्रा., बरेली
७. शिव इंडस्ट्रीज, गुगलीयाना
८. सुरत जिल्हा सह.दुध उत्पा.युनियन लि., सुरत
९. व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद
१०. गंगा डेअरी, अलीगड
११. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा. संघ, सहजानंदनगर
१२. पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई
१३. ऊमिया मिल्क प्रॉडक्ट्स, अहमदाबाद
१४. स्मृती प्रॉडक्टस् प्रा.लि., सहा, अंबाला, हरियाणा
१५. मळगंगा मिल्क ॲण्ड ॲग्रो प्रॉ.प्रा.,लि., निघोज
१६. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव

वरील निविदांची ऑनलाईन छानणी केली असता सदर निविदाधारकांपैकी अनुक्रम नं.१ ते १० या निविदाधारकांनी संस्थानचे मागणीप्रमाणे सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर केलेली आहेत, त्यामुळे ते पात्र ठरले. अ.नं. ११ व १२ यांनी सादर केलेल्या FSSAI Certificate मध्ये तूप उत्पादन क्षमता २५ क्विंटल प्रती दिन पेक्षा कमी असल्यामुळे ते अपात्र ठरले आहेत. अ.नं.१३ यांनी FSSAI परवाना सादर न करता फक्त FSSAI परवाना Renewal पावती सादर केलेली आहे, त्यामुळे ते अपात्र ठरले आहे. अ.नं.१४ यांनी CA यांचे Production Capacity सर्टिफिकेट दिलेले आहे. CA ही Competent Authority नसल्यामुळे ते अपात्र ठरले. अ.नं.१५ यांचे FSSAI परवान्याची मुदत संपलेली आहे. त्यामुळे ते अपात्र ठरले. तर अ.नं.१६ हे शुध्द तूपाचे उत्पादक नसून डिलर आहेत, त्यामुळे त्यांचा विचार करता येणार नाही.

सदर नमूद कारणांमुळे अ.नं.११ ते १६ निविदाधारक तांत्रिक दृष्टया अपात्र ठरले आहेत.

क) जुलै ते सप्टेंबर-२०१९ या तिमाहीसाठी एकुण १६ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे–

१. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपुर
२. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी
३. कर्नाल मिल्क फुडस् लिमिटेड, दिल्ली

४. कोल्हापुर जिल्हा दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर
५. प्रभात डेअरी लिमीटेड, रांजणखोल
६. प्रिमिअर ॲग्रो फुड.प्रा., बरेली
७. शिव इंडस्ट्रीज, गुगलीयाना
८. सुरत जिल्हा सह.दुध उत्पा.युनियन लि., सुरत
९. व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद
१०. गंगा डेअरी, अलीगड
११. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा. संघ, सहजानंदनगर
१२. पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई
१३. ऊमिया मिल्क प्रॉडक्ट्स, अहमदाबाद
१४. स्मृती प्रॉडक्टस् प्रा.लि., सहा, अंबाला, हरियाणा
१५. मळगंगा मिल्क ॲण्ड ॲग्रो प्रॉ.प्रा.,लि., निघोज
१६. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव

वरील निविदांची ऑनलाईन छाननी केली असता सदर निविदाधारकांपैकी अनुक्रम नं.१ ते १० या निविदाधारकांनी संस्थानचे मागणीप्रमाणे सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर केलेली आहेत, त्यामुळे ते पात्र ठरले. अ.नं. ११ व १२ यांनी सादर केलेल्या FSSAI Certificate मध्ये तूप उत्पादन क्षमता २५ क्विंटल प्रती दिन पेक्षा कमी असल्यामुळे ते अपात्र ठरले आहेत. अ.नं.१३ यांनी FSSAI परवाना सादर न करता फक्त FSSAI परवाना Renewal पावती सादर केलेली आहे. त्यामुळे ते अपात्र ठरले आहे. अ.नं.१४ यांनी CA यांचे Production Capacity सर्टिफिकेट दिलेले आहे. CA ही Competent Authority नसल्यामुळे ते अपात्र ठरले. अ.नं.१५ यांचे FSSAI परवान्याची मुदत संपलेली आहे. त्यामुळे ते अपात्र ठरले. तर अ.नं.१६ हे शुध्द तूपाचे उत्पादक नसून डिलर आहेत त्यामुळे त्यांचा विचार करता येणार नाही.

सदर नमूद कारणांमुळे अ.नं.११ ते १६ निविदाधारक तांत्रिक दृष्टया अपात्र ठरले आहेत.

ड) ऑक्टोबर ते डिसेंबर- या तिमाहीसाठी एकुण १४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याची माहिती खालीलप्रमाणे–

१. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपुर
२. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी
३. कर्नाल मिल्क फुडस् लिमिटेड, दिल्ली
४. कोल्हापुर जिल्हा दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर
५. प्रभात डेअरी लिमीटेड, रांजणखोल
६. एस डि पी इंडस्ट्रीज प्रा.लि.,दमण
७. शिव इंडस्ट्रीज, गुगलीयाना
८. सुरत जिल्हा सह.दुध उत्पा.युनियन लि., सुरत
९. व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद
१०. गंगा डेअरी, अलीगड
११. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा. संघ, सहजानंदनगर
१२. ऊमिया मिल्क प्रॉडक्ट्स, अहमदाबाद
१३. मळगंगा मिल्क ॲण्ड ॲग्रो प्रॉ.प्रा.,लि., निघोज
१४. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव

वरील निविदांची ऑनलाईन छाननी केली असता सदर निविदाधारकांपैकी अनुक्रम नं. १ ते १० या निविदाधारकांनी संस्थानचे मागणीप्रमाणे सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर केलेली आहेत त्यामुळे ते पात्र ठरले. अ.नं. ११ यांनी सादर केलेल्या FSSAI Certificate मध्ये तूप उत्पादन क्षमता २५ क्विंटल प्रती दिन पेक्षा कमी असल्यामुळे ते अपात्र ठरले आहेत. अ.नं.१२ यांनी FSSAI परवाना सादर न करता फक्त FSSAI परवाना Renewal पावती सादर केलेली आहे. त्यामुळे ते अपात्र ठरले आहे. अ.नं.१३ यांचे FSSAI परवान्याची मुदत संपलेली आहे. त्यामुळे ते अपात्र ठरले आहे. तर अ.नं.१४ हे शुध्द तूपाचे उत्पादक नसून डिलर आहेत त्यामुळे त्यांचा विचार करता येणार नाही.

सदर नमूद कारणांमुळे अ.नं.११ ते १४ निविदाधारक तांत्रिक दृष्टया अपात्र ठरले आहेत.

वरील अ,ब,क व ड मधील अपात्र निविदाधारक वगळता उर्वरित निविदाधारकांच्या वाणिज्यीक निविदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडुन न्युनतम दरधारकाशी दराबाबत वाटाघाटी करून न्युनतम दरधारकाचे Vendor Audit ची कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

तरी,

१. सदर ४ निविदेतील पात्र निविदाधारकांच्या ई-निविदा वाणिज्यीक निविदा उघडणेस,

२. सदर निविदांमधील न्युनतम दरधारक यांचेशी चर्चा वाटाघाटी करणेस,

३. सदर निविदांमधील न्युनतम दरधारकांचे Vendor Audit करणेस,

४. सदर निविदांतील न्युनतम दरधारकाना पुरवठा आदेश देणेस,

वरील अ.नं. १ ते ४ बाबींबाबत निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७७२ सन २०१९ वर्षाकरीता गायीचे शुध्द तुप खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त झालेल्या निविदांमधून तांत्रिक निविदांमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या ऑनलाईन वाणिज्यीक निविदा आजचे व्यवस्थापन समितीमध्ये उपस्थिती निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. त्यामध्ये व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे चार तिमाही साठी दर खालीलप्रमाणे असून ते न्युनत्तम आहे. तथापी ई-निविदेत प्रति क्विंटलचे दर मागविण्यात आले होते. परंतु व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांनी प्रति किलोचे दर दिलेले आहे. याबाबत त्यांनी लेखी पत्र देऊन सदरचे दर प्रति किलो असून त्यापटीत प्रति क्विंटलचे दर ग्राहय धरावे अशी विनंती केली, व त्यास समितीने मान्यता दिली.

| अ.नं. | कालावधी | दर प्रति किलो (सर्व करांसह) |
|---|---|---|
| १ | जानेवारी-२०१९ ते मार्च-२०१९ | रु.२७०/- |
| २ | एप्रिल-२०१९ ते जून -२०१९ | रु.२७३/- |
| ३ | जुलै-२०१९ ते सप्टेंबर-२०१९ | रु.२७१/- |
| ४ | आक्टोंबर-२०१९ ते डिसेंबर-२०१९ | रु.२६९/- |

व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे प्रतिनिधी व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.

तसेच शासनाचे खरेदी धोरणानुसार महाराष्ट्राबाहेरील निविदाधारक निम्नतम असेल व निम्नतम आलेल्या दरामध्ये महाराष्ट्रातील निविदाधारक मालाचा पुरवठा करण्यास तयार असेल तर त्यांना ५० टक्के पुरवठा आदेश विभागुन देण्यात यावा, अशी तरतुद आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील निविदाधारक हे निम्नतम आलेल्या दरामध्ये गाईचे शुध्द तुपाचा पुरवठा करण्यास तयार आहेत काय? याबाबत त्यांना विचारणा करण्यात आली. मात्र महाराष्टातील सर्व पुरवठादारांनी निम्नतम दरधारकाचे दराने पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे १०० टक्के शुध्द गायीचे तुप पुरविणेबाबतचा पुरवठा आदेश व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना देण्यात यावा, असे ठरले.

तत्पुर्वी संस्थानच्या व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष व इच्छुक असलेले समिती सदस्य तसेच संस्थान अधिकारी यांनी व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद या प्रकल्पाचे व्हेंडर ऑडीट करावे. मात्र डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दोन आठवडयात भाविकांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. त्यामुळे संस्थान अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडणे शक्य होणार नाही, सबब डिसेंबर अखेर पावेतो व्हेंडर ऑडीट शक्य होणार नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन तुपाच्या पुरवठयात व्यत्यय येऊ नये म्हणून प्रथम १ जानेवारी पासून एक महिन्याचा पुरवठा आदेश देण्यात यावा. व्हेंडर ऑडीटचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर जर अहवाल अनुकूल/समाधानकारक असेल तर प्रथम तिमाहीच्या पुढील दोन महिन्याचा पुरवठा आदेश स्वतंत्रपणे देण्यात यावा, असे ठरले. सदर तिमाहीतील पुरवठा करण्यात आलेल्या शुध्द तुपाचा दर्जा व गुणवत्ता तसेच करारनाम्यातील इतर अटी व शर्ती यांचे पुरवठादाराकडून केले जाणारे पालन विचारात घेऊन पुढील प्रत्येक तिमाहीचे स्वतंत्र पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेबाबत.

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४ चा महातराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्रत विधान मंडळाचे अधिनियम व राज्यनपालांनी प्रस्तावित केलेले अध्याििदेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तां ना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

प्रास्तविक:- मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४७५ नूसार, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३९,५३,१७९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार दोन वेळेस मुदतवाढ देवून विहीत वेळेत प्राप्त झालेले तांत्रिक कोटेशन मा.खरेदी समिती दि.२२/१०/२०१८ रोजी पर्यंत पाच टेंडर प्राप्त झाले होते. त्यानूसार सदरहु ०५ ई-निविदांचा तांत्रिक तुलनात्मक तक्ता तयार करुन मा.खरेदी समिती दि.२५/१०/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर चर्चा होवून, त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यामुळे फक्त एकच ई-निविदा पात्र ठरत असल्याने व चार ई-निविदा तांत्रिक दृष्टया अपात्र ठरलेमुळे पुन्हा वृत्पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन फेर ई-निविदा मागविणेत आल्या.

त्यानूसार मागविणेत आलेल्या विहीत वेळेत दि.२७/११/२०१८ पर्यंत फक्त तीन ई-निविदा आल्या. मुदतीत आलेल्या खालीलप्रमाणे ०३ निविदांचे तांत्रिक बीड दि.२९/११/२०१८ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणेत आलेले असून पात्र ई-निविदाधारकांचे प्राईस बीड (दरपत्रक) दि.०७/१२/२०१८ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणेत आलेले आहे. त्यात खालीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहे.

| अं.नं. | कामाचा तपशिल | संख्या तपशिल | श्री साई प्रयाग केटरर्स ॲण्ड सप्लायर्स रु. पै. | यशोधरा महिला औद्योगिक सह. संस्था मर्यादीत रु. पै. | हॉटेल साई लक्ष्मी रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री साई प्रसादालयात (२५ ग्रॅम वजनाच्या पाच पुरी, सुकी भाजी, बर्फी किंवा शिरा अंदाजे वजन २५० ते २७५ ग्रॅम ) अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) पॅकींग करुन देणेकामी प्रति पाकीटास कर (GST) वगळून मजुरी दर रुपये | प्रति ०१ पाकीटास | २.३६ | १.९७ | २.१९ |
| | प्रति पाकीटास कर (GST) वगळून मजुरी दर रक्कम रु. | | २.३६ | १.९७ | २.१९ |

मागणी:- उपरोक्त प्रास्तविक मधील दराचे तुलनात्मक तक्त्यानूसार, श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांचे प्रति अन्नपाकीटास कर (GST) वगळून मजूरी दर रु.१.९७ पैसे असे निम्नतम L1 आलेले आहेत. त्यामुळे वर तक्तयात दर्शविलेप्रमाणे अन्नपाकीटे तयार करणेकामी निम्नतम दरधारक यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा.संस्था, नाशिक यांना मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे बोलावून चर्चा/वाटाघाटी करावी लागणार आहेत.

संस्थान अधिनियम ठराव यानूसार अनुमान/:- आर्थिक

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-तरी प्रास्तविक व मागणी नूसार, श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे तयार करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेसाठी यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांचे दर प्रति अन्न पाकीटास कर (GST) वगळून मजुरी दर रु. १.९७ पैसे इतके निम्नतम आलेले आहेत. त्यामुळे यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांचेबरोबर चर्चा/वाटाघाटी करुन ०१ जानेवारी-२०१९ पासून ते ३१ डिसेंबर-२०१९ अखेर एक वर्ष कालावधीसाठी कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे तयार करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांचे निम्नतम दर प्रति अन्न पाकिटास कर (GST) वगळून मजुरी दर रु. १.९७ मात्र स्विकारणेत येऊन त्यांना ०१ जानेवारी-२०१९ ते ३१ डिसेंबर-२०१९ अखेर एक वर्ष कालावधीसाठी कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ **श्रींचे म्युझियम हॉलमधील बाबांनी हाताळलेल्या वस्तुंचे जतन करणे संदर्भात संवर्धन प्रक्रिया करणेकामी तज्ञांचे शिर्डी भेटीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद – अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

प्रस्तावना– उपरोक्त विषयांकीत छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, मुंबई चे संचालक मा.एस.मुखर्जी व त्यांचे सहकारी श्री.ओमकार कडू यांनी दि.२७/०२/२०१७ रोजी शिर्डी येथे येऊन म्युझियम हॉलची पहाणी करुन अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार श्रींचे म्युझियम हॉलमधील बाबांनी हाताळलेल्या वस्तू जतन करणे संदर्भात संवर्धन प्रक्रीया करणेबाबत इकडील विभागामार्फत सदरहू प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेत विषय क्रं.०५ निणर्य क्रं. ४६२ अन्वये "यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानचे म्युझियम हॉलमध्ये ठेवण्यात आलेल्या, साईबाबांनी वापरलेल्या /हाताळलेल्या वस्तू अनमोल असुन त्यांचे व्यवस्थीत संगोपन करावयाला हवे, असे समितीचे मत झाले. सबब प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, तज्ञांचे अहवालानुसार म्युझियम हॉल अद्ययावत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली."असा निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये तज्ञांचे अहवालानुसार म्युझियम हॉल अद्ययावत करणे असल्याने, श्रींनी हाताळलेले वस्तूंवर तज्ञांमार्फत संवर्धन प्रक्रिया करणे संदर्भात सदरचा विषय संवेदनशील आहे.

विभागाचा अभिप्राय-श्रींनी हाताळलेल्या संग्रहालयातील वस्तूंवर संवर्धन प्रक्रिया करणेसाठी छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्राहालय, मुंबई येथील आलेल्या अधिकारींचे ताब्यात सदरच्या वस्तू न देता त्या संग्रहालयामध्ये अथवा मंदिराचे पहिल्या माळयावर उपलब्ध करुन देता येईल. यावेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने वस्तु संग्रहालयामध्ये आवश्यकता पडल्यास काही भागांमध्ये साईभक्तांना प्रवेश बंद करावा लागेल. तसेच सदरच्या वस्तू मौल्यवान असल्याने मा.व्यवस्थापन समिती सदस्य तसेच संरक्षण अधिकारी, संबंधीत विभागप्रमूख, कॅमेरामॅन (व्हिडिओ शुटींगसह) व इतर संरक्षण पहारेकरींसह उपस्थित रहाणे आवश्यक वाटते. तसेच श्रींचे म्युझियम हॉलमधील बाबांनी हाताळलेल्या वस्तु जतन करणे संदर्भात संवर्धन प्रक्रिया करणेकामीछत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, मुंबई यांचेमार्फत आलेल्या तज्ञ संचालकांची संस्थानमार्फत निवास व भोजन, दर्शन, आरती व्यवस्था तसेच त्यांना मुंबईहून जाणे-येणेची व्यवस्था मोफत करावी लागेल, असे नम्र मत आहे. सदरचा विषय संवेदनशील असलेने सदरच्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच म्युझियम हॉलमधील वस्तुंचे संबंधीत प्रक्रीया करणेचे कालावधीत मा.व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित राहाणे आवश्यक वाटते, असे मत आहे.

**प्रस्ताव** – सदरचे संग्रहालयातील बाबांनी हाताळलेल्या वस्तू जतन करणेकामी त्यावर संवर्धन प्रक्रीया करणेकरीता मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयाचे तज्ञांना शिर्डी येथे बोलविणेस तसेच त्यांची निवास, भोजन, दर्शन, आरती इत्यादी व्यवस्था व मुंबई येथुन घेऊन येणे, कामपुर्ण झालेनंतर मुंबई येथे सोडविणेसाठी वाहन व्यवस्था मोफत (विनामुल्य) करणेस मान्यता असावी. तसेच तज्ञांचा अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करणेसाठी सदरहू विषयांवर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७७४** **सदर विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत राहुरी तालुक्यातील चिचोंली फाटा ते शनिशिंगणापुर रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करणेकामी रु.२४,४६,०५,००८/- खर्चास व सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतुद : अधिनियम २१ (क) पोट कलम (१) नंतर खालीलप्रमाणे तरतुद आहे.

" (१क) पोट कलम (१) च्या तरतूदींना अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तींच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय महामंडळांना शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल."

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

०१. दिनांक ०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७९.

०२. दिनांक १४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४९.

०३. दिनांक ०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९६.

०४. दिनांक ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४७ (२).

प्रस्तावना : शिर्डी ते शिंगणापूर हा एकुण ७७ किलो मिटर लांबीचा रस्ता असून, सदर रस्ता हा शिर्डी-पिंपळवाडी-एकरुखे-गणेशनगर-वाकडी-श्रीरामपूर-बेलापूर–पढेगांव-मालुंजे-भेर्डापूर-पाथरे-मांजरी-पानेगांव-करजगांव-गणेशवाडी-विठ्ठलवाडी-हनुमानवाडी मार्गे शिंगणापूर येथे जात आहे. सदर रस्त्यापैकी पिंपळवाडी ते मालुंजे एकुण २१.५० किलो मिटर रस्त्याचे कामासाठी दि.३१ ऑगस्ट, २००७ ते दि.०३ जुलै, २००९ या कालावधीत संस्थानमार्फत रु.१०.४३ कोटी इतके अनुदान कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांना उपलब्ध करुन देणेत आलेले आहे.

आता, शिर्डी ते शिंगणापूर (वाकडी मार्गे) जाणा-या रस्त्याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१/०६/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.३४७ (२) खालीलप्रमाणे झालेला आहे.

“ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे पिंपळवाडी- एकरुखे- गणेशनगर-वाकडी ते रा.मा.५० पर्यंत रस्ता कि. मी.०/०० ते २५/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१३ कोटी मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहु प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविणेत यावा. असे ठरले.

यावेळी अशीही चर्चा झाली की, अहमदनगर–मनमाड या महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-टाकळीमिया-आरडगाव-केंदळ-ब्राम्हणी हा रस्ता शनि शिंगणापुर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचे सोईचा व नजीकचा आहे. तरी सदर रस्त्याचेही मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.”

त्यानुसार शिर्डी ते शिंगणापूर (वाकडी मार्गे) जाणा-या रस्त्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी दिनांक ११/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला असुन त्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु आहे.

तसेच उपरोक्त निर्णयातील अहमदनगर–मनमाड या महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-टाकळीमिया-आरडगाव-केंदळ-ब्राम्हणी मार्गे शनि शिंगणापुरकडे जाणा-या रस्त्याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/०६/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.४४६ अन्वये अहमदनगर-मनमाड महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-टाकळीमिया-आरडगांव-केंदळ-ब्राम्हणी रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अंदाजपत्रकानुसार रु.२०,००,००,०००/- मात्रचे खर्चास तसेच याकामी शासन मान्यता घेऊन सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सदरहू रस्त्याचे सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे तांत्रीक मान्यतेसह सादर करणेबाबत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांना दि.०१/०८/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. त्यानुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांना अग्रेषित दि. प्राप्त २२/११/२०१८ रोजी इकडील कार्यालयास पत्रान्वये रु.२४,४६,०५,००८/- रकमेचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसाठी सादर केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय:अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नशिक यांचेकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केलेल्या अंदाजपत्रकीय रकमेत मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेल्या रू.२० कोटी इतक्या रकमेपेक्षा रू.४,४६,०५,००८/-इतकी वाढ झाली आहे. सदर रस्त्याचे कामासाठी श्री साईबाबा संस्थान निधी उपलब्ध करून देणार असल्याने दि. २२/११/२०१८ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावाचे प्रतीत नमूद केले आहे.अंदाजपत्रकात वाढ झालेल्या रकमेबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

प्रस्ताव: तरी अहमदनगर-मनमाड महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-टाकळीमिया-आरडगांव-केंदळ-ब्राम्हणी या शनि शिंगणापुरकडे जाणा-या रस्त्यांचे कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/०६/२०१८ रोजीचे सभेत रू.२० कोटी इतका निधी उपलब्ध करून देणेस मान्यता देण्यात आली आहे.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,अहमदनगर यांनी मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम

मंडळ,नाशिक यांचेकडे रू.२४,४६,०५,००८/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला आहे तरी वाढीव अंदाजपत्रकासह निधी उपलब्ध करून देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७७५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर-मनमाड या महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-टाकळीमिया-आरडगाव-केंदळ-ब्राम्हणी या शनि शिंगणापुरला जाणाऱ्या रस्त्यांचे कामासाठी संस्थानमार्फत रक्कम रु.२० कोटी निधी उपलब्ध करुन देणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०६.२०१८ रोजीचे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,नाशिक यांचेकडे सदर कामासाठी रक्कम रु.२४,४६,०५,००८/- मात्र एवढया रकमेचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यामुळे सदरहु कामासाठी वाढीव रक्कम रु.४,४६,०५,००८/- मात्रचे रकमेसह एकुण रक्कम रु. २४,४६,०५,००८/-मात्रचा निधी शासन मान्यतेने संस्थानमार्फत देणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ **आयकर व व्हॅटकर कामकाजाबाबत सद्यस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.**

प्रस्ताव- संस्थानला आयकर विभाग व विक्रीकर विभाग यांच्या कर वसुली बाबत व कर निर्धारणे, फेर कर निर्धारणे बाबत नोटीसा आल्या असुन त्या बाबतची सद्यस्थिती खाली प्रमाणे आहे.

(अ) <u>आयकर (Income Tax)</u> :-

१. दि.३१.१२.२०१७ रोजी मा.उपायुक्त, आयकर, मुंबई यांनी आर्थिक वर्ष २०१४-१५ चे करनिर्धारण करुन रु.१८३,८६,१४,३३०/- देय कर असलेबाबत नोटीस पाठविली होती. यामध्ये साईबाबा संस्थान धार्मीक ट्रस्ट नसुन धर्मादाय ट्रस्ट गृहीत धरुन दक्षिणापेटीमध्ये प्राप्त झालेल्या देणगी रक्कम, आर्थिक वर्ष २००९-१० चे अखर्चित उत्पन्ना संबधीत फार्म नं.१० आनलाईन दाखल करणे व या सर्वांवर दंडव्याज याचा समावेश आहे.

२. सदर नोटीस विरोधात दि.३१.०१.२०१७ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट अर्ज नं.३९५/२०१८ दाखल करण्यात आला होता.

३. दि.०९.०२.२०१८ रोजी रिट अर्जावर सुनावणी होऊन आयकर विभागाने फेर करनिर्धारण करण्यात येऊन आयकर लवादाकडे अपिल दाखल करण्याचा व स्टे करिता आयकर विभागाकडे प्रस्ताव देण्याचा निर्णय दिला.

४. दि.१८.०२.२०१८ रोजी ऑनलाईनद्वारे मा.आयकर आयुक्त (अपिल) यांचेकडे अपिल अर्ज दाखल करण्यात आला आहे. यामध्ये श्री साईबाबा संस्थान धर्मादाय व धार्मीक देवस्थान असले बाबत ट्रस्ट डिड, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,अधिनियम २००४ दाखल केला आहे. आर्थिक वर्ष २००९-१० चे अखर्चित उत्पन्ना संबधीत फार्म नं.१० अपिलात दाखल करण्याची तरतुद आहे. त्याप्रमाणे सखोल अपिल अर्ज दाखल केला आहे. त्यावर आयकर विभागाने अदयाप निर्णय दिलेला नाही.

५. तत्पुर्वी दि.२०.०२.२०१८ रोजी आयकर विभागाने फेर करनिर्धारण करुन रु.१२२,०४,६१,८४०/- व्याजासह देय कर कळविला आहे.

६. दि.२०.०३.२०१८ व दि.२१.०३.२०१८ अखेर अपिल संबंधीत आवश्यक कागदपत्रे दाखल करण्यात आली असून त्यावर अद्याप आयकर विभागाकडून अपिल ऑर्डर झालेली नाही.

७. आर्थिक वर्ष २०१२-१३ चे वार्षिक करविवरणपत्र विहीत वेळेत दाखल करण्यात आले असून आयकर विभागाकडून त्यांचे करनिर्धारणही करण्यात आले आहे. तथापि, दि.०३.०८.२०१८ रोजी मा.उपायुक्त, आयकर विभाग, मुंबई यांनी आर्थिक वर्ष २०१२-१३ चे फेर करनिर्धारणाकरिता आवश्यक कागदपत्रांची मागणी केली.

८. आयकर विभागाने करनिर्धारण वर्ष २०१५-१६ चे अपिल पुर्ण करण्यापुर्वीच मागील वर्षांची फेर करनिर्धारणे करु नयेत करिता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.१६.१०.२०१८ रोजी रिट पिटीशन नं.३२७८ दाखल करण्यात आले. त्यावर दि.२१.१०.२०१८ रोजी सुनावणी होऊन दि.२४.१०.२०१८ रोजी संस्थानचे विरोधात मागील वर्षांची फेर करनिर्धारणे करण्याबाबत आदेश झाला आहे.

९. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे Special Leave Petition (Civil) No.30475/2018 दाखल करण्यात आली होती. त्यावर दि.३०.११.२०१८ रोजी सुनावणी होऊन सदर SLP मध्ये कोर्टाने "Issue Notice" चे आदेश दिले आहेत व मागील वर्षांची फेर करनिर्धारणे करण्यास स्थगिती आदेश (Stay Order) दिला आहे, त्याची प्रत सोबत परिशिष्ठ "अ " जोडली आहे.

**(ब) मुल्यवर्धीत कर (VAT) :-**

१. मुंबई विक्रीकर कायदा १९५९ अंतर्गत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी डिलर नसले बाबत महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण (IIIrd Bench of Maharashtra Sales Tax Tribunal Bombay) यांनी दि.२०.०३.१९९० रोजी निर्णय दिला आहे.त्यास अनुसरुन संस्थानला विक्रीकर लागु नव्हता.

२. विक्रीकर कायद्याचे रुपांतर मुल्यवर्धीत कर कायदा २००२ (VAT Act 2002) मध्ये झाले. व सन २००५ पासुन कार्यवाही सुरु झाली. विक्रीकर कायद्याप्रमाणे MVAT कायद्यात संस्थानला सुट मिळणे बाबत मा.आयुक्त विक्रीकर विभागाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यांनी संस्थान "Deemed Dealer" असले बाबत दि.१८.०३.२००९ रोजी आदेश केला. सदर आदेशाविरुद्ध (IIIrd Bench of Maharashtra Sales Tax Tribunal Bombay) मध्ये दि.२०.०४.२००९ रोजी अपिल दाखल करण्यात आले. सदर न्यायाधिकरणात २००९ पासुन ते २०१८ पर्यंत कोणताही निर्णय झाला नाही.

३. तत्पुर्वी विक्रीकर कार्यालय, अहमदनगर यांनी आर्थिक वर्ष २००९-१० चे व्हॅट कर निर्धारण करुन एकुण रु.२४,२६,२४,४२४/- व्हॅट कळविला आहे. यामध्ये प्रसादालय जमा, पुस्तक फोटो डायरी कॅलेंडर विक्री, रुग्णालय बील रक्कम, साई प्रतिमा असलेली सोने चांदी नाणी मिळकत रक्कम इत्यादी संस्थानला देणगी वजा जाता मिळणाऱ्या सर्व मिळकतीवर व्हॅटकर आकारणीचा समावेश आहे. सर्व सदर बाब न्यायाधिकरणात (Tribunal) न्यायप्रविष्ठ असल्याने कर निर्धारण करु नये असा पत्रव्यवहार त्यांचेशी करण्यात आला होता.

४. दि.०७.०९.२०१८ रोजी मा.आयुक्तांनी कळविल्या प्रमाणे संस्थान "Deemed Dealer" असले बाबत निर्णय विक्रीकर न्यायाधिकरण मुंबई यांनी दिला आहे.

५. विक्रीकर न्यायाधिकरणाच्या संस्थान डिलर असले बाबत निर्णयाविरुद्ध मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे अपिल अर्ज दाखल करण्यात आला असुन त्यावर दि.२१.११.२०१८ रोजी सुनावणी होऊन मा.उच्च न्यायालयाने अपिल अर्ज दाखल करुन घेतला आहे.

६. तथापि विक्रीकर विभागाकडुन दि.०४.१२.२०१८ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे. त्यामध्ये १० दिवसांचे आत आर्थिक वर्ष २००९-१० चा व्हॅटकर एकुण रु.२२,८३,३८,७४५/- भरणे बाबत कळविले आहे.

७. सदर बाबत मा.उपायुक्त विक्रीकर विभाग यांचेकडे अपिल करणे बाबत बाब विचाराधिन आहे.

(क) आयकर व मुल्यवर्धीत करविषयक कामकाज मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांचे समन्वयाने करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय संमत झाला आहे. त्यांचे समन्वयाने खालील प्रमाणे कामकाज चालु आहे :-

१. मा.उच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल करणे बाबत कामकाज मे.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचेमार्फत केले जात आहे. त्यांना कोणताही फि अद्याप ठरलेली नाही.

२. मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय येथे संस्थानची बाजू मांडण्याचे अत्यंत महत्वाचे कामकाज वरिष्ठ विधिज्ञ ॲड.एस. गणेश, दिल्ली करत आहेत. त्यांना कोणताही फि अद्याप ठरलेली नाही.

३. ॲड.पी.सी.जोशी, मुंबई यांनी मा.आयुक्त,विक्रीकर विभाग,मुंबई यांचेकडे अपिल व विक्रीकर न्यायाधिकरण येथे संस्थानचे वतिने बाजू मांडण्याचे काम केले आहे. त्यांचे मार्फत आवश्यक माहिती संकलीत करणे, ॲड.एस. गणेश, दिल्ली यांना बाजू मांडण्याकरीता मा.उच्च न्यायालयात हजर रहाणे, सहकार्य करणे, कामकाज करता त्यांनी त्यांचे फीचे बील रु. १,२५,०००/- सादर केले आहे.

४. मा.सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल करण्याकरिता ॲड. मेहुल गुप्ता, दिल्ली यांचे मार्फत कामकाज केले जात आहे. या कोर्ट कामकाजा करीता होणारा प्रत्यक्ष खर्च सोडुन त्यांची होणारी प्रोफेशनल फी ते घेणार नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

५. मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय येथे आयकर, व्हॅट, इ. बाबत रिट अर्ज, एसएलपी दाखल करणे यासाठी आवश्यक कागदपत्रांची जमवाजमव करणे, कोर्टात सादर करणे, न्यायालया संबधीत संपुर्ण कामकाजाचा समन्वय करुन पुर्तता करणे इ. कामकाज मा. विश्वस्त श्री मोहन जयकर व त्यांचे मे.जयकर ॲण्ड जयकर पार्टनर्स, मुंबई यांची टीम करत आहे. यासाठी लागणारा प्रत्यक्ष खर्च सोडुन त्यांची होणारी प्रोफेशनल फी ते घेणार नसल्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

६. आयकर विषयक अनुषंगीक माहिती संकलीत करणे, तयार करणे, दाखल करणे, आयकर कार्यालय, मा.उच्च न्यायालय, मा. सर्वोच्च न्यायालय, सर्व विधीज्ञ, वकील यांना माहीती उपलब्ध करुन देण्याचे कामकाज संस्थानचे पुर्वीपासूनचे आयकर सल्लागार सीए श्री.राहुल केळकर, मुंबई, व त्यांचे वरिष्ठ अनुभवी सीए श्री दिपक टिकेकर, मुंबई हे काम पाहत आहेत. सीए श्री दिपक टिकेकर यांनी फीचे बील रु.१२,२७,२००/- सादर केले आहे.

अशा प्रकारे आयकर व मुल्यवर्धीत कर विषयक सद्यस्थिती अवलोकनार्थ मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.७७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर व व्हॅटकर कामकाजाबाबतचे सद्यस्थितीचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच सदर प्रकरणी समिती सदस्य मा.डॉ.राजेंद्र सिंह यांचे देखील मागदर्शन घेण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग )**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **दक्षिणा पेटीतील रक्कमेच्या मोजणीत श्री साईभक्तांच्या सहभागाबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर व मंदिर परिसरात असलेल्या दक्षिणा पेटीतील रक्कमेची मोजणी आठवडयातून साधारणत: दोन वेळेस करण्यात येत असते. भक्तांच्या वाढत्या गर्दीबरोबरच दक्षिणा पेटीमध्ये प्राप्त होणा-या रक्कमेतही दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. मा. धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधीसोबत सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी यांचे प्रतिनिधी व संस्थानचे अधिकारी/कर्मचारी यांचे समवेत पेटया उघडून मोजणी केली जाते. पूर्वी दक्षिणा पेटी रक्कम मोजणीसाठी संस्थान कर्मचा-यांचाच सहभाग असे. दक्षिणा पेटीतील रक्कम मोठया प्रमाणात असली तर संस्थान कर्मचारी व बँकेचे कर्मचारी यांना ही मोजणी करतांना बराच वेळ लागत असे.

त्याअनुषंगाने दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे कामकाज वेळेवर पुर्ण व्हावे, व कामामध्ये जास्तीत-जास्त पारदर्शकता यावी म्हणून तत्कालीन मा. अध्यक्ष महोदय, यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे, दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीमध्ये भक्तांना सहभाग घेण्यास सुरुवात झालेली आहे. संस्थानचे सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली उत्सुक असणा-या भक्तांना दक्षिणा पेटीतील रक्कमेच्या मोजणीमध्ये सहभागी करुन घेतले जात आहे. सदर साईभक्तांना रक्कम मोजणीसाठी बसविण्यापूर्वी त्यांच्याकडील रोख रक्कम, पर्स, पाकीट इ. वस्तु सुरक्षा गार्डकडे जमा करण्यास सांगण्यात येते. या वस्तु भक्तांना स्वतंत्रपणे देण्यात आलेल्या पिशवीमध्ये जमा केल्यानंतर त्यांच्या वस्तुची पोहोच म्हणून नंबर असलेले टोकन देण्यात येते. सदर भक्तांना रुपये १००/- मात्रच्या आतील मुल्यांच्या नोटा दक्षिणा पेटी हॉलमधून आणून सदर नोटा फक्त जुळविणे कामी देण्यात येतात. याकामी भक्तांवर देखरेख करणेसाठी सुरक्षा रक्षक असल्याने, तसेच सी.सी.टी.व्ही.(CCTV) कॅमेरे असल्याने कोणताही गैरप्रकार होण्याचे प्रसंग साधारणपणे होणार नाहीत, याची दक्षता घेण्यात येते.

तथापि, दिनांक११.१२.२०१८ रोजी दक्षिणापेटी मोजणीचे ठिकाणी एक साईभक्त महिला रक्कम रुपये ७४,६२०/- मात्र घेऊन जात असतांना तपासाअंती उघड झालेले आहे. याबाबत शिर्डी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार (FIR) दाखल केलेली आहे.

तसेच दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे कामकाजात दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्यानुसार सदर कामकाजात सहभागी होणा-या भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे आणि प्रत्येक वेळेस सहभागी होणारे साईभक्त हे नवनवीन असतात. तसेच सदर कामकाजात सहभागी होणा-या साईभक्तांसाठी ठराविक गणवेश ठरलेला नाही. त्यामुळे सुरक्षा रक्षकांकडून सखोल तपासणी करणेत अडचणी येतात. त्यामुळे सहभागी झालेल्या साईभक्तांकडून भविष्यात काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ज्या साईभक्तांना श्री साईबाबांची सेवा करण्याची इच्छा असेल त्यांना इतर विभात ज्या ठिकाणी आर्थिक बाबींचा संबंध नाही अशा ठिकाणी सेवा करण्याची संधी देता येईल.

त्या अनुषंगाने, येथून पुढे दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे कामकाजात श्री साईभक्तांचा सहभाग बंद करुन, त्याऐवजी संस्थानमधील कंत्राटी कर्मचा-यांना सहभागी करुन घेता येईल. त्यांना कायम कर्मचा-याप्रमाणे

मेहनताना व गणवेश देऊन दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे काम करुन घेता येईल. तसेच जर कंत्राटी कर्मचा-याकडून आर्थिक बाबींसंबंधी काही अनुचीत प्रकार घडला तर सदर कंत्राटी कर्मचा-याविरुध्द कार्यालयीन कार्यवाही करुन त्यास कामावरुन कमी करता येईल.

तरी दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे कामात सध्या घेण्यात येत असलेला साईभक्तांचा सहभाग यापुढेही कायम ठेवावा, किंवा त्याऐवजी संस्थानमधील कंत्राटी कर्मचा-यांना कायम कर्मचा-यांप्रमाणे मेहनताना व गणवेश देऊन, सहभागी करुन घेऊन, त्यांचे कडून सदर कामकाज करुन घ्यावे किंवा कसे? याबाबतचा निर्णय होणेस मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर

**निर्णय क्र.७७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे कामात सध्या घेण्यात येत असलेला साईभक्तांचा सहभाग बंद करण्यात यावा. त्याऐवजी संस्थानमधील कंत्राटी कर्मचा-यांना कायम कर्मचा-यांप्रमाणे मेहनताना व गणवेश तसेच चहा /नाष्टा देऊन त्यांना दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे कामी सहभागी करुन घेण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **माहे जुन २०१८ जमा – खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे जून-२०१८ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा- खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.नं. | महिना | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | जून - २०१८ | ४७,०८,१३,०४१/- | ३९,०९,५३,७०२/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे जून-२०१८ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.७७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जुन २०१८ जमा – खर्च तक्त्याचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **माहे जुलै २०१८ जमा – खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

तृया अनुषंगाने माहे जुलै-२०१८ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा- खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.नं. | महिना | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | जुलै - २०१८ | ४०,७२,५४,६६९/- | २३,८१,९६,४४१/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे जुलै-२०१८ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.७७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जुलै २०१८ जमा– खर्च तक्त्याचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, शिर्डी, भाग शिर्डी यांना कायमस्वरुपी एक वाहन उपलब्ध करुन देणेच्या प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथील उपविभागीय अधिकारी यांनी मा. मुख्यकार्यकारी अधिकारी यांना पत्र पाठवून खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे. सदर पत्राचा तपशील खालीलप्रमाणे

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी शिर्डी कार्यालयाची स्थापना १५.०८.२०१३ रोजी झाली असून शिर्डी ता. राहाता गावाचा समावेश उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांच्या कार्यक्षेत्रात येत होता १५ ऑगस्ट २०१३ पासून शिर्डी हे गाव या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात समाविष्ट झालेले आहे. या कार्यालयाची स्थापना होण्यापूर्वी संस्थान मार्फत उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांना संस्थानने पत्र क्र. ११३३७/ ३ नोव्हेंबर २००४ मध्ये १ (एक) स्कार्पीओ वाहन उपलब्ध करून दिलेले आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १ | चेसी नं. | MATA23FC42K83230 |
| २ | इंजिन नं. | BF44 K 86782 |
| ३ | रंग | सिल्वर |
| ४ | वाहनाचा प्रकार | स्कार्पीओ डिलक्स |

अशा तपशीलाचे वाहन संस्थान मार्फत उपलब्ध करून देण्यात आले होते. सदर वाहनाची नोंदणी संस्थानचे सूचनेप्रमाणे उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांचे नावाने उपप्रादेशिक अधिकारी श्रीरामपूर यांनी केली असून त्याचा वाहन नोंदणी क्रमांक MH17K-2121

सदर पत्रात त्यांनी या कार्यालयाचे उपलब्ध वाहन जुने झाले असुन त्यामध्ये वारंवार बिघाड होत असतो. म्हणून कर्तव्य बजावणीमध्ये अडचणी निर्माण होत आहेत. भविष्यात असलेले श्री साईबाबा शताब्दी महोत्सव व त्यानिमित्ताने येणा-या अतिमहत्वाच्या व्यक्तींचा राजशिष्टाचार, कायदा व सुव्यवस्था तसेच आपत्ती व्यवस्थापन इत्यादी जबाबदा-या उपविभागीय दंडाधिकारी यांना पार पाडाव्या लागणार आहे. उपलब्ध असलेले शासकीय वाहन वरील कारणांमुळे नियमित पणे वापरता येत नाही म्हणून श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त अतिमहत्वाच्या व्यक्तींचा राजशिष्टाचार व्यवस्था, कायदा सुव्यवस्था व आपत्ती व्यवस्थापन अंमलबजावणी इत्यादी महत्वपुर्ण जबाबदा-या पार पाडणेसाठी आपले संस्थान मार्फत उपविभागीय कार्यालयासाठी एक नविन शासकीय वाहन उपलब्ध करून मिळणेबाबत विनंती केली आहे.

अर्थसहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील २१(२) मधील तरतुद खालीलप्रमाणे:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

अधिनियम कलम २१ चे पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा क्रिडा अकादमी वा संस्था सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निरीश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणे आवश्यक आहे.

विभागाचा अभिप्राय:-वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासकीय वाहनांचे किंमत मर्यादा धोरणाचा शासन निर्णय क्रमांक: वाहन -२०१६/प्र.क्र.५१/१६/विनिमय तारीख २१ जानेवारी २०१७ अन्वये

राज्यस्तरीय वाहन आढावा समितीच्या मान्यतेने वाहन अनुज्ञेय केलेले इतर अधिकारी यांना रु. ६.०० लक्ष (Accessories) मर्यादेपर्यंतच्या किंमतीचे वाहन अनुज्ञेय आहे.

प्रस्ताव:- उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांना त्यांचे प्रस्तावानुसार वित्त विभागाचा शासन निर्णय क्रं. वाहन -२०१६/प्र.क्र.५१/१६/विनिमय तारीख २१ जानेवारी २०१७ नुसार अनुज्ञेय मर्यादा रु. ६.०० लक्ष पर्यंत वाहन घेण्यासाठी अर्थसहाय्य देणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८०** **उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** **(कार्यवाही -लेखाशाखा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, औसा, लातुर यांना इंग्लिश मिडीअम स्कुलची इमारत बांधण्यासाठी अर्थसहाय्य मागणी बाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय प्रसारक मंडळ औसा, लातूर या संस्थेचे/विश्वस्तव्यवस्थेचे सचिव यांनी शाळा बांधकामासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावात त्यांनी संस्थेची माहिती सादर केली आहे.

श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय प्रसारक मंडळ औसा, लातूर या विश्वस्तव्यवस्थेकडून केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड (CBSE) सलग्न इंग्लीश मिडीयम स्कूल महात्मा गांधी या नावाने चालविण्यात येते. या शाळेची स्थापना १९ जुन २००९ मध्ये झाली असून शाळेत ज्यु के. जी. ते १० वी पर्यंत उजनी आणि शेजारील ४० गावातील ५५० मुले शिक्षण घेत आहे. १९९३ च्या भुकंपामध्ये लातुर जिल्हयातील हजारो लोक मृत्युमुखी पडले. तसेच शेकडो गावक-यांची वाताहत झाली. उजनी ही किल्लारीपासून ३० किमी आंतरावर आहे. आपत्तीनंतर श्रीमंत कुटुंब शेजारच्या शहराकडे स्थलांतरीत झाली.

या परिसरातील बहुतांशी लोक शेती व मजूरी करणारे असून आर्थिक विवंचनेत आहे. वारंवार येणा-या दुष्काळामुळे ही परिस्थीती गंभीर झाली आहे. दळणवळणाच्या व आर्थिक समस्येमुळे या भागातील मुले दर्जेदार व गुणवत्ता पुर्ण शिक्षणापासून वंचित राहिले आहे.

या मुलांचे भवितव्य उज्वल होण्यासाठी आम्ही पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरविली आहे. आता आम्ही शाळेचा तळमजला बांधला आहे. परंतु दोन मजली इमारत बांधण्यासाठी आंम्हाला रक्कम रु. ४ कोटीची आवश्यकता आहे. परंतु एवढी मोठी रक्कम संस्था उभारू शकत नाही.

तरी हे काम पुर्ण करण्यासाठी आपल्या कडून मदत मिळण्यासाठी विनंती करण्यात येत आहे. आम्ही आशा करतो की, तुम्ही आमची मागणी पूर्ण कराल, असे त्यांचे पत्रात नमूद केले आहे.

अर्थसहाय्य करणेबाब संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे.

अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

विभागाचा अभिप्राय :-

१) श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय प्रसारक मंडळ औसा, लातूर यांनी केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड (CBSE) चे सलग्न असलेली इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली आहे.

२) संस्थेने सदरच्या शाळेत किल्लारीजवळील भुकंपग्रस्त भागातील मुलांना दर्जेदार व गुणवत्ता पुर्ण इंग्रजी माध्यमाचे शिक्षणाची सोय केली असल्याचे प्रस्तावात नमूद केले आहे.

३) सदर प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीने मान्यता दिल्यास छाननी समितीने निश्चित केलेल्या निकषांची पुर्तता करून छाननी समितीचे शिफारसीने व शासनाचे मान्यतेने अनुदान देणेबाबत निर्णय घेता येईल.

प्रस्ताव:- श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, औसा, लातूर यांना इंग्लीश मिडीयम स्कूलची इमारत बांधण्यासाठी अर्थसहाय्य मागणीबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८१** **श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, औसा, लातुर या संस्थेचे प्रतिनिधी श्री. किशोर रंगलालजी जाजु व श्री. पवनकुमार शंकरराव जंगमे हे आजचे सभेत उपस्थित होते. त्यांनी सभेसमोर संस्थेची माहिती व इमारतीचे बांधकामाबाबतचा तपशिल व त्यासाठी अनुदान मागणीचा सविस्तर प्रस्ताव सादर केला.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर संस्थेने आजचे सभेत दाखल केलेल्या प्रस्तावाची अनुदान नियमावलीच्या अनुषंगाने छाननी करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा, असे ठरले.** **(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.१२** **साई आश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग इ. मेन्टनन्स / स्वच्छता कामाबाबत बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११६ अन्वये संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्स/स्वच्छता काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटस लि पुणे यांना दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्ष कालावधीकरीता कार्यादेश देण्यात आला होता. परंतू सदर ठेकेदार यांनी कार्यादेशातील अटी शर्तीनुसार काम करत नसल्याने, त्यांना वारंवार कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या होत्या. परंतू त्यांनी सदर बाब गांभिर्याने न घेतल्याने, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.६३६ अन्वये एम पी एन्टरप्रायजेस ॲण्ड असो.लि पुणे यांचा तीनही विभागाकडील आऊटसोर्स कामाचा ठेका रद्द करुन, त्यांची कामाची हमी म्हणून संस्थान खाती जमा असलेली ५% सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन त्यांचे नाव काळ्या यादीत समावेश करण्यात यावा. तसेच तीनही विभागाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्स/स्वच्छता काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी तातडीने विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणे यावी. तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो संस्थानचे इतर विभागात कार्यरत असलेल्या ठेकेदाराकडून दरपत्रके मागवून निम्नतम दरधारकाकडून कामे करुन घ्यावे असे ठरले होते.

त्यानुसार ई-निविदेत सादर केलेले दर व ठेकेदारांनी यांनी ई-मेल व पत्राव्दारे दिलेल्या दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

कंत्राटदारांनी ई-निविदेमध्ये सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| कंत्राटदाराचे नाव | **व्दारावती** | ई-निविदेतील निम्नतम दर स्थिती | **साईआश्रम १** | ई-निविदेतील निम्नतम दर स्थिती | **साई धर्मशाळा** | ई-निविदेतील निम्नतम दर स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| एम पी एन्टरप्रायजेस ॲण्ड असो.लि पुणे | प्रति माह – रु.८,७७,४४२/- १८% GST सह रु.१०,३५,३८१/- | L - 1 | प्रति माह – रु.६०,६२,३५७/- १८% GST सह रु.७१,५३,५८१.२६/- | L - 1 | प्रति माह – रु.२४,९८,२५७/- १८% GST सह रु.२९,४७,९४३.२६/- | L - 1 |
| बी व्ही जी इं.लि.पुणे | प्रति माह - रु.११,३१,४०४/- १८% GST सह रु.१३,३५,०५७/- | L – 3 | प्रति माह – रु.७७,५२,२११/- १८% GST सह रु.९१,४७,६०८.९८/- | L - 2 | प्रति माह – रु.३३,८४,००२.७५/- १८% GST सह रु.३९,९३,१२३.२४/- | L - 2 |
| स्पिक-एन-स्पॅन सर्व्हिसेस, पुणे | प्रति माह - रु.१०,३७,५६३/- १८% GST सह रु.१२,२४,३२४/- | L – 2 | --- | --- | --- | --- |
| बक्षी सिक्युरिटी सर्व्हिसेस, पुणे | --- | --- | प्रति माह – रु.८४,०४,३५०/- १८% GST सह रु.९९,१७,१३३/- | L - 3 | प्रति माह – रु.३५,९५,८३८/- १८ % जी एस टी सह रु.४२,४३,०८९/- | L - 3 |

कंत्राटदारांनी दि.१२/१०/२०१८ रोजी सादर केलेले सुधारित दर खालीलप्रमाणे आहे.

| कंत्राटदाराचे नाव | व्दारावती | शेरा | साईआश्रम १ | शेरा | साई धर्मशाळा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| बी व्ही जी इं.लि.पुणे | प्रति माह – रु.११,५३,२२७/- १८% GST सह रु.१३,६०,८०८/- | L –2 | प्रति माह –रु.८०,९३,०६८/- १८% GST सह रु.९५,४९,८२०/- | L –1 | प्रति माह – रु.३४,७१,१७०/- १८% GST सह रु.४०,९५,९८१/- | L –1 |
| स्पिक-एन-स्पॅन सर्व्हिसेस, पुणे | प्रति माह – रु.१०,६५,०००/- १८% GST सह रु.१२,५६,७००/-(एक वर्षासाठी) | L –1 | प्रति माह –रु.९३,८९,२००/- १८% GST सह रु.१,१०,७९,२५६/-(एक वर्षासाठी) | L –2 | प्रति माह – रु.३७,१५,०००/- १८% GST सह रु.४३,८३,७००/- | L –2 |
| बक्षी सिक्युरिटी सर्व्हिसेस, पुणे | निरंक | | निरंक | | निरंक | |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.६३६ अन्वये संस्थानचे इतर विभागात कार्यरत असलेल्या ठेकेदारांकडून दरपत्रके मागविणेत यावी असे ठरले होते त्यानुसार उपरोक्त ठेकेदारांना दुरध्वनीव्दारे संपर्क साधून तीन महिने अथवा नवीन ठेकेदार निश्चित होईपावेतो दर देणेबाबत कळविणेत आले होते त्यानुसार साईआश्रम १ व साईधर्मशाळा याकरीता बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांनी दिलेले दर निम्नतम आहेत. तसेच व्दारावती भक्तनिवाससाठी स्पिक-एन-स्पॅन सर्व्हिसेस, पुणे यांचे दर निम्नतम आहेत. परंतू सदरचे त्यांचे दर हे एक वर्ष कालावधीसाठी असल्याने, त्यांना दुरध्वनीव्दारे विचारणा केली असता, सदर कामाचा कालावधी कमी असल्याने त्यासाठी लागणारी मशिनरी खरेदी करणे शक्य होणार नाही त्यामुळे आमचे दरपत्रकानुसार एक वर्षाचे कालावधीसाठी दर ग्राहय धरण्यात येऊ नये, असे सांगितलेले आहे. त्यानुसार -

**अ)** उपरोक्त तक्त्याचा विचार करता व स्पिक-एन-स्पॅन सर्व्हिसेस, पुणे यांनी सदरचे कामास असमर्थता दर्शविल्याने साईभक्तांची निवासाची गैरसोय होऊ नये याकरीता साईआश्रम-१, व्दारावती भक्तनिवास व साईधर्मशाळा या तीनही विभागाकडील हाऊसकिपींग स्वच्छता/मेन्टनेन्स इ. कामे बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांना दि.०१/१०/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ अखरे तीन महिने कालावधीकरीता अथवा निविदा प्रक्रिया राबवून नविन ठेकेदाराची निश्चिती होईपावेतो (यापैकी जे अगोदर घडेल ते) या कालावधीसाठी खालील अटी व शर्तीस अधिन राहून कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**अटी व शर्ती**

१) सदरचे काम **दि.१५/१०/२०१८** पासून सुरु करावयाचे आहे. दि.०१/०८/२०१८ ते दि.१४/१०/२०१८ या कालावधीत कंपनीने प्रत्यक्ष काम केले नाही त्या कर्मचा-यांचे थकीत वेतन किमान वेतन दरानुसार येणारी रक्कम, भविष्य निर्वाह निधीचा हिस्सा, सर्व्हिस चार्जसह आपणास अदा करणेत येईल. दि.१५/१०/२०१८ पासून आपले दरपत्रकानुसार सर्व समावेशक कामासाठी रक्कम अदा करणेत येईल.

२) कामाचा कालावधी **दि.१५/१०/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ अखेर** या कालावधीसाठी राहील.

३) नविन कंत्राटदाराची निश्चिती होईपावेतो अथवा नविन कंत्राटदाराने काम सुरु करेपर्यंत आहे त्याच मंजूर दरात किंवा ०३ महिने पावेतो काम करुन देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

४) माहे ऑगस्ट २०१८ व सप्टेबर २०१८ या कालावधीतील कामगारांचे वेतन, भविष्य निर्वाह निधीची रक्कम संबंधीत कर्मचा-यांचे नावे कंत्राटदाराने जमा करावी.

५) साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी कामाची आवश्यकता बघता विभागातील प्रशासकीय इमारत, रुम बुकिंग काऊंटर व पार्किंग परिसर, विद्युत, प्लंबिंग इ. मेन्टनन्स् कामासाठी नमुद केलेले मनुष्यबळ, हाऊसकिपींग स्वच्छतेकामी लागणारे केमिकल्स नामांकित कंपनीचे वापरणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

६) कंत्राटदार कडुन स्वच्छतेसाठी व मेन्टेनन्ससाठी वापरात येणार असलेले केमिकल, साहित्य तपासणीचा अधिकार विभाग प्रमुख/अधिक्षक यांना राहील. तसेच दरमहा स्वच्छता कामी आवक झालेले, वापरलेले केमिकल्स् यादी परिमाणासह दरमहाच्या बीला बरोबर साईआश्रम भक्तनिवासच्या कार्यालयीन माहितीसाठी सादर करावी लागेल. त्यानंतरच बील अदा करणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

७) या कामासाठी लावणेत येणा-या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ अतर्गत शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेट झोन नं.३ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्राव्हीडंड फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी.

८) हाऊसकिपींग व मेन्टेनन्स कामासाठी सर्व अटी / शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. वेळ प्रसंगी काही कामे जादा करावी लागल्यास त्याचा अतिरिक्त मोबदला मागता येणार नाही /दिला जाणार नाही.

९) दरमहा ५३६ मनुष्यबळापैकी ज्या महिन्यात ज्या पदाचे मनुष्यबळ कमी लावण्यात येतील त्या पदाचे चालू किमान वेतन दरानुसार होणा-या रकमेची मुळ बीलातून वजावट करुन बील सादर करावे.

१०) कामगार कायद्यानुसार कामाच्या कालावधीमध्ये ठेकेदार स्वत:च्या खर्चाने कामगार पुरविणार असल्याने, त्यांना कामावर घेतांना संस्थानच्या आस्थापनेशी मालक व नोकर असा संबंध प्रस्थापित राहणार नाही.

११) ज्या कालावधीमध्ये गर्दीचे प्रमाण कमी असेल त्यावेळी त्या प्रमाणात व काही कारणास्तव इमारतीचा वापर बंद करण्यात येईल. त्यासाठी इमारतीमधील स्वच्छता कामगार व्यतिरिक्त इतर मनुष्यबळ लावण्यात येऊ नये. त्या कालावधीत जेवढे मनुष्यबळ कमी लावले जातील त्याचे बील ज्या-त्या महिन्याला जे दर राहील त्या किमान वेतन दरानुसार होणारी रक्कम कमी करुन बील सादर करण्यात यावे.

१२) कार्यादेशात नमुद केलेले कर्मचारी मनुष्यबळ संखेव्यतिरिक्त संस्थानला आवश्यकतेनुसार गर्दीचे व उत्सव काळात वेळोवेळी जादा कर्मचारी संख्या पुरवावी लागेल. सदर जादा कर्मचा-यांचे वेतन किमान वेतन दराप्रमाणे आपणास अदा करावे लागेल. जादा लावणेत आलेल्या कर्मचा-यांचे बील स्वतंत्र सादर करणेत यावे.

१३) नैसर्गिक आपत्तीमध्ये उदा.पुर,वादळ, भुकंप, आग लागणे किंवा संप इ. परिस्थितीत कंत्राटदार यांनी शक्य होईल तेवढी जास्तीत जास्त सेवा पुरविली पाहीजे. आपत्तीचा काळ १५ दिवस किंवा त्यापेक्षा कमी असेल तर आपत्तीच्या काळातील दरमहा ठरलेले वेतन ग्राह्य धरले जाईल. जर आपत्तीचा काळ १५ दिवसापेक्षा जास्त असेल तर पुरविलेल्या सेवेबद्दल संस्थान व कंत्राटदार यांचे सहमतीने विशेष मानधन मान्य केले जाईल.

१४) कंत्राटदाराने हाऊसकिपींग कामासाठी फक्त मुळ रक्कम नमूद केली असून. शासन नियमाप्रमाणे वेळोवेळी लागू होणा-या दरानुसार जी.एस.टी.ची रक्कम संस्थानमार्फत देण्यात येईल. सदरची जी.एस.टी.ची रक्कम विहीत मुदतीत शासन खजिन्यामध्ये भरणा करणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच शासनाकडे जी.एस.टी. भरणा केलेबाबतची चलन व बील निहाय गोषवारा दरमहा बीलासोबत संस्थानकडे सादर करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

१५) पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट मधील तरतुदीनुसार पुरविण्यात येणा-या कर्मचा-यांचे नियमित पेमेंट वाटप महिना पुर्ण झालेनंतर पुढील महिन्याचे १० तारखेचे आत विहीत मुदतीत करण्याची कायदेशीर जबाबदारी कंत्राटदारावर राहील. महिना पुर्ण झालेनंतर पुढील महिन्याचे १० तारखेचे आत वेतन वाटप करावे. तसेच कर्मचा-यांचे पेमेंट त्यांचे बॅंक खातेवर वर्ग करुन त्याची एक प्रत संस्थानचे विभागप्रमुख/ अधिक्षक यांचेकडे सादर करुन, संस्थानचे विभागप्रमुख/ अधिक्षक यांचेकडून तपासून त्याप्रमाणे शेरा घेवून, बीलाबरोबर एक प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

१६) कामावर नियुक्त केलेल्या सर्व कामगारांची सर्व प्रकारची देणे व त्यांचा नोकरी हक्क व इतर बांधिलकी ही सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१७) साईभक्तांची खोलीमधून चोरी झाल्यास चोरीचे ठिकाणी कंत्राटदाराचे कामावर असलेल्या कामगारावर जबाबदारी निश्चित करुन सदर कामगार सकृत दर्शनी दोषी अढळल्यास त्यास कामावरुन कमी करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

१८) कंत्राटदारामार्फत सदर कामासाठी नियुक्त करणेत येणारे कामगारांनी साईभक्तांशी, नागरीकांशी, संस्थान कर्मचारी / अधिकारी यांचेशी गैरवर्तन करणार नाही याची काळजी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे.

१९) कामगार व साईभक्त यांचे समवेत काही वाद विवाद उपस्थित झालेस, त्याचे निरसन करणेची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२०) माहे ऑगस्ट २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत हाऊसकिपींग कुशल, अकुशल आऊटसोर्स कामगारांना मिळणा-या वेतनाचे रक्कमेवर ८.३३ % याप्रमाणे सानुग्रह अनुदान रक्कम कामगारांना दिपावली सणाचे ०७ दिवस अगोदर अदा करणेत यावे.

२१) खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे इमारतीतील कोणत्याही प्रकारची स्वच्छता गुणवत्तेनुसार झाली नाही तर पार्टी नं.१ पुर्ण अधिकाराने रकान्यात नमूद केल्याप्रमाणे दंडाची रक्कम पार्टी नं.२ यांचेकडून वसूल करण्यात येईल.

| अ.नं | कामाची पध्दती | अ.नं | स्वच्छतेबाबत कामाचे नियोजन |
|---|---|---|---|
| १ | दैनिक स्वच्छता | १ | मुख्य गेट, रस्ते व परिसर स्वच्छता करुन कचरा उचलणे. |
| | | २ | पार्किंग स्थळ स्वच्छता करुन कचरा उचलणे. |
| | | ३ | सर्व जीने ओल्या आणि सुक्या कपडयाने पुसून स्वच्छता करणे. |
| | | ४ | सार्वजनिक शौचालय व स्नानगृह स्वच्छता करुन कचरा उचलणे. |
| | | ५ | सर्व कार्यालय स्वच्छ करुन कचरा उचलणे. |
| | | ६ | रुम, रुममधील शौचालय व स्नानगृह स्वच्छता करुन कचरा उचलणे. |
| | | ७ | खुले सभागृह व त्यामधील शौचालय व स्नानगृह स्वच्छता करुन कचरा उचलणे. |
| | | ८ | गॅलरी व इमारतीमधील पॅसेज कपडयाने झटकून, पुसून स्वच्छ करणे आणि कचरा उचलणे. |
| | | ९ | स्टोअर रुम व त्या अनुषंगाने लागणारी जागा स्वच्छ करणे आणि कचरा उचलणे. |
| | | १० | विद्युत,प्लंबिंग,गंवडी, रंगकाम व सुतारी मेन्टनन्स् ची कामे वेळेत करणे. |
| | | ११ | इमारतीतील सर्व काचेच्या खिडक्या, पार्टेशन तसेच प्रदर्शनीय काचेच्या भागावरील तेलकट किंवा हाताचे डाग साफ करणे. |
| | | १२ | रुममधील प्लॅस्टिक बादली,मग,डस्टबीन,जग व स्टील ग्लास साफ करणे |
| २ | साप्ताहिक स्वच्छता | १ | खिडक्याची स्लाईडींग/लाकडी शॅटर स्वच्छ करणे. |
| | | २ | रुम, स्नानगृह व शौचालयाचे दरवाजे स्वच्छ करणे. |
| | | ३ | रुममधील संपूर्ण स्वच्छता करणे. |
| | | ४ | जाणे-येण्याचा मार्ग तसेच पार्कींग परिसर होज पाईपने स्वच्छता करणे. |
| | | ५ | खिडक्यांचे लगतचे भागावरील धुळ साफ करणे. (विन्डो सिल) |
| ३ | पंधरा दिवसातून स्वच्छता | १ | रुममधील फॅन, टयुब, लिप्ट व विद्युत उपकरणेची स्वच्छता करणे. |
| | | २ | रुम व कार्यालयचे छतावरील कोप-यातील झालेले जाळे जळमटे काढणे. |
| | | ३ | इमारतीत असलेल्या सर्व डक्ट (Duct) मधील साफसफाई करणे. |
| | | ४ | जनरल व रुममधील स्नानगृह, शौचालयामधील लोव्हर्ड विन्डो (Louvered Window) मधील घाण काढून साफसफाई करणे. |
| | | ५ | ड्रेनेज लाईन चोकअप काढणे तसेच साफसफाई करणे. |
| ४ | महिन्याची स्वच्छता | १ | स्टोअर रुम खरडुन फरशी स्वच्छ करणे. |
| | | २ | इमारतीच्या चारही बाजुच्या,दर्शनी भिंती व इमारतीवरील नावाचे बोर्ड स्वच्छ करणे. |
| | | ३ | अति उंचावर असलेले कोळयाचे जाळे काढुन टाकणे. |
| | | ४ | टेरेस वरील साफ सफाई करणे. |
| | | ५ | टेरेस वरील सोलरच्या काचेवरील धुळ व सोलर कलेक्टर व टँकची साफसफाई करणे. |
| | | ६ | फायर फायटर नळकांडेची साफसफाई करणे. |
| | | ७ | पाण्याच्या टाक्या साफ करणे. (एकूण पाण्याच्या टाक्याची संख्या-२४) |
| | | ८ | बाहेरील खिडक्यांचे सज्जावरील घाण काढून स्वच्छता करणे |
| ५ | विशेष स्वच्छता | १ | अति महत्वाचे कार्यक्रम, उत्सव विशेष बाबीच्या वेळेस संपूर्ण इमारत आतून बाहेरुन धुणे व स्वच्छ करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २ | सेप्टीक टँकची कामे. (एकूण सेप्टीक टँक-४) |
| | | ३ | रुम औषध फवारणी नंतर रूमची सर्व सफासफाई करणे. |

२२) खालील अ.नं.१ व अ.नं.२ मधील कोष्टकात नमूद केले प्रमाणे पदनिहाय कर्मचारी कामावर नेमूण ४ ते १२, १२ ते २०, २० ते ०४ तसेच १० ते ०६ या शिफ्टमध्ये चालणार आहे. त्यानुसार कामाचा दर्जा उत्तम ठेवून कंत्राटदारास स्वच्छता/हाऊसकिपींग विद्युत, प्लंबिंग इ. मेन्टनन्स् ची कामे करावयाची आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ | हाऊसकिपींग कामासाठी | | | |
| | पदनाम | कुशल | अकुशल | एकुण |
| | जनरल मॅनेजर | १ | -- | १ |
| | लिपीक टंकलेखक | ३६ | -- | ३६ (मागणीनुसार) |
| | स्टोअर किपर | १ | -- | १ |
| | मुकादम | ३ | -- | ३ |
| | मदतनिस | -- | ७ | ७ |
| | मदतनिस (बस सेवा) | -- | ३ | ३ |
| | स्टोअर मदतनिस | -- | १ | १ |
| | शिपाई | -- | २ | २ |
| | स्वच्छता कर्मचारी (परिसर) | -- | ३४ | ३४ |
| | एकूण | ४१ | ४७ | ८८ |
| | | | | |
| ब | विद्युत विभाग मेन्टनन्स् कर्मचारी | | | |
| | पदनाम | कुशल | अकुशल | एकुण |
| | तारतंत्री | ७ | -- | ७ |
| | तारतंत्री-मदतनिस | -- | ७ | ७ |
| | जनरेटर ऑपरेटर | ३ | -- | ३ |
| | वेल्डर | ३ | -- | ३ |
| | एकूण | १३ | ०७ | २० |
| | | | | |
| क | मेकॅनिकल विभाग मेन्टनन्स् कर्मचारी | | | |
| | पदनाम | कुशल | अकुशल | एकुण |
| | ए.सी. मॅकेनिक | २ | -- | २ |
| | सोलर ऑपरेटर | २ | -- | २ |
| | ए.सी.-मदतनिस | -- | २ | २ |
| | लिफ्ट ऑपरेटर | -- | ३९ | ३९ |
| | एकूण | ०४ | ४१ | ४५ |
| | | | | |
| ड | पाणी पुरवठा विभाग, मेन्टनन्स् कर्मचारी | | | |
| | पदनाम | कुशल | अकुशल | एकुण |
| | प्लंबर | ३ | -- | ३ |
| | प्लंबर मदतनिस | -- | ६ | ६ |
| | पंपमन | -- | ६ | ६ |
| | एस.टी.प्लॅन्ट,मदतनिस | -- | ३ | ३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मदतनिस (कार्यालय) | -- | १ | १ |
| | मदतनिस (हौद,टाक्या इ.साफ सफाई) | -- | ५ | ५ |
| | एकूण | ३ | २१ | २४ |
| इ | बांधकाम विभाग मेन्टनन्स् कर्मचारी | | | |
| | पदनाम | कुशल | अकुशल | एकुण |
| | सुतार कारागीर | ५ | -- | ५ |
| | गवंडी कारागीर | ५ | -- | ५ |
| | पेंटर कारागीर | ४ | -- | ४ |
| | सुतार, गवंडी मदतनिस | -- | २० | २० |
| | एकूण | १४ | २० | ३४ |
| उ | वाहन विभाग,वाहन चालक कर्मचारी | | | |
| | पदनाम | कुशल | अकुशल | एकुण |
| | बॅटरी कार ऑपरेट चालक | ६ | -- | ६ |
| | एकूण | ६ | -- | ६ |
| | कॅन्टीन विभाग कर्मचारी | | | |
| | पदनाम | कुशल | अकुशल | एकुण |
| | मदतनिस | -- | ३३ | ३३ |
| | एकूण | -- | ३३ | ३३ |
| | | | दररोज एकूण मनुष्यबळ संख्या(अ+ब+क+ड+इ+ई+उ) = | २५० |

प्रशासकीय इमारत, रुम बुकिंग काऊंटर, पार्किंग परिसर व विद्युत, प्लंबिंग मेन्टनन्स कामासाठी दररोज आवश्यक मनुष्यबळ तपशील खालील प्रमाणे.

साईआश्रम भक्तनिवासमधील १ ते १२ इमारतीमधील कामासाठीचे मनुष्यबळ (आवश्यकतेनुसार)

| पदनाम | ०१ इमारतीसाठी मनुष्यबळ संख्या | कुशल | अकुशल | १२ इमारतीसाठी एकूण मनुष्यबळ |
|---|---|---|---|---|
| मदतनिस (माळ्यासाठी) | १२ (०१ इमारतीसाठी) | -- | १४४ | १४४ |
| मदतनिस(माळा स्व.कर्म.) | १० (०१ इमारतीसाठी) | -- | १२० | १२० |
| लॉन्ड्री मदतनिस | ०२ (०६ इमारतीसाठी) | -- | ४ | ४ |
| शिफ्ट पर्यवेक्षक | ०३ (०२ इमारतीसाठी) | १८ | -- | १८ |
| एकूण मनुष्यबळ संख्या | २७ | १८ | २६८ | २८६ |
| एकूण मनुष्यबळ अ.नं १) कोष्टकानुसार = २५०<br>अ.नं २) कोष्टकानुसार = २८६<br>एकूण = ५३६ | | | | |

कंत्राटदाराकडील प्रत्येक कामगारांना ओळखपत्र देऊन ते परिधान करणे बंधनकारक राहील.

कंत्राटदाराकडील सर्व कामगारांनी साईभक्तांशी, संस्थान कर्मचारी / अधिकारी यांचेशी सौजन्याने वागावे. भाविकांशी उध्दट, बेशिस्त व अनुचित गैरवर्तन करतांना आढळलेस/ केलेस तसेच कायम गैरहजर असणारे कामगारांना तात्काळ विनानोटीस व विना नुकसान भरपाई कामावरुन बंद /कमी करणेची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२३) कंत्राटदाराकडील कामगार धुम्रपान, मद्यपान करणार नाही किंवा धुम्रपानाचे साहीत्य सोबत बाळगणार नाही, तसे आढळून आल्यास संबंधीतावर कंत्राटदारामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

२४) डयुटीवर आल्यानंतर कोणताही कामगार मोबाईलवर बोलणे, मोबाईल खेळत बसणे असे प्रकार करणार नाही. तसे आढळून आल्यास संबंधीतावर व संबंधीत पर्यवेक्षक यांचेवर कंत्राटदारामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

२५) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम -१९५२ नुसार कंत्राटदारांनी भविष्य निर्वाह निधी संबंधी कागदपतत्रांची पुर्तता सामान्य प्रशासन कार्यासन १० अ (पी.एफ.)कडे करणे बंधनकारक आहे.

i कंत्राटदाराने आस्थापनेस प्रॉव्हीडंट फंडाचा स्वत:चा स्वतंत्र कोड नंबर असणे आवश्यक असून, त्या बाबतचे पी.एफ. कोड ड्राप्ट लेटरची सत्यप्रत दयावी लागेल.

ब) दरमहा भविष्य निर्वाह निधी रक्कम भरणा केले नंतर संबंधीत कर्मचा-यांचे हजेरीपत्रक, पगारपत्रक, विहीत नमुन्यातील प्रॉ.फंड रजिस्टर, ऑनलाईन ईसीआर, ऑनलाईन चलनाचा ऑनलाईन भरणा केलेबाबतची Payment Confirmed Slip (TRRN Details) इत्यादी कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती (प्रत्येक महिन्याची स्वतंत्रपणे) वेळेत सादर करावे लागतील.

क) काम सुरु झालेनंतर महिना संपलेनंतर दुस-या महिन्याचे १५ तारखेच्या आत प्रॉ.फंडाची रक्कम भरणा करुन दरमहा उपरोक्त कागदपत्रे सादर करावी लागतील.

ड) कंत्राटदाराने त्याचेकडील संस्थानचे शिर्डी साईटवरील कामगारांची होणारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम स्वतःचे पी.एफ.कोड नंबरवर स्वतंत्र चलनाने भरावयाची आहे. कागदपत्रांची पुर्तता करणेस विलंब झाल्यास कंत्राटदाराचे बील प्रलंबीत राहिलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२६) कंत्राटदाराकडील कर्मचा-यांना दि.०१/०८/२०१८ ते दि.१४/१०/२०१८ या कालावधीतील थकीत वेतर तसेच दि.१५/१०/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ अखेर तसेच नवीन ठेकेदाराची निश्चिती होईपावेतो दरमहा वेतनाची अदायगी विहीत मुदतीत नियमानुसार त्या-त्या कर्मचा-यांच्या बॅक खात्यात वर्ग करुन कर्मचारी निहाय बॅक यादी संबंधीत विभाग प्रमुख व कामगार विभागास दर महिन्याचे दहा तारखेपर्यत सादर करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२७) कार्यारंभ आदेशात नमुद कामाबाबत, अर्बीट्रेशन क्लॉज मा.व्यवस्थापन समितीचे होणा-या सभेतील निर्णयानुसार पार्टी नं.१ व पार्टी नं.२ यांचेवर बंधनकारक राहील, झालेला निर्णय कराराचा भाग राहील. तसेच झालेल्या निर्णयामध्ये अर्बीट्रेशन क्लॉज टाकणेबाबत निर्णय झाल्यास त्याबाबत १०० रुपयाचे स्टॅम्प पेपरवर पुरवणी करारनामा करण्यात येऊन, तो कराराचा भाग समजण्यात येईल.

२८) या कंत्राटाबाबत काही वाद उत्पन्न झाल्यास तो राहाता / कोपरगाव / अहमदनगर / औरंगाबाद या कोर्टाचे न्याय कक्षेत राहिल.

२९) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी / शर्ती विहित करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट / अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

३०) सदरचे काम हे तीन महिने कालावधीसाठी असल्याने सुरक्षा अनामत रक्कम संस्थानकडे जमा करावयाची अवश्यकता नाही.

३१) सदरचे काम हे तीन महिने कालावधीसाठी असल्याने डेड, किरकोळ स्टॉक /इतर वस्तूची चार्ज देवाण घेवाण करणेची अवश्यकता नाही.

३२) कार्यादेशातील अटी व शर्तीस अनुसरुन रु.६००/- मात्रचे स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा करुन घ्यावा लागेल त्यास येणारा सर्व खर्च कंत्राटदारास स्वःत करावयाचा आहे.

वरील नमुद अटी व शर्तीस अनुसरुन बी.व्ही.जी.इं.लि.पुणे यांना खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्यादेश नं. व दिनांक | प्रतिमहा GST वगळून रुपये एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | साईआश्रम भक्तनिवास | जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम/२१३७/२०१८ दि.१५/१०/२०१८ | ८०,९३,०६८/- |
| ०२ | साई धर्मशाळा | जा.नं.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/२१३८/२०१८ दि.१५/१०/२०१८ | ३४,७१,१७०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | व्दारावती भक्तनिवास | जा.नं.एसएसएस/वशी-व्दारावती/२१३९/२०१८ दि.१५/१०/२०१८ | ११,५३,२२७/- |

उपरोक्तप्रमाणे सदरचे तीनही विभागामार्फत बी.व्ही.जी.इं.लि.पुणे यांना देण्यात आलेल्या कार्यादेशास मान्यता मिळणेस ,

**आ)** साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील माहे ऑगस्ट २०१८ व सप्टेंबर २०१८ या दोन महिन्यातील कालावधीमधील एम पी एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएट्स लि पुणे यांचेकडील कर्मचा-यांचे माहे ऑगस्ट व सप्टेबर २०१८ या महिन्याचे वेतनापोटी एकुण प्रत्येक महिन्यातील मनुष्यबळावर १८ % जी एस टी सह बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांनी दि.१२/१०/२०१८ रोजीचे पत्रात मागणी केलेप्रमाणे बी.व्ही.जी.इं.लि.पुणे यांना तीनही विभागामार्फत आदा करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | महिना | साईआश्रम भक्तनिवास | साई धर्मशाळा | व्दारावती भक्तनिवास | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ऑगस्ट २०१८ | ८७,२९,१३१/- | ३४,७३,५५७/- | १२,७१,९८९/- | १,३४,७४,६७७/- |
| ०२ | सप्टेंबर २०१८ | ८२,७६,२५३/- | ३४,४६,०५९/- | ११,८१,११२/- | १,२९,०३,४२४/- |
| | | | | **एकुण -** | **२,६३,७८,१०१/-** |

**इ)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/१०/२०१८ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१३, निर्णय क्र.६९० नुसार साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील एम पी एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएट्स लि.पुणे यांचे कामाचे कालावधीतील माहे मार्च २०१८, एप्रिल २०१८, मे २०१८, जून २०१८ व जुलै २०१८ या ०५ महिन्याचे आऊटसोर्सिंग कर्मचा-यांना देय होत असलेल्या सानुग्रह अनुदानाचे एकुण रक्कमेवर बी.व्ही.जी.इं.लि.पुणे यांचे मार्फत आदा करणेकामी त्यांनी मागणी केलेनुसार 18 % GST, 10 % Service Charge, 4 % TDS सह बी.व्ही.जी.इ.लि.पुणे यांना तीनही विभागामार्फत खालीलप्रमाणे आदा करण्यात आलेली आहे.

**ई)**

| अ.नं | विभागाचे नाव | ८.३३ % सानुग्रह अनुदान | १० % सर्व्हिस चार्ज + ४ % टिडीएस | एकुण | १८ % जी एस टी | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईआश्रम भक्तनिवास | १८,११,९०४/- | २,५३,६६७/- | २०,६५,५७१/- | ३,७१,८०३/- | २४,३७,३७३/- |
| ०२ | साई धर्मशाळा | ६,०६,७९८/- | ८४,९५२/- | ६,९१,७५०/- | १,२४,५१५/- | ८,१६,२६५/- |
| ०३ | व्दारावती भक्तनिवास | २,८३,६४१/- | ३९,७१०/- | ३,२३,३५१/- | ५८,२०३/- | ३,८१,५५४/- |
| | | | | | **एकुण -** | **३६,३५,१९२/-** |

उपरोक्त (अ) (आ) व (इ) नुसार कार्यवाही करण्यात आलेली असून सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.७८२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग इ. मेन्टनन्स / स्वच्छता कामाबाबत बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे यांना दि.१५.१०.२०१८ पासून देण्यात आलेल्या कार्यादेशाचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच साई आश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास या विभागांनी माहे ऑगस्ट-२०१८ व सप्टेंबर-२०१८ या कालावधीतील एम पी एन्टरप्रायजेस ॲण्ड असो.लि. पुणे यांचेकडील कर्मचाऱ्यांचे वेतन बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे या कंपनीने केले आहे. सदर रक्कम रु.२,६३,७८,१०१/-मात्र साई आश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास या विभागांनी बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे यांना आदा केली आहे. त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच साई आश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील एम पी एन्टरप्रायजेस ॲण्ड असो.लि. पुणे यांचे कामाचे कालावधीतील माहे मार्च-२०१८ ते जुलै-२०१८ या पाच महिन्याचे कालावधीतील त्यांचे कर्मचाऱ्यांना देय होत असलेले सानुग्रह अनुदान रक्कम रु.३६,३५,१९२/- मात्र एवढी रक्कम बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे या कपनीने आदा केली आहे. सदर रक्कम साई आश्रम भक्तनिवास,**

साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास या विभागांनी बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे यांना आदा केली आहे. त्यास मान्यता देण्यात आली.

बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे या कंपनीस उपरोक्त सर्व रक्कमा एम पी एन्टरप्रायजेस ॲण्ड असो.लि. पुणे यांच्या जप्त करण्यात आलेल्या सुरक्षा अनामत रकमेतून व त्यांना प्रलंबीत देयक आदा न करता या देयकातून वसूल करण्यात यावे, असे ठरले. तसेच यासाठी येणारा जास्तीचा खर्च संस्थान निधीमधून करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, व्दारावती भक्तनिवास)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.१३** **साई आश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग इ. मेन्टनन्स / स्वच्छता कामाच्या ई-निविदा मसुद्यात बदल करुन ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो बी.व्ही.जी.इंडीया लि.पुणे यांना मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्स/स्वच्छता काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटस लि पुणे यांना दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एक वर्ष कालावधीकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११६ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. परंतू सदर ठेकेदार यांनी कार्यादेशातील अटी शर्तीनुसार काम करत नसल्याने, त्यांना वारंवार कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या होत्या. परंतू त्यांनी सदर बाब गांभिर्याने न घेतल्याने,मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.६३६ अन्वये एम पी एन्टरप्रायजेस ॲण्ड असो.लि पुणे यांचा तीनही विभागाकडील आऊटसोर्स कामाचा ठेका रद्द करुन,त्यांची कामाची हमी म्हणून संस्थान खाती जमा असलेली ५% सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन त्यांचे नाव काळया यादीत समावेश करण्यात यावा. तसेच तीनही विभागाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्स/स्वच्छता काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी तातडीने विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणे यावी. तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो संस्थानचे इतर विभागात कार्यरत असलेल्या ठेकेदाराकडून दरपत्रके मागवून निम्नतम दरधारकाकडून कामे करुन घ्यावे असे ठरले होते.

त्यानुसार ई-निविदेत सादर केलेले दर व ठेकेदारांनी यांनी ई-मेल व पत्राव्दारे दिलेल्या दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

कंत्राटदारांनी ई-निविदेमध्ये सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| कंत्राटदाराचे नाव | **व्दारावती** | ई-निविदेतील निम्नतम दर स्थिती | **साईआश्रम १** | ई-निविदेतील निम्नतम दर स्थिती | **साई धर्मशाळा** | ई-निविदेतील निम्नतम दर स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| एम पी एन्टरप्रायजेस ॲण्ड असो.लि पुणे | प्रति माह – रु.८,७७,४४२/- १८% GST सह रु.१०,३५,३८१/- | L - 1 | प्रति माह – रु.६०,६२,३५७/- १८% GST सह रु.७१,५३,५८१.२६/- | L - 1 | प्रति माह – रु.२४,९८,२५७/- १८% GST सह रु.२९,४७,९४३.२६/- | L - 1 |
| बी व्ही जी इं.लि.पुणे | प्रति माह - रु.११,३१,४०४/- १८%GST सह रु.१३,३५,०५७/- | L – 3 | प्रति माह – रु.७७,५२,२११/- १८%GST सह रु.९१,४७,६०८.९८/- | L - 2 | प्रति माह – रु.३३,८४,००२.७५/- १८% GST सह रु.३९,९३,१२३.२४/- | L - 2 |
| स्पिक-एन-स्पॅन सर्व्हिसेस, पुणे | प्रति माह - रु.१०,३७,५६३/- १८%GST सह रु.१२,२४,३२४/- | L – 2 | --- | --- | --- | --- |
| बक्षी सिक्युरिटी सर्व्हिसेस, पुणे | --- | --- | प्रति माह – रु.८४,०४,३५०/- १८% GST सह रु.९९,१७,१३३/- | L - 3 | प्रति माह – रु.३५,९५,८३८/- १८ % जी एस टी सह रु.४२,४३,०८९/- | L - 3 |

कंत्राटदारांनी दि.१२/१०/२०१८ रोजी सादर केलेले सुधारित दर खालीलप्रमाणे आहे.

| कंत्राटदाराचे नाव | व्दारावती | शेरा | साईआश्रम १ | शेरा | साई धर्मशाळा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| बी व्ही जी इं.लि.पुणे | प्रति माह – रु.११,५३,२२७/- १८% GST सह रु.१३,६०,८०८/- | L –2 | प्रति माह – रु.८०,९३,०६८/- १८% GST सहरु.९५,४९,८२०/- | L –1 | प्रति माह – रु.३४,७१,१७०/- १८% GST सह रु.४०,९५,९८१/- | L –1 |
| स्पिक-एन-स्पॅन सर्व्हिसेस, पुणे | प्रति माह – रु.१०,६५,०००/- १८%GST सह रु.१२,५६,७००/- (एक वर्षासाठी) | L –1 | प्रति माह – रु.९३,८९,२००/- १८% GST सह रु.१,१०,७९,२५६/- (एक वर्षासाठी) | L –2 | प्रति माह – रु.३७,१५,०००/- १८% GST सहरु.४३,८३,७००/- | L –2 |
| बक्षी सिक्युरिटी सर्व्हिसेस, पुणे | निरंक | | निरंक | | निरंक | |

कंत्राटदारांनी ई-निविदेत सादर केलेले दर व दि.१२/१०/२०१८ रोजी इतर ठेकेदारांनी सादर केलेले सुधारीत दराचा तपशील खालीलप्रमाणे

| विभागाचे नाव | एम पी एन्टरप्रायजेस अॅण्ड असो.लि पुणे यांचे ई-निविदेत प्राप्त झालेले प्रतिमहा मुळ दर | बी व्ही जी इं.लि.पुणे यांनी सुधारीत दिलेले प्रतिमहा मुळ दर | जास्त दर |
|---|---|---|---|
| व्दारावती | रु.८,७७,४४२/- | रु.११,५३,२२७/- | रु.२,७५,७८५/- |
| साईआश्रम १ | रु.६०,६२,३५७/- | रु.८०,९३,०६८/- | रु.२०,३०,७११/- |
| साई धर्मशाळा | रु.२४,९८,२५७/- | रु.३४,७१,१७०/- | रु.९,७२,९१३/- |
| एकूण | रु.९४,३८,०५६/- | रु.१,२७,१७,४६५/- | रु.३२,७९,४०९/- |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.६३६ अन्वये संस्थानचे इतर विभागात कार्यरत असलेल्या ठेकेदारांकडून दरपत्रके मागविणेत यावी असे ठरले होते त्यानुसार उपरोक्त ठेकेदारांना दुरध्वनीव्दारे संपर्क साधून तीन महिने अथवा नवीन ठेकेदार निश्चित होईपावेतो दर देणेबाबत कळविणेत आले होते त्यानुसार साईआश्रम १ व साईधर्मशाळा याकरीता बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांनी दिलेले दर निम्नतम आहेत.

साईभक्तांची निवासाची गैरसोय होऊ नये याकरीता साईआश्रम-१, व्दारावती भक्तनिवास व साईधर्मशाळा या तीनही विभागाकडील हाऊसकिपींग स्वच्छता/मेन्टनेन्स इ. कामे बी.व्ही.जी.इंडिया लि, पुणे यांना दि.१५/१०/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ अखेरे तीन महिने कालावधीकरीता अथवा निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन, नविन ठेकेदाराची निश्चिती होईपावेतो अनुक्रमे साईआश्रम भक्तनिवास विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम/२१३७/२०१८ दि.१५/१०/२०१८ रोजी, साईधर्मशाळा विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/२१३८/२०१८ दि.१५/१०/२०१८ रोजी व व्दारावती भक्तनिवास मार्फत जा.नं.एसएसएस/वशी-व्दारावती/२१३९/२०१८ दि.१५/१०/२०१८ रोजी कार्यादेश पारीत करण्यात आले आहे.

मागणीः- सदर साईआश्रम भक्तनिवास, व्दारावती व साईधर्मशाळा या विभागाकडील हाऊसकिपींग स्वच्छता/मेन्टनेन्स कामाची ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. परंतू सदर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होणेस कालावधी लागणार असल्याने, ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आहे त्याच मंजूर दरात व अटी शर्तीस अधीन राहून बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांचेकडून काम करुन घ्यावे लागणार आहे.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः-

१) मा.व्यवस्थापन समिती दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३६ अन्वये निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदार निश्चित होईपावेतो संस्थानचे इतर विभागात कार्यरत असलेल्या ठेकेदारांकडून दरपत्रके मागवून निम्नतम दरधारकाकडून व्दारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा या विभागाची यांत्रिकीकरणासह हाऊसकिपीग, विद्युत, प्लंबीग इत्यादी मेन्टनन्स/स्वच्छता इत्यादी कामे करुन घ्यावे असे ठरले आहे.

त्यानुसार सध्या बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांना साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवासस्थान या तीनही विभागाकडील हाऊसकिपींग, स्वच्छता/मेन्टनन्स कामाचा कार्यादेश दि.१५/१०/२०१८ रोजी ०३ महिने कालावधीकरीता देण्यात आलेला असून, सदर कार्यादेशाची मुदत

दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने, ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन ठेकेदाराची नियुक्ती होई पावेतो आहे त्याच मंजूर दरात बी.व्हि.जी.इंडिया लि पुणे यांचेकडून कामे करुन घेणेकामी मुदतवाढ देणेस,

२) तसेच यापुर्वी उपरोक्त साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती निवासस्थानाकरीता कर्मचारी संख्या निश्चित करुन व त्याचा आकृतीबंध तयार करुन ई-निविदा प्रक्रिया राबविली जात होती. त्या ऐवजी व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग / स्वच्छता व साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनेन्स /स्वच्छता कामाचे स्वरुप निश्चित करुन सदरची कामे ठोक पध्दतीने करुन देणेबाबत ई-निविदेत नमुद करुन ई-निविदा मागविणेस,

उपरोक्त अ व ब बाबीस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.७८३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांना साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती भक्तनिवासस्थान या तीनही विभागाकडील हाऊसकिपींग, स्वच्छता/मेन्टनन्स कामाचा कार्यादेश दि.१५/१०/२०१८ रोजी ०३ महिने कालावधीकरीता देण्यात आलेला असून, सदर कार्यादेशाची मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने, ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन ठेकेदाराची नियुक्ती होई पावेतो आहे त्याच मंजूर दरात बी.व्हि.जी.इंडिया लि पुणे यांचेकडून कामे करुन घेणेकामी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच यापुर्वी साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व व्दारावती निवासस्थानाकरीता कर्मचारी संख्या निश्चित करुन व त्याचा आकृतीबंध तयार करुन ई-निविदा प्रक्रिया राबविली जात होती. त्या ऐवजी व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता व साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनेन्स/स्वच्छता कामाचे स्वरुप निश्चित करुन सदरची कामे ठोक पध्दतीने करुन देणेबाबत ई-निविदेत नमुद करुन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, व्दारावती भक्तनिवास)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१४ **१० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकामी मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचेशी टेंडरमधील अटी व शर्तीबाबत चर्चा होऊन दुसरे वेळेस फेर ई-निविदा बोलविणेस तसेच दुसरे वेळेस फेर ई-निविदा जाहिरात ही राज्यस्तरावरील व राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०८-०१-२०१८ रोजीचे सभेतील विषय क्र.१९ निर्णय क्र.१९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, अपारंपारिक उर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम बसविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. ४०/- कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी राज्य शासनाची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार राज्य शासनाची मान्यता मिळणेकामी मा.प्रधान सचिव,विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला होता. संस्थानमार्फत करण्यात आलेल्या पत्रव्यवहारानंतर मा.प्रधान सचिव,विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांचे शासन निर्णय क्र.सासवि-१०१८ / ०४ / प्र.क्र.०२ / का.१६ दि.१६-०८-२०१८ रोजीचे पत्रानुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत १० मेगावॅट सोलर पी.व्ही.प्रकल्प उभारणेस व त्यासाठी येणा-या रु.३९,९५,३७,०००/- इतक्या खर्चास मंजुरी मिळालेली आहे. त्यानुसार अपारंपारिक उर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम बसविणेकामाची ई-निविदा दि.१०-९-२०१८ रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatendrs.gov.in. या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करणेसाठी दिनांक १०-०९-२०१८ ते दिनांक ०१-१०-२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तसेच प्री-बीड साठी दि.१७-०९-२०१८ ही तारीख देण्यात आलेली होती.

सदर प्री-बीड मिटींग दि.१७-०९-२०१८ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी साहेब, मा.कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) तसेच मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे श्री.दिपक झाडे, श्री.नंदकिशोर धकाते यांचे उपस्थितीत झाली. सदर प्री-बीड मिटींगला एकुण पुढीलप्रमाणे १७ कंत्राटदार उपस्थित होते.

१० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी झालेल्या प्री-बीड मिटींगमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या QUERIES बाबत संस्थानचे अधिकृत सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी दि.01-10-2018 रोजी अनुपालन / खुलासा तक्ता सादर केला होता. त्याअनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि.05-10-2018 रोजीचे सभेत मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे प्रतिनिधी यांनी समक्ष उपस्थित राहून अनुपालन / खुलासा तक्त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांवर मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे प्रतिनिधीने उत्तरे देऊन मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांचे शंका समाधान केले.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेत प्री-बीड मधील उपस्थित करण्यात आलेल्या QUERIES बाबत झालेल्या निर्णयाप्रमाणे तक्त्यातील अनुपालन / खुलासा वेबसाईटवर दि.06-10-2018 रोजी अपलोड करण्यात आलेला आहे.

१० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी www.mahatendrs.gov.in. या संकेतस्थळावर मागविणेत येणा-या ई-निविदेस (Tender ID 2018_SAI_350408_1) दि.02-10-2018 ते दि.13-10-2018 अखेर मुदतवाढ देण्यात आलेली होती. परंतु (1) BVG Clean Energy Ltd., Pune, (2) STERLING & WILSON SOLAR PVT LTD, (3) Mundra Solar Pvt.Ltd., Adani, Ahmedabad, (4) Waaree Energies Limited, Mumbai यांनी ई-मेलव्दारे टेंडर सबमिशन तारीख 15-20 दिवस वाढविण्याची मागणी केली होती.

विद्युत विभागाचे दि.13-10-2018 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये ई-निविदा अपलोड करणेसाठी दिनांक 24-10-2018 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र या मुदतीत एकच (1) निविदा प्राप्त झालेली असल्याचे दि.24-10-2018 रोजी ई-टेंडरींग विभागामार्फत ई-मेल व्दारे विद्युत विभागास कळविण्यात आले होते. दि.01-12-2016 रोजीचे शासन खरेदी नियमावलीतील मुद्दा क्र.4.4.3.1 नुसार निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तसेच Sarjan Realities Limited, Pune यांनी ई-मेलव्दारे टेंडर सबमिशन तारीख वाढविण्याची मागणी केली होती. विद्युत विभागाचे दि.24-10-2018 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये ई-निविदा अपलोड करणेसाठी दिनांक 02-11-2018 पर्यंत तिसरे वेळेस मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र या मुदतीत दोनच (02) निविदा प्राप्त झालेली असल्याचे दि.02-11-2018 रोजी ई-टेंडरींग विभागामार्फत ई-मेलव्दारे विद्युत विभागास कळविण्यात आले होते.

दि. 01-12-2016 रोजीचे शासन खरेदी नियमावलीतील मुद्दा क्र.4.4.3.1 नुसार निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास, संबंधित खरेदी अधिका-याने प्रथम किमान एक आठवडयाची मुदतवाढ द्यावी. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ दयावी. त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येऊ नये असे नमूद आहे. त्यानुसार १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकामी दि.02-11-2018 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये प्रथम वेळेस फेर ई-निविदा बोलविण्यात आलेली होती १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकामी दि.02-11-2018 रोजीचे मंजूर टिपणीन्वये याकामी प्रथम वेळेस फेर ई-निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatendrs.gov.in. या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करण्याची मुदत दिनांक 06-11-2018 ते दि.27-11-2018 पर्यंत देण्यात आली होती. या मुदतीत तीन (03) निविदा प्राप्त झालेली असल्याचे दि.27-11-2018 रोजी ई-टेंडरींग विभागामार्फत ई-मेलव्दारे विद्युत विभागास कळविण्यात आले आहे.

दिनांक 29-11-2018 रोजी खरेदी समितीच्या सभेत उपरोक्तकामी असलेले 03 निविदाधारकांचे टेक्निकल बीड उघडण्यात आले होते. सदर तीन कंपन्यांच्या नावाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 01 | Greenlife Energy Pvt.Ltd., Pune |
| 02 | Powerexelectra LLP, Gandhinagar (Gujarat) |
| **03** | Sarjan Realiities Limited, Pune |

ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा दि.29-11-2018 रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडून निविदाधारकांच्या सर्व कागदपत्रांची तपासणी संस्थानचे अधिकृत सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचेमार्फत करण्यात आलेली असून त्यांनी दि.07-12-2018 रोजी ई-मेलव्दारे Technical Evaluation चा तक्ता सादर केलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **Technical Evaluation / Analysis** | | | | |
|---|---|---|---|---|
| S.No. | Qualification Criteria | **Name of the Bidder**<br>GR Greenlife Energy Pvt Ltd, Pune | Powerexelectra LLP, Gandhinagar (Gujarat) | Sarjan Realiities Limited, Pune |
| 01 | Technical Eligibility:<br>Grid connected solar power plant(s) of 10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW (10 MW cumulative) or above installed capacity in India in any two calendar years or two financial years in the last five years from the bid due date. Reference plant must have been in successful operation for at least 24 months up to the bid due date.Proof of commissioned project. | **No** | **No** | **No** |
| 02 | O&M Experience: The bidder should be presently in the business of Operation & Maintenance (O&M) of solar PV plants and should have experience of successful operation and maintenance of solar PV plant of 10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW (10 MW Cumulative) or above capacity in India for a period at least of 2 years up to the bid due date.Proof of O&M Experience. | **No** | **No** | **Yes** |
| 03 | Financial Eligibility:<br>The minimum average annual turnover of the Bidder in the preceding 3 (Three) financial years as on bid issue date should be at least INR 60 crores (Indian Rupees Sixty Crores only). The turnover should be gradually increasing or same in average, not decreasing. EPC Contractor should be in profits in last three years. The Net Worth for the last year should be positive. Financial Eligibility, financial data, Audited Balance sheet of last three Financial Years. | **No** | **Yes** | **No** |
| 04 | Team Leader (Civil Engg) -1 No.Years of experience in installation & Commissioning of project. Biodata/ CV of Team Leader. | **No** | **No** | **No** |
| 05 | Project Manager (Electrical Engg) – 1 No.<br>Years of experience in installation & Commissioning of project. Biodata/ CV of Project Manager. | **No** | **Yes** | **No** |
| 06 | Technical Experts in Designing and Engineering (Civil Engg) - 1 No.<br>Years of experience in Designing & Engineering of solar project. Biodata/ CV of Technical Expert (Civil). | **No** | **Yes** | **No** |
| 07 | Technical Experts in Designing and Engineering (Electrical Engg) - 1 No.<br>Years of experience in Designing & Engineering of solar project. Biodata/ CV of Technical Expert (Electrical). | **No** | **No** | **No** |
| 08 | Softwares:<br>1. Solar Data Analysis Software (Meteonorm, Solar GIS or any other software having high accuracy in solar data analysis)<br>2. Solar Plant Designing Software (PV Syst)<br>3. Shadow Analysis Software (Sketch Up)<br>4. Stadd Pro<br>5. Auto Cad | **No** | **No** | **No** |
| 09 | **Points Obtained as per Tender Criteria** | **0** | **30** | **20** |
| 10 | Criteria Met (Yes /No ) | **No** | **No** | **No** |
| 11 | Status Accepted / Rejected | **Rejected** | **Rejected** | **Rejected** |

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले मार्क (%) |
|---|---|---|
| 01 | Greenlife Energy Pvt.Ltd., Pune | 0 % |
| 02 | Powerexelectra LLP, Gandhinagar (Gujarat) | 30 % |
| 03 | Sarjan Realiities Limited, Pune | 20 % |

टेंडरमधील पा.क्र.48 वरील अटीनुसार पात्रताधारकास 70 % मार्क मिळणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त तीनही निविदाधारकांना तेवढे मार्क मिळालेले नसल्याने 3 ही निविदाधारक यांना संस्थानचे अधिकृत सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी अपात्र ठरवलेले आहे.

प्रथम वेळेस टेंडर अपलोड करणेसाठी दि.10-09-2018 ते दि.01-10-2018 अशी मुदत देण्यात आली होती. याकामी प्री-बीडला 17 बीडर्स उपस्थित होते. यावेळी प्री-बीडमधील QUERIES आणि सुचनेनुसार

दि.02-10-2018 ते दि.13-10-2018 अशी मुदतवाढ देण्यात आली होती. यानंतर (1) BVG Clean Energy Ltd., Pune, (2) STERLING & WILSON SOLAR PVT LTD, (3) Mundra Solar Pvt.Ltd., Adani, Ahmedabad, (4) Waaree Energies Limited, Mumbai यांनी टेंडर सबमिशन तारीख 15, 20 दिवस वाढविणेबाबत मागणी केल्यानंतर दि. 24-10-2018 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. या मुदतीत एकच निविदा प्राप्त झालेली होती. त्यामुळे दि.02-11-2018 पर्यंत तिसरे वेळेस मुदतवाढ देण्यात आलेली होती. यावेळेस दोनच निविदा प्राप्त झाल्याने पुन्हा प्रथम वेळेस फेर ई-निविदा दि.06-11-2018 ते दि.27-11-2018 पर्यंत बोलविण्यात आली होती. यावेळी 03 निविदा प्राप्त झाल्या. परंतु उपरोक्तप्रमाणे 03 निविदाधारक अपात्र ठरलेले आहेत. त्यामुळे दुस-यांदा फेर ई-निविदा बोलवावे लागणार आहे.

दुस-यांदा फेर ई-निविदा बोलविण्यापुर्वी टेंडरमधील अटी शर्तीबाबत मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचेशी पुन्हा एकदा चर्चा होणे अपेक्षित आहे असे वाटते. चर्चा होते वेळेस खालील मुद्दयांबाबत मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचेशी सविस्तर चर्चा करणे गरजेचे आहे.

01) प्रकल्पाची किंमत-प्रकल्प किंमत ही 40 कोटी गृहीत धरण्यात आलेली आहे व त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाची तेवढया रकमेस मान्यता घेण्यात आलेली आहे.

02. मेक इन इंडिया

03) युनिट जनरेशन अपेक्षित – सध्या 19704 एमडब्लूएच इतके गृहीत धरण्यात आले आहेत.

04) कॅपॅसिटी ऑफ प्लँट :- टेंडरमध्ये 10 मेगावॅट धरण्यात आलेली असून डी.सी.मध्ये ही 12 मेगावॅट इतकी होत आहे. (टेंडर पा.क्र.149 क्लॉज क्र.7-6 मुद्दा क्र.3)

05) पेमेंटच्या टर्मस

06) इतर अटी शर्ती.

मागणी:- तरी १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकामी मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचेशी टेंडरमधील उपरोक्त अटी व शर्तीबाबत पुन्हा एकदा चर्चा होऊन दुसरे वेळेस फेर ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.७८४ **१० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकामी ई-निविदा दि.१०.०९.२०१८ रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करण्यासाठी दि.०१.१०.२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर दि.२४.१०.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र याकालावधीत एकच (०१) ई-निविदा प्राप्त झाली. त्यानंतर दि.०२.११.२०१८ पर्यंत तिसऱ्या वेळेस मुदतवाढ देण्यात आली. मात्र या मुदतीत दोनच (०२) ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर पुन्हा दि.२७.११.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या मुदतीत तीन (०३) ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.**

**परंतु तीनही निविदाधारकांना पात्रतेसाठी आवश्यक असलेले ७० टक्के मार्क मिळालेले नसल्याने तीनही निविदाधारकांना संस्थानचे याकामाचे अधिकृत सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे अभिप्रायानुसार अपात्र ठरविण्यात आले होते.**

**तीन वेळा ई-निविदा प्रक्रिया राबवुनही प्रतिसाद मिळत नसल्याने ई-निविदेतील अटी/शर्तीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे का, याबाबत आजचे सभेमध्ये चर्चा करण्यात आली. त्यावेळी मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकामी ई-निविदाधारकांकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने ई-निविदा टेंडरमधील अटी-शर्ती मध्ये काही बदल करावे लागतील अशी माहिती त्यांनी सभेत दिली. त्यांनी ई-निविदेतील अटी शर्तीबाबत त्यांनी खालील तक्त्यात दर्शविले प्रमाणे बदल सुचविले.**

Amendment in Clauses of 10 MW Tender
10 MW Grid Connected Photo Voltaic Solar Power Plant for Captive use of
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

| Sr. No. | Present Tender Clause | Clause No. & Page No. | Corrected as per discussion in Meeting of Board of Management ( to be mentioned in Technical Bid ) (i.e. Documents to be furnished by bidder) |
|---|---|---|---|
| 1 | Contract Performance Bank Guarantee (CPBG) & Performance Guarantte Deposit (PGD) for<br>1. EPC Contract<br>2. Operation & Maintenance Contract<br>(I). The contractor shall furnish<br>a) Initial Security Deposit 2.5 % of Total Contract Value against Contract Performance Guarantee through RTGS within 15 days on issuing LOA, &<br>b) Balance Amount of 2.5% of Total Contract Value against Contract Performance Guarantee, through an unconditional and irrevocable bank guarantee ( CPBG ) for due Performance as per Format attached and which shall be for 5 % { (a) + (b) } of the Total Contract Value (i.e. total sum of all the supply contract, land & civil works contract, erection contract and O & M Contract) along with Contract Performance Guarantee Deposit (CPGD) of 5% of total contract value within 15 days from LOA and shall be valid up to 90 days beyond defect liability period as mentioned in SCC Clause 5.20.<br>II). The Contractor shall furnish within 15 days from the date of completion of first year of free O & M, the O & M Performance Guarantee Deposit ( O & M PGD ) (for first 5 years of O & M) for due Performance of contract and which shall be for 5 % of the Total Contract Value ( i.e., total sum of all supply contract, erection contract, civil works contract and O & M Contract ) and valid for 60 months plus 6 months of claim period. The CPBG & CPGD submitted at the time of LOA for EPC contract shall be returned once the O & M PGD is submitted.<br>III). The Contractor shall also furnish within 15 days prior to the date of expiry of the O & M PGD mentioned at Para - (II) above, the O & M Performance Guarantee Deposit ( O & M PGD ) (for next 5 years of O & M ) for due Performance of contract and which shall be for 5 % of the Total Contract Value and valid for 60 months plus 6 months of claim period.<br>Payment against Contract Performance Guarantee Deposit ( CPGD ) and O&M Performance Guarantee Deposit ( O & M PGD ) will be made strictly through Online RTGS only. | **Section II – Instructions to Bidder - Clause No. 2.2, Page No. 14, 15** | Contract Performance Bank Guarantee (CPBG) & Performance Guarantte Deposit (PGD) for<br>1. EPC Contract<br>2. Operation & Maintenance Contract<br>**1. EPC Contract**<br>I) Initial Security Deposit 2.5 % of Total Contract Value against Contract Performance Guarantee to be deposited by Bidder through RTGS within 15 days on issuing LOA, in which the EMD submitted by the successful bidder at the time of submission of bid will be converted into Security Deposit and remaining balance amount to be deposited by Bidder through RTGS within 15 days on issuing LOA.<br>II) The contractor shall alsofurnish within 15 days from the date of issue of Letter of Award (LOA), an unconditional and irrevocable bank guarantee for due Performance as per Format attached and which shall be for 7.5 % of the total Contract Value (i.e. total sum of all the supply contract, land & civil works contract, erection contract and O & M Contract) and shall be valid up to 90 days beyond defect liability period as mentioned in SCC Clause 5.20.<br>**2. Operation & Maintenance Contract**<br>A) **The AMC Amount is 10 % of the total Contract Value**(i.e., total sum of all supply contract, erection contract, civil works contract and O & M Contract).<br>I) O&M Security Deposit 2.5 % of total AMC Amount against O&M Performance Guarantee to be deposited by successful bidder through RTGS within 15 days from the date of completion of first year of free O & M, valid for next 10 years plus 3 months of claim period.<br>II) The Contractor shall also furnish within 15 days from the date of completion of first year of free O&M, an unconditional and irrevocable bank guarantee for O & M for due Performance of contract as per Format attached and which shall be for 7.5**% of the total AMC Amount** and valid for next 10 yearsplus 3 months of claim period. TheSecurity Deposit & CPBG submitted at the time of LOA for EPC contract shall be returned once the O & M BG and O&M security deposit through RTGS is submitted. |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | Bidders Technical Eligibility Criteria<br>a) The bidder should have designed, supplied, erected and commissioned on turnkey basis of Solar Photo Voltaic (SPV) based grid connected solar power plant(s) of 10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW (10 MW cumulative) or above installed capacity in India in any two calendar years or two financial years in the last five years from the bid due date.<br>b) The reference solar PV plant of 10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW (10 MW Cumulative) or above capacity must have been in successful operation for at least 24 months up to the bid due date.<br>c) The bidder should be presently in the business of Operation & Maintenance (O&M) of solar PV plants and should have experience of successful operation and maintenance of solar PV plant of 10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW (10 MW Cumulative) or above capacity in India for a period at least of 2 years up to the bid due date. | Section III-Bidders Eligibility Criteria, Clause No. 3.1, 3.2, Page No. 41 | Bidders Technical Eligibility Criteria<br>a) The bidder should have designed, supplied, erected and commissioned on turnkey basis of ground mounted Solar Photo Voltaic (SPV) based grid connected solar power plant(s) of 10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW(10 MW cumulative) or above **installed capacity in India in the last five years from the bid due date.**<br>b) The reference solar PV plant of 10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW(10 MW cumulative) or above capacity must have been in successful operation for **at least 12 months** up to the bid due date.<br>c) The bidder should be presently in the business of Operation & Maintenance (O&M) of solar PV plants and should have the experience of successful operation and maintenance of solar PV plant of 10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW or above capacity in India for a period of **at least 12 months** up to the bid due date. |
| 3 | Bidders Financial Eligibility Criteria<br>a) The minimum average annual turnover of the Bidder in the preceding 3 (Three) financial years as on bid issue date should be at least INR 60 Crores (Indian Rupees Sixty Crores only). The turnover should be gradually increasing or same in average, not decreasing.<br>b) EPC Contractor should be in profits in last three years.<br>c) The Net Worth for the last year should be positive. | Section III-Bidders Eligibility Criteria, Clause No. 3.3, Page No. 41 | Bidders Financial Eligibility Criteria<br>a) The minimum average annual turnover of the Bidder in the preceding 3 (Three) financial years as on bid issue date should be at least INR 60 Crores (Indian Rupees Sixty Crores only).<br>**Financial Years :-**<br>**2015-2016, 2016-2017, 2017-2018**<br>b) EPC Contractor should be in profits in last three years.<br>c) The Net Worth for the last year should be positive. |
| 4 | The bidder should identify suitable Class I private land of minimum 50 Acres flat land having high solar radiation (5 - 6 kWh/$m^2$/day)required for installation of the solar power project in any solar potential region in Maharashtra State in India.<br>The offered land should have clear title and free from any encumbrances, encrochments or litigation.<br>The bidder should have any of the following arrangements for having the land:<br>1. Bidder already having possession of suitable private land in his own name. Also furnish the location of land with the bid.<br>2. Bidder should identify suitable and adequate flat land in Maharashtra. Also furnish the location of land with the bid.<br>3. The bidder should have an Agreement with a third party (an individual or company) or successful Bidder's subsidiary or successful Bidder's group company who is/are either in | Section III-Bidders Eligibility Criteria, Clause No. 3.4, Page No. 42 | The bidder should identify **suitable Class I private land of minimum 50 Acres flat land having high solar radiation (5 - 6 kWh / $m^2$ / day )** required for installation of the solar power project in any solar potential region in Maharashtra State in India.<br>The offered land should have clear title and free from any encumbrances, encrochments or litigation.<br>The bidder should have any of the following arrangements for having the land:<br>1. Bidder already having possession of suitable private land in his own name. Also furnish the location of land with the bid.<br>2. Bidder should identify suitable and adequate flat land in Maharashtra. Also furnish the location of land with the bid.<br>3. The bidder should have an Agreement with a third party (an individual or company) or successful Bidder's subsidiary or successful Bidder's group company who is/are either in |

| | | | |
|---|---|---|---|
| | possession / having registered Agreement to Sell (ATS) with owner of private land along with commitment to transfer such land to SSSTS without any consideration from SSSTS and should submit the requisite documents along with bid.<br>4. It is mandatory to submit the Certificate of concerned authority with Technical Bid about concerned land having solar radiation norms are (5 - 6 kWh/m$^2$/day) suitable for installation of the solar power project. | | possession / having registered Agreement to Sell (ATS) with owner of private land along with commitment to transfer such land to SSSTS without any consideration from SSSTS and should submit the requisite documents along with bid.<br>4. It is mandatory to submit the self-certified Certificate of bidder with Technical Bid about concerned land having solar radiation norms are (5 - 6 kWh/m$^2$/day) suitable for installation of the solar power project. **Solar radiation analysis file should be carried out by METEONORM software and compulsorily submit along with this certificate. ( The format of the Certificate are provided in Tender Document )** |
| 5 | 5.12 Terms and Payment<br>Appendix 12: Terms of Payment for EPC<br>A) **Supply of Plant & Equipment** including PV Modules, Inverter and BOS up to site (FOR basis) including transportation and insurance along with mandatory spares:<br>1) 60% of the total price for supplies of Plant and Equipment shall be paid against delivery of supplies on pro-rata basis (equipments wise) against receipt of material at site under the Contract and obtaining transfer of private land (mutation) for commencement of project activities.<br>2) 10% of the total price for supplies on erection of plant & equipment including PV Modules, Inverter and on pro-rata basis on certification by the Project Manager/ Engineer In - Charge for the quantum of work completed.<br>3) 25% of the total price for supplies of Plant and Equipment shall be paid on Operational Acceptance of the Facility pursuant to successful Guarantee Tests and demonstration of PR and submission of all as – built documentation.<br>4) 5% of the total price for supplies of Plant and Equipment shall be paid on supply of agreed generation for the successful first year of operation. | **Section V-Special Conditions of Contract- Clause No. 5.12 Page No. 64-68**<br><br>**Section VIII Forms and Formats- Appendix -12 Terms of Payment for EPC, Page No. 243-244** | 5.12 Terms and Payment<br>Appendix 12: Terms of Payment for EPC<br>A) **Supply of Plant & Equipment** including PV Modules, Inverter and BOS up to site (FOR basis) including transportation and insurance along with mandatory spares:<br>1) 70% of the total price for supplies of Plant and Equipment shall be paid against delivery of supplies on pro-rata basis (equipments wise) against receipt of material at site under the Contract and obtaining transfer of private land (mutation) for commencement of project activities.<br>2) 10% of the total price for supplies on erection of plant & equipment including PV Modules, Inverter and on pro-rata basis on certification by the Project Manager/ Engineer In-Charge for the quantum of work completed.<br>3) 15% of the total price for supplies of Plant and Equipment shall be paid on Operational Acceptance of the Facility pursuant to successful Guarantee Tests and demonstration of PR and submission of all as – built documentation.<br>4) 5% of the total price for supplies of Plant and Equipment shall be paid on supply of agreed generation for the successful first year of operation. |
| | B) **Procurement & Development of land, Civil and Allied Works**<br>1) 70% of total price of land procurement & development cost and the total price of Civil Works shall be paid progressively on certification by the Consultant for the quantum of work completed/ Milestones achieved after successful clearance of quality check points involved in the quantum of work / Milestones | | B) **Procurement & Development of Land, Civil & Allied Works**<br>1) 80% of total price of land procurement & development cost and the total price ofCivil Works shall be paid progressivelyon certification by the Consultant for the quantum of work completed/ Milestones achieved after successful clearance of quality check points involved in the quantum of work / Milestones |

| | | | |
|---|---|---|---|
| | billed and after transferring the procured land on the name of Sansthan with certified mutation entry & title on 7/12 extract.<br>2) 25% of total price of land procurement & development cost and the total price of Civil Works shall be paid on completion of all the civil works including finishing and debris removal.<br>3) 5% of total price of land procurement & development cost and the total price of Civil Works shall be paid on supply of agreed generation for the successful first year of operation. | | billed and after transferring the procured land on the name of Sansthan with certified mutation entry & title on 7/12 extract.<br>2) 15% of total price of land procurement & development cost and the total price of Civil Works shall be paid on completion of all the civil works including finishing and debris removal.<br>3) 5% of total price of land procurement & development cost and the total price of Civil Works shall be paid on supply of agreed generation for the successful first year of operation. |
| | C) Erection, Testing and Commissioning (ETC):<br>1) 60% of the total price of Erection, Testing and Commissioning shall be paid on pro-rata basis (equipments wise) on completion of installation of equipment on certification by the Engineer-In-Charge/ Project Manager for the quantum of work completed after successful clearance of quality check points involved in the quantum of work billed.<br>2) 10% of the total price of ETC shall be paid on pro-rata basis on completion of internal lines , yard/ pooling substations and installation of meter inside yard (if applicable)<br>3) 10% of the total price of ETC shall be paid on completion of evacuation system & metering and submission of Commissioning Certificate of the pooling sub-station issued by State Electricity Board.<br>4) 15% of the total price of Erection, Testing and Commissioning shall be paid on Operational Acceptance of the Facility pursuant to successful Guarantee Tests and demonstration of PR.<br>5) 5% of the total price of Erection, Testing and Commissioning shall be paid on supply of agreed generation for the successful first year of operation. | | C) Erection, Testing & Commissioning (ETC)<br>1) 70% of the total price of Erection, Testing and Commissioning shall be paid on pro-rata basis (equipments wise) on completion of installation of equipment on certification by the Engineer-In-Charge/ Project Manager for the quantum of work completed after successful clearance of quality check points involved in the quantum of work billed.<br>2) 10% of the total price of ETC shall be paid on pro-rata basis on completion of internal lines , yard/ pooling substations and installation of meter inside yard (if applicable)<br>3) 10% of the total price of ETC shall be paid on completion of evacuation system & metering and submission of Commissioning Certificate of the pooling sub-station issued by State Electricity Board.<br>4) 5% of the total price of Erection, Testing and Commissioning shall be paid on Operational Acceptance of the Facility pursuant to successful Guarantee Tests and demonstration of PR.<br>5) 5% of the total price of Erection, Testing and Commissioning shall be paid on supply of agreed generation for the successful first year of operation. |
| 6 | Fulfillment of eligibility criteria and certain additional conditions in respect of each of the below type of bidders are stated below.<br>Bids may be submitted by:<br>a. Single Entity (called sole bidder) including incorporated JVC.<br>b. Newly incorporated Joint Venture Company (JVC)<br>c. Consortium (to be incorporated as JVC) having a maximum of three members;<br>d. An Indian arm of a foreign company;<br>e. A Foreign Company<br>The above Joint Venture (JV) clause has already mentioned in the tender document while in pre-bid | **Section II – Instructions to Bidder - Clause No. 2.5, Page No. 19,20,21** | Fulfillment of eligibility criteria and certain additional conditions in respect of each of the below type of bidders are stated below.<br>Bids may be submitted by:<br>a. Single Entity (called sole bidder)<br>b. Consortium (to be incorporated as JVC) having a maximum of three members;<br>( Note:- The bid shall specifically identify and describe each member of the consortium and shall submit a Consortium Agreement as per Appendix-21 along with their offer. |

| | | | |
|---|---|---|---|
| | meeting as instructed by SSST Shirdi, JV was not allowed for finalization of the bid process. | | |

A. **Bid Evaluation Methodology:- Section IV- Clause No. 4.1 (a) & (b), Page No. 45 to 49**

a. **Technical Bid Evaluation Criteria**

| Sr. No. | Criteria | Maximum Quality Points | Criteria for assigning Points | Corrected as per discussion in Meeting of Board of Management ( to be mentioned in Technical Bid ) (i.e. Documents to be furnish by bidder) |
|---|---|---|---|---|
| A | Over allExperience | 100 | | |
| 1 | Technical Eligibility Criteria | | | |
| | a) The bidder should have designed, supplied, erected and commissioned on turnkey basis of ground mounted Solar Photo Voltaic (SPV) based grid connected solar power plant(s) of **10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW (10 MW Cumulative)**or above **installed capacity in India in the last five years from the bid due date.**<br>b) The reference solar PV plant of **10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW (10 MW cumulative)** or above capacity must have been in successful operation **for at least 12 months** up to the bid due date. | 25 | 10 MW and above 10 MW = 25 Marks<br><br>Below 10 MW = 0 Marks | 1. Experience of onlycommissioned/ completed solarprojects as on bid due datewill be considered forevaluation. Validdocumentary proof shallbe submitted along withthe Bid to justify andsupport claim for marksagainst each Technical/qualityEvaluation criteria.<br>2. In support of claim forExperience related to projectagainst criteria (a) &(b), dataof executed, installed andcompleted solar projects of 10 MW cumulative or above capacity only should be submittedand considered forevaluation as proof ofexperience. Clientcertificate for satisfactorycompletion of the job, commissioning certificate from Government authority orother valid proof shall beattached with properreference in the Bid.<br>3. Incomplete project will not be considered valid for this evaluation.<br>4. For validity of proof, Owner judgment shall be final and binding to the Bidder. |
| | c) The bidder should be presently in the business of Operation & Maintenance (O&M) of solar PV plants and should have experience of successful operation and maintenance of solar PV plant of 10 MW or 2 X 5 MW or 5 X 2 MW or 10 X 1 MW **(10 MW Cumulative)** or above capacity in India for a period of **at least 12 months** up to the bid due date. | 25 | 10 MW and above 10 MW = 25 Marks<br><br>Below 10 MW = 0 Marks | 1. Minimum 12 month O&M Experience for only solar projects as on bid due date will be considered for evaluation. Valid documentary proof shall be submitted along with the Bid to justify and support claim for marks against each Technical/ quality Evaluation criteria.<br>2. In support of claim for experience related to project against criteria (c), data of O&M completed solar projects of 10 MW cumulative or above capacity only should be submitted and considered for evaluation as proof of experience. Client certificate for satisfactory completion of the job or other valid proof shall be attached with proper reference in the Bid.<br>3. For validity of proof, Owner judgment shall be final and binding to the Bidder. |
| 2 | Financial Eligibility Criteria (FEC) | 25 | | |
| | a) The minimum average annual | 25 | ≥60Cr ≤ | 1. In support of claim related to Financial Eligibility, financial data, Audited Balance |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | turnover of the Bidder in the preceding 3 (Three) financial years as on bid issue date should be at least INR 60 Crores (Indian Rupees SixtyCrores only).<br>**Financial Years :-**<br>**2015-2016, 2016-2017, 2017-2018**<br>b) EPC Contractor should be in profits in last three years.<br>c) The Net Worth for the last year should be positive. | | 100Cr – 20 Marks<br><br>>100Cr – 25 Marks | sheet of last three Financial Years, Net worth Certificate from Certified Auditor will be considered for evaluation. Valid documentary proof shall be submitted along with the Bid to justify and support claim for marks against each evaluation criteria.<br>2. For validity of proof, Owner judgment shall be final and binding to the Bidder. |
| 3 | **Qualified Technical Staff For EPC and O & M** | **10** | | |
| | i. **Team Leader (CivilEngg) -1 No.**<br>Years of experience in installation & Commissioning of project | 5 | ≥5 Yrs ≤10 Yrs – 3 Marks<br><br>>10 Yrs – 5 Marks | 1. The points would be awarded on the basis of general qualification,competency for years ofexperience based on the Bio data submitted.<br>2. The person whose Biodatais furnished must beon a payrole of the companyand not a hired expert orthird party. |
| | ii. **Project Manager (ElectricalEngg) – 1 No.**<br>Years of experience in installation & Commissioning of project | 5 | ≥5 Yrs ≤10 Yrs – 3 Marks<br><br>>10 Yrs – 5 Marks | |
| 4 | **Technical Experts** | **10** | | |
| | i. **Technical Experts in Designing and Engineering (Civil Engg) - 1 No.**<br>Years of experience in Designing &Engineering of solar project | 5 | ≥5 Yrs ≤10 Yrs – 3 Marks<br><br>>10 Yrs – 5 Marks | 1. The points would be awarded on the basis of general qualification, competency for years of experience based on the Bio data submitted.<br>2. The person whose Biodata is furnished must be on a payrole of the company and not a hired expert or third party. |
| | ii. **Technical Experts in Designing and Engineering (Electrical Engg) - 1 No.**<br>Years of experience in Designing & Engineering of solar project | 5 | ≥5 Yrs ≤10 Yrs – 3 Marks<br><br>>10 Yrs – 5 Marks | |
| 5 | **Softwares for Design and Engineering** | **5** | | |
| | 1. Solar Data Analysis Software (Meteonorm, Solar GIS or any other software having high accuracy in solar data analysis)<br>2. Solar Plant Designing Software (PV Syst)<br>3. Shadow Analysis Software (Sketch Up)<br>4. STADD Pro<br>5. AUTO CAD | 5 | 1 Point- For each software | 1. The list of softwares submitted will have license copy with bidder.<br><br>2. Also submit the copy of license, certificate related to the softwares for evaluation |

**Capacity of Project:-** Instead of 10 MW ( A.C.), it should 10 M.W. (D.C.) to be mentioned in Bid and further Electricity generation and A.C. Capacity of the project to be calculated and it should be mentioned in Technical Bid Document by Consultant.

**Technical Merit:-** Each Technical Proposal will receive a technical merit score based on the above mentioned evaluation criteria with acceptance to technical bid without any deviation. The bidder having

more than or equal to 70 Points will be considered technically qualified for Price bid opening. The bidder should compulsorily qualify the Sr. No. 1 & 2 above.

Price (Financial) Bid Evaluation Criteria

i) The Price Bid of the Bidders, who are technically qualified and responsive, will be opened. The Price Bid should contain the total contract valuequoted by the Bidder including all the expenses and taxes, as per the Price Bid Schedule.

ii) Financial Evaluation of the technically qualified bids shall be carried out with following major considerations:

a) Total EPC contract price including total O & M charges for 10 years without escalation quoted by the bidder including GST shall be considered for evaluation.

b) Selection of EPC contractor should be on L1 basis.

**उपरोक्त तक्तयात मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी सुचविल्याप्रमाणे ई-निविदेतील टेंडरमधील अटी व शर्तीबाबत समितीमध्ये साधक बाधक चर्चा होऊन त्यास मान्यता देण्यात आली. तसेच ई-निविदेतील टेंडरमधील अटी व शर्तीबदल करुन नव्याने तात्काळ ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची तुकडी वाढ व B.SC. (Computer Science) व BCA हा नविन अभ्यासक्रम सुरु करणेकामी मुदतठेव पावती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रस्ताविकः- शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/ मशि-४, दि.१५ जून, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा महाविद्यालय या नावाने नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/९४४/२०१८ दि.०२ जुलै, २०१८ अन्वये श्री साईबाबा महाविद्यालय हा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला असून, त्याचा शुभारंभ दि.१७.०७.२०१८ रोजी पासून झालेला आहे. सन २०१८-१९ या वर्षामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत एकूण ३१५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१) नुसार श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेबाबत सुचना दिल्या त्यासाठी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळावर Online प्रस्ताव सादर करुन त्यासाठी रु.१,९८,०००/- मात्र लागणारे शुल्क भरणेस मान्यता देण्यात आली. श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची दुसरी तुकडी शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेसाठी आवश्यक असणा-या मनुष्यबळ, वर्ग खोल्या, फर्निचर व इतर अनुषंगिक येणा-या खर्चासह सविस्तर प्रस्ताव स्वतंत्रपणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावी अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

त्यानुसार B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी तसेच नैसर्गिक तुकडीवाढीचे प्रस्ताव दि.०१.१०.२०१८ रोजी Online सादर करण्यात आलेला आहे. तसेच दि.०८.१०.२०१८ रोजी पुणे विद्यापीठात प्रत्यक्ष जाऊन प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

विद्यापीठात दाखल केलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडील संदर्भ क्र.सीए/२७७६ दि.०६.१२.२०१८ रोजीचे पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी व विशेषस्तर विषय सुरु करण्यास परवानगी देण्यासाठी तज्ञ समितीची नियुक्ती करण्यात आलेली असून, सदरची समिती संस्थानचे महाविद्यालयास दि.१२-१३ डिसेंबर, २०१८ रोजी भेट देऊन पाहणी करणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने निश्चित केलेल्या धोरणानुसार संस्थानच्या नावावर रक्कम रुपये १५,००,०००/-ची मुदत ठेव पावती करावी लागणार आहे.तसे उपरोक्त संदर्भ क्र.२ चे पत्रातही विद्यापीठाने नमूद केलेले आहे. त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

०१. नवीन अभ्यासक्रमासाठी - रुपये ५ लाख.
०२. नवीन विषयासठी - रुपये २ लाख.
०३. नवीन विद्याशाखासाठी - रुपये ५ लाख.
०४. अतिरिक्त तुकडीसाठी - रुपये ३ लाख.

तसेच मुदतठेव निधी विद्यापीठाचे पुर्व परवानगी शिवाय न काढण्या बाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बॅंकेचे व संस्थानचे संयुक्त आश्वासनपत्र द्यावे लागणार आहे. सदरची बाबत धोरणात्मक असल्यामुळे याबाबत मा.व्यवस्थापन समितीची सभेत चर्चा होवून कार्यवाही करणे योग्य राहील.

मागणी– प्रास्ताविकात नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेवून सदर विषयावर चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची तुकडी वाढ व B.SC. (Computer Science) व BCA हा नविन अभ्यासक्रम सुरु करणेसाठी विद्यापीठाने निश्चित केलेल्या धोरणानुसार संस्थानच्या नावावर रक्कम रुपये १५,००,०००/-मात्रची खालील प्रमाणे राष्ट्रीयकृत बॅंकेत मुदत ठेव पावती करणेस मान्यता देण्यात आली.**

**०१. नवीन अभ्यासक्रमासाठी - रुपये ५ लाख.**
**०२. नवीन विषयासठी - रुपये २ लाख.**
**०३. नवीन विद्याशाखासाठी - रुपये ५ लाख.**
**०४. अतिरिक्त तुकडीसाठी - रुपये ३ लाख.**

**तसेच सदरचा मुदतठेव निधी विद्यापीठाचे पुर्व परवानगी शिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बॅंकेचे व संस्थानचे संयुक्त आश्वासनपत्र देणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१६ **नियोजीत श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शन रांग हॉल यांना जोडणाऱ्या Connecting Corridor चे बांधकामाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-

अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयः-

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ नुसार श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकामाकरीता निम्नतम निविदाधारक भानु कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८१ अन्वये, काम सुरु करण्याची तारीख दि.१९/१०/२०१८ निश्चित करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

प्रस्तावना - सदर प्रकल्पाचे भूमीपूजन मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे हस्ते दि.१९/१०/२०१८ रोजी झाले असून, त्या तारखेपासून कामास सुरुवात झालेली आहे. ठेकेदार यांचे समवेत दि.२२/१०/२०१८ रोजी करारानामा करण्यात आलेला आहे. सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| ठेकेदार | भानू कन्ट्रक्शन, मुंबई. |
| कार्यादेश | जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८. |
| मंजूर निविदा रक्कम | रु.१०९.५० कोटी. |
| करारनामा दिनांक | दि.२२/१०/२०१८. |
| कामाचा कालावधी | १२ महिने. |
| कामाचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ | २२२१४ चौ.मीटर |
| काम जलद गतीने पूर्ण केल्यास देण्यात येणारे प्रोत्साहन भत्ता | मंजूर निविदा रकमेच्या १% रक्कम प्रती महा.(सदरहू रक्कम जास्तीत जास्त २% असेल). |
| विलंबापोटी दंड | मंजूर निविदा रकमेच्या ०.०५% प्रती दिवस. (दंड पोटी जास्तीजास्त मंजूर निविदा रकमेच्या १०% रक्कम कपात करणे). |

ठेकदार यांनी साईटवर बॅरेकेडींग करणे, साईट ले-आऊट मार्किंग करणे, सर्व्हे नं.१२५ मध्ये बॅचिंग प्लॉन्ट व लेबर कॅम्प, ११ कम्बाईन्ड फूटींगचे खोदाई, पी.सी.सी व ०९ फुटींगचे स्टील रिन्फोर्समेंटचे काम पूर्ण केलेले आहे.

ठेकेदार यांनी दि.२२/११/२०१८ व दि.३०/११/२०१८ रोजीचे पत्राव्दारे नियोजीत दर्शनरांग प्रकल्प व मंदिर परिसर यांना जोडणा-या Connecting Corridor चे कामास सुरुवात करणेची परवानगीची मागणी केलेली आहे. सदर Connecting Corridor चे कामात सध्याचे विद्यूत ट्रान्सफॉर्मर व मंदिर परिसरातील काही झाडांचा अडसर होणार आहे. याकरीता विद्युत विभाग व बगीचा विभागास पत्राव्दारे कळविणेत आले आहे. सदर विभागामार्फत पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

सदर Connecting Corridor हा पिंपळवाडी रस्त्यावरुन मंदिर परिसरात येणार आहे. Connecting Corridor चे कामात मंदिर परिसराचे काही भागातील सध्या नव्याने बसविलेली ग्रेनाईट फरशी तुटणार आहे व पी.आर.ओ विभागाजवळील वॉटर फाऊंटन व लॉन निघणार आहे. Connecting Corridor चे कामात अंदाजे खालीलप्रमाणे फ्लोरींग काढून ती परत बसवावी लागेल.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लेंडीबाग सभागृह गार्डन / फाऊंटन एरीया | - | ११६.५१ चौ. मी. |
| २. | गेट नं.०२ समोर | - | ८५.२८ चौ. मी. |
| | **एकूण अंदाजे** | **-** | **२०१.७९ चौ. मी.** |

मंदिर परीसरातील सर्व फ्लोरिंगचे काम शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने तसेच मान्यवर व्यक्तींच्या भेटीचे नियोजन असल्याने माहे मार्च-२०१८ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. सदर Connecting Corridor चे कामासाठी वरीलप्रमाणे फ्लोरींग काढावी लागेल व काम पूर्ण झालेनंतर ती परत बसवावी लागेल. त्यामध्ये जवळपास ७५ % फ्लोअरींग चांगली निघेल व २५% फ्लोअरींग काढतेवेळी तुटेल, असा अंदाज आहे. वरील क्षेत्रफळाचे फ्लोरींगकरीता एकुण रक्कम रू.८.२४ लक्ष मात्र इतका खर्च झालेला आहे. त्यापैकी ७५ % फ्लोअरींग चांगली निघेल म्हणजे एकूण रू.८.२४ लक्ष पैकी रु.६.१८ लक्ष खर्च वाचणार आहे व उर्वरीत २५ % फ्लोअरींग जी काढतेवेळी तुटेल असा अंदाज आहे त्याची किंमत रु.२.०६ लक्ष मात्र इतकी आहे. तथापी, खाली नमूद केलेल्या निविदा अटी-शर्तीनुसार सदरहू फ्लोअरींग काढणे व पूर्ववत बसविणे यासाठी होणारा खर्च संबधीत ठेकेदार करणार असल्याने यामध्ये संस्थानला कोणताही अतिरिक्त खर्च येणार नाही.

निविदेतील शर्त क्र.२८, पृष्ठ क्र.५१ (Damages), अन्वये याकामात होणारे परिसराचे फ्लोरींगचे व इतर बाबींचे नुकसान हे ठेकेदार यांची जबाबदारी असेल व ते ठेकेदार यांनी दुरुस्त करावयाचे आहे. तसेच निविदेतील पृष्ठ क्र.२० वरील Declaration of Contractor व पृष्ठ क्र.३४ वरील Disclaimer नुसार याकामासंबधी व याचे संलग्न सर्व कामे ठेकेदार यांनी करावयाची आहे. त्यानुसार कॉरीडॉरच्या पायाचे काम झाल्यानंतर फ्लोअरींग पूर्ववत दुरुस्त करणेचे काम ठेकेदार भानु कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेकडून कुठलाही अतिरिक्त मोबदला न देता करून घ्यावे लागेल.

ठेकेदार यांनी दि.२२/११/२०१८ व दि.३०/११/२०१८ रोजीचे पत्रान्वये नियोजित दर्शनरांग प्रकल्प व मंदिर परिसरास जोडणा-या Connecting Corridor चे कामास परवानगी मिळणेची विनंती केलेली आहे. तथापी, आता नाताळ उत्सव व नविन वर्षारंभामुळे श्रींचे दर्शनासाठी भक्तांची गर्दी वाढणार आहे. त्यामुळे सदर Connecting Corridor चे काम आता हाती घेतल्यास भक्तांची गैरसोय होईल. त्यामुळे सदर काम दि.०५/०१/२०१९ नंतर हाती घेणे योग्य होईल.

प्रस्ताव – तरी नियोजीत कॉरीडॉरचे बांधकामामुळे मंदिर परिसरातील अंदाजे रु.२.०६ लक्ष किंमतीचे ग्रेनाईट फ्लोअरींगची तोडफोड होणार असलेची बाब निदर्शनास आणणेत येत आहे. तसेच सदर Connecting Corridor चे काम दि.०५/०१/२०१८ नंतर गर्दी कमी झाल्यावर ठेकेदार मे.भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेमार्फत हाती घेणेसाठी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजीत कॉरीडॉरचे बांधकामामुळे मंदिर परिसरातील अंदाजे रु.२.०६ लक्ष किंमतीचे ग्रेनाईट फ्लोअरींगची तोडफोड होणार आहे, याची नोंद घेण्यात आली. तसेच नाताळ उत्सव व नविन वर्षारंभामुळे श्रींचे दर्शनासाठी भक्तांची गर्दी वाढणार आहे त्यामुळे भक्तांची गैरसोय टाळण्यासाठी सदर काम दि.०५/०१/२०१९ नंतर करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

आयत्या वेळेचा

विषय नं.१७, निर्णय क्र. ७८७- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६९७ (३) अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या १४ कियॉस्क/गाळे वापरासाठी मुदतवाढ देणेसंबधी सदर सोसायटीचे चेअरमन व सदस्य यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलविण्यात यावे व तोपर्यंत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा. असे ठरले होते.

त्यानुसार आजचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि.शिर्डीचे चेअरमन, व्हा.चेअरमन व सचिव हे उपस्थित होते. समिती सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. त्यानुसार श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या १४ कियॉस्क/गाळे वापरासाठी दि.०७/१०/२०१८ ते दि.०६/०९/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रति कियॉस्क मागील मासिक भाडे रु.४,३९२/- मध्ये १०% वाढ करुन (रु.४,३९२/- +१०% रक्कम रु.४३९/-= रु.४,८३१/-) रक्कम रु.४,८३१/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१८, निर्णय क्र.७८८- मा.सर्वोच्च न्यायालयामधील एस.एल.पी.नं.२९८७५/२०१५, साखरबाई हरिभाऊ शेळके (मयत) करीता श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर व इतर विरुध्द श्री साईबाबा संस्थान व इतर या दाव्याचे संस्थानच्या वतीने कामकाज पाहाणारे ॲड श्री.संजय खर्डे यांच्या अंतीम बिलाची रक्कम रु.१,१०,०००/-मात्र (अक्षरी रक्कम रु.एक लाख दहा हजार मात्र) त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- विधी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१९, निर्णय क्र.७८९- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६९३ नुसार साईप्रसाद निवासस्थान विभागाकरीता प्रिंटेड बेडशिट व पिलोकव्हरचे नमुने मान्यतेसाठी महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधीस उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. संतोष ठाकरे हे प्रिंटेड बेडशिट / पिलोकव्हरचे नमुन्यासह आजचे व्यवस्थापन समितीसमोर उपस्थित होते. सदर नमुन्याची पाहणी करुन त्यापैकी प्रिंटेड बेडशिट/ पिलोकव्हरच्या ०४ नमुन्यांना मान्यता देऊन, त्यानुसार साईप्रसाद निवासस्थान विभागाकरीता खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२०, निर्णय क्र.७९०- श्री साईबाबा संस्थानच्या कायम कर्मचाऱ्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ज्या सुविधा/ उपचार उपलब्ध होत नाहीत त्यासाठी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार / शस्त्रक्रियेसाठी पाठवितांना अपेक्षित खर्चापोटी रक्कम रु. एक लाख पावेतो अग्रीम रक्कम देण्यास मान्यता देण्यात आली. सदर रक्कम देतांना कर्मचाऱ्यावरील करावयाच्या उपचार/ शस्त्रक्रियेसाठी अपेक्षीत खर्चाचा अंदाज वैद्यकीय संचालक व संबधीत विभागाच्या तज्ञ डॉक्टरांनी प्रमाणीत करुन द्यावा. व त्यानुसार रक्कम रु. एक लाख पावेतो अग्रीम रक्कम द्यावी. यासाठी आवश्यक नियमावली करुन व्यवस्थापन समिती समोर मान्यतेसाठी सादर करावी. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२१, निर्णय क्र.७९१- संस्थानच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना श्री साईनाथ रुग्णालयात मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. त्याच धर्तीवर संस्थानचे कायम कर्मचाऱ्याप्रमाणे त्यांना देखील साईबाबा हॉस्पिटल येथे मोफत उपचार / सुविधा देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२२, निर्णय क्र.७९२- संस्थानचे प्रकाशने विभागाने २०१९ चे ऑफिस कॅलेंडर (दिनदर्शिका) छपाई करुन घेतले आहे. यापुर्वी संस्थानचे विविध विभागात व कार्यालयामध्ये खाजगी संस्थांची कॅलेंडर्स लावली जात होती. मात्र आता संस्थाननेच कॅलेंडर प्रकाशित केलेले असल्याने संस्थानच्या सर्व विभागात/कार्यालयात संस्थानची ऑफिस कॅलेंडर लावण्यात यावी. कोणत्याही खाजगी संस्थेची कॅलेंडर्स लावण्यात येऊ नये, असे ठरले. याकामी विभागांचे मागणीनुसार ऑफिस कॅलेंडर देणेस व त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाती (Publication Expenses) खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.११.२०१८ सभेतील निर्णय क्र.६९२ नुसार सर्व विश्वस्त व अधिकारी यांना मान्यवरांना देण्यासाठी दिनदर्शिका व दैनंदिनी देणेबाबत निर्ण्य झालेला आहे. त्याचप्रमाणे सर्व विश्वस्त व अधिकारी यांना मान्यवरांना देणेसाठी पुढील प्रमाणे ऑफिस कॅलेंडर्स (दिनदर्शिका) देण्यास व त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाती (Publication Expenses) खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.

| अ.नं | तपशिल | श्री साई दिनदर्शिका (६ पाने) २०१९ (देणगी मूल्य रु.३०/-) नग संख्या |
|---|---|---|
| ०१. | मा.अध्यक्ष महोदय, मा.व्यवस्थापन समिती | ७५ |
| ०२. | मा.उपाध्यक्ष महोदय, मा.व्यवस्थापन समिती | ७५ |
| ०३. | मा.अध्यक्ष- छाननी समिती- (श्री.के.यू. चांदीवाल साहेब) | ७५ |
| ०३ | मा.सदस्य, मा.व्यवस्थापन समिती (प्रत्येकी ७५ नग प्रमाणे ८ मा. समिती सदस्य) | १२०० |
| ०४ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ७५ |
| ०५ | मा.उप जिल्हाधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ४० |
| ०६ | मा.उप जिल्हाधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ४० |
| ०७. | पोलिस उपअधिक्षक, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | ४० |
| ०७ | मा.उप कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ४० |
| ०८ | सर्व प्रशासकीय अधिकारी आणि मा. कार्यकारी अभियंता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी (प्रत्येकी २० नग प्रमाणे x ०५ व्यक्ती) | १०० |
| ०९. | विधी व न्याय विभाग | २५ |
| | एकूण नग | १७८५ |
| | एकूण खर्च | ५३,५५०/- |

(कार्यवाही- प्रकाशने विभाग)

---

वरील निर्णय क्र.७२८ ते ७९२ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सायंकाळी ०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.